(**सभापतीस्थानी** : **माननीय उपसभापती**)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहात कोरम नाही त्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कोरम असल्याशिवाय चर्चा होऊ शकत नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहामध्ये कोरम नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 9 वाजून 50 मिनिटांनी 5 निमिटांकरिता स्थगित झाली.)

---------

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**<u>अंतिम आठवडा प्रस्ताव</u>**

**पृ.शी.**: राज्यात भूखंड वाटपात व इतर घोटाळयात झालेला करोडो रुपयांचा भ्रष्टाचार.

**मु.शी.**: राज्यात भूखंड वाटपात व इतर घोटाळयात झालेला करोडो रुपयांचा भ्रष्टाचार या विषयावर सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत, केशवराव मानकर, गोपीकिसन बाजोरिया, संजय केळकर, अनिल परब, सागर मेघे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांचा (म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा) प्रस्ताव.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २५९ अन्वये पुढीलप्रमाणे अंतिम आठवडा प्रस्ताव मांडतो.

"राज्यात शासनकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणात भूखंडांचे नियमबाह्य वाटप होणे, नगरपालिका, महानगरपालिकांतील नगररचनेचे आराखडे वारंवार बदलण्यात येणे, आरक्षणे उठवून मॉल, शॉपिंग कॉम्प्लेक्स यांची बांधकामे होणे, यात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होणे, अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी टी.डी.आर. देणे आवश्यक असताना तो त्यांना न देता त्यांच्या व्यतिरिक्त इतरांना देण्यात येणे, शासकीय भूखंडावर अतिक्रमण करणाऱ्यांविरुध्द तातडीने व कठोर स्वरुपाची कारवाई न होणे, नगरपालिका, महानगरपालिकेचे अधिकारी, पोलीस व विकासक यांच्या संगनमतामुळे अनेक बेकायदेशीर बांधकामे होणे, सिडको, एम.आय.डी.सी. सारख्या शासकीय उपक्रमांकडून अल्प दरात त्यांच्या मर्जीतील व्यक्तींना भूखंडाचे वाटप होणे, काही वेळेला हे वाटप विनानिविदा करण्यात येणे, महसूल व नगरविकास विभागाप्रमाणे शासनाच्या विविध विभागात विविध प्रकारचे भ्रष्टाचार होणे, पंतप्रधान पॅकेजअंतर्गत शेतकऱ्यांची कोंडी होणे, भूखंड व इतर घोटाळ्यात झालेल्या करोडो रुपयांच्या भ्रष्टाचारामुळे प्रचंड आर्थिक नुकसान होणे, शासनाचे सातत्याने त्याकडे होणारे दुर्लक्ष व याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. या अधिवेशनाच्या सुरुवातीला वक्फ बोर्डाच्या जमीन घोटाळयाबाबत चर्चा सुरु झाली होती. ही चर्चा दोन दिवस दोंन्ही सभागृहात झाली आहे. त्यावेळी यातून अनेक बाबी उजेडात आल्या आहेत. या गैरव्यवहाराची व्याप्ती एवढी मोठी आहे की, त्यामुळे संबंधित मंत्री आणि मुख्यमंत्री अडचणीत आल्याचे वातावरण त्या दोन दिवसात होते. शेवटी सी.आय.डी. चौकशीची घोषणा शासनाला करावी लागली. त्यावेळी वेळ मारुन नेली गेली आहे. वक्फ बोर्डाची चौकशी किती निष्ठापूर्वक होईल ते आज सांगता येणार नाही. परंतु नि:पक्षपातीपणे चौकशी झाली तर त्यातून सत्य बाहेर येऊ शकेल. मंत्रिमंडळातील एका मंत्र्यांचा संबंध अशाच एका प्रकरणामध्ये आला असून, त्याचा उल्लेख मी माझ्या भाषणाच्या शेवटी करणार आहे. अशा प्रकरणामध्ये सचिव किंवा सचिव स्तरावरील अधिकारी आपले शेरे मारतात परंतु त्यामुळे मंत्री महोदय अडचणीत येतात आणि त्यानंतर त्यांना कोणीही वाचवू शकत नाही.

सभापती महोदय, सरकार कशा पध्दतीने चालले आहे ? आपण ग्रामीण भागात किंवा शहरी भागात गेल्यानंतर पाहतो की, तेथील भिंतीवर म्हण लिहिलेली असते "देवीचा रोगी कळवा व एक हजार रुपये मिळवा" असेच या शासनाच्या बाबतीत आपण म्हटले व लिहिले तर काही वेगळे होणार नाही. "महाराष्ट्र शासनातील भ्रष्टाचारमुक्त असे एक खाते कळवा व एक हजार रुपये मिळावा". असे म्हणणे या शासनासाठी संयुक्तिक ठरेल.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

ाभापती महोदय, या पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार असे या सरकारला म्हणण्याऐवजी सर्व सर्व क्षेत्रात प्रचंड भ्रष्टाचार करणारे घोटाळेबाज सरकार असे नामकरण या सरकारचे केले तर ते चुकीचे ठरणार नाही. सभापती महोदय, आजच्या या विषयाची व्याप्ती एवढी मोठी आहे, खरे म्हणजे अंतिम आठवडा प्रस्तावासाठी विषय देताना सुरूवातीस आम्ही असा विचार केला होता की, एका स्पेसिफिक विषयावरच हा अंतिम आठवडा प्रस्ताव दिला पाहिजे. परंतु सर्वच खात्यामध्ये प्रचंड घोटाळे आज होत आहेत, या विषयाची व्याप्तीच एवढी मोठी आहे की, या सत्राच्या सुरूवाती पासून सत्राच्या समाप्तीपर्यंत प्रत्येक दिवशी या विषयावर चर्चा केली गेली असती तरी या प्रचंड घोटाळ्यांबाबतची चर्चा संपली नसती इतके घोटाळे या सरकारच्या कार्यकाळात झालेले आहेत. सभापती महोदय, मी फार काही बोलणार नाही, माझे अन्य सहकारी देखील या विषयावर बोलणार आहेत. मी केवळ या चर्चेची सुरूवात करणार आहे आणि त्यामध्ये 5-10 मुद्दे मी सांगणार आहे.

सभापती महोदय, मुंबई नगरीला पर्याय म्हणून नवी मुंबई निर्माण करणाऱ्या सिडकोने गेल्या चार पाच वर्षांमध्ये भूखंड विक्रीचे नवनवीन रेकॉर्ड केलेले आहेत. गेल्याच महिन्यात खारघर सेक्टर 20 मधील एक भूखंड सिडकोने तब्बल 135 कोटी रूपयांचा विकण्याचा विक्रम केला. एक लाख एक हजार प्रति चौरस मीटर दराने हा भूखंड सिडकोने शाह ॲण्ड सोमय्या पाटर्नर्सला विकून बाजारभावाच्या चौपट दराने त्यातून पैसा वसूल केला. या भूखंडावर सप्ततारांकित हॉटेल आणि मॉल उभा राहणार आहे. एका अर्थाने सिडको आणि सिडकोच्या आर्थिक व्यवहारांना मान्यता देणारे शासन हे दोघेही टाटा, बिर्ला सारख्या व्यावसायिकाची भूमिका पार पाडत आहेत. सभापती महोदय, सिडकोप्रमाणेच एमएमआरडीए देखील या भूखंड विक्रीमध्ये मागे राहिलेला नाही. एमएमआरडीएने 2007-08 च्या आपल्या बजेटमध्ये भूखंड विक्रीतून 810 कोटी रूपये जादा मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. वांद्रा-कुर्ला संकुलातील दोन भूखंडाच्या विक्रीतून 806 कोटी रूपये आणि आणखी एका क्लबच्या विक्रीतून 30 कोटी रूपये मिळविण्याचे लक्ष्य ठेवले आहे. सभापती महोदय, या दोन्ही शासकीय उपक्रमांनी त्यांच्या विविध उपक्रमांचा लाभ सर्वसामान्य माणसाला मिळू देण्याऐवजी बड्या उद्योजकांना मिळेल याची दक्षता घेतलेली आहे. वांद्रा-कुर्ला संकुलातून 2 ऐवजी 4 एफएसआय देण्याचा निर्णयदेखील एमएमआरडीएने घेतला आणि त्याचा

...... डी 2 ...

फायदा रिलायन्सला मिळणार असून यामुळे त्यांना 241 हेक्टर जागा जादा बांधकामासाठी मिळणार आहे. सिडकोने वाशीमध्ये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर रिॲलिटी तसेच विश्वरूप इन्फोटेक पार्क या सारख्या कंपन्यांना भरपूर फायदा मिळेल याची बरोबर दक्षता त्या ठिकाणी सिडकोने घेतली आहे. येणाऱ्या नजिकच्या काळामध्ये वांद्रा-कुर्ला संकुल असो वा नवी मुंबईतील खारघर-बेलापूर परिसर असो, सर्वत्र सिमेंट काँक्रीटचे जंगल आता आपल्याला पहावयास मिळेल. जिकडे तिकडे टोलेजंग इमारतीच दिसतील आणि सर्व सामान्य गरीब माणूस मात्र या काँक्रिटच्या जंगलापासून कोसो दूर राहिलेला असेल असे म्हटले तर ते काही वावगे होणार नाही. सभापती महोदय, गेल्या 8-10 वर्षांपासून मुंबई व मुंबईच्या उपनगरांमधील जागांच्या किंमती फार वाढलेल्या आहेत. गेल्या चार पाच वर्षात तर या किंमती जवळपास आकाशाला भिडलेल्या आहेत. याचाच नेमका फायदा बिल्डर्स मंडळी उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना हाताशी धरून शासनामार्फत भूखंडाचे आरक्षण बदलत आहेत. आरक्षण बदलणे हे आता या राज्यात नित्य परिपाठ झालेला आहे. नगरपालिका, महापालिकेपासून सिडको आणि एमएमआरडीएपर्यंत हे आरक्षण बदलण्याचा सपाटा सुरू आहे. याचे उत्तम असे एक उदाहरण द्यायचे झाले तर नवी मुंबई महानगरपालिकेंतर्गत माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी राखीव असलेल्या भूखंडाचे आरक्षण सिडकोने प्रथमतः बदलले आणि हा भूखंड विना निविदा के.रहेजा या विकासकाला दिला. या भूखंडांचे वाटप विनानिविदा करू नये अशी स्पष्ट टिपणी चीफ इकॉनॉमिस्ट यांनी लिहिली असतानादेखील, म्हणजे त्याने एक टिप्पणी लिहिली की, या भूखंडांचे आरक्षण बदलले जाऊ नये तसेच विनानिविदा वाटप करू नये तरीही केवळ 13500 मीटर 13500 रूपये या दराने के.रहेजा या विकासकाला सेक्टर 30-ए मधील 31232 चौ.मी. भूखंड विकला गेला आणि त्यासाठी असलेले आरक्षण देखील बदलण्यात आली. अशा प्रकारे अतिशय कमी दरामध्ये हा भूखंड दिला गेला. एवढ्यावरच सिडकोचे अधिकारी थांबले नाही तर 1.5 चटईक्षेत्राऐवजी 3 चटईक्षेत्र देऊन बिल्डर्स आणि विकासकाचा फायदा त्यांनी करून दिला आहे. सदर भूखंडाचे वाटप निविदा काढून केले असते तर कोट्यवधी रूपयांचा महसूल सिडकोला मिळाला असता. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... इ 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

परंतु हा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडविला गेला. त्यामध्ये करोडो रुपयांचा व्यवहार झाला. परंतु सिडकोच्या अधिकाऱ्यांनी शासनाचा फायदा न बघता विकासकांचा फायदा पाहिला आणि हा भूखंड त्यांना देण्यात आला. शासनाने अजूनही सदरहू भूखंडाचे वाटप रद्द केलेले नाही. महानगरपालिकेमध्ये सिडकोने हा भूखंड माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी राखीव ठेवला. खरे म्हणजे त्याठिकाणी माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी रिझर्व्हेशन होते, या भूखंडला प्रोत्साहनपर 3 चटईक्षेत्र देण्यात आला होता. परंतु महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या डोळयासमोर विश्वरुप इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड आणि डी.एस.ई.एल. इन्फ्रास्ट्रक्चर रिॲलिटी यांनी सदर भूखंडाचा वापर माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी करणे बंधनकारक असतांना तेथील इमारतींचा वापर इतर व्यावसायिक कारणांसाठी केला. हे सर्व प्रकार होत असतांना महानगरपालिका,सिडको आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकारी मात्र त्याठिकाणी मूग गिळून चूप बसले होते. आणि ते उघडया डोळयांनी व्यवहार पहात होते. यासंबंधी तक्रार करुन ही बाब त्यांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला.परंतु त्यावर कारवाई करण्याचे नाटक केले गेले. आणि शासनाने माहिती व तंत्रज्ञानासाठी राखीव असलेल्या भूखंडाचा वापर बँक, रोखे खरेदी, रेस्टॉरंट इत्यादी व्यावसायिक आस्थापनांसाठी करता येईल असा शासनाने जी. आर. काढला. सुरुवातीला यामध्ये 80 टक्के माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी आणि 20 टक्के इतर कमर्शिअल बाबींसाठी हा भूखंड राखून ठेवण्यात आला होता. परंतु नंतर ते आरक्षण बदलले गेले व उलटे केले. त्यामध्ये 20 टक्के माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी व 80 टक्के कमर्शिअल वापराकरिता राखून ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला. हा निर्णय कां घेतला? आरक्षण कां बदलले? याच्या पाठीमागे कोण आहे, याची लिंक कुठपर्यंत जाते, यामध्ये किती रुपये घेतले हे सर्व गुलदस्तात आहे. मुंबई महानगरपालिके अंतर्गत खारघर या भागामध्ये एक भूखंड 1 लाख रुपये प्रतिचौरस मीटर या दराने विकला गेला. त्याचा चटई क्षेत्र 1.5 होता. चटई क्षेत्र 3 असलेला माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी राखीव असलेला भूखंड शासनाने किरकोळ भावाने व्यावसायिक कारणासाठी त्याठिकाणी वापरण्याची मुभा दिली. ही मुभा आपण कां दिली? याच्या पाठीमागे कोण बिल्डर आहे? या बिल्डरचा संबंध मंत्रालयापर्यंत जाऊन त्यामध्ये किती करोडो रुपयांचा व्यवहार झाला? हा व्यवहार झाल्यामुळे शासनाचे हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, आपण ठाणे जिल्हयामध्ये रहाता. त्या जिल्हयातील शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या गेल्या. त्याठिकाणी व्होल्टास, मफतलाल, वायमन गार्डन, जॉन्सन टाईल्स या कंपन्या सुरु झाल्या, उद्योग सुरु झाले. उद्योग सुरु करण्यासाठी जर जमिनी घेतल्या तर आपण समजू शकतो. वास्तविक शेतकरी नसलेली व्यक्ती शेत जमीन विकत घेऊ शकत नाही. परंतु त्या भागातील विकासासाठी अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्यानंतर त्याठिकाणी उद्योग निर्माण झाले तर त्या भागाचा विकास होतो, त्या भागातील बेरोजगारांना रोजगार मिळतो. शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन विकास होत असेल तर ती अपेक्षा रास्त आहे. परंतु आज संपूर्ण भारतामध्ये औद्योगिक विकास खूप मोठया प्रमाणात होत असतांना व्होल्टास, मफतलाल, वायमन गार्डन, जॉन्सन टाईल्स या कंपन्या बंद करण्यात आल्या. या कंपन्या कां बंद करण्यात आल्या? हे मी समजू शकलो नाही. तेथील कामगारांना सक्तीची सेवानिवृत्ती दिली, त्यांना घरी जायला सांगितले. त्याठिकाणी 15-20 वर्षापूर्वी किरकोळ भावाने घेतलेल्या जमिनी कोटयावधी रुपयांना विकसित करण्यासाठी विकण्यात आल्या. आणि शेतकऱ्यांना मात्र एक नवा पैसा देखील जमिनीचा मोबदला मिळाला नाही. शेतकऱ्यांना त्या जमिनी परत करण्यात आल्या नाहीत. शेवटी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळणे आवश्यक होते परंतु त्या सुध्दा परत करण्यात आल्या नाहीत.

सभापती महोदय, मी आपणास एक उदाहरण देतो. ज्या रस्त्यावरुन आपण सर्वजण जातो त्या वरळी येथे दोन-तीन वर्षापूर्वी अटारीया नावाचा पंचतारांकित मॉल उभा राहिला. हा मॉल ज्या जागेवर उभा राहिला ती जागा शाळा आणि अल्प उत्पन्न गटांसाठी गाळे बांधण्याकरिता राखीव ठेवली होती. परंतु त्या जागेचे आरक्षण बदलण्यात आले. हे आरक्षण आपण केव्हा बदलले आणि कां बदलण्यात आले?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

यामागे कोण आहे, तो बदलण्यामध्ये त्यांचा काय हेतू आहे, शाळेचे आरक्षण, अल्प उत्पन्न गटाचे आरक्षण बदलले जाते आणि त्या ठिकाणी पंचतारांकित मॉल उभा करून त्यामध्ये 100 कोटी रुपयाचा व्यवहार झाला, अशाप्रकारचा आरोप आहे शासनाने याची चौकशी केली पाहिजे. आरक्षण बदलण्यामागे कोण होते. राखीव भूखंडाचा मॉलच्या माध्यमातून व्यवहार झाला. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या वाळकेश्वरकडे जाण्याच्या मार्गावर अफगाण कॉन्स्युलेट आहे. त्या रस्त्यावरून मीही जात असतो. हे अफगाण कॉन्स्युलेट राजभवनाच्या गेट जवळ आहे. किनाऱ्यावर अवैध पुनर्विकास सुरू असल्याची माझ्याकडे तक्रार आली. त्यानंतर त्यासंबंधात मी संबंधित विभागाला एक पत्र लिहिले. अफगाण कॉन्स्युलेटजवळ एक दाणी चाळ नावाची जुनी इमारत होती. त्या ठिकाणी 42 भाडेकरू रहात होते. पण सन 1994 मध्ये बिल्डर भुपेश जैन यांनी ही चाळ विकत घेतली आणि पैशाच्या जोरावर 30 भाडेकरूंना तेथून बाहेर काढले. या भाडेकरूंच्या जागी स्वत:च्या नातेवाईकांची आणि आपल्या जवळच्या लोकांची नावे टाकून प्रशासनाकडे पुनर्विकासाचा प्रस्ताव पाठविला. खरे म्हणजे म्हाडाने त्या ठिकाणचे भाडेकरू खरे आहेत की, खोटे आहेत याची चौकशी करायला पाहिजे होती. परंतु तसे न करता म्हाडाने पुनर्विकासासाठी परवानगी दिली. परंतु काही जागरूक भाडेकरूंनी तक्रार केली, त्याचबरोबर अफगाण कॉन्स्युलेटनी त्याला विरोध केला. कारण अफगाण कॉन्सुलेटला लागून ही जागा असून त्यांचा तो जाण्या-येण्याचा रस्ता होता म्हणून त्यांनी त्यास विरोध केला. 30 पेक्षा जास्त भाडेकरू बोगस असल्याची तक्रार करण्यात आली म्हणून काम थांबविले गेले. त्यामुळे राज्य शासनाद्वारा पुनर्विकासांतर्गत मिळणारा एफएसआयचा लाभ मिळू नये, असे असताना त्यांना वाढीव एफएसआयचा लाभ दिला गेला. उपरोक्त जागा ही हाय रिस्ट्रीक्टेड एरियामधील आहे. त्यामुळे त्या ठिकाणी 21.35 मिटर पेक्षा उंच इमारतीला परवानगी देणे चुकीचे आहे. तसे नियमात आहे. परंतु त्या बिल्डरने 27 मीटर पेक्षा जास्त उंचीच्या इमारतीचा प्रस्ताव दिला आणि तो प्रस्ताव मंजूर करण्यात आला. खरे म्हणजे तो रिस्ट्रीक्टेड एरिया असल्यामुळे इमारतीची उंची किती असावी, हे ठरविले गेलेले आहे. परंतु त्यापेक्षा जास्त उंचीला परवानगी दिली गेली. तसेच 2 पेक्षा जास्त बेसमेंट फ्लोअर बेकायदेशीर आहेत परंतु बिल्डरने चार बेसमेंटचा प्रस्ताव दिला आणि तो देखील मंजूर करण्यात आला. त्यामुळे राजभवनजवळ पुनर्विकासाला परवानगी देताना ट्रॅफिक मॅनेजमेंटचा अभ्यास करणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरू...

आवश्यक असते. वाळकेश्वरला जाणारा राजभवनाजवळील रस्ता अतिशय अरूंद आहे. पुनर्विकास केल्यानंतर त्या ठिकाणी 50 ते 60 गाळ्यांची वाढ होणार असल्यामुळे आधीच अरूंद असलेल्या रस्त्यावरून ट्रॅफिक वाढेल. महामहिम राज्यपालांना अगोदरच ट्रॅफीकच्या रस्त्यावरून जाणे-येणे करावे लागते. आपल्यालाही माननीय मुख्यमंत्री महोदय त्या रस्त्यावरून जाताना उशीर होतो. तरीदेखील पुनर्विकासाला परवानगी दिली गेली, विकासकाला पाठिशी घातले गेले. याची आपण चौकशी करणार काय ? सभापती महोदय, मी मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, मी चारवेळा म्हाडाकडे तक्रार केली. त्यावर म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी उत्तर दिले की,जुन्या भाडेककरूंची यादीच मिळत नाही, जुने भाडेकरू मिळत नाहीत. परंतु ते भाडेकरू येथपर्यन्त येऊ शकतात. पण त्यांना मिळत नाहीत, तसे उत्तर देतात.

सभापती महोदय, मुंबईतील गोरेगाव येथील आरे कॉलनीत हरित पट्टा आहे. त्या ठिकाणी नो डेव्हलपमेंट झोन आहे. तब्बल 36 एकर जागा बामकोटेक प्रा.लि. कंपनीसाठी देण्याचा घाट घातला गेला. खरे म्हणजे हरित पट्टयामध्ये नो डेव्हलपमेंट झोनमधील जागा देता येत नाही. तरीसुध्दा 36 एकर जागा बामकोटेक प्रा.लि. या कंपनी देताना असे लिहिले गेले की, या भागामध्ये झाडे नाहीत ..

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

या भागामध्ये पॅराग्रासचे उत्पादन होते असा युक्तिवाद जागा देत असताना केला गेला. परंतु पॅराग्रास नावाच्या मोठ्या झाडांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे. बामको टेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला कोणताही पूर्वानुभव नसताना जागा देण्यात आली. माननीय मुख्यमंत्री महोदय, याची चौकशी आपण केली पाहिजे. सभापती महोदय, मी पश्चिम उपनगरातील एक उदाहरण देणार आहे. मिरा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, अंधेरी (पश्चिम) या भागातील ही सोसायटी आहे. ओशिवरा येथील सीटीएस क्रमांक 1 व सर्व्हे क्रमांक 41 या भूखंडावर मिरा कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीचे बांधकाम करण्यात आले. सदर जमीन मुंबई महानगरपालिका व राज्य शासनाने विकास आराखड्यानुसार म्युनिसिपल रिटेल मार्केट व म्युनिसिपल हाऊसिंग बनविण्याकरिता आरक्षित केली होती. ते ही आरक्षण बदलले. त्या ठिकाणी रिटेल मार्केटचे आरक्षण होते. त्या ठिकाणी म्युनिसिपल हाऊसिंग बनविण्याचे आरक्षण होते. परंतु ते आरक्षण बदलले गेले. त्या भूखंडावर हाऊसिंग सोसायटीचे बांधकाम करण्याकरिता सदर आरक्षण काढून त्या ठिकाणी निवासी भूखंड बनवून अत्यल्प दराने या सोसायटीला देण्यात आला. हे कोणी दिले, कसे दिले, का दिले, हे आरक्षण कसे बदलले गेले याची चौकशी करण्याची गरज आहे. एकीकडे मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी घरे अपुरी आहेत याची जाणीव असतानाही दुसरीकडे महापालिकेच्या आणि इतर शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासनाची दिशाभूल करुन सदर राखीव भूखंडावर नियोजित महापालिकेची वसाहत न बसविता खाजगी वसाहतीला हा भूखंड देण्यात आला. माझी अशी माहिती आहे की, त्या ठिकाणी काही अधिकाऱ्यांनी संगनमत केले आणि अधिकाऱ्यांनी संगनमत करुन हा भूखंड घेतला आणि ते आरक्षण त्या ठिकाणी बदलले गेले. सदर भूखंड सीआरझेडच्या क्षेत्रामध्ये येत असूनही संबंधित कार्यालयाकडून कोणतीही परवानगी न घेता हे बेकायदेशीर बांधकाम केले गेले. याची चौकशी करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी किती घोटाळे सांगावयाचे. पामबीच घोटाळ्याबाबत मी सांगू इच्छितो. त्या ठिकाणी 9 जुलै, 2004 रोजी एमआयडीसीने नवी मुंबई नेरुळ, सरसोळे सेक्टर 14 येथील प्लॉट क्रमांक आर-1 या 24 हजार 10 चौ. मीटर जागेची एक निविदा काढली. माननीय मुख्यमंत्री महोदय, कदाचित आपल्या निदर्शनास हे प्रकरण आले नसेल. ती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

एमआयडीसीची जागा आहे. 24 हजार चौरस मीटर जागेची निविदा काढली गेली. निविदेमध्ये आरए-1 प्लॉट दिला गेला. सदर निविदेमध्ये आरएमएस असोसिएट्स या पार्टनरशीप बिल्डर कंपनीने सर्वाधिक बोली बोलून 14727 रुपये प्रती चौरस मीटर प्रमाणे 35 कोटी रुपयांना विकत घेतली. आरएमएस असोसिएट्सने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगमताने 19 जानेवारी., 2005 ला एक शुध्दिपत्रक काढले गेले. ते शुध्दिपत्रक असे काढले गेले की, त्या ठिकाणी आरए-1 प्लॉट ऐवजी आरए-3 हा प्लॉट टाकला गेला. निविदा आरए-1 ची निघाली होती. निविदा काढल्यानंतर आणि प्लॉटचा व्यवहार झाल्यानंतर शुध्दिपत्रक काढून प्लॉटचा नंबर बदलण्यात आला. तो नंबर का बदलण्यात आला ? त्यांना आरए-1 प्लॉट का देण्यात आला नाही ? त्यांना आरए-3 प्लॉट का देण्यात आला ? त्यांना आरए-3 प्लॉट देण्यामध्ये मोठे राजकारण झाले. त्यामध्ये मोठा व्यवहार झाला. कारण आरए-3 प्लॉट हा अतिशय महत्वाचा प्लॉट आहे. मात्र छोटेसे शुध्दिपत्रक काढून जी निविदा काढली होती तो प्लॉट न देता एमआयडीसीने दुसराच प्लॉट विकून टाकला. याची चौकशी होण्याची गरज आहे. म्हणून प्लॉट विकण्याचे हे जे षडयंत्र झाले त्याची चौकशी शासनाने केली पाहिजे.

सभापती महोदय, मी इतर सन्माननीय सदस्यांचा फार वेळ घेणार नाही. परंतु मी दोन तीन प्रकरणे सांगून माझे भाषण संपविणार आहे. एवढ्या भूखंडांचे आरक्षण बदलले गेले. या ठिकाणी जे विषय मी आपल्यासमोर आणले त्याची शासन चौकशी करणार आहे काय ? मी जेवढी प्रकरणे दिलेली आहेत त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा व्यवहार झालेला आहे. त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून या प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे. सभापती महोदय, आपल्याच परिसरामध्ये कॉसमॉस स्टोन क्वारी आहे. हा कॉसमॉसवाला फार मोठा माणूस आहे. या कंपनीला सर्व्हे नंबर 208 येथील जमिनीवर 42912 ब्रास दगडाचे अनधिकृत उत्खनन केल्याने दिनांक 30 एप्रिल, 2005 रोजी तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी एक नोटीस दिली.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 10:20

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

त्या नोटीसीची प्रत माझ्या जवळ आहे. त्यामध्ये त्यांनी लिहिले आहे की, या क्वारीच्या मालकाने तेथे केलेले उत्खनन बेकायदेशीर आहे. त्याला दिलेला प्लॉट वगळता शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण करुन त्या ठिकाणी त्याने उत्खनन केलेले आहे. त्यामुळे त्याच्याकडून तीनपट दंडाची रक्कम वसूल का करण्यात येऊ नये अशा प्रकारचे पत्र तेथील जिल्हाधिका-यानी एप्रिल 2005 मध्ये दिले. हे पत्र दिल्यानंतर पुढची कारवाई थांबली. माझ्या माहितीप्रमाणे क्वारीच्या मालकाला जी नोटीस दिली गेली त्यानुसार त्याच्याकडून 16 ते 17 कोटी रुपये दंडाची रक्कम वसूल करावयास पाहिजे होती. परंतु हे पत्र दिल्यानंतर पुढची कारवाई थांबली. जिल्हाधिका-यांनी यासंदर्भात जे पत्र दिलेले आहे त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, माझ्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, तुम्हाला मंजूर केलेल्या क्षेत्राबाहेर तुम्ही 42912 ब्रास दगडाचे अनधिकृत उत्खनन केलेले आहे. हे अनधिकृत उत्खनन केल्याबद्दल जमीन महसूल अधिनियम 1966 नुसार आजच्या बाजार भावाच्या तीन पट दंड तुमच्यावर का आकारण्यात येऊ नये यासंबंधी लेखी खुलासा 7 दिवसाच्या आत करावा. मुदतपूर्व खुलासा न केल्यास याबाबतीत तुमचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन कारवाई करण्यात येईल. जिल्हाधिकारी अशा आशयाचे पत्र एप्रिल 2005मध्ये दिले. त्यानंतर पुढे कोणती कारवाई झाली ? संबंधिताकडून दंड वसूल केला आहे काय ? दगडाचे उत्खनन थांबलेले आहे काय ? त्याने अतिक्रमण केलेली जमीन शासनाने ताब्यात घेतलेली आहे काय ? हे सर्व प्रश्न अनुत्तरीत राहिलेले आहेत. कालपर्यन्तची माझी माहिती अशी आहे की, संबंधित क्वारीच्या मालकाकडून एक नया पैसाही वसूल करण्यात आलेला नाही. उलट त्याला उत्खनन करण्यास प्रोत्साहन दिले गेले.

सभापती महोदय, आणखी एक गंभीर बाब अशी आहे की, उत्खनन करण्यासाठी जेवढी जमीन देण्यात येते त्या प्रमाणातच त्याला स्फोटके मिळत असतात. मग या क्वॉसमॉस क्वारीने अतिक्रमण केलेल्या जमिनीवर जे उत्खनन केले त्यासाठी त्यांना स्फोटके कोठून उपलब्ध झाली ? सभापती महोदय, मुंबईमध्ये अनेक बॉम्बस्फोट झाले. ते बॉम्बस्फोट घडवून आणण्यासाठी मुंबई शहरामध्ये जेवढी स्फोटके आणली गेली होती ती सर्व स्फोटके पोलिसांना सापडलेली नाहीत. मग ही न सापडलेली स्फोटके अनधिकृत जमिनीवर उत्खनन करण्यासाठी वापरली गेली का यासंबंधी

..2..

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

चौकशी झाली पाहिजे. सभापती महोदय, या कॉसमॉस क्वारीचा मालक कोण आहे ? त्याने केलेल्या अनधिकृत उत्खननापोटी त्याच्याकडून तीनपट दंडाची रक्कम वसूल केली पाहिजे. तसेच त्याने 4 वर्षे उत्खनन करण्यासाठी जी स्फोटके वापरली ती त्याने कोठून आणली याचीही चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, आता या ठिकाणी माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील उपस्थित नाहीत. आजही डिस्कोथेक, पब्स चालू आहेत. डान्स बार बंद करण्यात आले. प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी असे उत्तर देण्यात आले होते की फक्त 26 पब्सना परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु या मुंबई शहरामध्ये शंभर ते दीडशे पब्स अनधिकृतपणे चालू आहेत. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे आम्हाला छाती समोर करुन सांगतात की, एकही पब चालू नाही. परंतु आजही दीडशे पब विनापरवाना चालू आहेत. ज्या ठिकाणी हे पब्स चालू आहेत त्या विभागातील संबंधित अतिरिक्त पोलीस आयुक्तांना मी पत्र लिहून विचारणा केली होती. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, किती पब्स अधिकृत आहेत आणि किती अनधिकृत आहेत याची चौकशी करावी लागेल. म्हणजे अधिकृत आणि अनधिकृत पब्स बाबत पोलिस खात्याला माहिती नाही. तेव्हा याबाबतीत चौकशी करावी अशी विनंती मी माननीय मुख्यमंत्र्यांना करीत आहे.

सभापती महोदय, मी आणखी एकच उदाहरण देऊन माझे भाषण संपविणार आहे. विदर्भामध्ये गडचिरोली येथे नवदुर्गा बांबू क्राफ्ट कंपनी आहे. दरवर्षी 10 हजार मे.टन बांबूचा पुरवठा करण्यासाठी दिनांक 25 मे 2004 रोजी शासनाने या कंपनीशी करार केला.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

सभापती महादेय,10,000 टन बांबू या कंपनीला पुरविला पाहिजे अशी करारामध्ये अट टाकली गेली होती तसेच,करारातील अट क्रमांक 03 प्रमाणे सदरहू बांबूचा उपयोग बांबूच्या चटया , बोर्ड तसेच इतर बांबूच्या वस्तू तयार करण्याकरिता करावयाचा असे ठरले होते. तथापि, या कंपनीचा असा कोणता उद्योग तरी अस्तित्वात आहे का ? असा माझा सवाल आहे. कंपनी रजिस्टर्ड झाली. कंपनीने सरकारशी करारही केला पण या कंपनीचा स्वत:चा असा उद्योग अस्तित्वात आहे का ? सभापती महोदय,याबाबत अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक,नागपूर, महाराष्ट्र राज्य,यांनी खातरजमा केली असता, त्यांना जून,2006 मध्ये असे आढळून आले की, गडचिरोली येथे या कंपनीचा फक्त एक प्लॉट असून तेथे कंपनीच्या नावाचा एक बोर्ड लावलेला आहे,परंतु कंपनीच्या इमारतीचे कोणत्याही प्रकारचे बांधकाम तेथे करण्यात आलेले नाही. करारनाम्यातील अट क्रमांक 28 नुसार बांबूचा उपयोग केल्यानंतर शिल्लक राहिलेला बांबू उप वनसंरक्षक, सिरोंचा, जि.गडचिरोली यांच्या परवानगीशिवाय तो कुठेही विकता येणार नाही. त्या अनुषंगाने कंपनीने दिनांक 29 मार्च,2004 रोजी शासनाला एक हमी - पत्रही दिले होते. सदर हमी - पत्रामध्ये असे म्हटलेले होते की, आम्ही बांबूचा उपयोग झाल्यानंतर उरलेला बांबू खुल्या बाजारात विकणार नाही. सदर शिल्लक राहिलेला बांबू उपवनसंरक्षक,सिरोंचा जि.गडचिरोली यांच्या परवानगीनेच विकला जाईल तसेच, जी काही नुकसान भरपाई होईल ती कंपनी भरुन देईल. अशा पध्दतीचे हमी - पत्र सदर कंपनीने शासनाला सादर केले होते. यासंदर्भात आणखी एक हमी - पत्र देखील शासनाला कंपनीने सादर केले होते. अशा प्रकारची दोन हमी - पत्रे कंपनीने शासनाला देऊन सुध्दा त्याप्रमाणे काहीही घडून आलेले आढळले नाही. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक,महाराष्ट्र राज्य,नागपूर यांनी 20 एप्रिल,2006 यांनी प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन यांना पाठविलेल्या पत्रामध्ये दिसून येते की, नवदुर्गा बांबू क्राफ कंपनी,गडचिरोली या कंपनीकडून शासनाची खालीलप्रमाणे रक्कम येणे बाकी आहे. सदर कंपनीने शासनाशी केलेल्या कराराप्रमाणे कोणतीही अट पाळलेली नाही व नुकसानभरपाईची रक्कमही दिलेली नाही. बांबूची चटई वगैरे बनविली किंवा बोर्ड वगैरे इतर वस्तुही वनविलेल्या नाहीत, तसेच अनधिकृत बांबू जमा केला नाही तर तो मध्यप्रदेशात विकला. या बांबू खरेदीमधून येणारी रक्कम सन 2003-04 या वर्षामध्ये जवळपास शासनास 10,5,304 अधिक व्याज 3,056, सन 2004-05 या वर्षामध्ये 75,49795 अधिक व्याज 14,53,932.सन 2005-06 या वर्षामध्ये

I - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

56,54,844 अधिक व्याज 11,69,123 असे एकूण या कंपनीकडून 1,68,23,354 रुपये शासनाला घेणे बाकी आहे. कराराप्रमाणे खुल्या बाजारात या बांबूची किंमत 3,500 ते 4,000 मेट्रिक टन एवढी आहे, म्हणजे हाच बांबू जर आपण खुल्या बाजारामध्ये विकत ध्यावयाला गेलो तर तो आपल्याला 4,000 रुपये मेट्रिक टन याप्रमाणे खरेदी करावा लागतो. परंतु हा कुपेचा बांबू या कंपनीने शासनाशी केलेल्या कराराप्रमाणे फक्त 600 रुपये मेट्रिक टन याप्रमाणे विकत घेतला यामुळे शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान झाले. या बांबूचे पैसे शासनाला अजूनही प्राप्त झालेले नाहीत. या कंपनीने एकतर कमी दराने बांबू शासनाशी केलेल्या कराराप्रमाणे शासनाकडून विकत घेतला आणि कमी दराने तो घेऊन त्याचे पैसेही शासनाला दिलेले नाहीत, तेही डुबविले. तोड झालेल्या बांबूपैकी 99 टक्के बांबू खुल्या बाजारात उपवनसंरक्षक,सिरोंचा जि.गडचिराली यांची परवानगी घेतल्याशिवाय विकला कराराचा येथेही भंग झालेला आहे. करारनाम्यानुसार कुपातील बांबूची वाहतूक ही कुपापासून कंपनीच्या उद्योगस्थानापर्यंत व्हायला पाहिजे होती, परंतु सदर कंपनीचा स्वत:चा असा उद्योगच नसल्यामुळे बांबूची वाहतूक कुपापासून कमलापूरपर्यंत झाल्यानंतर मध्यप्रदेशातील व्यापा-याच्या मदतीने बाहेरच्या राज्यात विकला जातो. आपल्या राज्यातील बांबूची अशा पध्दतीने तोड करुन व शासनाशी करार करुन स्वस्त दराने मध्यप्रदेशामध्ये व्यापा-याला विकण्यात आला. या बांबूच्या वाहतूकीच्या संदर्भामध्ये दिनांक 12 फ्रेब्रुवारी,2002 ते 05 मे,2007 या कालावधीत 129 वाहतूक परवाने जारी करण्यात आले.

यानंतर श्री.कानडे......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ 10:30

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, राज्याच्या मंत्रिमंडळात असणाऱ्या एका मंत्र्याने अशा पध्दतीने बोगस कंपनी स्थापन करुन करोडो रूपयांची बांबू तोड केली आणि आणि करारातील तरतुदींचा भंग करून 4 हजार रूपये किंमतीचा बांबू सहाशे रूपयांना खरेदी करून शासनाचे करोडो रूपये लाटलेले आहेत. यातील आणखी एक वैशिष्टय म्हणजे नवदुर्गा बांबू क्राफ्ट कंपनीबरोबर जो करारनामा झाला त्यावर या कंपनीचे एक संचालक म्हणून या मंत्रिमंडळातील एक सदस्य आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी याची चौकशी करावी अशी माझी विनंती आहे. बांबू कोटा मिळावा म्हणून सचिव वनविभाग यांना 10 मार्च 2003 रोजी पत्र लिहिले. 29 मार्च 2004 रोजी 100 रूपयांचे जे हमीपत्र दिलेले आहो त्यावर या कंपनीचे एक संचालक म्हणून त्यांची सही आहे. हे पत्र माझ्याकडे आहे. आदिवासी बुरड समाजाच्या लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली राज्याच्या मंत्रिमंडळातील एक सदस्य अशा पध्दतीने पदाचा गैरवापर करीत आहे आणि राज्य शासनाचा करोडो रूपयांचा महसूल बुडवून जंगलतोडीचा कार्यक्रम चाललेला आहे यापेक्षा दुसरा भ्रष्टाचार कोणता असू शकतो ? मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी. आपल्या मंत्रिमंडळातील एक सदस्य बदनामी करीत आहे त्याला आपण मंत्रिमंडळातून काढून टाकणार काय असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, अनेक माननीय सदस्य याविषयावर बोलणार असल्यामुळे मी सदनाचा अधिक वेळ घेणार नाही. गुटखाबंदी संबंधी वारंवार या सदनामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला. या राज्यामध्ये सरकारने गुटखाबंदी केली होती. परंतु सुप्रीम कोर्टाने हा राज्य शासनाचा अधिकार नाही केंद्र शासनाचा अधिकार आहे असे सांगितले. त्यानंतर या राज्यामध्ये पुन्हा गुटखा वाटप सुरू झाले. याबाबतीत माझी एवढीच हरकत आहेकी, 23 जुलै 2007 रोजी शासनाने आदेश काढले होते. त्यामध्ये राज्यात गुटखा उत्पादन करणे, विक्री करणे, साठा करणे यावर बंदी घातली होती. सर्वोच्च न्यायालयाने ती उठवली. आता गुटख्यामध्ये मॅग्नेशिअम कार्बोनेट मिसळून गुटखा विक्री सुरू आहे. गुटखा विकला जातो तो मॅग्नेशिअम कार्बोनेट मिसळून विकला जातो. परंतु अन्नभेसळ प्रतिबंध कायद्याच्या कलम 62 मधील तरतुदीनुसार कोणत्याही अन्नपदार्थामध्ये मॅग्नेशिअम कार्बोनेट मिसळता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद असताना देखील हे रसायन मिसळून करोडो रूपयांचा गुटखा विकला जात आहे. याबाबत अतिरिक्त आयुक्त, अन्न प्रशासन यांच्याकडे तक्रार केली

......2

SSK/ SBT/ MAP/ 10:30

श्री. पांडुरंग फुंडकर ....

असता ते उत्तर देतात की विक्री कराची पावती नाही आणि बिले नाहीत त्यामुळे गुटखा उत्पादकांवर कारवाई करता येत नाही. कारवाई केली जाते ती पानठेलेवाले किंवा टपरीवाला आणि गुटखा विक्री करणारा दुकानदार यांच्यावर केली जाते. किराणा दुकानदारांवर केली जाते. या रसायनामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निमार्ण होत आहे. या रसायनामुळे कॅन्सर होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे यापासून भयंकर रोग होण्याचा धोका असतानाही हा गुटखा विकला जातो आणि संबंधित खात्याचे अधिकार सांगातात की गुटखा उत्पादकांवर कारवाई करता येत नाही हे बरोबर नाही. बिगर बिलांचा गुटखा विकला जात असेल तर राज्याचा महसूल बुडतो आहे, विक्रीकर बुडतो आहे. याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. छोटया विक्रेत्यांवर कारवाई केली जाते. शासनाने चांगल्या उद्देशाने गुटखा बंदी केली होती. बाहेरच्या राज्यातून उत्पादित केलेला गुटखा या राज्यामध्ये आणून त्यामध्ये मॅग्नेशिअम कार्बोनेट मिसळून या राज्यात विकला जातो.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

शासनाचे अधिकारी करोडो रुपयांचा मलिदा खाऊन या कंपन्यांना गुटखा विक्री करण्यास परवानगी देतात, गुटखा उत्पादकांवर कारवाई केली जात नाही. त्यामुळे या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी झाली पाहिजे. गुटखा विक्रीची बिले दिली जात नाहीत, बिनबिलाचा गुटखा महाराष्ट्रात येतो. अशा प्रकारचे षडयंत्र चालले असेल तर याच्या मुळाशी गेले पाहिजे. या राज्याचा महसूल कोणाकडून बुडविला जातो? त्यांना पाठीशी घालणारे कोण आहेत? उपआयुक्त कारवाई का करीत नाहीत? नाशिक विभागाच्या उपआयुक्तांनी 90 केसेस दाखल केल्या. परंतु उर्वरित विभागामध्ये अशा केसेस दाखल केल्या जात नाहीत. कारण गुटखा उत्पादकांकडून करोडो रुपयांचा हप्ता दिला जातो. ही हप्त्याची रक्कम मंत्रालयापर्यंत येते. म्हणून या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे अशा प्रकारची विनंती आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना करतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**उपसभापती** : या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 12.15 वाजेपर्यंत पूर्ण व्हावयाची आहे. माननीय मंत्रीमहोदयांना उत्तराच्या भाषणासाठी अंदाजे 30 मिनिटांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना आपले विचार 11.45 पर्यंत मांडावे लागतील याची सभागृहाने नोंद घ्यावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, शेतच कुंपण खात आहे हा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो विषय याठिकाणी मांडला आणि राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्रीच आता सगळे काही स्वत:च्या घरात नेऊ लागले आहेत, तो संदर्भ घेऊनच मी याठिकाणी बोलणार आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माननीय उपमुख्यमंत्र्यांचा उल्लेख याठिकाणी केला. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या सभागृहात असे म्हटले होते की, ज्या भागामध्ये बारबालांच्या संदर्भात बंदी घातल्यानंतरही जर कुठे असे प्रकार उघडकीस आले तर तेथील उच्च अधिकाऱ्यापासून खालच्या अधिकाऱ्यांपर्यंत सगळ्यांना बडतर्फ केले जाईल. अशी घोषणा सदनामध्ये केलेली असल्यामुळे अधिकृतरित्या हे जाहीर झाले आहे. परंतु आजही बारबालांना अटक केली जात असून पोलिसांकडून गुन्हे दाखल होत आहेत. तेव्हा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करावा. हाही एक भ्रष्टाचाराचा मार्ग आहे. पैसे घेऊन हे सगळे प्रकार सर्रास सुरु आहेत. माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, अधिकृत परवानगी 150 ते 200 हॉटेल मालकांकडे आहे. अनेक ठिकाणी बेकायदेशीरपणे, अवैधरित्या कारभार सुरु आहे. या सदनामध्ये जाहीर करुनही अधिकाऱ्यांना धाक वाटत नाही आणि भ्रष्टाचार बोकाळत चालला आहे. तेव्हा माननीय उपमुख्यमंत्र्यांविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करणे क्रमप्राप्त आहे.

सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या एक महत्वाची बाब निदर्शनास आणू इच्छितो. जालना जिल्हयामध्ये 3 कोटी रुपयांची वीज चोरी करणा-या संबंधित कारखानदाराला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने 3 वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा सुनावली आणि लाखो रुपयांचा दंड केला आहे. हे प्रकरण संपले का? मी माननीय ऊर्जामंत्र्यांना विनंती केली होती की, वीज चोरी केल्यानंतर 3 वर्षे सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागते. अशा व्यक्तीचा संदर्भ फोटोसहित वीज बिलावर छापण्यात यावा व ही माहिती घरोघर दिली जावी. प्रश्न असा आहे की, 3 कोटी रुपयांची वीज जोरी होत असताना ज्या अधिकाऱ्याने याकडे दुर्लक्ष केले, वीज चोरी झाल्याचे सिध्द झाले आहे, त्यामुळे अशा भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. ती कारवाई करणार की नाही याचा खुलासा उत्तराच्या भाषणामध्ये मंत्रीमहोदयांनी करावा अशी माझी विनंती आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, भ्रष्टाचार खालपासून वरपर्यंत थांबणे आवश्यक आहे. भ्रष्टाचारामध्ये जे लोक गुंतलेले आहेत त्यांनी भ्रष्टाचार केला आहे हे जर सिध्द झाले तर त्यांच्यावर कडक कारवाई होणे आवश्यक आहे. संबंधित अधिका-यांनी, कर्मचा-यांनी भ्रष्टाचार केलेला आहे असे सिध्द झाल्यानंतरही त्यांच्यावर कारवाई झाली नाही तर अशा लोकांवर शासनाचा काही सुध्दा वचक राहणार नाही. भ्रष्टाचाराचे विषय पुष्कळ आहे परंतु मी या ठिकाणी भ्रष्टचाराचा मोजकाच विषय उपस्थित करणार आहे. सन्माननीय मंत्रीमहोदय, श्री. अनिस अहमद ज्या खात्याचे मंत्री आहेत, त्या खात्यात त्यांच्या आशिर्वादाने निर्माण झालेला भ्रष्टाचार या ठिकाणी मी मांडणार आहे. यासंदर्भात मी माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांना नियमाप्रमाणे नोटीस सुध्दा दिलेली आहे. मी येथे काहीही बोललो, मी त्यांच्या संदर्भात काहीही विषय मांडले तरी त्यांचे काही होणार नाही हे मला माहीत आहे. खरे म्हणजे माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेनेच मंत्रीमंडळ तयार होत असते, घटने प्रमाणे मंत्रीमंडळ तयार होत असते. जनतेला कितीही वाटले की, या आमदाराला मंत्री म्हणून घ्या तर तसे होत नाही तर मुख्यमंत्र्यांना वाटले तरच तो मंत्री होत असतो. मुख्यमंत्र्यांच्या मनात येईल तेव्हा मंत्र्याचे खाते बदलले जाते आणि मुख्यमंत्र्यांच्या मनात आले तर मंत्र्याचा राजिनामा मागितला जातो. परंतु या सदनात घटनेची पायमल्ली करणारा जिगरबाज मंत्री मी पाहिलेला आहे. या मंत्र्याने सदनात उभे राहून सांगितले आहे की, " मैं कफन बांध कर खडा हूं. मैं किसी से डरता नहीं, मैं किसी की परवाह नहीं करता, मुझे किसी ने मंत्री नहीं बनाया.मुझे ऊपर वाले ने मंत्री बनाया है.मैं किसी की मेहरबानी से मंत्री नहीं बना हूं" सभापती महोदय, या घटनादत्त सदनात जे वक्तव्य करण्यात आलेले आहे त्याबाबत संबंधित मंत्र्यावर काय कारवाई करावयाची तो शासनाचा प्रश्न आहे, मुख्यमंत्र्यांचा प्रश्न आहे. सभापती महोदय, मी जे काही बोलत आहे ते सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी अजून काही नावे घेतलेली आहेत तो धर्माचा आणि श्रध्देचा भाग आहे. आम्ही सुध्दा देवाच्या कृपेने येथ पर्यंत आलेलो आहोत असे आम्ही सुध्दा मानतो. उर्दूमध्ये म्हटले जाते की, "आसमान से गिरा और मंत्रिमंडल में टपका" आपण आदरणीय मंत्री आहात. सन्माननीय मंत्रीमहोदय, सभागृहात उभे राहून जे बोलले आहेत ते कायद्यात बसत नाही यासंदर्भात माझ्याकडे कागदपत्रांचा दाखला आहे. सन्माननीय

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

मंत्रीमहोदयांनी जे काही वक्तव्य केलेले आहे ते गंभीर आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांचे यासंदर्भातील ॲफेडेवीट माझ्याकडे उपलब्ध आहे. खरे म्हणजे मंत्री हा सरकार असतो. मंत्र्यांनी जनसामान्यांचे प्रश्न सोडवावयाचे असतात, धोरणे आखावयाची असतात. धोरणात्मक निर्णय राबविण्याची जबाबदारी ही त्या खात्याच्या सचिवांची असते. सचिव हा हेड ऑफ डिपार्टमेंट असतो आणि मंत्री हा सरकार असतो. सचिव म्हणाले की, "मी हे करतो" तर ते धोरण होत नाही. जर मंत्री म्हणाले की, "मी हे करतो" तर ते राज्याचे धोरण होते. माननीय मंत्रीमहोदयांच्या डोक्यात फिट बसले आहे की, "मीच हेड ऑफ द डिपार्टमेंट, मी करेन ते योग्य, मी म्हणजे सर्व काही, कारण मी वरुन आलेलो, मी कोणाच्या मेहरबानीने आलेलो नाही." सभापती महोदय, या मंत्रीमहोदयांच्या खात्यातर्फे एक टेंडर निघाले होते. आता आरे व्यवस्थापन अडचणीत आलेले आहे. जसे एसटी महामंडळ अडचणीत आलेले आहे तसेच आरे व्यवस्थापन अडचणीत आलेले आहे. महाव्यवस्थापक, आरे डेअरी बृहन्मुंबईच्या कार्यालयातून एक निविदा निघाली होती. त्या निविदेमध्ये विविध प्रकारचे खाद्य पदार्थाचे स्टॉल विकावयाचे होते. हे स्टॉल विकतांना त्या स्टॉलवाल्यांना काही मुनाफा द्यावयाचा होता त्यासंदर्भातील हे टेंडर निघाले होते.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

आईस्क्रीम, गुलाबजाम, रसगुल्ला, एनर्जी, प्रक्रिया चीज तसेच ब्रेड, बेकरी उत्पादन, नाईट्रोजन वायुयुक्त पॅकबंद असलेले पदार्थ, पिण्याचे पाणी, अशाप्रकारची विविध खाद्यपदार्थ विकायची आणि विकलेल्या वस्तूंमधून काही ठराविक टक्केवारी आरेला द्यावी असे ते टेंडर होते. माननीय मंत्रिमहोदयांनी या टेंडरमध्ये लक्ष घातले. त्यांना वाटले की, मी या टेंडरमध्ये लक्ष घातल्यास आरेचा फायदा होईल. या टेंडरमध्ये काही चुकले आहे किंवा कसे याची माहिती घेण्यासाठी त्यांनी संबंधितांना बोलाविले. त्या टेंडरमध्ये असे म्हटले होते की, "रॉयल्टीची टक्केवारी द्यायची, ज्याची टक्केवारी जास्त असेल त्यास टेंडर मिळेल. 60 टक्केप्रमाणे रॉयल्टी आली तर शासनाच्या तिजोरीमध्ये वर्षाला 4 ते 5 कोटी रुपये जमा होतील. माननीय मंत्रिमहोदयांनी संबंधितांना विचारले हे बरोबर आहे काय ? कारण निविदाकारांनाही धंदा करायचा आहे, तेव्हा निविदाकारांना देखील थोडे पैसे मिळाले पाहिजेत. या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी स्वत: लक्ष घातले. या संदर्भातील ओरिजिनल कागदपत्रे माझ्याकडे आहेत. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी मला विचारले, " साहिब, कहाँ से लाए हो". मी त्यांना सांगितले, "माहितीच्या अधिकाराखाली काहीही मिळते." या माहितीच्या अधिकाराखाली ही माहिती मिळवली आहे. या टेंडरमध्ये श्री.भाटिया यांची निविदा मंजूर झाली होती. या रॉयल्टीच्या संदर्भात श्री.भाटिया यांनी वाद निर्माण केला होता. या संदर्भातील माहिती घेण्यासाठी मंत्रिमहोदयांनी अधिका-यांची बैठक बोलाविली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी माननीय मंत्रिमहोदयांना पुढीलप्रमाणे माहिती दिली.

"बैठकीच्या सुरुवातीस महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना यांनी आरे ब्रॅंड, को-ब्रॅंड विक्री या संदर्भातील माहिती दिली. सदर आरे ब्रॅंड, को-ब्रॅंड पदार्थ विक्री शासनाच्या दिनांक 5.5.2003 च्या पत्रानुसार मान्यता दिल्याप्रमाणे निविदा मागवून आरे केंद्रावर 21.5.2004 पासून कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर निविदाकाराने आतापर्यंत सात महिने काम केलेले असून त्यांनी शासनास देय असलेली रॉयल्टीची रक्कम वेळोवेळी न भरल्यामुळे 31.12.2004 पासून निविदाकाराची आरे केंद्रावरुन होणारी पदार्थाची विक्री थांबविण्याचे आदेश देण्यात आले. सात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

महिन्यांची अपेक्षित रॉयल्टीची रक्कम साधारणत: 38 लाख 18 हजार 313 इतकी भरणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी 10 लाख 78 हजार 837 इतक्या रकमेचा शासनाकडे भरणा केलेली आहे. आता त्यांच्याकडे 27 लाख 39 हजार 436 एवढ्या रॉयल्टीची रक्कम थकीत आहे."

या बैठकीमध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी निविदाकारांबाबत सहानुभूतीपूर्वक विचार केला. निविदेच्या कालावधी पुढील दोन महिने नि:शुल्क मुदतवाढ देऊन मागील थकबाकी माफ करण्यात आली. त्या निविदाकारास वाटले इतका चांगला मंत्री राज्यास लाभलेला आहे. तेव्हा आपण त्यांच्याकडे आणखी थोडी सवलत मागू. त्या निविदाकाराने सांगितले. आम्हाला आणखी सवलत द्यावी म्हणजे तुमचा आमचा झगडा राहणार नाही. आरे ब्रँड, को-ब्रँड पदार्थ पुरविणाऱ्या गट प्रमुख श्री.भाटिया यांनी असे सांगितले की, "पदार्थविक्री अपेक्षेप्रमाणे होत नसताना शासनाच्या निविदेतील अटीप्रमाणे रॉयल्टी रक्कम भरणे शक्य होणार नाही." रॉयल्टीची रक्कम विकलेल्या पदार्थावर भरायची होती. जेवढ्या पदार्थांची विक्री होईल तेवढ्यांची रॉयल्टी भरायची आहे असा करार होता.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 10:50

श्री.दिवाकर रावते.....

किमान रॉयल्टीची अट न ठेवता, प्रतिबूथ, प्रति पदार्थ रॉयल्टीचे दर निश्चित करुन त्याप्रमाणे रॉयल्टी भरण्यास आम्ही तयार आहोत. त्यासाठी 25 रुपये प्रति पदार्थ प्रति बूथ, प्रति महिना अशी देण्याची आमची तयारी आहे, असे चर्चेत सांगितले. तसेच मुंबई महापालिकेच्या कलम 394 खाली लायसन्स सर्व केंद्राकडे नाहीत व केंद्रचालक सहकार्य करीत नसल्याचे सांगितले. आयुक्त, दुग्धविकास यांनी असे सुचित केले की, लायसन्स घेणे व व्यवस्थापकांना आरे ब्रॅण्ड, को ब्रॅण्ड पदार्थ विक्री करण्यास उद्युक्त करणे ही जबाबदारी गट प्रमुखांची आहे." म्हणजे त्या भाटियांची आहे. तेथेही जाऊन ते भर आणि तुझे काम चालू दे, हा त्यातील इन्डायरेक्ट उल्लेख आहे. लायसन मिळत नसेल तर महापालिकेत जा आणि काय करायचे ते कर आणि तुझे पदार्थ विक असाच याचा अर्थ आहे. यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "प्रस्तावित रुपये 25 प्रमाणे आकार फारच कमी असून...दयावान मंत्रिमहोदयांनी आरेचा फायदा व्हावा याकरिता रुपये 50 आकार असावा असे आयुक्तांना सांगितले. अशाप्रकारे ही रॉयल्टी 25 ची 50 केली." अशाप्रकारे यातील टक्केवारी बाद केल्यामुळे याचा परिणाम असा झाला की, शासनाला जे दरवर्षी 4-5 कोटी रुपये मिळणार होते, ते आता मिळणार नाहीत. यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "माननीय दुग्धविकास मंत्री यांनी त्यांचे स्तरावर बैठक बोलाविली होती आणि रॉयल्टीच्या निविदेतील अट बदलली." ती अट आपण कोणत्या अधिकारात बदलली ? तसा अधिकार आपल्याला कोणी दिला ? पुढे असेही म्हटले आहे की,"...आणि प्रति बुथ 50 अशी केली. या बदलामुळे 2005 साली अपेक्षित असलेली 1 कोटी 68 लाख रुपयांऐवजी फक्त 14 हजार 500 रुपये प्राप्त झाले." अशाप्रकारचे महान काम माननीय मंत्रिमहोदयांनी केलेले आहे. त्या बिचाऱ्या पदार्थ विक्रत्येच्या कुटुंबाला कुठे तरी जगायला मिळाले पाहिजे म्हणून त्याच्याकडून पावणे दोन कोटी रुपयांऐवजी फक्त 14 हजार 500 रुपये घेतले. अशाप्रकारे संपूर्ण करारातून आरेचे 10 कोटी रुपयांचे नुकसान झाले. एवढे दयावान मंत्री असताना, आनंदित झालेला माणूस बिस्कीटे किंवा मिठाई वगैरे देतो, ती त्यांना दिलीच असेल. एवढया कोटयावधी रुपयांचा फायदा करुन दिल्यानंतर आपल्याही घरच्यांची तोंड गोड करा, म्हणून त्यांनी आपल्याला मिठाई वगैरे दिलीच असणार. अशाप्रकारचे हे आरे ब्रॅण्ड प्रकरण गंभीर आहे. याबाबतीत माननीय मंत्रिमहांदयांच्या चांगले लक्षात आले की, आपल्या घरची मंडळी जगण्यापेक्षा, जनता जगली पाहिजे. सभापती महोदय,

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

माननीय मंत्रिमहोदय हे असे करीत असताना त्यांचे भान हरपले. माननीय शरदचंद्रजी पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी मुंबईतील तबेले बाहेर हलविण्याचे ठरवले व तसे आदेश सरकारने काढून ते हळूहळू बाहेरही गेले. याबाबतीत आदेश काढल्यानंतर कुठल्याही परिस्थितीमध्ये तबेले खाली करा, आरेमधीलही तबेले खाली करा, असे त्या आदेशात होते. एक म्हैस म्हटल्यानंतर त्याला आपण एक खीळा म्हणतो. अशाप्रकारे खीळे देण्याचा प्रकार त्यावेळी शासनाने बंद केला. परंतु माननीय अनिस अहमद महोदयांच्या आजूबाजूला फार हुशार लोक आहेत. यासंदर्भातील दिनांक 1 ऑगस्ट,1989 रोजी काढलेला जो आदेश आहे, त्यामागचा उद्देश चांगला होता. त्या माध्यमातून माननीय शरदचंद्र पवार यांनी प्रतिपादनच केले होते की, ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसाय वाढला पाहिजे, अशाप्रकारचे धोरण केंद्र शासनाने आखलेले आहे व ते राज्याने स्वीकारलेले आहे म्हणून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायातून प्रगती साधण्याकरिता मुंबईतील हा व्यवसाय थांबवून बाहेर घेऊन जाऊ, ही त्या मागची भावना होती. त्यातून शेतकऱ्यांना दोन पैसे मिळावेत, अशी त्या मागची भूमिका होती. त्याकरिता अशाप्रकारचा आदेश काढून राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेण्यात आला. परंतु आमच्या मंत्रिमहोदयांना ते रिकामे पडलेले खीळे दिसले व त्यांना कोणत्या तरी हुशार माणसांनी सांगितले की, साहेब, आपण हे देऊन टाकू.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती, श्री.उल्हास पवार)**

श्री.दिवाकर रावते.........

आरे दुग्ध वसाहतीतील रिक्त तबेले परवाने धारकांना देण्याबाबत कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासन निर्णय क्रमांक अेअेमपी/1003/प्र.क्र.92/पदुम-8, मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 19 सप्टेंबर 2003 च्या आदेशान्वये दयावान मंत्रिमहोदयांनी म्हशी बांधण्याकरिता एकूण चार हजार खिळयांना परवानगी दिली. मंत्रिमहोदयांना हा मार्ग दाखविणारे त्यांचे सल्लागार आता जेलमध्ये आहेत, काही जेलमध्ये जाणार आहेत. जाता जाता माणूस कुणाला तरी आपल्याबरोबर फरफटत नेतो, तसे हे झाले आहे. यांनी आणखी एक हजार खिळे दिले, म्हणजे एकूण पाच हजार नवीन खिळयांना परवानगी दिली व त्यामुळे पाच हजार नवीन खिळे मुंबईमध्ये आले. मला नवल वाटते माननीय मंत्रीमहोदय, एवढे केल्यानंतर सुध्दा आपल्या लक्षात आले नाही ? कशासाठी दिले, रिकामे पडले म्हणून दिले का, याविषयी मला कानात येऊन सांगितले, एका खिळयाकरिता मुंबईमध्ये हजारो रुपये मोजले जातात. प्रति खिळयामागे पंचवीस हजार रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. आता करा हिशेब, पंचवीस हजार गुणिले पाच हजार, तुमचे गणित चांगले आहे, किती कोटी रुपये झाले ? एखादा माणूस चाटुनपुसून जेवायला लागला की बघणा-याला त्याचा विट येतो, आपल्याला त्याची किळस येते. यांनी काय केले ? त्यानंतर कोकण विकास महामंडळाचे खिळे बाकी होते, यांचा त्यावर काहीही अधिकार नव्हता. तेथे देखील आदेश दिले गेले, आता तेथील कर्मचारी कोर्टात गेले आहेत. एकदा माणसाला चटक लागली की, माणूस चाटुनपुसून खातो. मंत्रिमहोदयांना अधिकार नसतांना त्यांनी त्या महामंडळाचे खिळे कसे दिले, का दिले, कोणत्या अधिकारात दिले ? यादृष्टीने हा विषय अतिशय गंभीर आहे. वेळेच्या बंधनामुळे प्रत्येक खिळयाबाबत मी येथे माहिती देऊ शकत नाही, परंतु माझ्याकडे प्रत्येक खिळयाबाबतच्या आदेशाची प्रत आहे. असे असले तरी आता मी जे सर्व सांगितले आहे त्यामध्ये सर्व आले. अशा प्रकारचे आदेश मंत्रिमहोदयांनी काढले आहेत, संबंधित नस्तीमध्ये त्याची नोंद आहे, मात्र सचिवांनी तसे केलेले नाही. मंत्रिमहोदयांनी सांगितले, अधिकार घ्या. सचिव म्हणजे चाकर. पण हे जे वरिष्ट अधिकारी असतात, ते या सर्व बाबी नस्तीमध्ये लिहून ठेवतात. मीही मंत्री होतो, आपण तर अनेक वर्ष मंत्री आहात. महापालिकेमध्ये मी सन 1972 मध्ये होतो, त्यावेळपासून मी पाहतो आहे की, आपण मंत्री होता. अधिकारी हुषार असतात व सावधही असतात. खिळे प्रकरणामध्ये ग्रामीण

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

भागातील शेतक-यांच्या हिताच्या, माननीय शरद पवार यांनी घेतलेल्या निर्णयाला हरताळ फासण्यात आला, पन्नास हजार लीटर दूध मुंबईमध्ये निर्माण होऊ लागले व त्यामुळे शेतक-यांची दूधाची आवक कमी झाली. खिळे वाटपात भ्रष्टाचार तर आहेच पण दुसरीकडे शेतक-यांवरही अन्याय झाला आहे. शासनाचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत बदलला गेला असता तर मी मान्य केले असते. परंतु, तो मंत्रिमहोदयांनी स्वत:च्या अधिकारात बदलला, हा धोरणात्मक निर्णय होता, शासनाचा निर्णय होता. ग्रामीण भागातील शेतक-यांची कुचंबणा होईल, असा निर्णय मंत्रिमहोदयांनी आपल्या अधिकारात घेतला, अशा प्रकारचा माझा दावा आहे.

सभापती महोदय, या घेतलेल्या निर्णयामुळे म्हशी आल्या, त्यापाठोपाठ मग खाद्यही आले. संबंधित मंत्रिमहोदयांना वाटले की, आरे वसाहतीच्या जमिनींवरील गवत छाटण्यासाठी ठेका दिला जातो. एवढया म्हशी वाढल्यानंतर त्यांना अन्न मिळाले पाहिजे, त्यांच्या खाद्याची सोय केली पाहिजे, टेंडर मागविले तर वेळ जातो, म्हशींना तर अन्न मिळाले पाहिजे, उदार अंत:करणाने म्हशी आणल्या आहेत, त्यांना खाद्य मिळाले पाहिजे. टेंडर न मागविता, जुन्या लोकांना मुदतवाढ द्यायची मंत्रिमहोदयांना सवय झाली आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .........

दिनांक 19 ऑगस्ट, 2004 रोजी श्री.दीपक मनुभाई पटेल यांनी दुग्ध विकास मंत्री श्री.अनिस अहमद यांना "पॅरा गवताच्या ठेक्याच्या नुतनीकरणाबाबत" पत्र पाठविले. त्या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले की, "मी, श्री.दीपक मनुभाई पटेल, पॅरागवत ठेकेदार आपणांस नम्रतापूर्वक विनंती करतो की, मला स.क्र.आदुव/मु.का.अ./शा-3/2003-04/24 अेकर/4762 दिनांक 07/09/2003 एकुण 24 एकर, 22 गुंठे जमीन पॅरा गवत कापण्यासाठी ठेका देण्यात आलेला होता. सदर ठेका दिनांक 04/09/2004 रोजी संपत आहे. सदर ठेक्यापैकी ग.क्र.5 येथील 82 गुंठे जमीन मी शासनाला परत करत आहे. आरे दुग्ध वसाहतीमध्ये गोरेगांव, मरोल व पवई चेकनाक्याचा प्रवेश शुल्क वसुली ठेवण्यात शासन क्रमांक अेअेमसी/1004/16224/प्र.क्र.103/पदुम-8 दिनांक 19/08/2004 नुसार मला ही ठेक्यासाठी तीन वर्षे कालावधी करीता उर्वरित 22-20 गुंठे जमिनीवरुन पॅरा गवताचे उत्पन्न घेण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी, ही विनंती." 19 तारखेला पत्र आले. माननीय मंत्री महोदयांनी ताबडतोब त्या पत्रावर असे लिहिले की, "Please put up, C.E.O." 19 तारखेच्या पत्रावर ताबडतोब कार्यवाही करण्यात आली. शासनास 1 लास 50 हजार रुपये इतका महसूल प्राप्त होणार असल्यामुळे ठेकेदाराला तीन वर्षाकरिता ठेका वाढवून देण्यात आला. 3 महिन्यांच्या वर ठेका वाढवून देण्याचा अधिकार नसतांना माननीय मंत्री महोदयांनी 3 वर्षाकरिता ठेका वाढवून दिला, यामुळे शासनाचे किती लाखाचे नुकसान झाले, हे माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात सांगितले तर बरे होईल. 19 ऑगस्ट रोजी पत्र आले आणि ताबडतोब 2 दिवसांनी मुदत वाढ देण्यात आली. ठेका रक्कमेत 5 टक्के मुदतवाढ दिल्यामुळे गायींची सोय झाली असेल, खिळे देणा-यांची सोय झाली असेल. गवत हा छोटा भाग आहे. परंतु प्रवृत्ती मोठी आहे. म्हशीने जर गवत खाल्ले तर ती शेण देईल. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी शेणाचा भ्रष्टाचार सभागृहामध्ये मांडला होता. माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आले की, शेण में भ्रष्टाचार हो सकता है. मग माननीय मंत्री महोदयांनी अधिका-यांना बोलाविले आणि विचारले की, हे काय आहे. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री ग्रामीण भागातून येथ पर्यंत आलेले आहेत. ग्रामीण भागामध्ये त्यांचा गोठा आहे आणि तो पारंपारिक आहे. त्यांनी सरपंच म्हणून काम केलेले आहे. त्यांच्याकडे शेती आहे आणि ज्यांच्याकडे शेती असते त्यांच्याकडे गोठा असतोच.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ........ 11:00

श्री.दिवाकर रावते .........

सभापती महोदय, 16 हजार म्हशी होत्या. एक म्हैस रोस 15 किलो शेण देते. हे गणित ठरलेले आहे. 16,000 x 15 म्हणजे रोज 240 टन शेण मिळते. आज शेणाचा भाव काय आहे ? शेणाचा भाव 500 रुपये प्रती टन इतका आहे. ज्यांनी ठेका घेतला त्यांना 1 लाख 20 हजार रुपये प्रत्येक दिवशी मिळतात. शेण गोळा करण्यासाठी त्या ठेकेदाराकडे माणसे किती आहेत ? त्या ठेकेदाराने दिनांक 05/05/2006 रोजी माननीय दुग्ध विकास मंत्री श्री.अनिस अहमद यांना पत्र दिले.त्या पत्राचा विषय असा आहे की, "आरे वसाहतीतील विविध गटाभोवती व विविध ठिकाणी उपलब्ध शेणखत व आगावू रकमेचा भरणा करुन स्वखर्चाने वसाहती बाहेर घेऊन जाण्याचा ठेका देण्यात यावा."

यानंतर श्री.गागरे ........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

ते मुळातच ठेकेदार आहेत. मे.नजीर एम. बागवान यांना ठेका मिळालेला असून त्यांनी दिनांक 5.5.2006 रोजी माननीय दुग्धविकास मंत्र्यांना अर्ज दिला आहे की, "वरील विषयाच्या संदर्भात मी आपणास विनंतीपूर्वक अर्ज करतो की, मला मुख्याधिकारी, आरे यांचे कार्यालय आरे दुग्धवसाहत मुंबई कार्यकारी यांच्याकडून वरील विषयाचा ठेका दिनांक 1.12.2004 ते दिनांक 30.11.2007 या तीन वर्षाच्या कालावधीकरिता देण्यात आला होता. आरे वसाहतीतील परिसर मोठे असून त्यातील तबेला पूर्व परिसरात निखुरलेला आहे. तसेच शेणखत डंपींग करण्यात आलेली जागा ही सुध्दा विखुरलेली आहे. शेणखत कामासाठी जवळ जवळ 150 ते 200 माणसे कामगिरीवर असतात. त्यांचा लेखा ठेवणे आवश्यक असल्याने तसेच त्यांना वेळोवेळी संपर्क साधरण्यासाठी एका ठराविक जागेची आवश्यकता आहे. मी पाहणी केली असता आरे वसाहतीतील मध्यवर्ती भांडार गट क्र.2 येथील अग्नीशमन विभागाचे ऑफिस असून सध्या शासनाने अग्नीशामक विभाग बंद असल्याने सदर विभागाच्या कामासाठी असलेली खोली रिक्त असून विनावापर पडून आहे. त्याचा वापर मी ऑफिस कामासाठी वापरण्यास तयार आहे व त्याच्यासाठी होणारे भाडे शासकीय नियमानुसार भरण्यास तयार आहे" अशा प्रकारचा अर्ज दिलेला होता. यानंतर ठेकेदारास ही खोली देण्यात आलेली आहे. आरे कॉलनीत हजारो म्हशी असून शेकडो लोक येथे काम करीत आहेत. या लोकांना आरेच्या खर्चाने राहण्यासाठी घरे दिलेली आहेत. या सर्व बाबींचा हिशोब केल्यानंतर कमाई होण्याऐवजी प्रत्येक म्हशीमागे 300 रुपये नुकसान झाल्याचे आढळून आले आहे. हे सर्व कागदपत्री असून माननीय मुख्यमंत्री महोदयांनी याची चौकशी करावी.

सभापती महोदय, यानंतर शेणाच्या ठेक्याबाबत सांगतो. आरे वसाहतीतील शेणाचा ठेका श्री.नझीर एम.बागवान यांना तीन वर्ष कालावधीसाठी देण्यात आला होता. यामध्ये शासनाला बाजारभावाप्रमाणे दरवर्षी एक कोटीहून अधिक रक्कम मिळावयास हवी होती. परंतु प्रतिवर्षी फक्त 2 लाख 50 हजार रुपयाप्रमाणे त्यांना ठेका देण्यात आलेला आहे. तेथील शेणाचे दिवसाला एक लाख रुपये येतात. याप्रमाणे महिन्याचा किंवा वर्षाचा हिशोब केला तर किती रक्कम मिळत असेल हे आपल्या लक्षात येईल. परंतु या प्रकरणात माननीय मंत्री महोदय श्री.अनिस अहमद यांनी त्यांच्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ KGS/

श्री.दिवाकर रावते .....

सहीने, त्यांच्या अधिकारात सचिवांचा नकार असतानाही श्री.नझीर एम.बागवान यांना तीन वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. मंत्री महोदय म्हणतात की, "I am the Head of the Department. I have got every right".

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी काहीच सोडायचे नाही असे ठरविले आहे. आरे कॉलनीमधील ताडी माडीच्या झाडांचेही ठेके देण्यात आलेले आहेत. मंत्री महोदयांनी त्यांच्या अधिकारात हे ठेके तीन वर्षासाठी दिलेले आहेत. "No tender" मंत्री महोदयांनी थेट हस्तक्षेप केला असून ते म्हणतात की, "मेरे पास आवो और ऑर्डर लेके जाव, मै हैड ऑफ द डिपार्टमेंट हू, सचिव वगैरा कुछ नही" याप्रमाणे ताडीचा ठेवा वाढवून दिलेला आहेत. मंत्री महोदयांनी ताडीच्या ठेक्याबाबत स्वत: नोटींगवर लिहिले आहे की, "Please put up" ठेकेदाराने दिनांक 21.8.2004 रोजी अर्ज केला असून त्याच दिवशी मंत्री महोदयांनी सही केली असून एकाच दिवसात ठेका मंजूर करुन ऑर्डर देण्यात आलेली आहे. मात्र आपले आमदार मतदारसंघातील कामासाठी मंत्रालयात वेगवेगळया टेबलवर व मंत्री महोदयांकडे खेटे मारीत आहेत, तरीही त्यांचे काम होत नाही, लवकर कार्यवाही होत नाही. इकडे एका दिवसात ठेका मंजूर करुन ऑर्डर दिली जाते, किती तफावत आहे ते पहा ? सभापती महोदय, आरे कॉलनीतील पॅरागवत, शेड, शेण, ताडीमाडीची झाडे या सर्व बाबींमध्ये हाच प्रकार चालू आहे.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 11:10

श्री. रावते .....

ताडी झाल्यानंतर आता आणखी एक भ्रष्टाचाराचा प्रकार मी आपल्याला सांगणार आहे. आरे कॉलनीमध्ये असलेल्या म्हशी धुण्यासाठी देखील ठेका दिला जातो आणि त्यासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी देखील जे पैसे मोजावे लागतात त्यानुसार हा ठेका ठरविला जातो. आता एक म्हैस धुण्यासाठी किती पाणी लागते याची आपल्याला कल्पना असेल. हे पाणी मुंबई महापालिकेकडून अधिकृतरित्या दिले जाते. मी याबाबतीतही त्यांच्याशी बोललो आहे. असा त्यांचा यात काहीही संबंधी नाही. कारण त्यावेळी हे आमदारही नव्हते. 1988 साली एक म्हैस धुण्यासाठी 45 रूपये प्रशासन घ्यायचे. पण आता पाण्याचे दर वाढल्यामुळे हे काम 45 रूपयांमध्ये करणे परवडत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. 1988 साली महापालिकेच्या स्थायी समितीचा मी चेअरमन होतो त्यावेळेस हे पाण्याचे दर महापालिकेने वाढविले आहेत. त्यामुळे त्यांनी सांगितले की, हे काम या कमी पैशात आम्हाला परवडत नाही. आम्हाला 45 ऐवजी 75 रूपये दर करून द्यावा. आता हे काम करणारे एकंदर 100 लोक आहेत आणि त्यातील केवळ 5-6 जण परब, सुर्वे, काळे असे आहेत आणि बाकी सारे महम्मद वगैरे आहेत. हा प्रश्न मी जातीय वा धर्मीय करीत नाही. केवळ माहितीसाठी सांगतो आहे इतकेच. ही मंडळी या प्रश्नावर कोर्टात गेली. कोर्टाने सांगितले की, तुम्ही या प्रश्नी कोर्टाच्या बाहेर तडजोड करा. या संबंधात सचिवांनी लेखी सांगितले आहे. त्यामुळे 1988 पासूनचा ॲरिअर्स जवळपास 12 कोटी रूपये होतो तो द्यावा लागेल. आता मंत्र्यांकडे ही बाब गेल्यावर मंत्र्यांनी कोर्टाचा निर्णय मान्य करण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे सेटलमेंट करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे सेटलमेंट केलेदेखील. पण साहेब, आपण या 100 लोकांना 45 ते 75 रूपयांतील फरक माफ केला आणि आतापासून 75 रूपये भरा म्हणून सांगितले. आता हे कोट्यवधी रूपये सगळे यांना माफ केले ते गम्मत म्हणून केले का ? सभापती महोदय, या प्रकरणाचीही आपण काय चौकशी करणार आहात ? 1988 पासून 2000 सालापर्यंतचा ॲरिअर्स किती होतो ? आता 2000 सालापासून आमच्या आताच्या मंत्री महोदयांकडे कार्यभार आला आणि त्यांनी तेथेपर्यंतची सारी थकबाकी माफ केली, ती का केली, कशासाठी केली, त्यातून शासनाचे म्हणजे आरेचे किती नुकसान झाले हे आपण पहावे अशी विनंती मी माननीय मुख्यमंत्र्यांना करतो. सभापती महोदय, हा पाण्याचा भ्रष्टाचार झाला. आताच्या आमच्या मंत्री महोदयांना वाटले की, आरेचे कंपाऊंड ही एक दुभती गाय आहे आणि म्हणून हा बिबळ्या घुसला आत. मुंबई महापालिकेचे पाणी आहे. त्यासाठी

...... आर 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

आरे कॉलनी महापालिकेचे बिल भरते आहे आणि ते पाणी हे लोक टँकरने विकतात. निलेश एंटरप्रायझेस यांनी याच्या ठेक्याच्या कालावधीला मुदतवाढ करून मिळण्यासाठी मंत्र्यांकडे अर्ज केला आणि त्यांनी लगेच त्यावर लिहिले, प्लीज पूट अप. खाली सही, अनिस अहमद. सभापती महोदय, आरे वसाहतीत गट क्र.8 - 18 एप्रिलचा ठेका वाढविणे असे त्यात म्हटले आहे. सभापती महोदय, महापालिका आरेला पाणी पैसे घेऊन देते आणि आरे प्रशासन या लोकांना ते 1 रूपये दराने देत असले तरी त्यांनी ते 2 रूपयानी बाहेर विकले तरी त्यात फायदा आहे. असा हा पाण्याचा ठेका हे महोदय विकून बसले आहेत. सभापती महोदय, अशा प्रकारे दुग्ध व्यवसाय विभागाच्या साऱ्या व्यवहारांची संपूर्ण माहिती माझ्याकडे आता उपलब्ध आहे, ती सर्व काही मी येथे सांगत नाही. कारण माझे इतर सहकारी देखील या प्रस्तावावर बोलणार आहेत. त्यामुळे ते चिंतेत आहेत, त्यांनाही वेळ देणे आवश्यक आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .....एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, सर्वात महत्वाची बाब माननीय मुख्यमंत्र्यांसमोर मी मांडतो. या मंत्रिमहोदयांनी नागपूर येथे एक बंगला घेतला. त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये छापून आले. आम्ही देखील नियम 289 अन्वये सभागृहामध्ये प्रस्ताव दिला. त्यावेळी सभागृहातील सदस्य म्हणाले की, हे काय रोज चालले आहे? जर मंत्री रोज पैसा खात असतील तर आम्ही बोंबलणारच. तोंडाला माखन लागलेले दिसत असतांना त्या श्रीकृष्णाची माय त्याला मारणार नाही काय? तरीही तो बोलतो की "मै नही माखन खायो" आम्ही काय करावयाचे? या सदनामध्ये आम्ही विरोधी पक्ष म्हणून आलो आहोत, त्यामुळे आवाज उठविणे आणि याठिकाणी तो विषय मांडणे आमचे कर्तव्य आहे. सभापती महोदय, त्या बंगल्याच्या संदर्भात निवेदन करतो असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ते निवेदन अजून करण्यात आले नाही. मंत्रिमहोदय माझ्याकडे म्हणाले की, "साहिब, क्यों बोंब मारते हो, मुझे अधिकृत रुप से दिया गया है" मला हे माहीत नव्हते. जर माहीत असते तर मी देखील मराठवाडयामध्ये एक बंगला घेतला असता. मंत्र्यांना एकच बंगला मिळत असतांना या मंत्र्यांना दुसरा बंगला कोणत्या अधिकारामध्ये देण्यात आला? याचा खुलासा झाला पाहिजे. सभापती महोदय, त्या बंगल्याचे प्रकरण काढल्यानंतर ती फाईल गायब झाली. ही गंभीर बाब आहे. एक मंत्री आपल्याकडे तीन-चार वर्षे फाईल ठेवतो आणि ती देत नाही, हे सुध्दा तसेच आहे. गरीब नवाझ यांना 5 टक्केप्रमाणे ठेक्याची 3 वर्षे मुदतवाढ दिली. कायदा व नियम बदलून सचिवांनी नकार दिला असतांना सुध्दा मुदतवाढ दिली ही सुध्दा गंभीर बाब आहे. सभापती महोदय, त्यावेळचे सचिव माननीय श्री.खोब्रागडे साहेब यांचे त्या फाईलवर रिमार्क्स आहेत. त्यांनी स्वत:च्या हातांनी लिहिले आहेत ते आपण तपासून घ्या. या फाईलचे प्रकरण कोर्टामध्ये सुरु होते. त्यांनी म्हटले आहे की, "Show me the files regarding following decisions.:-

1. Decision dated 19.8.2000 to give extension to M/s. Garib Nawaz.
2. Decision dated 29.4.2005 to give extension to M/s.Sushil Bank.
3. Decision dated 19.9.2003 4. Noble Dairy 5. Desai Dairy.
6. Decision dated 4.5.2003.

याठिकाणी हे सरकार म्हणत आहे. आणि जर असे सरकारच्या विरोधात लिहिले जात असेल तर माननीय मुख्यमंत्री महोदय, अशा एका रिमार्कवर आपण मंत्रिमहोदयांचा राजीनामा घेतला पाहिजे.

DGS/

श्री. दिवाकर रावते...

सचिवांनी आदेश दिले आहेत की " If the files are not available inform the Police".

त्या फाईल्स मंत्रिमहोदयांकडे आहेत म्हणून त्या सापडत नाहीत असे एका खात्याचा सचिव सांगतो की, आपण पोलिसांमध्ये तक्रार लिहा. ही साधी गोष्ट आहे काय? त्या संदर्भात आपण काय केले? हे प्रकरण गंभीर आहे. ते हायकोर्टामध्ये रिट झाले असल्यामुळे ते पब्लिक डॉक्युमेंट आहे. या फाईलच्या प्रकरणामध्ये इतका घोळ झाला आहे की, असे विविध आदेश मंत्रिमहोदयांनी वेगवेगळया वेळी दिले आहेत त्यांचे नोटींग त्यावर आहे. त्यांच्या सहीचे नोटींग आहे. त्यांनी हे नोटींग मराठीमध्ये लिहिले हे पाहून आम्हाला बरे वाटले. ते नोटींग आपणास वाचून दाखवितो. "प्रस्तुत प्रकरणाबाबतची नस्ती माझ्या कार्यालयाकडे सादर करण्यात आल्याची पोच विभागाकडे नसल्याचे समजते. तसेच, माझ्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांनी सदर नस्ती माझ्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत नसल्याचे कळविले.प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रस्तुत प्रकरणी परिच्छेद निहाय अभिप्राय सादर करणे क्रमप्राप्त आहे. नस्ती सापडत नाही या एकमेव कारणास्तव परिच्छेदनिहाय अभिप्राय सादर न करणे संयुक्तिक नाही". याचा अर्थ नस्ती मिळत नाही हे कारण तुम्ही सांगू नका. तुमच्याकडे असलेले पेपर देऊन टाका. असे त्यांनी स्वत:च्या हाताने लिहिले आहे ही गंभीर बाब आहे. या संदर्भात गरीब नवाझला कां दिले? हे स्पष्ट होईल.परंतु या संपूर्ण प्रकरणामध्ये ठेक्याचा कालावधी दिनांक 21.8.2004 च्या पत्रानुसार

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू....

17/2005 ते 16/2008 या तीन वर्षाच्या कालावधीत मूळ ठेक्यामध्ये पाच टक्के वाढवून मूळ करारनाम्यात पाच क्रमांकाची अट शिथिल केली. तसे करण्याचा अधिकार नाही. सचिवांनी लिहिलेले आहे की, ही अट शिथिल करता येत नाही. परंतु या महोदयांनी आपल्या सहीने ती अट शिथिल केली आणि हा ठेका दिला. हे प्रकरण कोर्टात असल्यामुळे त्यावर मी जास्त बोलणे योग्य नाही. सभापती महोदय, जी ॲफिडेव्हीट केलेली आहेत ती गंभीर आहेत. यामधील गंभीर प्रकरण आहे त्याची सरकारने नोंद घ्यावी, सरकारच्या सचिवांनी हायकोर्टामध्ये जे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे ते गंभीर आहे. " I say that Respondent No.4, Secretary, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development & Fisheries Department, Government of Maharashtra, sought the Government's orders on its stands taken on the review order dated 11th July,2007, passed by the Respondent No.6. The stand of the Government is as under:

1) Extent of loss cannot be ascertained. हा सरकारने ठेका दिल्यामुळे सरकारचा यामध्ये किती लॉस झाला ? आपण किती नुकसान केले आहे ते सांगता येत नाही एवढे आपण नुकसान केले. याबाबतचे ॲफिडेव्हीट आहे. पुढे म्हटलेले आहे की,

2) Relaxation of condition No.5 was not proper.

3) There are procedural lapses.

सभापती महोदय, मला जास्त बोलावेसे वाटत नाही. सचिव, सरकारच्या विरोधात म्हणजे मंत्र्यांच्या विरोधात हायकोर्टामध्ये आपले म्हणणे मांडत असतील तर मंत्र्यांना त्यांच्या पदावरून दूर करावे, यापेक्षा स्ट्राँग केस कोणती असू शकत नाही. सरकार त्यांना काढण्यामध्ये नामुष्की का स्वीकारते, समजत नाही. माननीय मुख्यमंत्री महोदय आपण याबाबतीत का हतबल झाला, ते कळत नाही. वरचा दबाव आहे, वरचा दबाव आहे, असे बोलले जाते. महाराष्ट्रामध्ये सर्वसामान्य जनतेची कामे व्यवस्थित केली जात नसतील तर केवळ वरचा आशीर्वाद आहे म्हणून मी म्हणेल तेच करेन, मी म्हणेन तेच चालेल. कोट्यावधी रुपये आले काय आणि गेले काय ? मला कोण विचारणार ? कारण मी कोणाच्या मेहरबानीने मंत्री झालेलो नाही. हे महाराष्ट्र राज्यात सहन केले जाईल काय, हा प्रश्न आपल्यासमरे उभा राहिलेला आहे. सुदैवाने मुख्यमंत्री महोदय, आपण या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू.....

चर्चेच्यावेळी उपस्थित आहात. सचिव, श्री.खोब्रागडे यांनी पोलिसात तक्रार नोंदवा असे सांगणे, ही गंभीर बाब आहे. ही तक्रार खरे तर मंत्र्यांच्या विरोधात आहे. त्या विभागाचे सचिव सांगतात, दुसरे सचिव हायकोर्टात रिट करतात. कोर्टामध्ये केस असल्यामुळे त्यावर मी जास्त बोलत नाही. परंतु पब्लिक डाक्युमेंट उपलब्ध असल्यामुळे त्यावर बोलण्याचा मला अधिकार आहे. अनेक सांगण्यासारख्या गोष्टी आहेत. परंतु वेळेचा अभाव आहे. श्री.अनिस अहमद यांचे कर्तृत्व अस्मानीसुलतानी आहे. अस्मानी नेतृत्व आहे. त्यांच्याबाबतीत अजून 25 प्रकरणे आहेत. ते मंत्री झ ााल्यापासून तेवढेच ते काम करतात की काय, माहीत नाही. ते गाफीलपणाने काम करतात. त्यांना चांगला मार्गदर्शक नाही., ते स्वत:च फाईलवर सही करतात. ते हिंम्मतबाज आहेत. जे केले ते मी केलेले आहे, काय करायचे ते मला करा, मधे अधिकाऱ्यांना घेऊ नका. एक श्री.आडे नावाचे अधिकारी होते, ते गेले. सभापती महोदय, सन्मानीय श्री.मोडक साहेबांनी या ठिकाणी दुधाच्या प्लॅस्टीक पिशव्या खरेदीमध्ये झालेला 9 कोटीचा भ्रष्टाचार बाहेर काढला. हे काय चालले आहे ? शेतकऱ्यांच्या दुधामध्ये घोटाळा, शेणामध्ये घोटाळा, ताडीमध्ये घोटाळा, असे प्रकार झालेले आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदय या सगळ्याच्याबाबतीत आपण काय वासलात लावणार आहात, ते कळले पाहिजे. याबाबतची चौकशी करा. पण महाराष्ट्र राज्यातील लहान असलेल्या आरे कॉलनीमध्ये बिबळ्याने मोठा धुमाकूळ घातला. त्याला पिंजऱ्यामध्ये बंद करून संरक्षित वनामध्ये पाठविणे ही वन खात्याची पध्दती आहे, ती आपण कराल काय ? सभापती महोदय, मला बोलण्यासाठी आपण वेळ दिला त्याबद्दल धन्यवाद देतो. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

--

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपला अधिक वेळ घेणार नाही. कारण आमचे आणखी तीन सहकारी बोलणार आहेत त्यांचा वेळ मी घेणार नाही. मी फक्त दोन तीन गोष्टींचा एक दोन मिनिटात उल्लेख करुन मी माझे बोलणे संपविणार आहे. एक तर टीडीआरची शासनाने चौकशी करावी. कारण टीडीआर नियमानुसार एलआयजी आणि एमआयजीला दिला जातो तो एचआयजीला का दिला गेला ? काल आपण यूएलसीवर किंवा गृहनिर्माण योजनेवर चर्चा केली. या मुंबई शहरामध्ये या सर्व धोरणांचा उपयोग गरिबांच्या घरासाठी झाला पाहिजे. मी श्रीमंत गरीब असा फरक करत नाही परंतु गरिबांना काही मिळाले पाहिजे. सगळाच टीडीआर एचआयजीला गेलेला आहे असा माझा आरोप आहे आणि त्याची चौकशी झाली पाहिजे.

दुसरा एक छोटा मुद्दा आहे पण महत्वाचा आहे. 20 मिनिटांमध्ये अन्य सहकाऱ्यांनाही बोलावयाचे आहे. मुंबईत जी सगळी तिवरांची जंगले आहेत त्या ठिकाणी भराव टाकून बिल्डर फार मोठ्या प्रमाणावर महानगरपालिकेचे, शासनाचे, ज्या ज्या काही शासकीय निमशासकीय ज्या संस्था आहेत त्यांचे नियम धाब्यावर बसवून या मुंबई शहराची वाट लावत आहेत. त्यासाठी आपण अतिशय कठोरपणे कारवाई करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर काल एका गोष्टीचा पुसटसा उल्लेख झाला. काल अनेक सन्माननीय सदस्यांनी त्याचा उल्लेख केला. या मुंबई शहरामध्ये आपण 2000 पर्यंतच्या झोपडपट्टयांना मान्यता द्या असे सांगण्यात आले. शासनाचा जो निर्णय असेल तो निर्णय घेण्यास शासन मोकळे आहे. पण हजारो बेकायदेशीर बांधकामे दररोज या मुंबई शहरामध्ये होत आहेत. त्याचे उदाहरण काल सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले की, भायखळा येथील रंगवाला कंपाऊंडमध्ये 20 वर्षापासूनचे बांधकाम आहे. परंतु मुंबई महापालिकेचा कोणताही कायदा या बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, ती बांधकामे तोडण्यासाठी उपयोगी पडला नाही. कधी तरी एखादी मोहीम काढली जाते. कोणी तरी 15 पैशाच्या कार्डवर हायकोर्टामध्ये जनहित याचिका करतात आणि त्याला स्टे मिळवितात.. त्यामुळे या मुंबई शहराला जर वाचवावयाचे असेल तर महानगरपालिकेला नगरविकास खात्याने अतिशय कडक आदेश देणे अत्यंत आवश्यक आहे. आपण जाहीर केले. ज्या ज्या ठिकाणी बांधकाम उभे राहील ते बांधकाम त्याच दिवशी जर तोडले

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. मधुकर चव्हाण .....

नाही तर या मुंबई शहरामध्ये हाहाकार होईल आणि राजकीय स्पर्धेतून प्रत्येक निवडणुकीच्या वेळी याबाबत स्पर्धा लागेल. 2005 च्या बांधकामांना मान्यता द्या, 2007 च्या बांधकामांना मान्यता द्या, 2009 च्या बांधकामांना मान्यता द्या अशी स्पर्धा लागेल आणि मग भविष्यामध्ये 25-30 वर्षानंतर या शहराचे काय होईल हे आपल्याला सांगता येत नाही.

शेवटचा एक मुद्दा मांडतो. गेल्या महिनाभरामध्ये किंवा प्रत्येक अधिवेशनामध्ये हा विषय येतो. विशेषतः सोलापूर जिल्हा असेल, जे धान्य गरिबांसाठी रेशन दुकानातून मोफत वाटले गेले पाहिजे त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचे घोटाळे झालेले आहेत. ज्यामध्ये तहसीलदार असतो, ज्यामध्ये तलाठी असतो, ज्यामध्ये अनेक संबंधित अधिकारी असतात. म्हणून यासंबंधी संपूर्ण सीआयडीची चौकशी करुन हे जे धान्य गरिबांच्या ताटापर्यंत गेले पाहिजे, घरापर्यंत गेले पाहिजे ते न जाता परस्पर भ्रष्टाचाराच्या माध्यमातून सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने त्या ठिकाणी करोडो रुपयांचा घोटाळा होतो त्याची चौकशी करावी. या ठिकाणी मुद्दे खूप आहेत परंतु प्रत्येक वेळी इतर सन्माननीय सदस्यांवर अन्याय होतो म्हणून मी या ठिकाणी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, अत्यंत गंभीर विषय सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी मांडलेला आहे. यासंदर्भात मी 4 मुद्दे मांडणार आहे त्याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी माझी अपेक्षा आहे. गोरेगाव येथील आरे कॉलनीचे प्रकरण आताच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडले. त्याच गोरगावमध्ये रॉयल पामने जो काही धुमाकुळ घातला आहे त्याकडे शासनाचे काही लक्ष आहे की नाही याचे मला आश्चर्य वाटते. आपण उत्तर देण्यापूर्वी राजकीय उत्तर नको म्हणून मी जाणीवपूर्वक सांगतो की, या रॉयल पामला आमचे सरकार असताना गोल्फ क्लबसाठी जागा दिली. त्या ठिकाणी एक सुंदर गोल्फ क्लब असावा, वनाचे सौंदर्य वाढवावे या सगळ्या भावनेने जागा दिली गेली. आज रॉयल पामच्या रोज टाईम्स ऑफ इंडियामध्ये पूर्ण पानभर रकाने भरुन जाहिराती येत राहतात. त्या ठिकाणी अपार्टमेंट हाऊसेसचे काम चालले आहे. ती वन खात्याची जमीन आहे. ती गोरेगावच्या आरे कॉलनीची जमीन आहे. त्या ठिकाणी अपार्टमेंट हाऊसेसचे काम करीत आहेत. त्यांना कोण परवागनी देते आणि कशी परवानगी देते ? जसे श्री. गोविंदस्वरुप यांचे प्रकरण आहे त्याला लागूनच हे प्रकरण आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्याला वेळ नसेल तर आपण हेलिकॉप्टरने पाहणी करावी पण आपण जाणीवपूर्वक पहावे. त्या ठिकाणी जो काही प्रकार चालला आहे तो पहावा. त्या ठिकाणी त्या रॉयल पामच्या मालकासह जेवढे कोणी असतील त्यांना शासन करावे अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो. याच पध्दतीने पवईमध्ये हिरानंदानी बिल्डर आहे. त्यांना जागा दिली. काल आपण सांगितले की, त्यांनी आपल्याला घरे दिली नाहीत. 5 टक्के ,10 टक्के मध्ये जी घरे मिळावयास पाहिजे ती मिळत नाहीत. त्यांनी त्या 5 टक्के घरांसाठी वेगळी इमारत बांधली. त्यांच्या इमारतीमध्ये ते आपल्याला जागा देत नाहीत. त्या ठिकाणी आता जे काही चालले आहे त्यामध्ये 90 डिग्रीमध्ये कापावा तसे डोंगर कापून डोंगर कमी करुन नवीन इमारती बांधत आहेत. त्या ठिकाणी मोकळे भूखंड आहेत की नाहीत, मैदाने आहेत की नाहीत, मनोरंजनासाठी जागा आहे की नाही हे काही कळत नाही.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत पुढे सुरु....)

त्या ठिकाणी नुसत्या उमारती उभ्या राहात आहेत. त्याबाबतीत लक्ष घालावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आपण जर नवी मुंबईतील महापे गावातून गेलात तर आपणाला अगदी वाईट परिस्थिती दिसून येईल. महापे येथील वनश्रीने नटलेला सुंदर डोंगर आज त्या ठिकाणी दगडाची खाण झाल्यामुळे भूईसपाट होतोय. तेव्हा ही कोणाची खाण त्या ठिकाणी चालू आहे हे पाहून त्याबाबतीत कारवाई करावी अशी मी मागणी करीत आहे.

सीआरझेडच्या कायद्याच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, आज रायगड जिल्हयातील मुरुड-जंजिराच्या संपूर्ण पट्टयामध्ये कोणतीही परवानगी न घेता बंगले उभारले गेले आहेत. या बंगल्यांच्या संदर्भात सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चाही झालेली आहे. हे जे बंगले उभे राहिलेले आहेत त्यामध्ये अनेकांचे हात ओले झालेले आहे. तेव्हा याबाबतीतही कारवाई करावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. महानंदाच्या तळेकरांचे पुढे काय झाले हे आम्हाला कळले नाही. एवढे भयानक प्रकरण करणा-या तळेकरांचे पुढे काय झाले हे कळले तर बरे होईल, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 259 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला दुजोरा देत असताना काही बाबी मी या सदनासमोर मांडत आहे.

सभापती महोदय, आज भ्रष्टाचार हा खेड्यापासून राजधानीपर्यन्त पोहोचलेला आहे असे अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते. शासकीय भूखंड वाटपामध्ये केवळ महानगरपालिका आणि नगरपालिकाच नाही तर जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या अनेक भागामध्ये शासकीय भूखंडावर अवैधरित्या कब्जा केला जात आहे. मी 1990मध्ये जिल्हा परिषदेचा सदस्य होतो. त्यावेळी मी अशा प्रकारे अवैधरित्या कब्जा केलेल्या भूखंडाच्या बाबतीत कारवाई करुन ते शासनाकडे जमा करावेत अशा प्रकारचा प्रस्ताव जिल्हा परिषदेमध्ये मांडला होता. तसेच जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांची प्रॉपर्टी रजिस्टर असावी अशा प्रकारची मागणी मी 1990 पासून भंडारा आणि गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये प्रस्तावाच्या माध्यमातून केलेली आहे. आज परिस्थिती अशी आहे की, शासकीय जमीन ही कोणाच्या मालकीची आहे हे कळत नाही. ज्या कोणाला वाटेल तो जमिनीवर कब्जा करुन आपला अधिकार दाखवित आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील व्यथा मला दुर्दैवाने या ठिकाणी सांगावी लागत आहे. आमगाव कृषी उत्पन्न बाजार समितीवर नुकताच प्रशासक नेमला आहे. तेथे कायदा आणि सुव्यवस्था आहे की नाही हेच कळत नाही. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत कायदा एक सांगतो आणि शासनाचा जी.आर. दुसरे सांगतो आणि प्रशासन चालविणारे अधिकारी तेथे प्रशासक बसवितात. 1994च्या आधी बाजार समितीमध्ये अशासकीय प्रशासक नेमलेला होता. त्याने 1100 रुपये दराने 11 भूखंड दिले होतो. बाजार समितीला शेवटी कोर्टामध्ये जावे लागले. दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, कोर्टात केस चालू आहे आणि प्रशासकाला मुदतवाढ दिलेली आहे. अत्यंत दुर्दैवी अशी व्यवस्था राज्यामध्ये निर्माण झालेली आहे. खरे म्हणजे त्या बाजार समितीची चौकशी होणे आवश्यक आहे. त्या बाजार समितीचा जेव्हा मी सभापती आणि विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. नागपुरे हे सदस्य होते त्यावेळी आम्ही आदर्श अशी बाजार समिती निर्माण करण्याचे

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. केशवराव मानकर...

काम केलेले आहे. अशा या बाजार समितीवर आता प्रशासक नेमण्याचे काम केलेले आहे. मी जिल्हाधिका-यांना पत्र लिहून त्या ठिकाणी निवडणुका घेण्यात याव्यात अशी मागणी केली होती. या बाजार समितीला एक्स्टेन्शन द्यावे असे पत्र देखील मी माननीय पणन मंत्र्यांना दिले होते.

...नंतर कु. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर..........

शब्दाला किंमत नाही. म्हणतात की, आम्ही कायद्याने करतो. मंत्रिमंडळामध्ये आम्ही याचा विचार करीत आहोत पण ते होत नाही हे दुर्देव आहे. कायद्याने त्या ठिकाणी दोन प्रशासन बसविले गेलेले आहेत व ते परतही घेतले गेलेले आहेत. पणन महासंचालकांना यासंदर्भात परत सत्ता बहाल करण्यात आलेली आहे. ख-या अर्थाने राज्यकर्त्यानी जर हे थांबविले असेल तर आमगाव बाजार समितीला हे परत केले पाहिजे. मी अशी मागणी करतो की, अप्रशासकीय संदर्भात जो प्रशासक असतो तो कधीही बाजार समितीवर नेमू नये. कारण त्यामुळे त्या बाजार समितीचे वाटोळे होते. वेळ कमी आहे म्हणून नाहीतर मी यासंदर्भातील अनेक घोटाळे आपल्यासमोर मांडले असते. यासंदर्भात जर आपण मला प्रत्यक्षात चर्चेला बोलाविले तर यासंदर्भातील अनेक घोटाळे मी आपल्यासमोर सविस्तरपणे मांडीन.

सभापती महोदय, आणखी एक भ्रष्टाचाराचा मुद्दा मी याठिकाणी उघड करु इच्छितो तो असा की, इरिगेशन डिपार्टमेंटमध्ये शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून गोंदियामधील एका तालुक्यामध्ये 16,00,000 रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, त्या ठिकाणी नाल्याचे सरळीकरणाचे काम चालू होते. सदर ठिकाणी नाले बांधलेले आहेत, असे खोटे रेकॉर्ड, बोगस मस्टर तयार करण्यात येऊन त्यासाठी मिळणारे पैसे संबंधित अधिका-यांनी घेतलेले आहेत. एवढे करुनही संबंधित अधिकारी आज मोकाटपणे फिरत आहेत परंतु त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची चौकशी होत नाही तसेच कारवाईही होत नाही. यासंदर्भात अन्नधान्याच्या वाटपाबाबतही जर आपण चौकशी केली तर आपल्याला सुमारे दीड ते पावणे दोन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस येईल. अन्नधान्य वाटप योजने अंतर्गत कोटयावधी रुपयांचा माल आल्याचा दाखवून तो वितरीत झाल्याचेही दाखविण्यात आलेला आहे, यासंदर्भातील कूपन अजूनही तेथे उपलब्ध आहेत. दोन दिवसांमध्ये कोटयावधी रुपयांचा माल आला आणि तो केंद्रांवर वाटप करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात तो माल सामान्यांच्या घरात न जाता भ्रष्टाचाराच्या मार्गाने व्यापा-याच्या घरात गेलेला आहे. माहितीच्या अधिकारान्वये मी सदर प्रकरणाची माहिती मागितली असता तेथील तहसिलदाराने मला अद्यापही माहिती पुरविलेली नाही कारण यासंदर्भात उप अभियंता, कार्यकारी अभियंता, पुरवठा अधिकारी, तहसिलदार, जिल्हाधिकारी यांच्या संगनमताने हा भ्रष्टाचार झालेला आहे. गोंदिया जिल्हयामध्ये तळकावणी येथे अन्नधान्य वाटपासंदर्भातील एकूण दीड ते

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

पावणे दोन कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराची लवकरात लवकर चौकशी झाली पाहिजे. सभापती महोदय, या प्रस्तावावर मला बोलू द्यावे. मागच्या एका प्रस्तावावरही मला जास्त वेळ बोलू दिले नव्हते, आणि आताही नाही हा माझ्यावर एक प्रकारे अन्याय आहे.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार )** : सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर सदर चर्चा दुपारी 12 वाजून 15 मिनिटांपर्यंत संपवायची आहे व त्यानंतर माननीय मुख्यमंत्री व माननीय मंत्रिमहोदयांना या प्रस्तावावर उत्तरही द्यावयाचे आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, हा अंतिम आठवडा प्रस्ताव आहे. या प्रस्तावावर प्रत्येकाला पुरेसे बोलू दिले पाहिजे.

**तालिका सभापती** : सदर प्रस्तावावर एकूण 15 लोकांची नावे आहेत. प्रत्येकाला बोलावयाची संधी मिळाली पाहिजे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, ग्रामीण भागाच्या व्यथा जर सांगितल्या नाहीत तर त्या कळणारच नाहीत, हे दु:ख आहे. तसेच जर असेल आणि आपण जर म्हणत असाल तर मी माझे भाषण आताच संपवून टाकतो.

**तालिका सभापती** : सदर प्रस्तावावरील चर्चेला दुपारी 12 वाजून 15 मिनिटांपर्यंतच वेळ दिलेली आहे म्हणून त्याअनुषंगाने वेळेचे नियोजन करावे लागेल.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, पंतप्रधानांच्या पॅकेजचे वाटप होऊन देखील सामान्य व गरीब शेतक-याला न्याय मिळालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. बँकेचा मोठया प्रमाणात एन.पी.ए.वाढला. इतर मागसवर्ग कल्याण समितीचा दौरा करीत असतांना लक्षात आले की, तेथील पदाधिका-यांनी भ्रष्टाचार केल्यामुळे सामान्य व गरीब माणसाला झळ पोहोचलेली आहे. अनेक जागा त्या ठिकाणी रिक्त आहेत त्या भरल्या जात नाहीत आणि त्यामुळे बेरोजगारांना रोजगार मिळत नाही. भ्रष्टाचारामुळे अनेक शासकीय भूखंडाच्या बाबतीत सांगावयाचे असेल तर गरीब माणसाकरिता भूखंड मिळत नाही परंतु श्रीमंत माणसाकरिता मिळतात याची चौकशी आपण केली पाहिजे व यासंदर्भात सामान्यांना न्याय दिला पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. सदर प्रस्तावावर बोलण्याकरिता आपण मला वेळ दिला त्याबद्दल धन्यवाद.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्याची संधी मिळाली त्याबाबत मी आपल्याला धन्यवाद देतो.

मी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे या ठिकाणी लक्ष वेधू इच्छितो की, मंत्रिमंडळात असलेल्या माननीय मंत्रिमहोदयांनी मालवण किनारपट्टीवर श्री.कुडाळकर नावाच्या माणसाकडे सन 1984 सालातील असलेली परवानगी व सी.आर.झेड.कायदा ज्यावेळी सन 1990 मध्ये आला. या 1984 सालाच्या परवानगीनुसार जेवढया एफ.एस.आय. चे बांधकाम करायला हवे होते त्याच्या तिपटीने बांधकाम केले व सॅटेलाईटच्या नकाशावरती 25 गुंठे दाखविलेली जमीन प्रत्यक्षात सात बाराच्या उता-यावरती 27 गुंठे आहे.

यानंतर श्री.कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ...

त्या 25 गुंठे जमिनीपैकी 2 गुंठे जमीन समुद्रामध्ये आहे. समुद्रामध्ये असलेली जमीन नगरपालिकेच्या सहाय्याने कमी दराने घेऊन आणि समुद्रात भराव टाकून सीआरझेड नियमाचे उल्लंघन करुन त्याठिकाणी शीशमहल बांधलेला आहे. अशा प्रकारे शीशमहल 1990 साली सीआरझेडचा कायदा आल्यानंतर सुध्दा बांधता येत असेल तर त्याठिकाणी असलेली मच्छिमारांची घरे जी धापांची आणि झावळयांची आहेत त्यांना सीआरझेड कायद्यामुळे बांधता येत नाहीत ती बांधण्यासाठी परवानगी मुख्यमंत्रीमहोदय देतील काय किंवा कायद्यामध्ये दुरुस्ती करतील काय ? एका मंत्र्यांला अशा प्रकारची परवानगी मिळत असेल तर इतरांसाठी सुध्दा अशा प्रकारची परवानगी देण्यासाठी आपल्याकडून काही प्रयत्न होणार आहेत काय याचे उत्तर द्यावे. कारण अशा प्रकारचा प्रश्न मांडल्यानंतर मला धमक्या येतील माझा पण रमेश गोवेकर होईल म्हणून माननीय मुख्यमंत्री मला संरक्षण देतील काय असा माझा त्यांना प्रश्न आहे. एक मंत्री अशा प्रकारचा शीशमहल उभा करीत असताना आपल्या घरांचे काय असा प्रश्न याठिकाणी राहणाऱ्या मच्छिमार लोकांना पडलेला आहे. आपण झावळयांच्या आणि धापांच्या घरात रहात असल्यामुळे आपल्याला सुध्दा घरे बांधण्याची परवानगी मिळेल या आशेने ते शासनाकडे बघत आहेत. याकडे खास लक्ष देऊन यावर उपाययोजना करावी. जर सीआरझेड कायद्याचे उल्लंघन झाले असेल तर नगरपालिकेने कशा प्रकारे परवानगी दिली याची सर्व चौकशी झाली पाहिजे अशी माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये महानंदाने युतीच्या काळात पशुखाद्य कारखाना काढला.. हा कारखाना काढण्याच्या पाठीमागचा उद्देश हा स्थानिक लोकांना नोकऱ्या देण्यासाठी कारखाना असा होता. पण तेथील लोकांना नोकऱ्या मिळाल्या नाहीत. काही दिवसातच कारखाना बंद पडला. महानंदाचे कोटयवधी रुपये त्या कारखान्यासाठी खर्च झालेले आहेत. शिवाजीराव तळेकर यांच्या काळात हा कारखाना उभा झाला. यावर काय उपाययोजना झाली ? युतीच्या काळात 6 कोटी रुपये खर्च करुन शासकीय डेअरी याठिकाणी उभी केली. ही डेअरी आता तोटयात चालली आहे. एका बाजूने सातारा येथील एका माणसाला महानंदाचे दूध फक्त पॅकींग करण्यासाठी दरमहा 7 लाख रुपये दिले जात आहेत. शासकीय दूध डेअरीचे वितरण त्यामुळे कमी झालेले आहे. शासकीय दूध डेअरीचे वितरण वाढविण्यासाठी सातारा येथील माणसाला महानंदाचे दूध पॅकींग करण्यासाठी जे कंत्राट दिलेले आहे ते शासन थांबविणार आहे काय ? मुख्यमंत्र्यांनी यासंबंधात उत्तर द्यावे अशी मी त्यांना विनंती करतो व आपली रजा घेतो.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, विरोधी पक्षनेते माननीय श्री. पांडुरंग फुंडकर यांनी व अन्य माननीय सदस्यांनी एका अतिशय गंभीर विषयावर याठिकाणी प्रस्ताव रुपाने चर्चा उपस्थित केलेली आहे. हा विषय तसे पाहिले तर दोन-अडीच तासाच्या चर्चेमध्ये संपणारा विषय नाही. दिवसभर या विषयावर चर्चा होऊ शकते इतकी या विषयाची व्याप्ती मोठी आहे. परंतु वेळीची मर्यादा लक्षात घेऊन नेमके मुद्दे मी मांडणार आहे. ज्या विभागातून मी निवडून आलो त्या विभागात तर या विषयावर बोलण्यासारखे भरपूर आहे. भूखंडाचे नियमबाहय वाटप, पालिकेतील भूखंडांचे आराखडे आणि आरक्षणे वारंवार बदलणे, भूखंडावरील अतिक्रमणे असे अतिशय महत्वाचे विषय की जे गेल्या दोन दशकात घडलेले आहेत आणि त्याचे परिणाम पुढील काळातील लोकांना भोगावे लागणार आहेत अशा प्रकारचे हे विषय आहेत. भूखंडाचा विषय हा ठाणे जिहयाच्या दृष्टीने केंद्रबिंदू आहे असे मला वाटते. कारण ज्यावेळी मुंबई भरली त्यावेळी नवी मुंबई निर्माण केली गेली आणि आता नवी मुंबईसुध्दा भरल्यानंतर ठाणे जिल्हयामध्ये अतिक्रमणे वाढायला लागली. ठाणे जिल्हयाची लोकसंख्या आज 1 कोटीच्या घरात गेली आहे. परंतु सत्ता, संपत्ती आणि मतपेटी लक्षात घेऊन यामध्ये कॉम्प्रमाइझ झाले. त्यामुळे हे सरकार भूमाफियांसाठी आहे की जनसामान्यांसाठी आहे की कोणासाठी आहे असा प्रश्न पडतो.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ SBT/ MAP/ MAP/ 11:45

श्री.संजय केळकर.......

एखादा जनसामान्य माणूस एखादे झोपडे बांधतो, शेड बांधतो त्याचे समर्थन निश्चितपणे मी करणार नाही. परंतु त्याठिकाणी नगरपालिकेचे, महानगरपालिकेचे अधिकारी जाऊन उभे राहतात. धनदांडगे लोक ऊंच ऊंच इमारती बांधतात, त्यांच्यावर मात्र कारवाई होत नाही. त्यामुळे मला शासनाला प्रश्न विचारावयाचा आहे की, जनसामान्यांसाठी सरकार आहे की भू माफियांसाठी सरकार आहे?

सभापती महोदय, या सभागृहात अनेकवेळा या विषयावर चर्चा झाली. ठाणे जिल्हयातील डोंगर बोडके केले जात आहेत. त्या जिल्हयात अवैधपणे रेतीचे उत्खनन केले जात आहे. तिवरांची अवैधपणे तोड होत आहे. या संदर्भात चौकशी होत नाही. आम्ही हे प्रश्न डीपीडीसीच्या बैठकीमध्ये मांडतो, सभागृहात मांडतो परंतु या प्रश्नांची चौकशी कोणी करणार आहे की नाही? माननीय उपसभापतींनी या संदर्भात निदेश दिले होते. परंतु काहीही कारवाई झालेली नाही. ठाणे जिल्हयाची पूर्ण वाट लागल्यानंतरच चौकशी करणार का? या प्रश्नांची त्वरित चौकशी झाली पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये किंवा शहरामध्ये ज्याप्रमाणात लोकसंख्येची वाढ होते त्या प्रमाणात नवनवीन रस्ते तयार केले जातात. एमएसआरडीसी मार्फत घोडबंदर रस्ता 2000 साली बांधण्यात आला. आज 2007 साल उजाडले परंतु हा रस्ता तयार करण्याकरिता ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्यांना आजपर्यंत एक छदाम देखील मिळालेला नाही. एका बाजूला शासन बिल्डर मंडळींना ताबडतोब टीडीआर देते. शेतकरी आपला मोबदला मिळावा म्हणून रस्त्यावर आले तर त्यांना कायद्याचा बडगा दाखविला जातो. शासन जनहिताकरिता भूमिपुत्रांच्या जमिनी घेते आणि त्यांना न्याय देत नाही. याबाबत शासनाने ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी सीआरझेडचा उल्लेख झाला. संपूर्ण कोकणपट्टीमध्ये सीआरझेडच्या प्रश्नाने उग्र स्वरुप धारण केले आहे. रायगड जिल्हयामध्ये मी स्वत: जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, प्रांत, तहसीलदार यांची भेट घेऊन त्यांना गदागदा हलवूनही ते हलायला तयार नाहीत. ते कोणाच्या मुठीत आहेत हे कळत नाही. त्याठिकाणी धनदांडगे लोक मोठ्या प्रमाणात बांधकाम करीत आहेत. त्यांना कोणाचा धाक वाटत नाही. तेथील सामान्य लोकांचा शासनावरील

..2..

श्री.संजय केळकर.......

विश्वास उडाला आहे. या बांधकामांना कोणी सील लावू शकणार नाही हा संदेश चुकीचा आहे. या विषयाच्या संदर्भात शासनाने कठोरपणे कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, सिडको म्हणजे एक मोठे संस्थान आहे. मनाला वाटेल तसे आरक्षण केले जाते आणि आरक्षण मोकळेही केले जाते. त्याचा फटका ठाणे जिल्हयाला मोठ्या प्रमाणात बसतो. वसई तालुक्यात सिडकोने डंपिंग केले, तबेल्यांसाठी आरक्षण केले. कोणत्या नियमाखाली आरक्षण केले? सिडकोच्या माध्यमातून नियमांचे उल्लंघन होत असून त्याचा फटका तेथील भूमिपुत्रांना, शेतकऱ्यांना बसतो. त्यामुळे शासनाने या बाबीकडे लक्ष देण्याची गरज आहे. काल सभागृहात मंत्रीमहोदयांनी सांगितले की, महापालिका क्षेत्रातील 70 टक्के बांधकामे अवैध आहेत, अनधिकृत आहेत. ठाणे जिल्हयातील सहाही महानगरपालिका, आणखी एक होऊ घातली आहे, त्यानंतरही एक होईल. या सगळ्या महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे आहेत त्या संदर्भात ठोस निर्णय शासन कधी घेणार की नाही? एका बाजूला महानगरपालिकांची संख्या वाढत जाईल, लोकसंख्या वाढत जाईल, परंतु तेथे राहणारी सामान्य माणसे दुःखी होतील. तेथील सुखसोयींपेक्षा त्रास वाढत जाईल. या संदर्भात शासनाने ठोस अशा प्रकारच्या धोरणाचा अवलंब करावा.

सभापती महोदय, वन जमिनींवरील जी काही बांधकामे आहेत, त्यामध्ये निरनिराळे प्रकार आहेत. काही बांधकामे ही महानगरपालिकेने प्लॅन मंजूर केल्यानंतर उभी राहिली आहेत. शासनाला आता जाग आली आणि कळले की, ती जमीन वन जमीन आहे. त्या जमिनीवर इमारती बांधल्या गेल्या असून त्या इमारतींमध्ये मध्यमवर्गीय, गरजू माणसे रहावयास गेली आहेत. या इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या संदर्भात शासनाने ठोस निर्णय घेतला पाहिजे एवढे सांगून माझे वक्तव्य संपवितो.

-----

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी वेळ कमी असला तरी आपण आणि माझ्या पक्षाने मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानते.

पहिली गोष्ट अशी की, भ्रष्टाचारासंबंधी जेवढी चर्चा होते, तेवढी ती भ्रष्टाचार करणा-यांना खूप आवडते असे माझे निरीक्षण आहे. याचे कारण असे की, भ्रष्टाचाराचा बागुलबुवा दाखवून अजून भ्रष्टाचार करता येतो. चार बोटे दुस-याकडे असली तरी अंगठा आपल्याकडे असतो हे विसरुन चालणार नाही. भ्रष्टाचाराला अंगठा दाखवणारा "अंगठा" हा शासनाच्या हातात असतो हे आपण ब-याचवेळा पाहिलेले आहे. भुखंडाच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, शासनाने नवीन नागरी जमीन धोरण तयार केलेले आहे. नागरी जमीन धोरणात काही चांगल्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. महसूल कायद्यात सुधारणांचा प्रश्न आहे. जमिनीच्या संदर्भातील परवानग्या आपण सोप्या केल्या नाहीत तर भ्रष्टाचाराला कुरण मिळत असते अशी वस्तुस्थिती आहे. दुर्दैवाने या अधिवेशनात आम्हाला विधानपरिषदेत नगारी जमीन जमीन धोरणावर चर्चा करण्यास वेळच मिळालेला नाही. त्यामुळे यासंदर्भात मला पहिली विनंती अशी कराविशी वाटते की, नागरी जमीन धोरणावर तपशिलवार चर्चा होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण कोणती पावले उचलणार आहात ते आम्हाला कळण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय मुख्यमंत्रीमहोदय काल आणि आज पूर्ण वेळ विधानपरिषदेत उपस्थित आहेत. आजच्या कामकाज पत्रिकेत 12 नंबरवर नागरी जमीन नियंत्रण या 106 अन्वयेच्या ठरावावर चर्चा होणार आहे. त्यामुळे आमची विनंती आणि मागणी आहे की, शिवसेनेचा या ठरावाला विरोध आहे त्यामुळे चर्चा न होता जर हा ठराव पास करणार असाल तर भ्रष्टाचार करणा-या धनदांडग्या बिल्डर लोकांची जी लॉबी आहे त्यांना याचा फायदा मिळेल . त्यामुळे यावर सविस्तर चर्चा होण्याच्या दृष्टिकोनातून त्याबाबतचा निर्णय या अधिवेशनात घेतला जाऊ नये अशी मी आपल्याला मन:पूर्वक विनंती करते.

तिसरा मुद्दा असा आहे की, मुंबई महानगरपालिका आणि एमएमआरडीए तसेच पुणे आणि पिंपरी चिंचवड अशी जी जी मोठी शहरे आहेत अशा ठिकाणी जमीन विकासाच्या संदर्भात निर्णय घेतले गेले नाहीत. निर्णय घेण्यामध्ये जा अडचणी असतील तर त्या दूर केल्या पाहिजेत. सभापती महोदय, आपण स्वत: पुणे जिल्हयाचे असल्यामुळे यासंदर्भात अधिक तपशिलात बोलण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. परंतु दोन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे.....

महानगरपालिकांच्या आसपास शंभर एक गावे आहेत त्या गावांमधील संपूर्ण जमिनीचे व्यवहार आणि तेथील परिस्थिती काय आहे याची आपल्याला जाणीव आहे. म्हणून माझी आपल्याला आग्रहाची मागणी आहे की, लोकप्रतिनिधींचा पुरेसा सहभाग ठेवून पुणे शहर आणि पिंपरी चिंचवडसाठी काही नियम तयार करणे अत्यावश्यक आहे असे मला सांगावेसे वाटते. आजच्या अंतिमआठवडा प्रस्तावामध्ये अनेक घोटाळयांचा, भ्रष्टाचाराचा उल्लेख करण्यात आलेला आहे. भ्रष्टाचार हा सर्वसाक्षी आणि सर्वव्यापी झालेला आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही जेव्हा समाजाकडे बोटं दाखवतो त्यावेळी अनेक लोकप्रतिनिधी स्टींग ऑपरेशनमध्ये सापडलेली असल्याचे आढळून आलेले आहे. अशा लोकप्रतिनिधींचा भ्रष्टाचार जनतेसमोर उघड झालेला आहे. मानवी तस्करीमध्ये सुध्दा लोकप्रतिनिधी सापडलेले आहेत त्यामुळे आपण कोणत्या तोंडाने भ्रष्टाचाराचा प्रश्न विचारावयाचा असा प्रश्न पडलेला आहे त्यामुळे यासंदर्भात आम्हाला आमची शरम वाटते अशी परिस्थिती आहे. ख-या अर्थाने भ्रष्टाचार दूर करावयाचा असेल तर भारतीय राज्यघटनेनुसार चांगले होईल. यामध्ये होण्यासारखी जी कामे आहेत त्यामध्ये अजिबात भ्रष्टाचार होणार नाही आणि कायद्यामध्ये बदल करुन योग्य ते निकष लावूनच निर्णय झाले पाहिजे असा जर आग्रह असेल तर त्यातून निश्चितपणाने मार्ग निघू शकेल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते. धन्यवाद.

--------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, या ठिकाणी नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव विरोधीपक्ष नेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी मांडला असून त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

या ठिकाणी भ्रष्टाचाराच्या विषयाच्या संदर्भात बरीच चर्चा झालेली आहे. सभापती महोदय, समाजातील गरीब वर्गाच्या संदर्भातील विषय मी उपस्थित करणार आहे. शेळी-मेंढी विकास महामंडळाच्या व्यवसायाशी निगडीत मी प्रश्न उपस्थित करणार आहे. निगडीत आहे. डोंगर कपा-यात आपले जीवन खडतरपणे जगत असलेल्या धनगर समाजाच्या विकासासाठी आदरणीय वसंतराव पाटील यांनी शेळी मेंढी विकास महामंडळ स्थापन केले होते. या समाजाचा विकास व्हावा, या समाजाच्या धंद्यामध्ये आधुनिकता यावी म्हणून दोन एकराचा भुखंड गोखलेनगरमध्ये देण्यात आला होता. आज या दोन एकराच्या भुखंडाची किंमत 40 कोटी रुपये आहे. गरीब समाजासाठी राखून ठेवलेला हा भुखंड शहा नावाच्या बिल्डरने गिळंकृत केलेला आहे. या भुखंडावर आज ब-याच मजल्याची इमारत उभी आहे. या भुखंडाच्या संदर्भात मी गेल्या दोन वर्षापासून अधिवेशन सभागृहात प्रश्न उपस्थित करीत आहे परंतु हा प्रश्न बाजूला का फेकला जातो हे समजत नाही. या भूखंडामध्ये कोण कोण गुंतलेले आहेत त्याची माहिती घेणे आवश्यक आहे. या महामंडळाने या भुखंडावर स्टे आणला होता. ही जागा दुस-याने लाटू नये यासाठी महामंडळाचे अधिकारी आणि एम.डी. यांनी खूप प्रयत्न केले होते परंतु या अधिका-यांना अटक करण्यात यावी असे कलेक्टरांनी आदेश दिले होते.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे........

ही जागा ब्रिटीशांनी 1912 मध्ये मोबदला देऊन ताब्यात घेतली आणि त्यावेळच्या पशुसंवर्धन विभागाच्या ताब्यात दिली. आपणास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही जागा महसूल विभागाच्या ताब्यात आली. महसूल विभागाने 1996 साली जी.आर.काढून ही जागा पशुसंवर्धन विभागाकडे वर्ग करावी असे सांगितले. परंतु त्याबाबत अद्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. महसूल विभागाचे आदेश बासनात गुंडाळण्यात आले. तेव्हा या संदर्भात चौकशी होणे आवश्यक आहे. या महामंडळाचा भूखंड महामंडळास परत मिळाला पाहिजे. या प्रकरणात जे अधिकारी आणि मंत्री इन्व्हॉल्व्ह आहेत त्यांची चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, औरंगाबादमध्ये सुध्दा या महामंडळाच्या जागा आहेत. आजुबाजूच्या परिसरात शहरे निर्माण होत आहेत. या जागांवर सुध्दा अधिकाऱ्यांची आणि मंत्र्याची वक्रदृष्टी पडलेली आहे. या जागा सुध्दा गिळंकृत करण्याचे काम चालू आहे. या जागा बिल्डरच्या घशात घालण्याचा घाट सुरु आहे. या जागा आपणास वाचविल्या पाहिजेत. तेव्हा पुणे येथील भूखंडाबाबत सी.आय.डी.चौकशी करण्यात यावी आणि त्यासंबंधीचा अहवाल सभागृहात देण्यात यावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी माननीय मुख्यमंत्र्यांना फक्त एक-दोन प्रश्नच विचारणार आहे.

सभापती महोदय, आज मुंबई शहरात बऱ्याच ठिकाणी शॉपिंग मॉल्स उभे राहत आहे. गोरेगाव येथे आणि मालाड येथे सुध्दा शॉपिंग मॉल्स आहेत. या शॉपिंग मॉल्समध्ये पार्किंगची व्यवस्था केलेली आहे. पण या पार्किंगची ठेकेदारी एकाही मराठी माणसाला देण्यात आलेली नाही. सर्व ठेकेदारी यु.पी. आणि अन्य परप्रांतियांना देण्यात आलेली आहे. तेव्हा यापुढे जी शॉपिंग मॉल्स होतील त्यामधील पार्किंगची ठेकेदारी मराठी माणसाला देण्याबाबत प्राधान्याने विचार होणार आहे काय ? मिलन सब-वे येथे जी शॉपिंग मॉल्स आहेत त्याठिकाणी अनधिकृत कामे होत आहेत. शॉपिंग मॉल्सच्या वरच्या बाजूला लग्नाचे हॉल बांधण्याचा प्रयत्न चालू आहे. तेव्हा या प्रकरणात लक्ष घालावे. सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे, मुंबईत जी मल्टिप्लेक्स झालेली आहेत त्याठिकाणी एकही मराठी सिनेमा दाखविला जात नाही. तेव्हा या मल्टिप्लेक्समध्ये सवलतीच्या दरात मराठी सिनेमे दाखविण्याचे अनिवार्य करण्यात यावे अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया ( अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था ): सभापती महोदय, माननीय विरोधीपक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात एम.आर.टी.पी. ॲक्ट आणि डी.सी.रुल्स अस्तित्वात आहेत. सन 2000 मध्ये गुंठेवारी रेग्युलराईजेशन आणि अपग्रेडेशन ॲक्ट आणण्यात आला. हा कायदा गोरगरिबांना न्याय देणारा कायदा आहे. ज्यांची घरे गुंठेवारीमध्ये आहेत ती रेग्युलराईज करण्यासाठी हा कायदा आहे. परंतु या कायद्याचा आधार घेऊन प्रत्येक जिल्ह्यामध्ये 14-14 एकरचे ले-आऊट मंजूर करण्यात येत आहेत. विकासक विकास नियमावलीचे पालन करीत नाहीत. ओपन स्पेस सोडत नाही, सर्व्हीस लेन सोडत नाही आणि गुंठेवारी कायद्याचा फायदा घेऊन मोठ मोठे मॉल्स उभे करीत आहेत. 40 हजार फुटाची जागा असेल तर त्याठिकाणी केवळ चार पिलर्स उभे करुन बहुमजली मॉल उभा केला जातो आणि गुंठेवारी कायद्यांतर्गत संबंधित खाते असा प्रस्ताव मंजूर करते. आजच्या काळात गुंठेवारी कायदा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये भ्रष्टाचाराचे एक माध्यम झालेले आहे. या गुंठेवारी कायद्यामुळे डी.सी.रुल्सची चौकट पूर्णपणे विस्कळीत झालेली आहे. या गुंठेवारी कायद्याअंतर्गत काहीतरी लिमिटेशन घालण्याची आवश्यकता आहे. गुंठेवारीमध्ये ज्यांची जागा आहे त्यांनी जर ती जागा एका वर्षात रेग्युलराईज केली नाही तर गुंठेवारी कायद्याचा फायदा देण्यात येणार नाही अशी अट घालण्यात यावी. सात वर्षे झाली परंतु यामध्ये कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. एम.आर.टी.पी. ॲक्ट आणि डी.सी. रुल्स हे दोन्ही पॅरलल चालत आहेत. या कायद्याचे फायदे आणि तोटे सांगण्यासाठी मी एक उदाहरण देतो. एखाद्याने 10 हजार फुटाचा ले-आऊट पास केला तर त्याला 1 एफ.एस.आय. देण्यात येतो.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया....

त्याच्या बाजूला एखाद्या माणसाने जर 10 हजार स्केअर फुटाचा प्लॉट अनधिकृत बांधला असेल तर त्याला गुंठेवारी कायद्यान्वये 3 एफएसआय किंवा 30 हजार फुटाचा प्लॉटही देण्यात येतो. हे एक भ्रष्टाचारामध्ये खूप मोठे माध्यम असून ते विदर्भात आणि महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी पसरलेले आहे. पूर्ण विकास आराखडयाचा सत्यानाश कोणत्या कायद्याने केला असेल तर तो गुंठेवारी कायद्याने केलेला आहे, असे माझे मत आहे. त्यामुळे यामध्ये काही तरी अट टाकावयास पाहिजे, अशी माझी मागणी आहे. तसेच विकास आराखडयाच्या बाबतीत पूर्वीची जी 10 वर्षांची लिमिट होती ती आता आपण 20 वर्षांची केलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 227 महानगरपालिका आणि नगरपालिका असून विकास आराखडयाच्या बाबतीत शासनाने एकाच अधिकाऱ्याला सुणावणीचे व फायनल मंजुरीचे अधिकार दिलेले आहेत, याबाबतही आपण विचार करावा. हायकोर्टाने सर्व विकास आराखडयावर निर्बंध टाकलेले आहेत. उदाहरण म्हणून मी मुर्तिजापूरचे देतो. त्याठिकाणी विकास आराखरा पुन्हा प्रसिध्द केला जाईल का ? याबाबतचा आपण निर्णय घ्यावा, अशी माझी यानिमित्ताने विनंती आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद !

--------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी जो म.वि.प.नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी भ्रष्टाचारांचे संपूर्ण घोटाळे येथे विशद केलले आहेत, त्यामुळे मी त्यावर बोलून सभागृहाचा वेळ घेणार नाही. त्याबाबतची सर्व चर्चा माननीय मुख्यमंत्र्यांनी ऐकलेली आहे. तसेच, आपल्या सहकाऱ्यांच्या खात्याची गाथाही याठिकाणी माननीय रावते साहेबांनी वाचलेली आहे, त्यावर काय निर्णय घ्यायचा तो आपण घ्यावा. अशाच पध्दतीने मागच्या आठवडयामध्ये एका विषयासंबंधी सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी वेगळे स्टेटमेंट केले आणि त्यांच्या सहकारी मंत्र्यांनी वेगळे स्टेटमेंट केले. परंतु संयुक्त जबाबदारीच्या दृष्टीने, मंत्रिमंडळ परिषदेच्या दृष्टीकोनातून किंवा भूमिकेतून अशाप्रकारे वेगवेगळे स्टेटमेंट करणे योग्य नाही. सर्वांनी एकाच दृष्टीकोनातून बोलले पाहिजे, असे माझे मत असून ते काय करावयाचे ते आपण ठरवावे. भ्रष्टाचाराविषयी लढण्याच्या दृष्टीने स्वतंत्र यंत्रणा असावी, अशी शिफारस देशाच्या गृहमंत्र्यांकडे आम्ही केलेली आहे, त्याचा आपणही विचार करावा. भ्रष्टाचाराची सर्व प्रकरणे हाताळण्याच्या दृष्टीने व ती लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने फास्ट ट्रॅक न्यायालयांची स्थापना केली पाहिजे, अशी माझी यानिमित्ताने मागणी आहे. अशी मागणी आम्ही सार्वजनिक उपक्रम समितीच्या अहवालाच्या माध्यमातूनही नुकतीच केलेली आहे. याठिकाणी माझ्या अगोदरच्या सन्माननीय सदस्यांनी जी भ्रष्टाचारांची प्रकरणे येथे मांडली, त्याची नोंद झालेली आहे. ती प्रकरणे मी याठिकाणी परत मांडणार नाही. आज महाराष्ट्रामध्ये भ्रष्टाचार झालेला नाही असा कुठलाही विभाग शिल्लक राहिलेला नाही. सगळीकडे भ्रष्टाचार वाढलेला आहे. आज मंत्रिमंडळात भ्रष्टाचार आहे, महापालिकेत भ्रष्टाचार आहे, तसेच शासनाच्या सर्व खात्यांमध्ये भ्रष्टाचार सुरु आहे. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये जलतगतीने निर्णय होण्याच्या दृष्टीने मुंबई, पुणे व नागपूरमध्ये फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण केले पाहिजे की जेणेकरुन त्या त्या भागातील प्रकरणे ताबडतोबीने निकाली निघतील व या कोर्टास आपण प्रकरणे निकाली निघण्याच्या दृष्टीने टाईम

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

बाऊंड प्रोग्राम आखून दिला पाहिजे. कारण, आज 10-10 वर्षे झाली तरी अशी प्रकरणे निकाली निघत नाहीत. त्यामुळे आपल्याला भ्रष्टाचारास आळा घालावयाचा असेल तर यासंदर्भात चांगल्या प्रकारचा इलाज केला पाहिजे, असे माझे मत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आहात, त्यामुळे याबाबतीत आपण चांगले काम केले तर महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये आपला एक आदर्श निर्माण होईल. त्यामुळे आपण फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, अशी माझी यानिमित्ताने विनंती आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

-----

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, या ठिकाणी विरोधी पक्षाच्या वतीने म.वि.प.नियम 259 अवये जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला आहे, त्यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. विशेषत: विरोधी पक्षनेते तसेच सन्माननीय सदस्य, सर्वश्री.दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, प्रतापराव सोनावणे, परशुराम उपरकर, संजय केळकर, प्रकाश शेंडगे, मधुकर सरपोतदार, डॉ.नीलम गो-हे, डॉ.दीपक सावंत आणि इतरही सदस्यांनी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्यांचे मी आभार मानतो.

सभापती महोदय, प्रामुख्याने शासकीय महामंडळांच्या वतीने आणि शासनाच्या वतीने जे भूखंड दिले जातात ते भूखंड अवैध मार्गाने दिले जातात, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आहे, अशा पद्धतीचे वक्तव्य करण्यात आले आहे. पहिल्याच मुद्याबाबत मी सांगू इच्छितो की, एमआयडीसी, सिडको, एमएमआरडीअे यासारख्या महामंडळांसाठी 'लॅण्ड डिसपोजल रुल्स' गठीत करण्यात आले आहेत व त्याअनुषंगाने 'लॅण्ड प्राईसिंग पॉलिसी' असते. या रुल्सप्रमाणे मोठे ले-आऊट प्लॅन केले जातात. सीडकोच्या जमिनींच्याबाबतीत स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून सीडको पूर्ण प्लॅन तयार करते. प्लॅन तयार करतांना इन्फ्रास्ट्रक्चरवर होणारा खर्च, लॅण्ड प्राईस, इतर विकासात्मक बाबींवर झालेला खर्च किती येऊ शकेल याचा अंदाज घेऊन व त्याचा अभ्यास करुन भूखंडाचे दर ठरविण्यात येतात. संपूर्ण प्लॅन तयार करतांना काही सोशल प्लॉटस् ठेवण्यात येतात. शैक्षणिक कार्यासाठी, वैद्यकीय कार्यासाठी, प्ले-ग्राऊंडसाठी काही प्लॉट राखीव ठेवण्याची आवश्यकता असते. तसेच, रेसिडेन्शियल प्लॉटस् देखील ठेवण्यात येतात. या सगळयासाठी एक लॅण्ड प्राईस पॉलिसी फिक्स केली जाते व त्याअनुषंगाने सोशल प्लॉटस्ना सवलती दिल्या जातात. सोशल प्लॉटस् सबसिडाईज प्राईसमध्ये देता यावेत यासाठी कमर्शियल प्लॉट धारकांकडून जादा किंमत वसूल केली जाते. कमर्शियल प्लॉटस्धारकांकडून जादा भाव मिळावा आणि सोशल प्लॉटस् सबसिडाईज प्राईसमध्ये देता यावेत, ही त्यामागील भूमिका असते. या पॉलिसीप्रमाणे एमआयडीसी, सीडको, एमएमआरडीअे सारखी महामंडळे भूखंड वाटपाची कामे करीत असतात. सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी अनियमिततेबाबत व भ्रष्टाचाराबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्यामुळे मी या नियमाचा उल्लेख केला आहे.

..2.........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.........

सभापती महोदय, निश्चितप्रकारे नियमांचे उल्लंघन काही प्रमाणात अधिका-यांच्या माध्यमातून झाले असेल. त्यामुळे असे उल्लंघन झाले तर ताबडतोबीने अशा प्रकरणांची चौकशी करुन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याचे काम शासनाच्यावतीने झाले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सिडकोमध्ये झालेल्या अनियमिततेची, गैरकारभाराची चौकशी केली होती. माजी मुख्य सचिव, डॉ.डी.के.शंकरन यांच्या वतीने ही चौकशी झाली होती. याअंतर्गत एकूण 83 प्रकरणांची चौकशी झ ाली, 50 प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आली, 11 प्रकरणी संशयास्पद बाबी आढळून आल्या, 22 प्रकरणे अनियमितता न झालेली आढळून आली. या सर्व अनियमिततेमध्ये एकूण 347 कोटी रुपयांचे नुकसान झाले, असा शंकरन समितीचा अहवाल आहे. या सगळया नुकसानीची वसूली करण्यासाठी शासनाच्या वतीने नगरविकास विभागाच्या माध्यमातून सातत्याने कार्यवाही चालू आहे. अनेक ठिकाणी जे नुकसान झाले आहे त्यांची वसुली करण्याचे काम चालू आहे. परंतु, काही प्रकरणांमध्ये अलॉटेड प्लॉटच्या अलॉटिजनी कोर्टाकडून स्टे मिळविला आहे, वाद निर्माण केला आहे, त्यामुळे अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. सभापती महोदय, लॅण्ड अलॉटमेंट ही लॅण्ड डिसपोजल रुल्सच्या माध्यमातूनच केली जाते.

सभापती महोदय, या चर्चेत बीएसईएल, विश्वरुप इन्फोटेक या प्रकरणी आय.टी.च्या पॉलिसीचा गैरवापर करुन कमर्शियल वापर केला गेला आहे, अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित झाला आहे. मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात कोर्टात केस झाली होती, चौकशी करुन कारवाई करण्याच्या सूचना कोर्टाने दिल्या होत्या. ज्या प्रकरणी नियम धाब्यावर बसवून आय.टी. इंडस्ट्रिज्ना जादा एफ.एस.आय.दिला, किंवा त्यांनी त्याचा कमर्शियल वापर केला अशा प्रकरणी सिडकोच्यावतीने, महानगरपालिकेच्यावतीने मालमत्ता सील करण्याचे काम करण्यात आले आहे. कोर्टाच्या वतीने केस झाली, कोर्टाने सूचना दिल्या, त्या सर्व प्रकरणी हिअरिंग घेऊन पुढील कार्यवाही केली जात आहे. काही ठिकाणी अधिका-यांच्या माध्यमातून हलगर्जीपणा झाला असेल, चुकीच्या पद्धतीने काम झाले असेल तर शासनाच्या वतीने ताबडतोबीने चौकशी करुन कारवाई करण्याचे काम केले जाते. वेळेच्या अभावामुळे मी जास्त वेळ बोलणार नाही .

यानंतर श्री.बोरले...........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ......... 12:10

श्री.राजेश टोपे .........

काही सन्माननीय सदस्यांनी विकास आराखडा आणि मायनर मॉडिफिकेशन संदर्भात आपले विचार व्यक्त केलेले आहेत. बांधकाम मंजुरीसाठी एक वैधानिक पद्धत आहे. ज्यावेळी विकास आराखडा तयार केला जातो त्यासाठी समिती गठित केली जाते. त्या समितीने तयार केलेल्या विकास आराखडयासंदर्भात लोकांच्या हरकती व सूचना मागविल्या जातात. लोकांच्या हरकती व सूचना, संचालक नगररचना यांचा अभिप्राय, शासनाचा अभिप्राय आणि तेथे राहणा-या लोकांचे अभिप्राय लक्षात घेऊन त्यावर निर्णय घेतला जातो. त्यामुळे ही सर्व पद्धत पारदर्शक आहे. हा विकास आराखडा 20 वर्षामध्ये विकसित केला पाहिजे. यामध्ये कालानुरुप छोटे-मोठे बदल करावयाचे असतील तर त्यासाठी सुध्दा हीच वैधानिक पद्धत अवलंबिली जाते, यालाच आपण कलम 37 ची पद्धत म्हणतो. त्यामुळे हे सरधोपट रितीने केले जाते, असे नाही. या वैधानिक पद्धतीमध्ये अत्यंत पारदर्शकता आहे, हे मी येथे पुन्हा नमूद करु इच्छितो. मधल्या काळामध्ये राज्याच्या मंत्रिमंडळाने असाही निर्णय घेतला आहे की, जे प्ले-ग्राऊंड आहेत, ते टिकले पाहिजेत. माननीय नगर विकास मंत्र्यांच्या अधिकार कक्षेत देखील हा विषय ठेवलेला नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अधिकार कक्षेत देखील हा विषय ठेवलेला नाही. तर हा विषय मंत्रिमंडळासमोर आला तरच आपण हे आरक्षण वगळू शकतो, अशा पद्धतीचे चांगले धोरणात्मक निर्णय नगर विकास विभागाच्यावतीने आणि मंत्रिमंडळाच्यावतीने जाणीवपूर्वक घेण्यात आलेले आहेत. मुख्यत: या विकास आराखडयाच्या माध्यमातून जे काही मायनर मॉडिफिकेशन्स आहेत यामध्ये नगर विकास विभागाच्यावतीने तेथील जी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे नगरपालिका, महानगरपालिका यांच्या अभिप्रायाला सुध्दा महत्व दिले जाते. 1974 च्या घटना दुरुस्तीनंतर अधिक स्वायत्तता दिलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी नगरपालिका आणि महानगरपालिकेचे काय म्हणणे आहे, त्यांच्या जनरल बॉडीने कोणता ठराव केला आहे, त्या ठिकाणी राहणा-या लोकांच्या हरकती व सूचना मागविल्या काय, या सर्व गोष्टींची तपासणी करुनच निर्णय घेण्याचे काम केले जाते. मी आकडेवारी सांगून सभागृहाचा वेळ घेणार नाही. पण खूप मोठया प्रमाणावर मायनर मॉडिफिकेशन करण्याचे काम निश्चित प्रकारे झालेले नाही. सभापती महोदय, शासनाला कलम 37 (1) (AA) अन्वये विशेष अधिकार आहेत. ज्याअन्वये शासन स्वत:चा अधिकारी नेमून, त्या ठिकाणी राहणा-या लोकांच्या हरकती व सूचना मागवून .......

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे भ्रष्टाचाराचे मुद्दे मांडलेले आहेत त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. आपण कायदेशीर तरतुदी वाचून दाखविता त्या तरतुदी सन्माननीय सदस्यांनी सुध्दा वाचून दाखविलेल्या आहेत. कायदेशीर तरतुदीचे पालन होत नसल्यामुळे भ्रष्टाचार होतो. म्हणून हे सर्व आरोप केलेले आहेत. The Hon. Minister of State for Urban Development Department should reply only to the points which are raised by us. That's all. We expect the reply on the points which are raised by us.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्य भ्रष्टाचारासंबंधी बोललेले नाहीत. काही सन्माननीय सदस्य धोरणात्मक बाबींवर सुध्दा बोलले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी असे सांगितले की, हौसिंगच्या पॉलिसीच्या दृष्टीकोनातून ....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी असा मुद्दा मांडलेला आहे की, टी.डी.आर.मध्ये भ्रष्टाचार होतो. एल.आय.जी. आणि एम.आय.जी.चा एफ.एस.आय. एच.आय.जी.ला दिला जातो.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी निर्णय दिलेला आहे. एल.आय.जी.च्या संदर्भाने टी.डी.आर. चा वापर व्हावा, म्हाडाच्या रिडेव्हलपमेंटसाठी किंवा नवीन ले-आऊटसाठी जो ॲडिशनल टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. दिला जातो त्यासंदर्भाने एल.आय.जी.ला प्रात्साहन देण्यासाठी धोरणात बदल कण्याच्या सूचना माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, मराठी माणसांना पार्किंगचा ठेका मिळाला पाहिजे. ही चांगली सूचना आहे, याबाबत सुध्दा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

यानंतर श्री.गागरे.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

पी.एम.आर.डी.ए.संबंधी माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले आहे की, धोरणात्मक बाबीच्या संदर्भात लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले पाहिजे. सभापती महोदय, मी याबाबत सांगू इच्छितो की, पी.एम.आर.डी.ए. ही संस्था प्रस्तावित असून याबाबतच्या कायद्याचे प्रारुप तयार झाले आहे. प्रारुप विधी व न्याय विभागाकडे तपासणीसाठी पाठविले असून त्यावर लवकर निर्णय घेतला जाईल.

**उपसभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहाची विशेष बैठक सकाळी 9.45 ते 12.15 वाजेपर्यत होती. त्यामुळे आता सभागृहाची वेळ 10 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर अंतिम आठवडा प्रस्ताव सभागृहात उपस्थित केला आहे. अनेक प्रकरणे त्यांनी आपल्या भाषणात उपस्थित केलेली आहेत. माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी नगरविकास विभागाच्या नियमावलीबाबत सदनाला माहिती दिलेली आहे. काही सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात काही स्पेसिफिक भ्रष्टाचाराचे आरोप केलेले आहेत. त्यांच्या भाषणाची प्रत घेण्यात येईल व त्यांनी स्पेसिफिक प्रकरणामध्ये केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाची सखोल चौकशी करण्यात येईल. जेथे चुकीचे घडले असेल, त्यांच्याविरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

माननीय सदस्यांनी प्रामुख्याने सिडकोतील रहेजा बिल्डर्सचा विषय मांडला आहे. या प्रकरणामध्ये सिडकोच्या झालेल्या नुकसानीबाबत शंकरन समितीचा अहवाल शासनाने जाणीवपूर्वक घेतलेला आहे. परंतु काही वेळेला सुप्रीम कोर्टाने असे आदेश दिलेले आहेत की, बाजारमूल्य आणि त्यावेळी दिलेली किंमत यातील फरक शासनाने भरुन घ्यावा आणि ते नियमित करावेत. या प्रकरणामध्ये सिडकोने कमी दरामध्ये प्लॉट दिल्यामुळे सिडकोचे नुकसान झालेले आहे. त्यावेळी बाजारमूल्य वेगळे होते. दोन्ही भावातील फरकाची रक्कम ज्यांनी भरुन दिलेली आहे, त्यांचे बांधकाम नियमित करावे. असा निर्णय सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे शासनाने घेतलेला आहे. यानंतरही जो निर्णय होईल त्याप्रमाणे शासन कार्यवाही करणार आहे. बी.एस.ई.एल. च्या एस.एस.आय.बद्दल मुद्दा उपस्थित केला आहे, त्या प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात येईल. तसेच अफगाण कौन्सिलेटच्या शेजारील इमारतीचे रि-डेव्हलपमेंट करण्यासाठी व त्या इमारतीची उंची वाढविण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला आहे, त्यावर शासनाने अंतिम निर्णय घेतलेला नाही. माननीय सदस्यांनी या प्रकरणामध्ये ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या लक्षात घेऊन याबाबतचा निर्णय राज्य सरकारकडून घेतला जाईल.

सी.आर.झेड व मॅनग्रोज बाबत काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. याबाबत मॅपींग करावे असे आदेश कोर्टाने दिलेले आहेत. त्याला Reserved forest म्हणून घोषित करावे अशाही सूचना कोर्टाने दिलेल्या आहेत. याप्रमाणे मॅपींग करण्याचे काम शासनाने हाती घेतलेले आहे. माननीय सदस्यांनी जनरल तक्रार व स्पेसिफिक तक्रार यामध्ये फरक केला पाहिजे. तिवरांची झुडपे तोडल्याबाबत स्पेशिफिक तक्रार असेल तर दोषींविरुध्द निश्चित कारवाई करण्यात येईल.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख .....

सभापती महोदय, रॉयल पाम येथे गोल्फ क्लब उभारण्यास परवानगी दिली होती. या जागेचा गैरवापर झाल्याचे व तेथे अपार्टमेंटचे बांधकाम सुरु असल्याचे माननीय सदस्यांनी सांगितले आहे, त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल. याबाबत काही परवानग्या दिलेल्या असतील तर त्या रद्द करण्याबाबत तातडीने कार्पोरेशनला सूचना देण्यात येतील. नियमबाहय किंवा उद्देशाव्यतिरिक्त या जागेचा विनापरवाना वापर केला असेल तर ते काम थांबविण्यात येईल.

यानंतर श्री.सुंबरे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख ....

व तातडीने ते काम थांबवावे अशाही त्याबाबतीत कार्पोरेशनला सूचना दिल्या जातील. तसे पाहिले तर कार्पोरेशनचेच प्रश्न येथे बहुतांश उपस्थित होतात आणि आमच्या समोरच्या मित्रांना त्याचे उत्तर तेथेच मिळू शकते. असो. ...

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी असाही एक प्रश्न उपस्थित केला आहे की, एका सोसायटीला बांबूचे उत्पादन करावे म्हणून सरकारमार्फत ठेका मंजूर केला. परंतु तेथे त्याचे उत्पादन होत नाही आणि तो बांबू बाहेर परस्पर बाजारात विकला जातो आणि 600 रूपये दराने दिलेला बांबूची किंमत बाजारात 4000 रूपये आहे. तर याही प्रकरणाची निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि त्या संदर्भात जी काही कारवाई होईली ती आपल्याला निश्चितपणे कळविण्यात येईल.

सभापती महोदय, शेळी-मेंढी पालनाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी पुण्याच्या एका जागेचा प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबतही आम्ही निश्चितपणे चौकशी करू आणि त्यात काही चुकीचे घडले असेल आणि महामंडळाची कोट्यवधी रूपयांची जमीन जर खाजगी व्यक्तीला दिली असेल तर त्या संदर्भात चौकशीनंतर जे काही निष्पन्न होईल त्याप्रमाणे संबंधितांवर कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चव्हाण यांनी टीडीआरच्या बाबतीतील प्रश्न येथे उपस्थित केला आहे. पण मी आपल्याला स्पष्ट करू इच्छितो की, टीडीआर हा काही म्हाडा वाटत नाही. टीडीआर देण्याची जबाबदारी ही महापालिकेची आहे. टीडीआर संबंधीचा सगळा हिशोब हा महापालिका ठेवत असते आणि महापालिकेकडेच त्याची डेटा बँक म्हणा वा अन्य सगळे आहे, म्हणजे तुमच्याकडेच हे सारे आहे. फक्त सन्माननीय सदस्यांचे एवढेच या संदर्भात म्हणणे आहे की, एमआयजी असेल वा एलआयजी असेल, जी कोणती सोसायटी असेल त्यांच्या वाट्याचा टीडीआर हा त्यांनाच मिळाला पाहिजे. त्यांच्या नावावरील टीडीआर कुणी तरी भलत्यानेच वापरू नये. म्हणूनच मागील अधिवेशनामध्ये या संदर्भात मी या सभागृहातच आश्वासन दिले होते की, हे देणे आपण थांबविले आहे. कारण यापुढील काळामध्ये, एप्रिल महिन्यामध्ये मी या सदनात जे आश्वासन दिले होते की ज्याचा एफएसआय आहे तो त्याच सोसायटीला मिळाला पाहिजे. पण तो नियम असा होता की, यासाठी अर्ज मागवावयाचे आणि पैसे भरून घ्यायचे, त्यासाठी 8 दिवस वाट

...... एफएफ 2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख ....

बघायची. गरीब माणसे काही पैसे जमा करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या नावावरील टीडीआर हा मोठ्या सोसायट्यांना मिळायचा. म्हणून ही प्रोसेस आपण थांबविली आहे. नंतर आपण ते दुरूस्त करू. .... मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणूनच मी हे दुरूस्त करीत आहे आणि आमची नेहमीच दुरूस्त करण्यास तयारी आहे. मी या संदर्भात एवढाच खुलासा करू इच्छितो की, तो निर्णय आपण त्या तारखेला घेतला तेव्हापासून कोठल्याही सोसायटीवर अन्याय होणार नाही अशीच भूमिका आम्ही घेतली. पण तत्पूर्वी ज्या लोकांना अशा पद्धतीने टीडीआर दिलेला होता त्यामुळे त्या ज्या सोसायट्या आहेत, ज्यांचे यात नुकसान झालेले आहे त्यांच्यासाठी देखील सरकार वेगळा विचार करीत आहे. कारण आपण पुढील प्रक्रिया थांबविली असली तरी जो टीडीआर जुन्या पद्धतीने देऊन झालेला आहे आणि ज्यांनी पैसे भरून तो टीडीआर घेतला आणि वापरला. त्यामुळे ज्यांचा मूळात तो टीडीआर आहे त्या सोसायट्या त्या पासून वंचित राहतील म्हणून त्यांच्यासाठी केवळ खास बाब म्हणून, त्यांचे नुकसान होऊ नये म्हणून, त्या सोसायट्यांनी जर मागणी केली तर त्यांच्यासाठी देखील वेगळ्या पद्धतीचा विचार आम्ही शासनाकडून करीत आहोत. जेणे करून त्या ज्या लहान सोसायट्या आहेत, मग त्या एलआयजी असतील वा एमआयजी असतील त्यांचे नुकसान टाळण्यासाठी देखील एक विशेष बाब म्हणून त्यांना टीडीआर देण्याबाबत शासन सहानुभूतीने विचार करील.

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्यांनी सीआरझेड बद्दल देखील निश्चितपणे तक्रार आपल्याकडे केलेली आहे ...

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, त्यांनी जी तक्रार येथे केलेली आहे ती तक्रार नेमकी आम्ही आमच्या रेकॉर्डवरून काढून घेऊ आणि त्यामध्ये नेमके सीआरझेडचे उल्लंघन झालेले आहे किंवा नाही याचीही माहिती आम्ही घेऊ. ..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी गुटखा बंदीसंबंधात मुद्दा येथे मांडला आहे. त्या गुटख्यामध्ये मॅग्नेशिअम कार्बोनेट टाकले जाते की जे आरोग्याला अतिशय घातक आहे. त्याबाबतीत खरे तर उत्पादकावर कारवाई व्हायला पाहिजे. परंतु त्याच्यावर कसलीही कारवाई न होता जे छोटे दुकानदार, पान टपरीवाले, ठेलेवाले आहेत की जे त्याची विक्री करीत आहेत त्यांच्यावर कारवाई केली जाते. तेव्हा गुटखा उत्पादकाचा शोध घेऊन, राज्याचा सेल्स टॅक्स आणि

...... एफएफ 3...



KBS/ MAP/ SBT/ श्री. गागरे नंतर --- 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

इन्कम टॅक्स चुकविणाऱ्या उत्पादकावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी मी येथे केलेली आहे त्याबाबत खुलासा आपण कराल का ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, गुटख्याबाबत राज्य सरकारने जो निर्णय घेतला आहे तो उच्च न्यायालयाने अमान्य केला. परंतु सन्माननीय विरोधी पक्षनेते सांगताहेत त्याप्रमाणे त्यात भेसळ होत असेल आणि त्यामुळे ते खाणाऱ्यांचे आरोग्य धोक्यात येत असेल तर निश्चितपणे फूड ॲण्ड ड्रग्ज विभागाला आम्ही विशेष सूचना देऊ आणि त्याबाबतदेखील खास मोहीम उघडून अशा प्रकारे अवैध विक्री या गुटख्याची होत असेल, नियमबाह्य होत असेल, भेसळयुक्त होत असेल, आरोग्याला ते धोकादायक असेल तर त्याच्या विरोधात देखील निश्चितपणे ॲक्शन घेतली जाईल.

( यानंतर श्री.सरफरे .....जीजी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची पहिल्या सत्राची 12.15 वाजेपर्यंत असलेली वेळ दुपारी 12.30 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. अनिस अहमद (पशुसंवर्धन, दुग्धविकास मंत्री) :सभापति महोदय, सम्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते जी ने मुझ पर अलग अलग आरोप लगाए हैं. खास तौर से पिछले 15 दिनों से वे मुझे टार्गेट कर रहे हैं. उन्होंने जितने भी आरोप मुझ पर लगाए हैं, मै उसके बारे में यह कहना चाहूंगा कि मैं उस समय राज्य मंत्री था, केबिनेट मंत्री नहीं था. दूसरी बात यह है कि कुछ मामले ऐसे हैं, उन्होंने जो तारीख बताई है, मैं उस समय मंत्री नहीं था. मेरे मंत्री बनने से पहले वह निर्णय लिया गया होगा. कुछ मामले उस समय के हैं जब मैं शिक्षा विभाग का राज्य मंत्री था. 19 सितम्बर, 2003 के मामले का उन्होंने उल्लेख किया है, मैं उस समय दुग्ध विकास विभाग का मंत्री नहीं था. मैं उस समय शिक्षा विभाग का राज्य मंत्री था. उन्होंने और एक मामले का जिक्र किया है, उस मामले की सीआईडी के द्वारा जांच चल रही है.

. सभापति महोदय, उन्होंने दूसरा मामला मेरे बंगले से संबंधित रखा है. सम्माननीय सदस्य ने रमन बंगले के बारे में मुझ पर आरोप लगाया है. मैं इस संबंध में यह कहना चाहूंगा कि मंत्री जब नागपुर में जाते हैं तो उन्हें सरकार की ओर से एक क्वार्टर अलाट किया जाता है.पालक मंत्री को रवि भवन में क्वार्टर अलाट होता है. आमदारों को आमदार निवास में रुम अलाट किया जाता है.जब विधान सभा के अधिवेशन के लिए मंत्री नागपुर जाते है, आमदार नागपुर जाते हैं तो उन्हें रवि भवन, नागभवन और आमदार निवास में रुम अलाट किया जाता है. इसी प्रकार से मुझे भी तंत्र निकेतन का गेस्ट हाऊस में सामान्य प्रशासन विभाग की तरफ से क्वार्टर अलाट हुआ है. मेरे पास सामान्य प्रशासन विभाग का अलाटमेंट आर्डर है. मैंने सिर्फ आफिशियल बैठक के लिए रमन बंगला लिया था और वह बंगला भी मैंन खाली कर दिया है. यह मेरा स्पष्टीकरण है.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाचे कामकाज आता स्थगित होत असून सभागृहाचे नियमित कामकाज दुपारी 12.40 वाजता सुरु होईल.

(दुपारी 12.27 ते 12.40 पर्यंत बैठक स्थगित झाली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(माननीय सभापती स्थानापन्न होताच विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहाबाहेर जातात.)

**पृ.शी. व मु.शी.** : तोंडी उत्तरे.

अल्पसूचना प्रश्न क्रमांक 33475

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---

अल्पसूचना प्रश्न क्रमांक 33484

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

--

राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक 24425

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

SKK/ MAP/ MAP/ SBT/ KGS/

**मुंबईतील पेडर रोड उड्डाणपुलासंदर्भात महाराष्ट्र किनारा नियम व्यवस्थापनाकडे विचारार्थ प्रस्ताव सादर केलेल्या प्रकल्पाबाबत**

**(1) * 29335 श्री. रमेश निकोसे, श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. यशवंतराव गडाख , श्री. गोविंदराव आदिक , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया खान** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- I

(1) मुंबईतील पेडर रोड उड्डाणपुलासंदर्भात महाराष्ट्र किनारा नियम व्यवस्थापनाकडे विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(3) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख** : (1) होय.

(2) उड्डाणपुलाचा सुमारे 36 मीटर एवढा भाग चौपाटी क्षेत्रात येत असल्याने प्रस्ताव महाराष्ट्र क्षेत्र किनारा व्यवस्थापनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या खात्याचे माननीय मंत्री महोदय कार्यक्षम आहेत. या उड्डाण पुलाच्या कामाला उशीर होत असल्यामुळे लोकांमध्ये संभ्रम पसरलेला आहे. माझे स्पेसिफीक दोन प्रश्न आहेत. सदरहू प्रस्ताव महाराष्ट्र क्षेत्र किनारा व्यवस्थापनाकडे मंजुरीसाठी केव्हा सादर केलेला आहे? त्यामध्ये कोणत्या अडचणी येतात ? प्रकल्पाच्या कामास विलंब होत असल्यामुळे या प्रकल्पाचा अंदाजित खर्च वाढलेला आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : पेडररोडवरील उड्डाण पूल हा मुंबई शहरातील वाहतुकीच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. या दृष्टीने उड्डाण पुलाचा संपूर्ण आराखडा व नकाशे तयार केलेले आहेत. याबाबत ज्या ज्या विभागाकडून एनओसी घ्यावयाच्या आहेत त्या घेतलेल्या आहेत. महाराष्ट्र क्षेत्र किनारा व्यवस्थापनाकडे दिनांक 15 मे 2007 रोजी सादर केलेला आहे.चौपाटी बीचवर फ्लाय ओव्हरचे पाच पिलर्स घेतले जाणार होते. चौपाटीवर पिलर न घेता डिझाईन करता येईल असे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29335......

श्री.अनिल देशमुख (पुढें सुरू....

त्यांच्याकडून सांगण्यात आल्यामुळै नव्याने डिझाईन करावे लागले त्यनंतर तो प्रस्ताव महाराष्ट्र क्षेत्र किनारा व्यवस्थापनाकडे पाठविलेला आहे, त्याचा पाठपुरावा आम्ही करत आहोत. त्यांच्याकडून एनओसी मिळाल्यानंतर पुलाच्या बांधकामची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रमेश निकोसे : किती कालावधीमध्ये प्रस्ताव मंजूर होईल असे अपेक्षित आहे ?

श्री.अनिल देशमुख : मी सुरूवातीलाच सांगितले की, मुंबईच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असा फ्लायओव्हर आहे. पेडररोडवर उड्डाण पूल होऊ नये, यासाठी देखील विरोध झाला होता. यामध्ये उद्या कोणी कोर्टामध्ये जाऊ नये म्हणून प्रत्येक गोष्टीचा बारकाईने अभ्यास करून प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला आहे, त्यांच्याकडून मंजुरी मिळाल्यानंतर लवकरात लवकर या पुलाचे बांधकाम चालू करण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 29335 .....

श्री. संजय दत्त : या प्रकल्पाबाबत माननीय लतादिदी मंगेशकर यांचा आणि पेडर रोड असोसिएशनचा विरोध होता. त्याबाबत त्यांच्याशी शासनाने समन्वय साधून त्यांचे मतपरिवर्तन केले आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, लतादीदींचा जो विरोध होता तो आता मावळलेला आहे. पेडर रोड असोसिएशनचा अजूनही त्याला विरोध आहे. म्हणून मी सांगितले की, याबाबत संपूर्ण बारकाईने अभ्यास करुन प्रस्ताव सादर केलेला आहे. एन.ओ.सी. मिळाल्यानंतर त्याच्या बांधकामाची पुढील कार्यवाही लवकरात लवकर चालू करण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ SBT/

**मुंबईतील नागपाडा व नायगाव येथील पोलीस रूग्णालयात विविध आजारांचे तज्ञ डॉक्टर व शल्यचिकित्सक तसेच सोयी सुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(२) * ३१११४ श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नागपाडा व नायगाव येथील पोलीस रूग्णालयात विविध आजारांचे तज्ञ डॉक्टर व शल्यचिकित्सक तसेच सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने पोलीसांना उपचारांसाठी खासगी रूग्णालयात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

पोलीस रुग्णालयात शल्य चिकित्सक हे पद रिक्त नसून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ.एस.एम.पाटील हे सांभाळत आहे आणि इतर विविध विभागामध्ये ठराविक वारानुसार विनामानधन तत्वावर मानसेवी वैद्यकीय अधिकारी कार्यरत असतात. सोनोग्राफी, एक्सरे मशीन व ऑटो ॲनालाईजर मशीन व्यवस्थित रित्या कार्यरत आहेत. फक्त ब्रॉकोस्कोपीक मशीन कार्यरत असलेल्या शस्त्रक्रिया विभागाचे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नूतनीकरणाचे काम चालू असून अल्पावधीतच शस्त्रक्रिया गृह चालू करण्यात येईल.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सदाशिवराव पोळ : सभापती महोदय, लेखी उत्तराने माझे समाधान झाले आहे.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ SBT/

**परभणीतील वाहतुक सिग्नल बंद असल्याबाबत**

**(३) * २९३९३ प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. सदाशिवराव पोळ :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखो रुपये खर्च करुन सुमारे सात वर्षापूर्वी परभणी शहरात वाहतुक सिग्नल बसविले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे सिग्नल अद्याप सुरु करण्यात आले नाहीत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शहरातील मुख्य चौकांमध्ये वाहतुकीची प्रचंड कोंडी होत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वाहतुक सुरळीत करण्यासाठी हे सिग्नल सुरु करण्याचा अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) होय, परभणी शहरात सन २००० मध्ये वाहतूक सिग्नल बसविण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही. तथापि, सदर सिग्नल काही काळानंतर नादुरुस्त झाल्याने अद्यापपर्यंत बंद पडलेले आहेत.

(३) हे खरे नाही. परभणी शहरात वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी नियमित पोलीस अधिकारी / कर्मचारी नेमण्यात येत असून वाहतूक व्यवस्थेसाठी शासनाने ४ पोलीस हवालदार व १७ पोलीस नाईक या पदांना मंजूरी दिली आहे.

(४) परभणी शहरातील बंद असलेले वाहतूक सिग्नल सुरु करण्याबाबत नगर परिषद, परभणी यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रा. फौजीया खान : सभापति महोदय, लाखों रुपये खर्च करके करीब सात साल पहले परभणी शहर में वाहतुक सिग्नल बिठाए गए थे. लिखित उत्तर में कहा गया है कि,परभणी शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी नियमित पोलीस अधिकारी/कर्मचारी नेमण्यात येत आहेत. लेकिन मैं यह कहना चाहती हूं कि वाहतुक ठीक तरह से चलने के लिए अभी वहां जो पुलिस कर्मचारी है, वे कम है. सिग्नल पर लाखों रुपये जब खर्च किए गए हैं और आज वे सिग्नल बंद है तो उन्हें फिर से शुरु करने के लिए कार्यवाही क्यों नहीं की जा रही है ? लिखित उत्तर में कहा गया है कि,परभणी शहरातील बंद असलेले वाहतूक सिग्नल सुरु कण्याबाबत नगर परिषद, परभणी यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.अगर परभणी नगर परिषद कार्यवाही करती तो सात साल सिग्नल बंद नहीं रहते. इसलिए क्या परभणी नगर परिषद को सिग्नल जल्द से जल्द शुरु करने के बारे में सूचना दी जाएगी ?

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ SBT/

प्र. क्र. २९३९३ ......

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, परभणी शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी 1 पोलीस अधीक्षक, 2 पोलीस उपनिरीक्षक, 4 हवालदार व 17 पोलीस कर्मचारी असा एकूण स्टाफ देण्यात आलेला आहे. सन 2000 मध्ये त्या ठिकाणी 6 सिग्नल बसविण्यात आले होते. त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची म्हणजे नगर परिषदेची असते. त्यासाठी त्यांनी टेंडर काढले होते. सिग्लनची संख्या कमी असल्यामुळे टेंडर परवडत नाही. 2005 पर्यंत सिग्नल सुरळीत चालू होते. 2005 ला रस्ते रुंदीकरणाची कामे घेण्यात आली त्यामुळे 3 सिग्नल बंद पडले. रस्ते अरुंद असल्यामुळे त्या ठिकाणी वाहतुकीस अडथळा येत होता म्हणून नगर परिषदेने सिग्नल बंद केले. तेथील सर्व 6 सिग्नल बंद आहेत. टेंडर काढले तरी कोणीही टेंडर घेण्यासाठी येत नाहीत. कारण टेंडर घेणाऱ्या लोकांना ते परवडत नाही. परभणी नगरपालिकेकडे यासाठी जे तंत्रज्ञ असावयास पाहिजे ते नाहीत. म्हणून ते नेहमी ठेकेदारी पध्दतीने हे काम करुन घेतात. सहाच सिग्नल असल्यामुळे ठेकेदारी पध्दतीने परवडत नाही म्हणून कोणी पुढे येत नाही. त्यांना औरंगाबाद आणि नांदेड येथून लोकांना बोलवून दुरुस्ती करावी लागते. असे असले तरी लवकरात लवकर सिंग्नल सिस्टिम सुरु करण्यासाठी शासनाकडून नगरपालिकेला सूचना करण्यात येईल.

श्री. सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, हे सिग्नल उभारणीचे काम माझ्या कार्यकाळामध्ये झाले होते. देखभालीची जबाबदारी नगरपालिकेची आहे यामध्ये वाद नाही. नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे हे सिग्नल चालत नाहीत. वाहतूक पोलीस शाखेकडून निधी द्यावयाचा असतो. तो निधी घेऊन नगरपालिकेने पूर्ण काम केलेले आहे. परंतु मध्यंतरी नगरपालिकेची दुरावस्था झाली त्यामुळे त्या सिग्नलकडे पाहणारे कोणी नाही. या पुढच्या काळामध्ये नगरपालिकेने हे काम पूर्ण जबाबदारीने करण्याबाबत शासन त्यांना सूचना देणार काय ? त्या ठिकाणी जे पोलीस कर्मचारी आहेत ते अल्प आहेत. कर्मचारी दुप्पटीने वाढवून देणार काय ? त्यासाठी शासनाने मंजुरी द्यावी अशी मी माननीय सभापतींमार्फत विनंती करतो.

यानंतर श्री. शिगम .....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 29393...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या प्रश्नाचे उत्तर मी आधीच दिलेले आहे. या सिग्नल दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात यावे असे शासनातर्फे नगरपालिकेला सूचित करण्यात येईल. तसेच 1 पोलीस अधीक्षक 2 पोलीस उपनिरीक्षक, 4 हवालदार आणि 17 कर्मचारी असा 24 कर्मचा-यांचा वेगळा स्टाफ मंजूर करुन देण्यात आलेला आहे.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 12:50

**शहापूर-किन्हवली रस्त्यावर कानवी नदी पुलाच्या नुतनीकरणाबाबत**

**(4) * 30483 श्री. शरद रणपिसे, श्री. संजय दत्त, श्री. गोविंदराव आदिक, श्री. धनाजी साठे** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शहापूर-किन्हवली रस्त्यावर कानवी नदी पुलाच्या नुतनीकरणाचे काम यावर्षीही रखडले यामुळे परिसरातील 80 गावांचा यंदाच्या पावसाळ्यातही संपर्क तुटणार असून तेथील नागरिकांनी वारंवार मागणी करुनही सदर पुलाचे काम न झाल्याने तेथील ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरुध्द तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, किन्हवली ही परिसरातील 80 गावांची बाजारपेठ असून खाजगी व शासकीय वैद्यकीय सेवेचे केंद्र येथेच आहे, त्याचबरोबर प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणासाठीही मुलांना येथेच यावे लागते तसेच किन्हवली येथे दररोज हजारो नागरिक ये-जा करीत आहे हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रवीशेठ पाटील, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1), (2), (3), (4) व (5) सदर पुलाचे काम मंजूर असून या संदर्भातील कामाची निविदा निश्चिती करण्याची कार्यवाही सुरु असून काम लवकरच सुरु करण्याचे प्रयत्न आहेत.

श्री. धनाजी साठे : या कामाचे एस्टिमेट किती आहे ? या कामाच्या निविदा केव्हा काढण्यात आल्या ? या निविदा किती दिवसात मंजूर करण्यात येतील ?

श्री. रवीशेठ पाटील : या कामाचे एस्टिमेट रु. 1.16 कोटी इतके आहे. कामाच्या निविदा 7 जुलै 2007 मध्ये दिलेल्या असून ठेकेदाराने 30.7.2007ला डिपॉझिट भरावयाचे आहे. ऑक्टोबरमध्ये हे काम सुरु होईल.

श्री. संजय दत्त : प्रश्न असा आहे की, हा पूल दरवर्षी पाण्याखाली जातो. गेल्या 7-8 वर्षापासून तेथील गावक-यांना, विद्यार्थ्यांना त्रास होत आहे. ट्राफिक देखील बंद होते. काही जण तर पाण्याचा अंदाज न आल्याने वाहून देखील गेलेले आहेत. या कामासाठी निधी दिलेला आहे. मग निविदा निश्चित करण्यासाठी एवढा विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 30483....

श्री. रवीशेठ पाटील : यापूर्वी या कामासाठी निधी अपुरा होता.आता पुरेसा निधी उपलब्ध झालेला आहे. हे काम ऑक्टोबर महिन्यामध्ये सुरु होईल.

----

(ता.प्र.क्र. 29462)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

(ता.प्र.क्र. 33308)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित

---

...4...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 12:50

**मिरारोड व भाईंदर रेल्वे स्टेशन येथे रेल्वे पोलीसांची नियुक्ती करण्याबाबत**

**(7) * 29550 श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , मेजर सुधीर सावंत** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्ह्यातील मिरारोड व भाईंदर या शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून उपनगरीय रेल्वेने प्रवास करणाऱ्या नागरीकांची संख्यासुध्दा वाढत असल्याने मिरारोड व भाईंदर रेल्वे स्टेशन येथे रेल्वे पोलीसांची नियुक्ती करण्याबाबतचे निवेदन मा.लोकप्रतिनिधी यांनी पोलीस आयुक्त, मुंबई रेल्वे पोलीस यांना दिनांक 3 मे, 2006 रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय, अध्यक्ष, रेल्वे पॅसेंजर असोसिएशन, भाईंदर, मुंबई यांनी दिनांक 28.2.2006 रोजी पोलीस आयुक्त, मुंबई (रेल्वे) यांना निवेदन दिलेले आहे.

(2) व (3) सदर निवदेनाच्या अनुषंगाने नव्याने आवश्यक पद निर्मितीचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, रेल्वे यांनी पोलीस महासंचालकांना सादर केलेला आहे. पोलीस ठाण्याचे निकष ठरवून त्यासाठी लागणारा कर्मचारीवृंद यांचा आकृतीबंध तयार करण्याबाबतची कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात करण्यात येत आहे. त्याच्या अनुषंगाने सुधारीत प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेनुसार त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. संजय दत्त : दिनांक 29 एप्रिल रोजी तेथील स्थानिक विधानपरिषद सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन आणि मी स्टेशनची पाहणी करीत असताना तेथे एकच पोलीस असल्याचे दिसून आले. याबाबतीत त्याला विचारणा केल्यानंतर त्याने सांगितले की, एकच पोलीस ड्युटीवर तैनात करण्यात आलेला आहे. उपनगरांची लोकसंख्या वाढत आहे, रेल्वे स्टेशनवर गर्दी वाढत आहे. मुंबईतील बॉम्बस्फोटांच्या घटना पाहिल्यानंतर रेल्वे प्लॅटफॉर्म्सवर किती अपुरी सुरक्षा व्यवस्था आहे हे दिसून येते. हा गंभीर प्रश्न असताना याबाबतीत निर्णय घेण्यास का दिरंगाई होत आहे ? या प्रश्नामध्ये ताबडीने लक्ष घालून आणि संबंधित अधिका-यांशी बोलून त्वरित निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : रेल्वे सीपी कडून डीजी ऑफीसकडे प्रस्ताव आलेला आहे. तेथील पदांचा आढावा घेण्याचे काम सुरु आहे. आढावा पूर्ण झाल्यानंतर त्वरित निर्णय घेण्यात येईल.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 29550....

श्री. संजय दत्त : मीरारोड व भाईंदर सारख्या मोठ्या स्टेशनवर केवळ एक पोलीस असणे योग्य आहे काय ? माननीय मंत्री महोदयांना हे पटते काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मीरा-भाईंदर या भागामध्ये किती पोलीस प्रोटेक्शन आवश्यक आहे हे नॉर्म्सवरुन ठरविले जाते. 1 ते 5 आणि 6 विभागातील गुन्ह्याचे प्रमाण किती आहे यावर पोलीस पदांची संख्या ठरत असते. 1 ते 5 आणि 6 विभागामध्ये गुन्ह्यांचे प्रमाण 150 पेक्षा कमी आहे. त्यामुळे नॉम्समध्ये ते बसत नाही. तरी देखील तेथील वाढत्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता अतिरिक्त पोलीस देता येईल का या संबंधी विचार करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29550..........

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, गेल्या दोन तीन महिन्यामध्ये मिरा - भाईंदर आणि त्यापुढच्या सर्व स्टेशनवर सोनसाखळी आणि दागिने चोरीचे प्रकार, महिलांची छेडछाड करणे, त्यांना त्रास देणे असे अनेक प्रकार सातत्याने घडलेले आहेत व घडत आहेत. तसेच, मिरा - भाईंदर परिसरामध्ये चोरीचे प्रमाणही वाढलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, मिरा - भाईंदर येथे चो-यांचे प्रमाण कमी आहे परंतु असे असतांना सुध्दा तेथे एका पोलिसाचा बंदोबस्त ठेवणे हे बरोबर नाही. या ठिकाणी तातडीने कायमस्वरुपी आणखी पोलिसांची नेमणूक होईपर्यंत तात्पूरत्या स्वरुपात अन्य पोलिसांची नियुक्ती करणार का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे. वसई पोलीस स्टेशनमधील काही पोलीस रेल्वे पोलीस म्हणून त्या ठिकाणी निश्चितपणे नेमण्यात येतील. जेणेकरुन प्रवाशांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही.

श्री धोंडीराम राठोड : माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, मिरा - भाईंदर येथे एक ते पाच आणि सहा यामधील गुन्हे कमी आहेत म्हणून त्या ठिकाणी अतिरिक्त कर्मचारी देता येत नाही म्हणजे शासनाची अशी इच्छा आहे की, गुन्हे झाल्यानंतर त्याच्यावर अतिरिक्त पोलीस नेमावयाचा अशा प्रकारची प्रिव्हेंटिव्ह ॲक्शन आपण ब-याच ठिकाणी घेतो. काही ठिकाणी आपण गुन्हे घडू नयेत म्हणून योजना करतो. आपण आता याठिकाणी गुन्हे घडू द्यावयाचे आणि मग त्याच्यावरती विचार करावयाचा तर गुन्हे जास्त घडले पाहिजेत असे आपल्याला वाटते का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, त्याप्रमाणे प्रत्येक ठिकाणच्या पोलीस स्टेशनला किती पोलीस कर्मचारी नेमावयाचे यासंदर्भात काही नॉर्म्स आहेत.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, एखाद्या ठिकाणी दरोडे, घरफोडया, चो-या वाढल्यावर मग त्या ठिकाणी अतिरिक्त पोलीस कर्मचारी द्यावयाचा का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मीरा-भाईंदरला बाजूच्या वसई पोलीस स्टेशनमधील काही पोलीस कर्मचारी अतिरिक्त पोलीस म्हणून नेमण्यात येतील.

------

KK - 2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आंतरराष्ट्रीय दर्जाची सुसज्ज कृषी उत्पन्न बाजारपेठ उभारण्यास केंद्र शासनाने मान्यता देण्याबाबत**

**(८) * ३१५१९ श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. राजेंद्र जैन , प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री.भास्कर जाधव , डॉ. वसंत पवार , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जगन्नाथ शेवाळे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाण्यासह आसपासच्या परिसराला भाजीपाला, फळे आणि कृषिमाल पुरविण्यासाठी कल्याणजवळ ९२ एकर जागेवर सुमारे १०० कोटी रुपये गुंतवणुकीने संपूर्ण वातानुकूलित अशी आंतरराष्ट्रीय दर्जाची सुसज्ज कृषी उत्पन्न बाजारपेठ उभारण्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१), (२) व (३) ठाणे येथे टर्मिनल मार्केट उभारण्यासाठी केंद्र शासनाने मान्यता दिली असून त्यानुसार मौजे बापेगांव, तालूका भिवंडी, जिल्हा ठाणे येथे सुमारे ९२ एकर जमिन विनामूल्य दराने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांना हस्तांतरित करण्याबाबत राज्य मंत्रिमंडळाने दिनांक ११/०६/२००७ रोजी निर्णय घेतला आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे एक मोठे फळभाज्यांचे, भाज्यांचे मार्केट निर्माण होणार आहे. उत्तरामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, ठाणे येथे टर्मिनल मार्केट उभारण्यासाठी केंद्रशासनाने मान्यता दिली असून त्यानुसार मौजे बापेगांव, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथे सुमारे 92 एकर जमीन विनामूल्य दराने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांना हस्तांतरित करण्याबाबत राज्य मंत्रिमंडळाने दिनांक 11 जून,2007 रोजी निर्णय घेतला आहे. हे काम किती दिवसात सुरु होणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये अशाप्रकारचे दोन टर्मिनल मार्केट आणि देशामध्ये सात टर्मिनल मार्केट उभे करण्याचा निर्णय राज्यशासने आणि केंद्रशासनाने घेतलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न केला की, ही 92 एकराची जागा नुकतीच महामंडळाने विनामूल्य बेसिसवर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला देण्याचा निर्णय झालेला आहे. या टर्मिनल मार्केटसाठी आपल्याला एकूण 200 कोटी रुपये खर्च येणार आहेत. या 200 कोटी रुपयांपैकी 25 टक्के सबसिडी राज्यसरकारला केंद्रातर्फे मिळणार आहे. कृषी उद्योग बाजार समिती हा प्रकल्प करणार नसून महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ नोडल एजन्सी म्हणून करणार

.....3

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. ३१५१९ .......

आहे. ही जमीन सुध्दा राज्यशासनाने कृषी पणन मंडळाच्या नावावर दिलेली आहे. हा एक अत्यंत महत्वाकांक्षी असा प्रकल्प आहे. याचे सर्व डिटेल्स सांगावयाला वेळ लागेल. हे टर्मिनल मार्केट म्हणजे आपल्या राज्याच्या दृष्टीने एक नवीन कन्सेप्ट आहे. हा मॉडेल ॲक्ट आपल्या राज्याने स्वीकारलेला आहे. उत्पादक ते ग्राहक ही संकल्पना नव्याने रुजविणे हा यामागील उद्देश आहे. मधले जे दलाल असतात त्यांचा त्रास कमी करण्यासाठी या माध्यमातून आता सुरुवात होणार आहे. शेतक-यांना चांगला भाव मिळेल, ग्राहकांना वाजवी दरामध्ये वस्तू उपलब्ध करुन देणे अशीआपली यामागील संकल्पना आहे. आता या मार्केटची जागा पणन मंडळाच्या नावावर झालेली आहे. याचे ग्लोबल टेंडर काढण्यात येईल. आणि त्यानंतर पुढील कार्यवाही लवकरच करण्यात येईल.

श्री.जगन्नाथ शेवाळे : माननीय मंत्रिमहोदयांनी अशाप्रकारचे मार्केट राज्यामध्ये एकूण दोन ठिकाणी निर्माण केले जाणार आहे असे संदिग्धपणे सांगितले, परंतु ते मार्केट कोठे निर्माण केले जाणार आहेत तेही सांगितले तर बरे होईल.

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 13:00

ता.प्र.क्र. 31519....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, नवीन मार्केट उभे केले जाणार आहे त्यासाठी एक जागा भिवंडी तालुक्यातील निश्चित केलेली आहे. दुसरे एक मार्केट उभे करण्यासाठी नाशिक येथे जागा प्रस्तावित केलेली आहे. पण त्यात इगतपुरी आणि नाशिक असे दोन जागांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. जागा निश्चित करण्यासाठी जी समिती आहे त्यामध्ये केंद्र सरकारचे सुध्दा अधिकारी आहेत. लवकरच या दोन जागांच्या संदर्भात योग्य तो निर्णय घेण्यात येईल. अशा प्रकारचे टर्मिनल सुरु करीत असताना केवळ भाजीपाला व फळांचे मार्केटच होणार नाही. आज शेरीकल्चर, हॉर्टिकल्चर आणि फ्लोरीकल्चर यामध्ये आमूलाग्र बदल झालेला असल्याने त्यावर आधारित अद्ययावत असे मार्केट उभे केले जाणार आहे. या मार्केटमध्ये 70 टक्के फळे आणि भाजीपाला, 15 टक्के कुक्कुटपालन आणि 15 टक्के मांसविक्री अशा प्रकारची उलाढाल अपेक्षित आहे. संपूर्ण मार्केट एअरकंडीशन राहणार आहे. मार्केटच्या आजूबाजूच्या 50 कि.मी.परिसरात शेतकऱ्यांचा तयार होणारा माल डायरेक्ट या मार्केटमध्ये आणला जाईल. त्यासाठी चार्जेस आकारले जातील. ऑक्शन पध्दतीने लिलाव होईल. नेदरलॅन्ड शहरात इलेक्ट्रॉनिक पध्दतीने लिलाव होतो तसा येथे होणार आहे. या पध्दतीमध्ये संपूर्णपणे पारदर्शकता राहणार आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे आता पूर्णपणाने विस्तारीकरण होऊ शकत नाही. कारण अगोदरच या मार्केटवर अतिताण झालेला आहे. नव्या कायद्यानुसार मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आता नवीन मार्केटसाठी परवानगी मिळणार नाही. त्यामुळे हे मार्केट होणे अतिशय आवश्यक आहे. नाशिक परिसरातून तसेच परराज्यातून येणारा जो शेतमाल आहे त्याचे प्रोसेसिंग करण्याकरिता ही जागा निवडली आहे. दुसऱ्या एका प्रस्तावानुसार काही सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे अजून 125 एकर जागेची पाहणी करणार आहोत. या 92 एकरामध्ये अद्ययावत असे टर्मिनल मार्केट उभें केले जाणार आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे अशा प्रकारचे टर्मिनल मार्केट सुरु करण्यामागचा उद्देश हा शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळावा हा आहे. त्याचप्रमाणे लिलाव पध्दतीत पारदर्शकता सुध्दा येणार आहे. परंतु आज शेतकऱ्यांना लुबाडण्याचा जो प्रकार कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधून सुरु आहे त्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? सध्या रुमाल पध्दतीने लिलाव करण्याची जी पध्दत सुरु आहे ती बंद करण्याच्या दृष्टीने शासन कोणती पावले उचलणार आहे ?

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 13:00

ता.प्र.क्र. 31519...

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा प्रश्न माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. रुमाल पध्दतीने लिलाव होतात अशा तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यासंबंधात तातडीने कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. जे व्यापारी अशा पध्दतीने लिलाव करतात त्यांचा परवाना रद्द करण्याच्या सूचना जिल्हा उपनिबंधकांना दिलेल्या आहेत. कुठल्याही शेतकऱ्याचा माल मार्केटमध्ये खुल्या पध्दतीने लिलाव होणे अभिप्रेत आहे. काही ठिकाणी अशा घटना घडतात. कायद्यात बदल केलेला आहे. मॉडेल ॲक्ट पध्दत स्वीकारली असल्यामुळे ही मोनोपली आता राहणार नाही. शेतकऱ्यांना नवी दालने खुली होणार आहेत. खुल्या पध्दतीने लिलाव करण्याची पध्दत कोणी पाळत नसेल त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, राज्यात दोन ठिकाणी नवीन मार्केट निर्माण करण्याच्या शासनाच्या धोरणाबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. नवी मुंबई येथील फळभाजीपाला मार्केटवर अतिताण झालेला आहे हे मंत्रीमहोदयांनी सांगितले आहेच. पालघर,डहाणू,वसई येथून जो फळ-भाजीपाला येतो तो शेतकऱ्यांना द्राविडी प्राणायाम करुन नवी मुंबईच्या मार्केटमध्ये न्यावा लागतो. म्हणून दहिसर किंवा मीरारोड येथे मार्केट सुरु करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे काय ?

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 13:05

ता.प्र.क्र.31519.........

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. या संदर्भात अनेक बैठका झाल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील म्हणाले ती गोष्ट खरी आहे. 30 ते 40 कि.मी. अंतरावरुन ट्रॅफिकमधून त्या परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतीमाल घेऊन नवी मुंबईच्या मार्केटमध्ये यावे लागते. यासाठी शासन स्तरावर लवकर निर्णय घेतला जाईल. ओपन मार्केटची कन्सेप्ट स्वीकारली असल्यामुळे, डायरेक्ट मार्केटिंग, प्राईव्हेट मार्केटिंगची भूमिका मॉडेल ॲक्टमध्ये स्वीकारली अससल्यामुळे अशी गैरसाय यापुढच्या काळात होणार नाही.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, टर्मिनल मार्केट उभारले जाणार आहे त्यामध्ये किती व्यापाऱ्यांना आणि दलालांना लायसन्स दिले जाणार आहे?

श्री.हर्षवर्धन पाटील : यामध्ये दलालांचा संबंध येत नाही. दलाल बंद करावयाचे आहेत म्हणूनच ही कन्सेप्ट स्वीकारली आहे. लायसन्स देण्याच्या संदर्भात वास्तविक पाहता जी नोडल एजन्सी म्हणून मार्केट बोर्ड आहे त्यांच्याकडून 2-3 प्रकारच्या व्यवस्था करणे आवश्यक आहे. लायसन्स कोणाला देणार हा खरा प्रश्न आहे. यामध्ये एक तर ग्लोबल टेंडर काढले जाईल. त्यामध्ये ज्या निगोशिएशन्स येतील त्यांचा मेरिटवर निर्णय केला जाईल. हा व्यापाऱ्यांच्या बाबतीतील भाग झाला. तेथे लायसन्स कोणाला देणार? डायरेक्ट मार्केटिंगसाठी नोडल एजन्सी असल्यामुळे रुल्स फ्रेम केले आहेत. लायसन्ससाठी कोणी अर्ज करायचा? अर्ज करणाऱ्यांचा टर्नओव्हर, बँक गॅरंटी, रेप्युटेशन याचा विचार करुन लायसन्स दिली जातील. लायसन्स देण्याचे अधिकार, अटी घालण्याचे अधिकार आणि लायसन्स रिन्यू करण्याचे अधिकार व शेतकऱ्यांना योग्य भाव दिला नाही अशी तक्रार प्राप्त झाली तर लायसन्स रद्द करण्याचे अधिकार मार्केट बोर्डाला राहतील. सभापती महोदय, आज नवनवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे. शेतकऱ्यांच्या आज ज्या बाजार समित्या आहेत, त्या भुसारावर आधारित बाजार समित्या आहेत. आज भूसारापासून शेतकरी डायव्हर्ट झाला आहे. आज 12 ते 13 लाखापर्यंत हॉर्टिकल्चर झाले आहे. आधुनिक शेती करणारा वर्ग निर्माण झाला आहे. त्यांची अपेक्षा एकच आहे की, मार्केट व्यवस्था सरकारने केली पाहिजे. हा एक प्लॅटफॉर्म मार्केटबाबत तयार करीत आहोत. आपण फक्त सर्व्हिस देणार आहोत. त्यामध्ये इंटरव्हेन्शन राहणार नाही. टर्मिनल मार्केटची सर्व्हिस प्रोव्हाईड फॅसिलिटी निर्माण करण्याचा यामध्ये महत्वाचा उद्देश आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31519.........

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, एक अच्छी संकल्पना के लिए शासन का अभिनंदन करते हुए मैं यह पूछना चाहती हूँ कि क्या इस तरह के टर्मिनल मार्केट मराठवाडा और पिछड़े इलाकों में भी बनाने का शासन का मानस है ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापति महोदय, अभी फिलहाल 2 मार्केट तय किए गए हैं. दूसरे फेज में जब इसका विस्तार करेंगे तो उसमें मराठावाडा और विदर्भ का भी विचार किया जाएगा.

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, कृषि उत्पन्न बाजार समित्या मॉडेल ॲक्ट अंतर्गत आणून शेतकऱ्यांना योग्य तो भाव मिळवून देण्याच्या दृष्टीकोनातून घेतलेल्या निर्णयाबद्दल मी मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करतो. आम्ही पिकवायचे आणि आमच्या शेतमालाचा फायदा व्यापाऱ्यांनी घ्यायचा असे आतापर्यंत सुरु आहे. माझी मंत्रीमहोदयांना एकच विनंती आहे की, जो प्रकल्प सुरु करणार आहात तो कमीत कमी कालावधीत सुरु करावा. स्वत: मंत्रीमहोदय या प्रश्नामध्ये लक्ष घालीत आहेत. प्रामुख्याने येत्या महिन्याभरात हा प्रकल्प कार्यान्वित करावा. औरंगाबाद येथे अशीच बाजारपेठ निर्माण केली जाईल का?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, नुकतीच आता ही जागा शासनाच्या ताब्यात आली आहे. त्यानंतर या प्रकल्पाचा फिजिबिलिटी रिपोर्ट आपल्या एजन्सीमार्फत तयार झाला. ग्लोबल टेंडरच्या प्रोसेसची कार्यवाही सुरु आहे. ग्लोबल टेंडर लवकरात लवकर काढले जाईल. त्यामध्ये जो कमीत कमी कायद्याप्रमाणे कालावधी द्यावा लागतो, तोच कालावधी लागेल. परंतु राज्य सरकारचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. ही काळाची गरज आहे म्हणून तातडीने यामध्ये कुठलाही विलंब मार्केट उभे करण्यामध्ये लागणार नाही अशा पध्दतीचे काम केले जाईल.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** 31519 .........

श्री. हर्षवर्धन पाटील ........

दुसरे असे की, शासनाने ही जागा विनामुल्य दिलेली असली तरी इक्वीटी कॉन्ट्रीब्युशनच्या बाजारभावानुसार ही रक्कम महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ ग्राहय धरणार आहे. मार्केट उभे राहिल्यानंतर इक्वीटी कॉन्ट्रीब्युशन शेअर नुसार त्याचे कंट्रोलीग राहणार आहे. शेतक-याच्या मालाला भाव मिळवून देणे हा आमचा एकमेव उद्देश आहे.

----------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विदर्भात नक्षल चळवळीशी संबंध असल्याच्या संशयावरुन राजूरा, चंद्रपूर, बल्लारपूर आणि दर्यापूर परिसरातील १७ ठिकाणी घातलेल्या छाप्यात नक्षलप्रचार साहित्य सापडल्याबाबत**

**(९) * २९६२९ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. रमेश निकोसे , श्री.सय्यद जामा , श्री. यशवंतराव गडाख :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात नक्षल चळवळीशी संबंध असल्याच्या संशयावरुन दिनांक १० मे, २००७ रोजी वा त्यादरम्यान राजूरा, चंद्रपूर, बल्लारपूर आणि दर्यापूर परिसरातील १७ ठिकाणी घातलेल्या छाप्यात नक्षलप्रचार साहित्य सापडल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ज्या व्यक्तीकडे नक्षलप्रचार साहित्य सापडले अशा व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्या करिता:** (१) राजूरा, चंद्रपूर, बल्लारपूर व दुर्गापूर परिसरातील १७ ठिकाणी घातलेल्या छाप्यात नक्षलप्रचार साहित्य सापडल्याचे आढळून आले.

(२), (३) व (४) नक्षलवादी संघटनांनी दिनांक १०/०४/२००७ रोजी गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर जिल्हा बंद चे आयोजन केले होते. या अनुषंगाने दिनांक ०७/०४/२००७ रोजी चंद्रपूर शहर, रामनगर, गडचांदूर, राजूरा या पोलीस स्टेंशन हद्दीत नक्षल प्रचाराचे व शासन विरोधी पत्रक मिळून आल्याने ती जप्त करण्यात येऊन याबाबत दिनांक ७/०४/२००७ चे २१.०० वाजता पोलीस स्टेशन रामनगर येथे अज्ञात आरोपीतांविरुध्द अपराध क्र.३०५८/२००७ कलम ३९(१) बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम १९६७ सह, कलम ३,४, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपासात १७ नक्षलसमर्थक व सहानुभूतीवर यांच्या घरी छापे टाकले असता नक्षलतत्व प्रणालीचे व हिंसक कृत्याचे समर्थन व प्रचार करणारे साहित्य आढळून आले. प्राप्त दस्तऐवजांची तपासणी सुरु असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, गडचिरोली, गोंदिया, दर्यापूर, सालेकसा, दरीकसा आणि चंद्रपूर या जिल्हयात नक्षलवादी अनेक वर्षापासून जनतेला आणि शासनाला त्रास देत असल्यामुळे फार गंभीर परिस्थिती या ठिकाणी निर्माण झालेली आहे. 10 एप्रिल, 2007 रोजी नक्षलवाद्यांनी या ठिकाणच्या पोलीस स्टेशनमध्ये तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रके टाकून तो परिसर बंद ठेवण्याचे आवाहन केले होते. अनेक वर्षापासून या ठिकाणी नक्षलवाद्यांचा त्रास होत असल्यामुळे या ठिकाणी नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलीस फोर्स कमी पडत असेल तर लष्कराची मदत घेऊन या नक्षलवादी चळवळीचा कायमचा नायनाट करण्याच्या संदर्भात शासन काही भूमिका घेणार आहे काय?

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MAP/ KGS/ प्रथम श्री. भोगले... 13:10

**ता.प्र.क्र. : 29629** .........

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, राजूरा, चंद्रपूर, बल्लारपूर आणि दुर्गापूर परिसरात नक्षलवाद्यांचा काही प्रमाणात प्रभाव आहे. परंतु या ठिकाणी पोलीस त्यांचा चांगल्या प्रकारे बंदोबस्त करीत असल्यामुळे नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी लष्कराची मदत घेण्यासारखी परिस्थिती नाही. या ठिकाणचे नक्षलवादी माओवादी चळवळीने दंडकारण्य घेण्याचा उद्देश सफल करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. हे नक्षलवादी प्रचार, बातम्या गोळा करणे, भिती दाखवणे अशा प्रकारे स्ट्रॅटेजी वापरतात. परंतु नक्षलवाद्यांचा बंदोबस्त चांगल्या प्रकारे पोलीस करीत असल्यामुळे या ठिकाणी लष्कराला पाचारण करण्याची आवश्यकता नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, नक्षलवाद्यांविरोधात कारवाई करणा-या पोलिसांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी पोलीस जोखिमिचे काम करतात त्यामुळे नक्षलवादी चळवळीच्या ठिकाणी काम करणा-या पोलिसांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. तसेच नक्षलवादी चळवळीला आळा घालित असतांना निरपराध जनतेला त्रास होता कामा नये यासाठी कोणती काळजी शासनातर्फे घेण्यात येते याची माहिती माननीय मंत्रीमहोदय देतील काय? नक्षलवाद्यामुळे सामान्य जनतेला त्रास होतो यासंदर्भात हयुमन राईट संघटनेने काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे निरपराध जनतेला न्याय मिळाला पाहिजे त्यासंदर्भात माननीय मंत्रहीमहोदय माहिती देणार आहेत काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, नक्षलवादी कारवाई करतांना सामान्य जनतेला त्रास झाला आहे अशी तक्रार आतापर्यंत कोणीही दिलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात माहिती दिली तर त्यासंदर्भात विचार करुन तोडगा काढला जाईल.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, जिस जिले में मैं रहता हूँ और जहां से मैं चुनकर आता हूँ, उस चंद्रपुर और गडचिरोली जिले का यह प्रश्न है. नक्सलवादी मोहिम पिछले 30-35 साल से चल रही है, इसके बारे में अब तक शासन ने क्या किया है ? यह मोहिम कौन चला रहा है, इसके पीछे कौन व्यक्ति हैं, कौन सी जगह से ये लोग आते हैं, क्या ये लोग चंद्रपुर और गडचिरोली जिले के हैं ? पहले यह मोहिम चंद्रपुर और गडचिरोली के दुर्गम और पिछड़े हुए भाग तक सीमित थी, लेकिन अभी इसका विस्तार शहरी क्षेत्र तक हो गया है. उदाहरण के तौर पर मैं आपको बताना चाहता हूँ कि चंद्रपुर में सिटी थाना, रामनगर के अन्तर्गत 2001 के

. . . NN 4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : **29629** .........

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .......

जारी , चुनाव में जिला कांग्रेस के अध्यक्ष को पेड़ पर बांधकर गोली मारी गई. नक्सलवादी मोहिम के पीछे क्या कारण हैं ? क्या वहां का विकास नहीं हो रहा है, क्या वहां के युवकों को रोजगार नहीं मिल रहा है, क्या पढ़े-लिखे युवक बेरोजगारी की वजह से नक्सलवादी मोहिम से जुड़ रहे हैं ? मैं मंत्री महोदय से पूछना चाहता हूँ कि इसके पीछे क्या कारण है ? नक्सलवादी मोहिम के कारण का पता लगाने के लिए सरकार को एन.जी.ओ., लोकल लीडर्स या कोई आयोग बिठाना चाहिए. क्या ये लोग आंध्र प्रदेश या छत्तीसगढ़ से आ रहे हैं ? चंद्रपुर और गडचिरोली की जनता नक्सलवादियों की वजह से परेशान है. इसलिए नक्सलवादियों की मोहिम को खत्म करने के लिए शासन क्या उपाय-योजना करने वाली है ?

. . . नंतर अ. शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29629....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ही चळवळ 35 वर्षापासून सुरु आहे असे सांगितले. ही चळवळ कोण चालवितो, कशी चालवितो याची वेळोवेळी माहिती आलेली आहे. तसेच चळवळीच्या प्रमुखांना पकडून त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. ही चळवळ छत्तीसगड, आंधप्रदेश व देशातील इतर राज्यांमध्ये चालू आहे. याठिकाणी प्रामुख्याने बेरोजगारीसंबंधी प्रश्न विचारलेला आहे. या दुर्गम भागामध्ये रस्ते, कारखाने काढण्याचा शासनाचा प्रयत्नशील आहे. काही ठिकाणी रस्ते नव्हते, परंतु आता रस्त्यांची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. या नक्षलवादी चळवळीमध्ये बेरोजगार तरुण गेलेले आहेत. यासाठी शासनाने आत्मसमर्पणाची योजना जाहीर केलेली आहे. त्यांना बक्षिसही जाहीर केलेली आहेत. बेरोजगार तरुणांना या चळवळीपासून दूर ठेवण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझे मंत्रिमहोदयांना दोन प्रश्न आहेत. नक्षलवादी मार्क्सवादी, लेनिनवादी वैचारिक भूमिका स्वीकारणे, त्या संदर्भातील अभ्यास करणे, हा वेगळा भाग आहे आणि प्रत्यक्ष हिंसक कारवायामध्ये भाग घेणे हा वेगळा भाग आहे. हिंसक कारवायामध्ये भाग घेणाऱ्याविरुध्द शासन कारवाई करीत असेल तर प्रश्न नाही. परंतु केवळ तशापध्दतीचे प्रचार साहित्य किंवा तशाप्रकारची पत्रके वाचणे हा शासन गुन्हा ठरविणार असेल तर ती चुकीची गोष्ट आहे. परंतु अशाप्रकारची कारवाई शासन करीत आहे. मुंबईतील अनेक तरुणांना चुकीच्या पध्दतीने तुरुंगात टाकले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी सांगितले की, हा प्रश्न मुख्यत: दारिद्र्याचा, शोषणाचा आणि विकासाचा आहे. ज्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर दारिद्रय आहे, शोषण आहे आणि विकासाचा कोणताही रस्ता तेथे पोहोचलेला नाही अशा ठिकाणी नक्षलवादी चळवळ आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, महाराष्ट्रातील सर्व दुर्गम भागाची सामाजिक आणि आर्थिक पाहणी करुन त्याचा अहवाल या सभागृहात ठेवण्यात येईल काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कोणालाही पुस्तके वा पत्रके वा कोणतेही साहित्य वाचण्याचा अधिकार आहे. पत्रक वाचणे हा गुन्हा होऊ शकत नाही आणि अशाप्रकारची कारवाई शासनाने केलेली नाही. ......

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29629....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ज्यांच्याकडे ही पत्रके सापडली त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. उत्तरात देखील नमूद करण्यात आलेले आहे. हा प्रकार अतिशय निंदाजनक आणि निषेधार्ह आहे....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, गुन्हा का दाखल करण्यात आला त्याचे कारण सांगतो. दोन पत्रके वाटण्यात आली होती. पहिल्या पत्रकातील मजकूर मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवितो.

(1) महाराष्ट्र पोलिसांचे तथाकथित एन्काऊंटर गडचिरोली वर्षभरात 24 आदिवासींची हत्या, सरकारी आतंकवाद्याचा मुकाबला करण्यास लडाकू जन आंदोलन उभारा, खादी आणि खाकीतील हत्यारांना ठेचून काढा. नवजनवादी क्रांती झिंदाबाद.

(2) "महाराष्ट्र सरकार द्वारा गडचिरोली जिले में निर्दोष आदिवासी की हत्याओं के विरोध में जुझारु संघर्ष करो. 10 अप्रैल 2007 को गडचिरोली, गोंदिया, चंद्रपुर जिले को बंद करो, झूंठी मुठभेड़ों में महाराष्ट्र पुलिस के द्वारा की गई निरपराध ग्रामीणों की हत्याओं का विरोध करो. साम्राज्यवादी भ्रष्ट दलाल सरकार के विरुद्ध जनता संघर्ष करे. महाराष्ट्र सरकार के असली आतंकवादी विलास देशमुख व गृहमंत्री आर.आर. पाटील हैं.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, त्या पत्रकामध्ये आक्षेपार्ह असे काय आहे ?

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 13:20

ता.प्र.क्र.29629.....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, काल माननीय गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की,...

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, राज्याच्या मुख्यमंत्र्यांना व गृहमंत्र्यांना मारुन टाका, असे या पत्रकात म्हटलेले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, काल माननीय गृहमंत्र्यांनी एका घटनेबद्दल विद्यार्थ्यांवरील खटले मागे घेतले व असे सांगितले की, अशा प्रवृत्ती ठेचून काढल्या पाहिजे, अशाप्रकारचा न्याय आपण एका बाजूला देता आणि दुसऱ्या बाजूला आपण आदिवासींचे शोषण करणाऱ्यांबद्दल अशी कारवाई करता ? हे योग्य नाही.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापति महोदय, पत्रक में लिखा है : "साम्राज्यवादी भ्रष्ट दलाल सरकार के विरुद्ध जनता संघर्ष करे. महाराष्ट्र सरकार के असली आतंकवादी विलास देशमुख व गृहमंत्री आर.आर. पाटील हैं. और फिरोती लेकर हत्या करने वाले गुंडे आय.जी. पंकज गुप्ता और शिरीष जैन हैं. सिरीयल किलर को सजा देने जनयुद्ध के मैदान में कूद पड़ो." म्हणून हा सरकारविरुध्द अशाप्रकारचा त्या लोकांनी अवमान केलेला आहे. अशाप्रकारचे हे पत्रक आहे.

**सभापती** : एखादे साहित्य वाचणे आणि अशा पध्दतीने चिथावणी देणारे जर पत्रक असेल तर त्याबाबातीत कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्याबद्दलच आपण गुन्हा दाखल केलेला आहे. बाकीच्या 19 ठिकाणी जे छापे टाकले व त्याबाबतीत कारवाई केलेली नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, चिथावणी देणारे साहित्य असेल तर संबंधितांवर आपण कारवाई करा, परंतु याठिकाणी उत्तरात म्हटल्याप्रमाणे, केवळ शासनाच्या विरोधात भूमिका घेतल्यामुळे जर आपण त्यांच्यावर गुन्हे दाखल करणार असाल तर ते योग्य नाही. त्यामध्ये चिथावणी देणारी कोणती भाषा आहे ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मीही काही काळ गृह विभागाचा राज्यमंत्री होतो व माननीय भूजबळ साहेब पूर्ण दर्जाचे गृहमंत्री होते. एखादे साहित्य कोणी वाचले म्हणून त्यावर कारवाई होत नाही, परंतु याठिकाणी सन्माननीय मंत्र्यांकडे असलेले दोन क्रमांकाचे पत्रक पाहिले तर त्यामध्ये प्रचलित सरकारविरुध्द चिथावणी दिली असून त्याविरुध्द कारवाई होणे आवश्यक आहे.

(..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29629.....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, दुसऱ्या पत्रकाच्या बाबतीत हिंसक वृत्ती असेल तर त्याबाबतीत आपण जरुर कारवाई करा. मीही हिंसाचाराच्या विरोधात आहे. परंतु याठिकाणी शासनाच्या विरोधात भूमिका घेतली म्हणून व शासनाच्या विरोधात कार्यकर्ते बोलत असतील तर त्यामध्ये चिथावणी असण्याचे कारण काय ?

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी सुरुवातीसच सांगितलेले आहे की, इतर 19 ठिकाणी छापे टाकले, त्यांच्याकडे चिथावणी देणारे काही सापडले नाही म्हणून त्यांच्यावर त्यांनी कारवाई केलेली नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांचे लेखी उत्तर व सुरुवातीस वाचलेले पत्रक वाचावे.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांकडे अन्य काही साहित्य असेल तर ते त्यांनी पटलावर ठेवावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ते पत्रक मी वाचून दाखवतो. सीआरपीसी कलम 93 अन्वये घरझडती घेण्यात आलेल्या लोकांची यादी माझ्याकडे आहे. त्यामध्ये काही लोकांकडे नक्षलविचार सरणीचा पुरस्कार व समर्थन करणारे काही दस्तऐवज प्राप्त झाले. त्यामध्ये श्री.किशोर सोमन्नाजी पोतनवार यांचे तसेच इतरांची नांवे आहेत. माझ्याकडे इतरही माहिती आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय,...

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती पटलावर ठेवावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी माझ्या सुरुवातीला विचारलेल्या आर्थिक व सामाजिक तसेच दारिद्र्याविषयीच्या प्रश्नास उत्तर द्यावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे योग्य असून तो दुर्गम व मागासलेला भाग आहे. त्यामुळे त्या भागातील पाहणी करुन सर्व्हे करण्यात येईल व त्याठिकाणी ज्या ज्या सुधारणा करावयाच्या आहेत त्याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

नंतर श्री.रोझेकर...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.29629 पुढे सुरु.........</u>

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, ज्यांच्याकडे हे पत्रक सापडले आहे त्यांच्यावर कारवाई करणार नाही, परंतु, पत्रक प्रसिध्द करणा-यांचा तपास सुरु आहे, असे आताच मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. चार महिन्यांपूर्वी गुन्हा नोंदविण्यात आला असला तरी अद्याप गुन्हयाचा सुगावा लागलेला नाही. हे पत्रक प्रसिध्द करणारे कोण आहेत, त्यांच्या मागे कोण आहे, याबाबतचा शोध लावून शासन त्यांच्यावर कठोर कारवाई करणार काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जे पत्रक वाटले गेले त्याचे मुद्रक कोण आहेत, छापणारे कोण आहेत, लेखक कोण आहेत यांची नांवे उपलब्ध नाहीत. त्यामुळे अज्ञात इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे व या लोकांचा शोध सर्व बाजूने घेतला जात आहे. गुप्तहेर खाते, बातमीदार यांच्यामार्फत हे पत्रक कुठून आले, कसे आले, कोणाकडून आले याबाबत सखोल तपास करण्याचा प्रयत्न पोलिसांमार्फत कसोशीने सुरु आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, गेल्या पाच वर्षात नक्षलवादी चळवळ संपूर्ण देशात मोठया प्रमाणात वाढली आहे. गेल्यावर्षी नक्षलवाद्यांकडून मारले गेलेल्यांची संख्या जम्मु-काश्मीरसह देशात दहशतवाद्यांकडून मारले गेलेल्यांपेक्षा जास्त आहे. नक्षलवादी चळवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित राहिली नसून नेपाळपासून आंध्र प्रदेशपर्यन्त सर्व ठिकाणी ही चळवळ फोफावली आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी एकत्रितपणे ही चळवळ मोडून काढली पाहिजे. अशाप्रकारची कोणती उपाययोजना महाराष्ट्र शासनाने योजली आहे ? तसेच केंद्र व राज्य सरकारचा टास्कफोर्स असून त्यांच्यामार्फत कारवाई झाली पाहिजे. असे राज्य शासनामार्फत केले जात आहे काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, नक्षलवाद्यांची चळवळ देशभरातील विविध राज्यांमध्ये आहे. नक्षलवाद्यांशी संबंधित किंवा अन्य बाबींमधील चौकशीच्या बाबतीत वेळोवेळी केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून एकमेकांच्या सहकार्याने कार्यवाही केली जाते आणि याही पुढे केली जाईल.

..2.........

**ता.प्र.क्र.29629 पुढे सुरु.........**

श्री.गिरीष गांधी : सभापती महोदय, नक्षलवादी चळवळ ही गडचिरोली व चंद्रपूर या दोन भागांमध्ये मोठया प्रमाणावर आहे. माओवादी संघटनेचा प्रमुख, मुरली याने मला धमकीचे पत्र पाठविले होते व माझ्या जीविताला धोका असल्याचे कळविले होते. कारण, आम्ही चोवीस दिवसांची लोकयात्रा त्या ठिकाणी काढली होती. ही गोष्ट खरी आहे की, चारु मुजुमदार आणि अन्य लोकांनी एक चळवळ त्या परिसरात सुरु केली होती. सुरुवातीच्या काळात या चळवळीला वैचारिक भूमिका होती, मात्र, अलिकडच्या काळामध्ये गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्हयामध्ये जे काही सुरु आहे त्याचे उदात्तीकरण करु नये, अशी नम्र विनंती मी आपल्या माध्यमातून सभागृहाला करु इच्छितो. पिपल्स वॉर ग्रुपच्या माध्यमातून एखाद्याची हत्या होत होती, अलिकडचे चित्र बदलले आहे. लहान मुलांना देखील मारुन टाकले जाते आणि झाडावर लटकाविले जाते, अशा प्रकारचे भयानक हिंसक वळण या चळवळीला लागले आहे. म्हणून या प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा करीत असतांना कुणाचेही उदात्तीकरण होऊ न देता संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक आहे. नक्षलवादी जे गडचिरोली आणि चंद्रपूरमध्ये आहेत त्यांनी वैचारिकता कधीचीच सोडली आहे. माझ ी पुन्हा एकदा विनंती आहे की, कोणत्याही बाबतीत त्या घटनेचे उदात्तीकरण होऊ न देता कारवाई झाली पाहिजे. शासन याबाबतीत गंभीर आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्या परिसरात आदिवासींच्या रक्षणासाठी पोलीस उभे आहेत. पोलिसांना मात्र संरक्षण देण्याची जास्त गरज आहे आणि यादृष्टीने शासनाने काम करण्याची आवश्यकता आहे. यादृष्टीकोनातून शासन काही प्रयत्न करेल काय ?

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29629 .....

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांनी जी माहिती दिलेली आहे ती सत्य आहे. आपणा सर्वांना कल्पना आहे की, नक्षलवाद्यांचा प्रश्न हा आजचा नाही तर कित्येक वर्षापासून अर्ध्या भारताला या समस्येने ग्रासलेले आहे. मी स्वत: गृहमंत्री होतो, त्यामुळे हा विषय मला माहिती आहे. महाराष्ट्रात नक्षलवाद्यांचे हल्ले होऊ नये म्हणून आपण कितीही काळजी घेतली तरी वेगवेगळया राज्यातून विविध मार्गाने लोक येतात व हल्ले करीत असतात. नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखणे हा जनतेच्या व सभागृहाच्या भावनेचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, नक्षलग्रस्त परीसरात कोणत्याही सोयीसुविधा निर्माण करण्यास अडचणी निर्माण केल्या जात आहेत. नक्षलवादी भागात रस्ता तयार करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टर, कामगाराना मारले जात आहे, त्यांना तेथे काम करु दिले जात नाही. महसूल खात्याचे अधिकारीही तेथे जाण्यास घाबरतात. शासनाला नक्षलग्रस्त भागाचा विकास करावयाचा आहे, त्या भागाला योग्य ती मदत करावयाची आहे. यासाठी केंद्र सरकारही निधी देत आहे. परंतु प्रत्यक्ष तेथे काम करताना विविध पध्दतीने विरोध होत आहे. असाच विरोध होत राहिला तर विकास कसा करणार ? शासनाने तेथे सुविधा दिल्या तर ही त्यांची चळवळ फोफावणार नाही अशी भिती नक्षलवाद्यांना वाटत आहे. त्यामुळे तेथे सोयी-सुविधा देण्यामध्ये नक्षलवादी अडचणी आणत आहेत. सध्या बॉर्डर सिक्युरीटी फोर्सला सोबत घेऊन तेथील इमारती व रस्त्याचे काम शासन करीत आहे. परंतु त्यांच्यावरही हल्ले होत आहेत. त्यामुळे तेही या कामामध्ये कमी पडत आहेत. तरीही तेथे सुविधा मिळण्यासाठी व सर्वसामान्यांचे कल्याण करण्याच्या कामी शासन प्रयत्न करीत आहे परंतु तेथे केवळ हिंसाचार केला जात आहे. तेथील पोलीस, शासकीय अधिकारी यांच्या जीवीताला धोका पोहण्याची शक्यता आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मांडलेल्या मुद्दयाबाबत वेगळा विचार करावा लागेल, कारण दोन्ही प्रश्न वेगवेगळे आहेत. या प्रश्नामध्ये शासन निश्चित सहकार्य करील परंतु कोणीही कायदा हातात घेऊ नये.

-----

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्रमांक 32625**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

**तारांकित प्रश्न क्रमांक 29680**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

**तारांकित प्रश्न क्रमांक 32011**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

**सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, भूमिहिन शेतमजूर योजना इ. योजनांचा लाभ मिळण्याबाबत**

**(१३) * २९७१७ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, भूमिहिन शेतमजूर योजना इ. योजनांचा लाभ मिळण्यासाठी तालुक्यातील अनेकांनी अर्ज केलेले आहेत परंतु अनुदान मंजूर करणाऱ्या समितीची गेल्या वर्षभरात मिटींग न झाल्याची तसेच या योजनेत गैरव्यवहार झााल्यामुळे या सर्व प्रकारची चौकशी करावी या मागणीसाठी युवा जनता दलाने दिनांक ४ जून २००७ रोजी मिरज तहसिल कचेरीवर मोर्चा काढला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चेकऱ्याच्या मागणीनुसार या तक्रारीची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय,

(२) होय,

(३) सन २००६-२००७ मध्ये संजय गांधी सामाजिक सहाय्य योजना समितीच्या आठ बैठका होऊन संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे ३५७ अर्ज मंजूर करण्यात आले. तर इंदिरा गांधी निराधार व शेतमजूर महिला अनुदान योजनेच्या ३ बैठका होऊन ३५८ अर्ज मंजूर करण्यात आले.

सन २००५ मधील प्राप्त प्रस्ताव गहाळ झालेले नाहीत. समितीने काही लोकांच्या पत्रावर मंजूर असा शेरा मारुन बँकेमध्ये खाते उघडण्यास सांगितले. परंतू खाते उघडूनही खात्यावर रक्कम जमा केली नाही, असे एकही प्रकरण नाही. तसेच प्रस्तुत समितीचा व्यवहार भेदभाव पूर्ण, संशयास्पद आहे, कमिटीचे काही सदस्य लाभार्थीचे मंजूर रकमेपैकी काही रकमेची मागणी करतात अशी लाभार्थ्यांची एकही तक्रार आलेली नाही.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, मोर्चेकरांनी ज्या तक्रारी केल्या होत्या, त्यामध्ये काही तथ्य आढलेले नाही. कोणत्याही लाभार्थ्याची तक्रार आलेली नाही व या प्रकरणाबाबत बैठक होऊन सर्व अर्ज मंजूर केल्याची माहिती दिली असल्याचे म्हटले आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, मंत्री महोदयांनी सन 2006-2007 मध्ये संजय गांधी सामाजिक सहाय्य योजना समितीच्या आठ बैठका होऊन संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे 357 अर्ज मंजूर केल्याचे व इंदिरा गांधी निराधार व शेतमजूर महिला अनुदान योजनेच्या तीन बैठका होऊन 358 अर्ज मंजूर केले आहेत. तसेच सन 2005 मधील प्राप्त प्रस्ताव गहाळ झालेले नाहीत. समितीने काही लोकांच्या पत्रावर मंजूर असा शेरा मारुन बँकेमध्ये

....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील.....

ता.प्र.क्र.29717.....

खाते उघडण्यास सांगितले आहे. परंतु खाते उघडूनही खात्यावर रक्कम जमा केलेली नाही असे एकही प्रकरण नसल्याचे म्हटले आहे. तसेच प्रस्तुत समितीचा व्यवहार भेदभावपूर्ण व संशयास्पद आहे, कमिटीचे काही सदस्य लाभार्थीच्या मंजूर रकमेपैकी काही रकमेची मागणी करतात अशी लाभार्थ्यांची एकही तक्रार आलेली नाही असे म्हटले आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 29717 ....

माझ्याकडे अनेक अशा तक्रारी आलेल्या आहेत. मंजूर म्हणून त्यांना पत्रही मिळाले आहे पण त्या व्यक्तींना प्रत्यक्षात ते मिळालेच नाही किंवा बँकेमध्येही रक्कम जमा झालेली नाही. काहींना पत्र मिळाले, पोच मिळाली पण त्यांचे अर्ज येत नाहीत अशाही तक्रारी आहेत. तेव्हा या तक्रारी मी आपल्याकडे दिल्यास त्याबाबत मंत्री महोदय चौकशी करतील काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, संजय गांधी निराधार योजनेसाठी तालुका पातळीवर जी समिती आपण गठित केली आहे तिचे अध्यक्ष स्थानिक आमदार असतात आणि त्या समितीच्या 2006-07 मध्ये 8 बैठका झाल्या असून त्यांच्या तारखाही माझ्याकडे आता उपलब्ध आहेत. या योजनेतून लाभ घेण्यासाठी जितके अर्ज आले होते त्यात किती लाभार्थींचा समावेश केला त्याची सर्व माहिती देखील माझ्याकडे आता उपलब्ध असून ती मी वाटल्यास पटलावर ठेवू शकतो. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेआहे की, काही लाभार्थींना पैसे दिलेले नाहीत. परंतु आमच्याकडे म्हणजे जिल्हाधिकारी, तहसिलदार इत्यादींकडे अशा नेमक्या केसेसच्याबाबतीत एकही तक्रार आलेली नव्हती. सन्माननीय सदस्यांकडे अशा काही केसेस असतील तर जरूर त्यांनी त्या माझ्याकडे द्याव्यात, आम्ही त्याबाबत निश्चितपणे तपास करू.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, या संबंधात तेथे लोकांनी मोर्चा काढला होता आणि नंतर तहसिलदारांनी वर्तमानपत्रामध्ये देखील याबाबत खुलासा दिलेला आहे की, काही प्रकरणांमध्ये वाद आहेत आणि अजून काही प्रकरणे प्रलंबित आहेत व पुढील बैठकीमध्ये त्यांचा विचार केला जाईल. तेव्हा या संबंधात कोणाच्या तक्रारी आलेल्या नाहीत असे आपण कसे म्हणता? तरीही माझ्याकडे आलेल्या तक्रारी मी आपल्याकडे दिल्यास त्याबाबत आपण चौकशी करून त्यांना न्याय द्याल का ?

श्री. सुरेश शेट्टी : होय.

***

**ता. प्र. क्रमांक 30945**

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )**

...... एसएस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विचोरी ते बेलोरा रस्त्याचे डांबरीकरण**

**(15) * 29728 प्रा. बी.टी.देशमुख, श्री. व्ही.यू. डायगव्हाणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक 24522 ला दिनांक 10 एप्रिल, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विचोरी ते बेलोरा या खडीकरणाचे काम पूर्ण झालेल्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,
(2) या कामावर आतापावेतो किती खर्च करण्यात आला आहे,
(3) या प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी अजून किती निधीची आवश्यकता आहे,
(4) प्रकल्पपूर्तीचे काय नियोजन करण्यात आलेले आहे ?

**श्री.छगन भुजबळ** : (1) सदरहू रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे कामाची निविदा निश्चिती झालेली असून डांबरीकरणाचे काम पावसाळ्यानंतर करण्यात येईल.
(2) सदर कामावर आतापर्यंत खर्च निरंक आहे.
(3) रु. 68.55 लक्ष निधीची आवश्यकता आहे.
(4) निधी उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे प्रयत्न राहतील.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, ठाणे येथे कृषी माल विकास करून येथे वातानुकूलित बाजारपेठ केली जाईल आणि त्याच्यानंतर मग विदर्भ, मराठवाड्यामध्ये देखील अशा प्रकारे बाजारपेठा केल्या जातील. आता या ए.सी. बाजारपेठेतील माल या डांबरी रस्त्यावरून जाणार आहे. हा प्रश्न या ठिकाणी दोन तीन वेळा येऊन पुढे गेलेला आहे. आता या कामाच्या निविदा काढलेल्या आहेत आणि पावसाळ्यानंतर हे काम सुरू केले जाईल असे सांगितले आहे. तेव्हा हे काम किती दिवसात आपण पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत वा देण्यात येतील ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, हे खरे आहे की, या कामाच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत आणि ती 4.80 टक्क्यांनी जास्त होती. त्यामुळे त्यांच्याशी वाटाघाटी करण्याचा प्रश्न होता. तसेच सुरक्षा अनामत म्हणून पैसे भरायला त्यांना सांगण्यात आले होते तेसुद्धा त्यांनी भरलेले नाहीत. परंतु त्यांनी त्यासाठी वेळ मागून घेतला आहे व आपणही 31 जुलै पर्यंतची मुदत वाढवून दिली आहे. नुकतीच या संदर्भात त्यांच्याशी चर्चा झाली असून कार्यारंभ आदेश पारित करण्यात येतील व पावसाळा संपल्यानंतर हे काम पूर्ण करण्यात येईल. साधारणत: यासाठी एक वर्षाचा कालावधी लागेल. आपल्याला कल्पना आहे की, अनेक वर्षे हा प्रश्न येथे येतो आहे आणि

...... एसएस 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भुजबळ (पुढे चालू.....) ता.प्र.क्र. 29728 ....

यासाठी पुरेशी तरतूद नव्हती. या वेळेसही पुरेशी तरतूद आहे अशातील भाग नाही. पण 2007-08 या आर्थिक वर्षामध्ये 43 लाखाचा जो निधी आहे तो आणि इतर लेखाशीर्षाखालील जो निधी आहे त्यातील काही निधी किंवा अन्य निधी एकत्रित करून, कोठल्याही प्रकारे हे काम व्यवस्थित होईल आणि हे काम निधीसाठी थांबणार नाही. तसेच हे काम वर्षाच्या आत पूर्ण होईल जेणे करून या डांबरी रस्त्यावरून या गाड्या येतील आणि ए.सी.मार्केटपर्यंत तो भाजीपाला उत्तमप्रकारे पोहोचेल आणि त्यातून शेतकऱ्यांनादेखील दोन पैसे अधिक मिळतील हा जो आपला उद्देश आहे तो रास्त आहे आणि त्यादृष्टीनेच शासन हे काम करील.

( यानंतर श्री. सरफरे ..... टीटी 1 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29728...

श्री. छगन भुजबळ...

हा आपला जो उद्देश आहे तो अतिशय रास्त आहे. त्यानुसार शासन काम करीत आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांचा आभारी आहे.मला फक्त एकच प्रश्न विचारावयाचा आहे. त्यांनी विभागाला दिलेले आश्वासन पुरेसे आहे. हे काम एक वर्षाच्या आत पूर्ण केले पाहिजे अशाप्रकारे ठामपणे क्षेत्रिय अधिकाऱ्यांना आदेश दिले जातील काय?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी ज्या अर्थी सदनासमोर स्टेटमेंट केले आहे की, या कामाकरिता कोणत्याही प्रकारे निधीची कमतरता होऊ न देता एक वर्षाच्या आत काम पूर्ण केले जाईल. याचा अर्थ ते आदेशच आहेत, आणि ते काम करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांसाठी आहेत. त्यानुसार हे काम पूर्ण केले जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवणे

विशेष कार्य अधिकारी : सभापमती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 16 जुलै, 2007, गुरुवार, दिनांक 26 जुलै, 2007 व शुक्रवार, दिनांक 27 जुलै, 2007 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : सोमवार, दिनांक 16 जुलै, 2007, गुरुवार, दिनांक 26 जुलै, 2007 व शुक्रवार, दिनांक 27 जुलै, 2007 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवणे

विशेष कार्य अधिकारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तांची नववी व दहावी यादी मुद्रित स्वरुपात व अकरावी ते एकोणतीस या याद्या अमुद्रित स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तांची नववी, दहावी यादी मुद्रित स्वरुपात व अकरावी ते एकोणतीस या याद्या अमुद्रित स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या. सदर अमुद्रित याद्यांच्या मुद्रित प्रती मुद्रणालयाकडून प्राप्त झाल्यानंतर माननीय सदस्यांना यथावकाश पाठविण्यात येतील.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील पोलिसांना देशातील इतर पोलिसांपेक्षा जास्त पगारवाढ देण्याबाबत" या विषयावर श्री. गुरुनाथ कुलकर्णी, श्री. जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजिया खान, श्री. रणजित सिंह मोहिते-पाटील, श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 18418 ला दिनांक 21 जुलै, 2006 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी माननीय गृह राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : अधिक माहिती छापावी )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या कोटयवधी रुपयांच्या मालमत्ता खरेदी-विक्रीची चौकशीबाबत" या विषयावर सर्वश्री. नितीन गडकरी , पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, गोपीकिशन बाजोरिया, दिवाकर रावते, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 29327 ला दिनांक 29 जुलै, 2007 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी माननीय उप मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे

(प्रेस : अधिक माहिती छापावी )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मौजे पेल्हार (ता. वसई, जि. ठाणे) येथील शेत जमिनीवर बेकायदेशीरपणे बांधकामे करुन नफा मिळविण्याबाबत" या विषयावरील श्री.शांताराम करमळकर (माजी वि.प.स.), सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा तरांकित प्रश्न क्रमांक 18518 ला दिनांक 18 जुलै, 2006 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी माननीय महसूल मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे

(प्रेस : अधिक माहिती छापावी )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. सुनील देशमुख (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोक आयुक्तांचा दिनांक 28 जानेवारी 2000, 23 मे 2000, 4 डिसेंबर 2000 तसेच उप लोकआयुक्तांचा दिनांक 16 डिसेंबर 2002 चा विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञ ापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचा सन 2006-07 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2002-2003, 2003-2004 चा लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादितचा सन 2005-2006 चा पंचविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील (पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सन 2003-2004 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : सन 2003-2004 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "पेरिमल प्राथमिक आरोग्य केंद्रातील (जिल्हा गडचिरोली) दत्तक घेतलेल्या 5 वर्षीय बालकाचा कुपोषणाने इ ालेला मृत्यू" या विषयावर डॉ.दीपक सावंत व इतर वि.प.स.नी सन 2005 च्या हिवाळी अधिवेशनामध्ये दिलेल्या लक्षवेधी सूचनेसंबंधी अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : लक्षवेधी सूचनेसंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---

**पृ.शी. व मु.शी.** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.रमेश निकोसे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल सादर करतो.

**सभापती** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल सादर करण्यात आला आहे.

---

**पृ.शी. व मु.शी.** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.सुधाकर गणगणे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इतर मागासवर्ग कल्याण समितीचा चौथा अनुपालन अहवाल व पाचवा अहवाल सादर करतो.

**सभापती** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा चौथा अनुपालन अहवाल व पाचवा अहवाल सादर करण्यात आला आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

SKK/ SBT/ MAP/ MAP/ KGS/

**<u>औचित्याचे मुद्दे</u>**

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे :-

सभापती महोदय, जिल्हा परिषद, कुडाळ यांनी कुडाळ तालुक्यातील वालावल ग्रामपंचायत बरखास्त (विघटन) करण्याचा प्रस्ताव आयुक्त कोकण विभाग यांच्यामार्फत शासनाकडे पाठवून बराच कालावधी झाला आहे. शासनाने या प्रस्तावावर अद्यापही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे वालावल परिसरातील नागरिकांत असंतोषाचे वातावरण पसरलेले आहे. वालावल ग्रामापंचायत त्वरित बरखास्त करण्याबाबत शासनाने कारवाई करावी अशी विनंती आहे.

--

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, लाल गव्हाच्या वाटपाबाबतच्या अत्यंत महत्वाच्या विषयावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. याबाबत माझ्याकडे जे पुरावे आहेत ते मी आपल्याकडे सादर करीत आहे. सभापती महोदय निकृष्ट दर्जाचा, मानवी शरीरास अयोग्य अशा लाल गव्हाचे रेशनवर होणारे वितरण तातडीने थांबविण्यात येईल असे ठोस आश्वासन मंगळवार, दिनांक 24 जुलै, 2007 रोजी विधान परिषदेच्या सभागृहात माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी दिलेले असताना व या गव्हाच्या वितरणाबाबत बंदी घातलेली असताना, ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागात सुमारे अडीच हजार मेट्रीक टनापेक्षा जास्त लालसर निकृष्ट गव्हाचे वितरण सक्तीने अजूनही केले जात आहे. परिणामी आदिवासींच्या वाट्याचा 10 किलो तांदूळ कमी प्रमाणात देण्यात येत आहे. कुपोषणग्रस्त भागातील संतप्त आदिवासी व गोरगरीब जनतेने श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली काल बुधवार, दिनांक 1 ऑगस्ट 2007 रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी दिनी ठाणे जिल्ह्यातील सर्व तहसील कचेऱ्यांमधील अधिकाऱ्यांना लाल गव्हाच्या पोळ्या खाऊ घालण्याचे आंदोलन केले आहे. संतप्त जनतेच्या भावना लक्षात घेऊन सभागृहात दिलेल्या आश्वासनाची तातडीने पूर्तता करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात तसेच राज्यात सर्वत्र या निकृष्ट दर्जाच्या लाल गव्हावर बंदी घालण्यात यावी म्हणून या सार्वजनिकदृष्ट्या अत्यंत महत्वाच्या मुद्यावर औचित्याचा मुद्दा सभागृहात मांडत आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय सभापती महोदय, आपणास नम्र विनंती आहे की, हा निकृष्ट दर्जाचा गहू बंद करण्याबाबत आपण शासनाला निदेश द्यावा किंवा आपल्याला योग्य वाटेल ती सूचना करावी.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये लाल गहू वाटला जात आहे. याबाबतीत लोकांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, ही पोळी खाण्याजोगी आहे काय हे आपण पहावे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, ही पोळी आहे की नाही याचाही विचार करावा लागेल.

श्री. सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना जे निदेश दिले होते त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

...2...

**सभापती** : या औचित्याच्या मुद्याबाबत मी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त आणि आपल्यालाही बोलण्याची परवानगी दिली. हा मुद्दा माझ्या लक्षात आलेला आहे. हा अत्यंत गंभीर प्रश्न सातत्याने सभागृहात मांडला जात आहे आणि त्याचा पाठपुरावा केला जात आहे. त्याचे कारण असे की, गरीब लोकांना हा गहू रेशनवर वाटप केला जात आहे. त्यांना चांगल्या गव्हाचे वाटप कसे करता येईल यादृष्टीने यापूर्वी सुध्दा त्या विभागाच्या माननीय मंत्रिमहोदयांबरोबर माझी बैठक झाली होती. आता या ठिकाणी माननीय राज्यमंत्री श्री. बाबा सिद्दीकी उपस्थित आहेत. मी त्यांना सांगेन की, ठाणे जिल्हा असेल किंवा राज्याचे अन्य जिल्हे असतील, त्या ठिकाणच्या निकृष्ट दर्जाच्या गव्हाची अत्यंत गांभीर्याने तपासणी करावी. या अनुषंगाने प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. तो गहू सामान्य लोकांच्या घरापर्यंत जाऊ नये याची काळजी कशी घेता येईल यादृष्टीने विचार करावा.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, होय.

**सभापती** : याबाबतीत येत्या आठ ते दहा दिवसांमध्ये मी माझ्या दालनामध्ये बैठक घेईन.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मेरे 2 औचित्य के मुद्दे है. पहला मुद्दा यह है कि महाराष्ट्र शासन ने 6 प्रतिशत की ब्याज दर से किसानों को कर्ज देने का धोरण जाहिर किया है. इस पर सभी बैंकों ने अमल शुरु कर दिया है और महाराष्ट्र ग्रामीण बैंक 6 प्रतिशत की दर से किसानों को व्यक्तिगत लोन देती है. लेकिन सोसायटीज को 10 प्रतिशत की ब्याज दर से कर्ज दिया जाता है और सोसायटीज उसमें 3 प्रतिशत ब्याज मिलाकर 13 प्रतिशत की ब्याज दर से शेतकरी को पैसा दे रही हैं. यह शेतकरी के ऊपर अन्याय है. यह शेतकरी के लिए बहुत महत्वपूर्ण प्रश्न है. इसलिए शासन को जल्दी से जल्दी निर्देश देना चाहिए कि शेतकरी को 6 प्रतिशत की ब्याज दर पर कर्ज उपलब्ध हो.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदय श्री. छगन भुजबळ साहेब सभागृहात उपस्थित आहेत. आपण या प्रश्नाची जरुर नोंद घ्यावी आणि सहकार विभागाच्या संबंधित मंत्र्यांना ही बाब कळवावी.

श्री. छगन भुजबळ : ठीक आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांनी आपला दुसरा औचित्याचा मुद्दा मांडावा.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरा दूसरा औचित्य का मुद्दा यह है कि मराठवाडा कृषि विद्यापीठ में अभी जो परीक्षा हुई है, उसमें बहुत सारे विद्यार्थियों को यह शंका है कि उनको एक विशेष सब्जेक्ट में जो मार्क्स मिलने चाहिए थे, वे द्वेष भावना से नहीं दिए हैं. विद्यापीठ में रिवेल्यूएशन प्रावधान नहीं है, सिर्फ रिकाउन्टिंग की जाती है. विद्यार्थियों के लिए रिवेल्यूएशन होना आवश्यक है. महाराष्ट्र के सभी कृषि विद्यापीठों में रिवेल्यूएशन का प्रावधान होना चाहिए, क्योंकि अगर विद्यार्थियों को कम मार्क्स मिलते हैं तो उनके पास और कोई दूसरा रास्ता नहीं है. इसलिए मेरी आपसे विनंती है कि सरकार को इस बारे में निर्देश दिए जाएं.

**सभापती** : माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी या औचित्याच्या मुद्याची नोंद घ्यावी.

श्री. दिलीप वळसे-पाटील : याबाबतीत माननीय कृषी मंत्र्यांना कळविण्यात येईल.

. . . नंतर एम.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आज एक 93ची सूचना आली होती. ती मी दालनातच नाकारलेली आहे. आज 93च्या सूचनांची एकूण 22 निवेदने चर्चेसाठी आहेत.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : अमरावती जिल्हयातील भातकुली तालुक्यातील पेंढी धरण प्रकल्पग्रस्त महिलांनी पुनर्वसनासाठी सुरु केलेले आमरण उपोषण

**मु. शी**. : अमरावती जिल्हयातील भातकुली तालुक्यातील पेंढी धरण प्रकल्पग्रस्त महिलांनी पुनर्वसनासाठी सुरु केलेले आमरण उपोषण याबाबत सर्वश्री दिवाकर रावते, जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार व डॉ. नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार व डॉ. नीलम गो-हे यांनी "अमरावती जिल्हयातील भातकुली तालुक्यातील पेंढी धरण प्रकल्पग्रस्त महिलांनी पुनर्वसनासाठी सुरु केलेले आमरण उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : यवतमाळ नगरपरिषदेचे नगरसेवक श्री. प्रशांत दुबे यांची झालेली निघृण हत्या

**मु. शी.** : यवतमाळ नगरपरिषदेचे नगरसेवक श्री. प्रशांत दुबे यांची झालेली निघृण हत्या याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, पाशा पटेल, जगदीश गुप्ता, श्रीकांत जोशी, गुरुमुख जागवानी, केशवराव मानकर, रामनाथ मोते, संजय केळकर, व प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सिध्दाराम म्हत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, पाशा पटेल, जगदीश गुप्ता, श्रीकांत जोशी, गुरुमुख जागवानी, केशवराव मानकर, रामनाथ मोते, संजय केळकर व प्रकाश शेंडगे, वि.प.स.यांनी "यवतमाळ नगरपरिषदेचे नगरसेवक श्री. प्रशांत दुबे यांची झालेली निघृण हत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

--

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : कोल्हापूर जिल्ह्यातील शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या

**मु. शी**. : कोल्हापूर जिल्ह्यातील शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या याबाबत प्रा. शरद पाटील, श्री. जयंत पाटील व डॉ. नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील, श्री. जयंत पाटील व डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी "कोल्हापूर जिल्हयातील शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत)

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विदर्भातील शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या

**मु. शी.** : विदर्भातील शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर व मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर व मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी "विदर्भातील शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ या भागातील शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येच्या संदर्भात शासनाने केलेले निवेदन समाधानकारक नाही. तेव्हा शेतक-यांच्या आत्महत्या थांबाव्यात यासाठी शासन कोणती खास उपाययोजना करणार आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी 10 पानाचे सविस्तर निवेदन दिलेले आहे. शेतक-यांच्या आत्महत्या थांबाव्यात यासाठी शासनाने विविध उपाययोजना केलेल्या आहेत.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे.....

त्यामध्ये राज्यसरकारचे 1,0875 कोटी रुपयांचे पॅकेज असेल किंवा केंद्र सरकारचे 3,750 कोटी रुपयाचे पॅकेज असेल या संदर्भात जेवढे काही प्रयत्न करता येईल तेवढे राज्यसरकारच्या वतीने करण्यात येतील.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

XX - 2

**पृ.शी.**: रायगड जिल्हयातील मुरुड तालुक्यातील श्री.इर्शाद हुसैन या शेतक-याला प्रकल्पग्रस्त म्हणून प्राप्त झालेला धनादेश न वटता दोन वेळा परत येणे.

**मु.शी.**: रायगड जिल्हयातील मुरुड तालुक्यातील श्री.इर्शाद हुसैन या शेतक-याला प्रकल्पग्रस्त म्हणून प्राप्त झालेला धनादेश न वटता दोन वेळा परत येणे याबाबत सर्वश्री.विनोद तावडे,नितीन गडकरी,मधुकर चव्हाण,रामनाथ मोते व संजय केळकर वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.विनोद तावडे,नितीन गडकरी,मधुकर चव्हाण,रामनाथ मोते व संजय केळकर यांनी "रायगड जिल्हयातील मुरुड तालुक्यातील श्री.इर्शाद हुसैन या शेतक-याला प्रकल्पग्रस्त म्हणून प्राप्त झालेला धनादेश न वटता दोन वेळा परत येणे." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

( प्रश्नोत्तरे झाली नाहीत.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: चंद्रपूर जिल्हयातील खाजगी व शासकीय आश्रम शाळातील विद्यार्थ्यांना मिळत असलेला निकृष्ट आहार.

**मु.शी.**: चंद्रपूर जिल्हयातील खाजगी व शासकीय आश्रम शाळातील विद्यार्थ्यांना मिळत असलेला निकृष्ट आहार याबाबत सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रविशेठ पाटील( आदिवासी विकास राज्यमंत्री ): अध्यक्ष महोदय,सन्माननीय सदस्य सर्वश्री.व्ही.यू.डायगव्हाणे,बी.टी.देशमुख,वसंतराव खोटरे विधानपरिषद सदस्य यांनी "चंद्रपूर जिल्हयातील खाजगी व शासकीय आश्रम शाळातील विद्यार्थ्यांना मिळत असलेला निकृष्ट आहार." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली हाती,तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मौजे ओवळा,जि.ठाणे येथील कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने वादग्रस्त क्षेत्रात केलेले उत्खनन.

**मु.शी.**: मौजे ओवळा,जि.ठाणे येथील कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने वादग्रस्त क्षेत्रात केलेले उत्खनन याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर नितीन गडकरी,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी,संजय केळकर यांनी " मौजे ओवळा,जि.ठाणे येथील कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने वादग्रस्त क्षेत्रात केलेले उत्खनन" विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

XX इ 5

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने अवैध मार्गाने अतिक्रमण करुन या खनिज पट्टयामध्ये उत्खनन केलेले आहे. यासंदर्भात दिनांक 30 एप्रिल,2005 रोजी सदर कंपनीला नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यानुसार दंड वसूल करण्यासंबंधी काय कारवाई केली ? आणि उर्वरित त्या जमिनीवर अतिक्रमण करुन त्यांनी जे खनिज काढले त्यासाठी जी स्फोटके वापरली ती कोठून आणली यासंबंधी पोलीस खात्यातर्फे आपण तपास करणार आहात का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सदर तक्रार खरी आहे. सदर खनिज कंपनीने मंजूर खनिज पट्टयाच्या बाहेर जाऊन बेकायदेशीरपणे उत्खनन केलेले आहे, यासंदर्भात दंडात्मक कारवाई केलेली आहे. यामध्ये त्यांनी रॉयल्टी देखील भरलेली आहे. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशनला देखील यासंदर्भातील तक्रार केली गेली होती.

श्री.पांडुरंग फुंडकर : सदर कंपनीने एकूण दंडाच्या तीन पट दंड भरावयाला पाहिजे होता सदर कंपनीला किती दंड करण्यात आला व त्यापैकी किती दंड वसूल करण्यात आला ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : नियमानुसार जेवढा दंड आकारावयास पाहिजे होता तेवढा दंड शासनाने सदर कंपनीला आकरलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाने सदर कंपनीला तीन पटीने दंड आकारला का ? सदर कंपनीने या खनिज पट्टयातून जवळपास 42,000 ब्रॉझ खनिज काढलेले आहे. बाजार भावाने याचे मूल्य काढल्यानंतर त्याच्या तीनपटीने दंड त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल का ? आतापर्यंत किती दंड वसूल करण्यात आला ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आता माझ्याकडे यासंदर्भातील आकडे उपलब्ध नाहीत परंतु यासंदर्भात निश्चितपणे सर्व नियमानुसार कारवाई करण्यात आलेली आहे. स्फोटकांबाबतच्या कारवाईबाबत बोलावयाचे झाले तर दिनांक 01 मे,2004 रोजी तेथे याप्रकरणी दोन जणांना अटक झ ाालेली आहे आणि न्यायालयामध्ये यासंबंधी दोषारोप पत्र देखील दाखल करण्यात आलेले आहे.

-------





**नियम 93 अन्वयेच्या निवेदनासंबंधी**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, नियम 93 अन्वये निवेदनाच्या संदर्भात मी कालही सभागृहामध्ये उल्लेख केला होता. मी दिनांक 20 जुलै,2007 रोजी एक नियम 93 अन्वयेची सूचना दिली असून आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असूनही यासंदर्भात शासनाकडून निवेदन आलेले नाही.

**उपसभापती** : सदर निवेदनाचे उत्तर आज सभागृह संपण्याच्या आत शासनाकडून करण्यात यावे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**नियम 93 च्या निवेदन क्रमांक 10 संबंधी**

**उपसभापती** : आजच्या नियम 93 च्या निवेदनामध्ये अनुक्रमांक 10 -" शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान धोरणानुसार सिडकोने वाशी रेल्वे स्टेशनजवळ तयार केलेले इंटरनॅशनल इन्फोटेक पार्क" यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता यांनी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात आहे, परंतु संबंधित माननीय मंत्रिमहोदय आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे आता यापुढील निवेदन घेण्यात येईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**पृ.शी.**: मॅग्नेशियम कार्बोनेट हा पदार्थ कोणत्याही अन्न पदार्थात वापरावयाची परवानगी नसतांना गुटख्यामध्ये त्याचा सुरु असलेला सर्रास वापर.

**मु.शी.**: मॅग्नेशियम कार्बोनेट हा पदार्थ कोणत्याही अन्न पदार्थात वापरावयाची परवानगी नसतांना गुटख्यामध्ये त्याचा सुरु असलेला सर्रास वापर याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाबा सिद्दीकी ( अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री ) अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर व इतर यांनी "मॅग्नेशियम कार्बोनेट हा पदार्थ कोणत्याही अन्न पदार्थात वापरावयाची परवानगी नसतांना गुटख्यामध्ये त्याचा सुरु असलेला सर्रास वापर" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली हाती,तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

XX - 9



JPK/ MAP/ SBT प्रथम श्री.शिगम एम. ........ 14:00

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अन्न व औषध प्रशासनाने या गुटख्याचे 500 नमुने तपासणीकरिता नेले असता त्यातील 442 नमून्यांमध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट आढळून आले. यावरुन आपल्याला सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात येईल. मगाशी चर्चेच्यावेळी मी सांगितले की, गुटखा

विक्री करणा-यांवर आपण कारवाई केली.  छोटया छोटया पानटपरीवाल्यांवर आपण कारवाई केली परंतु मूळ गुटखा उत्पादक जे आहेत, ज्यांनी शासनाचा मोठया प्रमाणावर सेल्स टॅक्स,इन्कम टॅक्स बुडविला. अशा किती उत्पादकांवर आपण आतापर्यंत कारवाई केली ?

श्री.बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, 137 लोगों के खिलाफ प्रासीक्यूशन किया गया है. विभाग को हिदायत दी गई है कि प्रोपराईटर के खिलाफ भी एफआईआर दर्ज की जाए. तीन एफआईआर दर्ज की गई है और यह कार्रवाई चालू है.

..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ 14:05

**पृ.शी.**: मुंबईतील तबेले वसई तालुक्यात हलविण्याबाबत

**मु.शी.**: मुंबईतील तबेले वसई तालुक्यात हलविण्याबाबत

श्री. संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वयेसूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( पशुसंवर्धन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. संजय केळकर यांनी "मुंबईतील तबेले वसई तालुक्यात हलविणे" याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे. )

------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबईतील तबेले मुंबईबाहेर हलवावेत यासाठी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. वेळोवळी यावर सुनावणी होऊन तबेल्यांपासून होणारे प्रदुषण टाळण्यासाठी शासनाने योग्य ती कार्यवाही करावे असे आदेश दिले होते. सदर रिट याचिका 14 मार्च 2007 रोजी पुन्हा सुनावणीस आली असता उच्च न्यायालयाने आयुक्त,मुंबई महानगरपालिका, प्रधान सचिव(पदुम) तसेच प्रधान सचिव नगरविकास यांची संयुक्त बैठक बोलावून प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी दाखल केलेल्या अहवालाच्या अंमलबजावणीबाबत तसेच संबंधित अधिनियमाच्या तरतुदी लागू करण्यासंदर्भात निदेश दिले होते. असे असताना आणि मा. श्री. शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी असे आदेश दिले होते की, हे तबेले मुंबईबाहेर हलवा आणि जनावरांच्या संख्येत वाढ होणार नाही याची काळजी घ्या. तरीसुध्दा गेल्या 3 वर्षात हे जे खिळे विकले गेले ते कसे काय विकले गेले ? आरेचे चार हजार आणि मंत्रिमहोदयांचे एक हजार याप्रमाणे विकले गेले. रिट पिटीशन सुरु असताना आणि यावर कोर्टाचे निर्बंध असताना हे खिळे का विकले गेले ? अशा प्रकारे जनावरांची वाढ का केली ? शासनाचे आदेश का बदलले ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आरे वसाहतीमधील तबेलेधारक आहेत आणि तेथे जी जनावरे आहेत त्यांच्यापासून जे शेण मिळते त्यावर गोबरगॅस तयार करुन प्रदुषण कमी केले जाणार आहे. आरे वसाहतीबाहेरील तबेलेधारक आहेत त्यांना दापचरीमध्ये आणण्याचा प्रस्ताव होता. परंतु दापचरी खूप लांब असल्यामुळे वसई तालुक्यातील देवधर व तामण येथे हे तबेले हलविण्याचा ठोस निर्णय घेतलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबईतील तबेले बाहेर हलविण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. श्री. पवार साहेब मुख्यमंत्री असताना निर्णय झाला होता की आहेत ते तबेले बाहेर काढायचे आणि जनावरांच्या संख्येत वाढ होऊ द्यावयाची नाही. असे आदेश असताना ते बदलून पुन्हा नवीन लोकांना जनावरे बांधण्याकरिता का परवानगी देण्यात आली ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंबंधातील माहिती आता माझ्याकडे नाही. मी पटलावर ठेवतो.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, शासनाच्या या निर्णयामुळे तामण आणि त्या परिसरात प्रचंड विस्फोट झालेला आहे. त्या भागातील लोकांनी मोर्चे काढले आहेत. मी सुध्दा या मोर्चाचे नेतृत्व केले होते. ........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ...

कोर्टाने ठाणे जिल्हयामध्ये तबेले हलवा असे सांगितलेले नाही. मुंबईच्या बाहेर हलवा असे सांगितलेले आहे. ठाणे जिल्हा किंवा वसई तालुका हे डंपिंग ग्राऊंड करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे काय ? मध्यंतरी भटके कुत्रे वसईला सोडण्याचा निर्णय झाला होता. तबेले हलविण्यासाठी भूमिपुत्रांचा आणि शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध आहे. त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होणार आहे. 400 हेक्टर जमीन त्यांना द्यावी लागणार आहे. मिठागरे आहेत ती आताच उद्ध्वस्त होत आहेत. आजच यासंबंधात त्याभागातील लोकप्रतिनिधींची पालकमंत्र्यांसोबत बैठक झाली आणि संपूर्ण ठाणे जिल्हयाचा तबेले हलविण्यासाठी विरोध आहे. त्यामुळे शासनाची भूमिका महत्वाची आहे. माझा प्रश्न असा आहे की, शासन ठाणे जिल्हयातील या भागाला डंपिंग गाऊंड करणार आहे की योग्य तो न्याय देणार आहे ? शासनाने याबाबत निश्चित असे धोरण ठरविले नाही तर त्या भागात विस्फोट होण्याची शक्यता आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विरार आणि वसई भागाचा विकास आराखडा तयार केलेला आहे. कॅटल झोनसाठी सुमारे 465 हेक्टर जमीन आरक्षित केलेली आहे. या आरखडयास 9.2.07 रोजी मान्यता सुध्दा देण्यात आलेली आहे. बरेचसे तबेले स्थलांतरित झाले आहेत. सर्व तबेले एकत्रित केल्यास गोबरगॅसच्या माध्यमातून प्रदुषणाचा प्रश्न मिटविता येईल. दुसरी जागा आता शासनाकडे उपलब्ध नाही.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ 14:10

निवेदन क्रमांक-12..........

श्री.संजय केळकर : जे तबेले आहेत ते अधिकृत नाहीत. या तबेल्यांनी त्याठिकाणी उच्छाद मांडला आहे.

**उपसभापती** : ठाण्यामध्ये अधिकृत काय आहे? सगळेच अनधिकृत आहे.

श्री.संजय केळकर : या तबेल्यांनी उच्छाद मांडला आहे. सिडकोने डेअरी झोन जाहीर केला आहे. त्यासाठी ज्या अटी व शर्ती लागतात त्यामध्ये हा झोन बसत नाही. त्यामुळे शासनाने तेथे तबेले नेता कामा नयेत. त्यासंबंधीची भूमिका जाहीर होईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कॅटल झोन जाहीर केला असून 465 हेक्टर जमीन ताब्यात घेतली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तबेल्यांसाठी दुसरी कोणतीही जागा उपलब्ध नाही.

**उपसभापती** : मंत्रीमहोदय, मी कोर्टाचा आदर राखून सांगू इच्छितो. आपण कोर्टाचा उल्लेख केला आहे. म्हशींचे तबेले ठाणे जिल्हयातच हलवावेत हे कोर्टाने सांगितले. मागच्या वेळी आरे वसाहतीतील अनधिकृत वसाहती कल्याणला म्हणजे ठाणे जिल्हयात हलवाव्यात असे सांगितले. कोर्टाचे आदेश फक्त मुंबईतून उचलून ठाणे जिल्हयात हलविण्यात यावे असे आहेत का? ठाण्यामध्ये माणसे रहात नाहीत का? कोर्टाचे आदेश मी मान्य करतो. परंतु दरवेळी कोर्टाच्या आदेशाचा आधार घेतला जातो. या सगळ्या म्हशी नेऊन कोर्टात उभ्या करा आणि कोर्टाला विचारा की, या म्हशींचे काय करायचे?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 140 कि.मी.चा दापचरीचा परिसर आहे. त्यांना मुंबईच्या अगदी जवळ ठेवा असे म्हटले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : देवधर व कामण या गावांमध्ये कॅटल झोन जाहीर केला असून 465 हेक्टर जमीन ताब्यात घेतली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने दापचरी येथे खूप मोठा भूखंड ताब्यात घेतला असून तेथे कोट्यावधी रुपये खर्चून तबेल्यांसाठी शेड बांधल्या आहेत. ही घटना 1976-77 सालातील आहे. 1975 साली या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कै.शंकरराव चव्हाण होते, त्यांनी आणीबाणीच्या काळात असे जाहीर केले होते, याची माहिती मी सदनाला देऊ इच्छितो. मुंबईतील सगळे अनधिकृत तबेले सहा महिन्यात आम्ही येथून हटवू अशी घोषणा केली





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होती. त्या घोषणेचे खूप कौतूक झाले. आज 32 वर्षे उलटून गेली. दापचरी येथील जागा मोकळी पडून आहे. तेथे उंदीर व घुशींचे साम्राज्य निर्माण झाले आहे. एकही तबेला मुंबईतून हलवून दापचरी येथे नेला नाही. शासनाचे कोट्यावधी रुपये खर्च झाले. तबेले ठाण्यामध्ये हलवावेत असे सांगण्यापेक्षा दापचरी येथे का व्यवस्था केली जात नाही?

श्री.हसन मुश्रीफ : शासनाने हे तबेले दापचरी येथे हलवावेत असा प्रस्ताव उच्च न्यायालयाला दिला होता. परंतु उच्च न्यायालयात तबेलेधारकांनी तक्रार केली की, दापचरी हे अंतर दूर होते. त्यानुसार उच्च न्यायालयाने आदेश दिले म्हणून देवधर व कामण या गावांमध्ये कॅटल झोन जाहीर केला आहे.

श्री.दिवाकर रावते : दापचरी मुंबईपासून दूर आहे का? शासनाने कोर्टाला तसे का सांगितले नाही?

श्री.हसन मुश्रीफ : शासनाने तसे ॲफिडेव्हीट सुध्दा दिलेले आहे.

-----------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : शहापूर तालुक्यातील लिबर्टी ऑईल मिलचे दूषित पाणी भातसा नदीच्या पात्रात सोडल्यामुळे निर्माण होणारे प्रदूषण.

**मु. शी**. : शहापूर तालुक्यातील लिबर्टी ऑईल मिलचे दूषित पाणी भातसा नदीच्या पात्रात सोडल्यामुळे निर्माण होणारे प्रदूषण याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रविशेठ पाटील (पर्यावरण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी, यांनी "शहापूर तालुक्यातील लिबर्टी ऑईल मिलचे दूषित पाणी भातसा नदीच्या पात्रात सोडल्यामुळे निर्माण होणारे प्रदूषण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शहापूर तालुक्यातील सापगाव येथील लिबर्टी ऑईल मिलचे पाणी भातसा नदीत सोडल्यामुळे हजारो नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका धोका निर्माण झालेला आहे. लिबर्टी ऑईल मिलचे दूषितपाणी भातसा नदीच्या पात्रात सोडल्यामुळे या नदीच्या पाण्याचा उपयोग शहापूर, आसनगाव, खुटघर, कळंभे, बोरशेती, गोठेंघर, येरपोली, बामणे इत्यादी ग्रामपंचायतीना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असतो. या ठिकाणच्या लोकांना जे दुषित पाणी प्यावे लागते ते मी आपल्याला बघण्यासाठी पाठवितो. लिबर्टी ऑईल मिलचे दुषित पाणी भातसा नदीत सोडले जात असल्यामुळे हे दुषित पाणी 10-12 गांवाना प्यावे लागत आहे त्यामुळे या ठिकाणच्या लोकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. या कारखान्याला प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी भेट दिलेली असून हे पाणी दुषित असल्यामुळे लिबर्टी ऑईल मिल बंद करण्यात यावी यासंदर्भात कंपनीला नोटीस दिलेली आहे त्यामुळे दुषित पाणी भातसा नदीत सोडणा-या लिबर्टी ऑईल मिलवर आपण कारवाई करणार आहात काय?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, लिबर्टी ऑईल मिलमधून 100 घनमीटर प्रतिदिन एवढे सांडपाणी निघत असून कारखान्याने सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी त्रिस्तरीय सांडपणी प्रक्रिया यंत्रणा उभारलेली असून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा वापर कारखान्याच्या आवारात बागकाम व शेतीसाठी केला जातो. कारखान्याच्या सांडपाण्याची गुणवत्ता तपासणी मंडळातर्फे नियमितपणे केली जाते. गेल्या वर्षभरातील पृथ:करण अहवालावरुन सांडपाण्याची गुणवत्ता सर्वसाधारणे विहित मर्यादेत आढळून आलेली आहे. तसेच प्रक्रिया केलेले सांडपाणी पूर्णत: कारखान्याच्या आवारात वापरल्याचे आढळून आलेले आहे. आमच्याकडे या कंपनीचे जे पाणी आहे त्याचे सॅंपल दूषित आढळून आलेले नाही. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांची इच्छा असेल तर आपण प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन वस्तुस्थिती बघू.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी या कंपनीला भेट दिली असून त्यांना पाणी दुषित पाणी आढळून आले असल्यामुळे या कंपनीला कंपनी बंद करण्याची नोटीस दिलेली आहे. मी स्वत: या ठिकाणचे दुषित पाण्याचे सॅंपल आणलेले आहे. त्यामुळे आपण लिबर्टी ऑईल मिलवर तातडीने कारवाई करणार काय?

...2

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते तसेच सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर व सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी आपण स्वत: लिबर्टी ऑईल मिलमधून दूषित पाणी सोडले जाते का हे भेट देऊन तपासून घेऊ. या कंपनीतून दूषित पाणी सोडले जात असेल तर संबंधित कंपनीवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

-----------

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी त्यांची नियम 93 अन्वयेची सूचना प्रथम घेण्याची विनंती केली असल्यामुळे 14 नंबरवर असलेली नियम 93 अन्वयेची सूचना नंतर घेण्यात येईल आता सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांची क्र.15 ची नियम 93 अन्वयेची सूचना घेण्यात येईल.

---------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुण्यातील लक्ष्मी रोडवरील सोन्याच्या दुकानावर पडलेला दरोडा.

**मु. शी.** पुण्यातील लक्ष्मी रोडवरील सोन्याच्या दुकानावर पडलेला दरोडा याबाबत डॉ. नीलम गो-हे,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "पुण्यातील लक्ष्मी रोडवरील सोन्याच्या दुकानावर पडलेला दरोडा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रथमत: आपण माझी नियम 93 अन्वेयेची सूचना प्रथम चर्चेला घेतल्याबद्दल मी आपले आभार मानते.

दि. 23.7.2007 रोजी पुणे शहरातील नेहमीच वर्दळ असलेल्या लक्ष्मी रोडवरील प्रसिध्द अष्टेकर ज्वेलर्सच्या दुकानावर भरदिवसा दरोडा पडलेला असून त्यामध्ये सुमारे चार लाख किमतीचे सोन्या चांदीचे दागिने लुटण्यात आलेले असून पुणे शहरात दरोडेखोरांनी दरोड्यांची मालिकाच सुरु केलेली आहे. लक्ष्मी रोडवर वर्दळ नसते किंवा त्या ठिकाणी पोलीस स्टेशन नाही अशी स्थिती नाही. एक फूट जाडीची भिंत फोडून चोरी करण्यात आली असतांना या ठिकाणी दरोडा घालण्यात आला नसून चोरी झालेली आहे अशी माहिती उत्तरात देण्यात आलेली आहे त्यामुळे अशा प्रकारचे उत्तर देणे योग्य नाही. या ठिकाणी हा प्रकार दिवसा झालेला असतांना पोलीस काय झोपले होते काय? असे असतांनाही उत्तरात म्हटले आहे की, या ठिकाणी दरोडा पडला अशी वस्तुस्थिती नाही. ठाणे, डोंबिवली, कल्याण येथेही मोठया प्रमाणात चो-या आणि दरोडे पडत आहेत. अजूनसुध्दा चो-या दरोडे घालणा-यांना पोलीस अटक करु शकलेले नाही. तसेच कोथरुड येथील अंलकार पोलीस चौकीतील दूरध्वनी यंत्रणा गेल्या महिन्यापासून बंद पडलेली असून या ठिकाणची दूरध्वनी यंत्रणा सुरु नसेल तर ती आजच्या आज सुरु करण्यात येईल काय?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, तेथील दूरध्वनी यंत्रणा बंद होती हे खरे आहे. रस्त्याचे काम सुरु असताना दूरध्वनीची केबल तुटली होती त्यामुळे दूरध्वनी यंत्रणा बंद होती. परंतु आता तेथील दूरध्वनी यंत्रणा सुरु झालेली आहे. सदरचे दुकान दिनांक 22.7.2007 रोजी रात्रौ 9.30 ते दिनाक 24.7.2007 रोजी सकाळी 10.30 वा.पर्यंत बंद असताना घरफोडी झालेली आहे. सोमवारी दुकान बंद असते, मंगळवारी दुकान उघडल्यावर घरफोडी झाल्याचे मालकाच्या निदर्शनास आले. या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलीस तपास सुरु आहे. सोलापूर, पुणे आणि इत्यादी भांगातील आरोपिंचा रेकॉर्ड तपासण्यात येत आहे. या संदर्भात निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रात दरोडे पडत आहेत. दोन दिवसांपूर्वी अकोला शहरातील दापटी रोडवर जवळपास 40 लोकांनी तीन ज्वेलर्सची दुकाने लुटून जवळपास 25 ते 30 लाखांचा ऐवज पळविला. त्या 40 लोकांकडे शस्त्रास्त्रे होती. या घटनेचा निषधार्थ अकोला शहरात बंद पाळण्यात आला होता. त्याचप्रमाणे वाशिम जिल्हयामध्ये सुध्दा दरोडे पडलेले आहेत. तेथील ज्वलेर्सनी मोर्चा देखील काढला होता. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या प्रकरणात किती जणांना अटक करण्यात आली आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पुणे शहरापुरता प्रश्न असल्यामुळे माझ्याकडे फक्त पुणे जिल्ह्यातील आकडेवारी आहे. सन्माननीय सदस्यांनी अकोला आणि वाशिम जिल्ह्याची माहिती विचारलेली आहे. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. पुणे शहरात 7 जून अखेरपर्यंत एक दरोडा, तीन जबरी चोऱ्या आणि 16 घरफोडी झालेली आहे.

**उपसभापती** : मी सन्माननीय राज्यमंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, पुणे जिल्ह्यात फार मोठ्या प्रमाणावर दरोडे पडले ही वस्तुस्थिती आहे आणि अजूनही दरोड्याचे सत्र सुरु आहे. मी या संदर्भात एकच गोष्ट सांगू इच्छितो की, पुणे जिल्ह्यात ग्रामीण पोलीस- लोकल क्राईम ब्रँच कार्यरत आहे. या एलसीबीमध्ये गुन्हेगारी स्वरुपाच्या किती गुन्ह्यांची नोंद झालेली आहे, त्यातील किती गुन्ह्याचा तपास लागला, यातील किती केसेस सिव्हील म्हणून नोंदविण्यात आल्या आणि त्यापैकी किती केसे क्रिमिनल स्वरुपाच्या करुन त्याची वासलात लावण्यात आली. हा विभाग

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**..........

पूर्णपणे भ्रष्टाचाराने बरबरेटला आहे. कोणत्याही गुन्ह्याचा ते तपास करीत नाहीत. त्या शाखेतील काही पोलीस कर्मचारी  गुन्ह्याच्या तपासाचे काम सोडून जमिनीचे व्यवहार होतात त्याठिकाणी फिरत असतात आणि दोन पार्टीमधील एकाला तक्रार करायल सांगतात आणि पोलीस स्टेशनमध्ये पैसे घेऊन सेटलमेंट करतात. कोणत्या केसमध्ये कोणत्या अधिकाऱ्याने किती पैसे घेतले त्याची केस-टू-केस मी माहिती देऊ शकतो. खरे म्हणजे ही दिवाणी स्वरुपाची प्रकरणे आहेत. जर आपणास खरोखर न्याय द्यावयाचा असेल तर त्याठिक्राणी काम करणाऱ्या भ्रष्ट कर्मचाऱ्यांची तेथून बदली केली पाहिजे. पुणे येथील विषय निघाला म्हणून मी आपणास ही अतिरिक्त माहिती देत आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मांडलेला प्रश्न देखील महत्वाचा आहे. फार तपशीलात जायचे असेल तर प्रकरणनिहाय माहिती मी आपणास देईन. कोणत्या प्रकारच्या किती गुन्ह्याची नोंद झाली, यातील किती सिव्हील केसेस, किती क्रिमिनल करण्यात आल्या इत्यादीची माहिती मी आपणास देईन. कारण चोऱ्या करणारे चोरच आहेत परंतु खाकी वर्दीतील महाचोर आहेत. तेव्हा आपण गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. तेव्हा या संदर्भात काय कारवाई करण्यात आली त्याची माहिती मला किंवा सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना कळवावी.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**....

ही मी उदाहरणासहित माहिती देऊ शकतो. माझ्याकडे संपूर्ण माहिती आहे. म्हणूनच मी गांभीर्याने बोलत आहे. त्यामुळे आपण यासंदर्भात कारवाई करणार का ? हे माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्ट करावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, मी सांगितलेली माहिती पुणे ग्रामीणसंबंधीची आहे. नावासहित माहिती पाहिजे असेल तर तीही मी आपल्याला देतो. त्यामुळे यासंबंधी आपल्याकडून 8 दिवसांत खुलासा व्हावा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ठीक आहे.

--------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अल्ट्राटेक सिमेंट लि. व आवारपूर सिमेंट वर्क्स, चंद्रपूर सिमेंट कंपनीतील सिमेंटमध्ये राख मिसळून विकणे

**मु. शी.** : अल्ट्राटेक सिमेंट लि. व आवारपूर सिमेंट वर्क्स, चंद्रपूर सिमेंट कंपनीतील सिमेंटमध्ये राख मिसळून विकणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "अल्ट्राटेक सिमेंट लि. व आवारपूर सिमेंट वर्क्स, चंद्रपूर सिमेंट कंपनीतील सिमेंटमध्ये राख मिसळून विकणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदनातील शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, " अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या राज्यस्तरीय दक्षता पथकाने पॉवर स्टेशनमधून फ्लशॲशचे नमुने पंचासमक्ष घेतले आहेत. हे नमुने पृथःकरणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार असून त्या अहवालाच्या आधारे शासनस्तरावर योग्य निर्णय घेण्यात येणार आहे." माझा प्रश्न असा आहे की, हे नमुने केव्हा घेतले ? केव्हा पाठविले ? व त्याचा अहवाल किती दिवसांत येणार ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, गेल्या आठवडयात नमुने घेण्यात आले व ते 1-2 दिवसांमध्ये प्रयोगशाळेत पाठविण्यात येतील आणि त्याचा अहवाल किमान 15 दिवसांच्या आत द्यावा अशी विनंती करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मे.आल्ट्राटेक सिमेंट व आवारपूर सिमेंट वर्क्स, चंद्रपूर येथील कंपनीसंबंधी आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिली होती. हया कंपनी सिमेंटमध्ये राख मिसळून विकत होत्या. ज्या दिवशी या कंपनीतील सिमेंटचे नमुने घेण्यात आले, त्यावेळी प्रोडक्शन बंद करण्यात आले. परंतु या कंपनीने आपले सिमेंट संपूर्ण मुंबईमध्ये व नागपूरमध्ये विकलेले असल्यामुळे त्यांचे नमुने काढून पुन्हा एकदा शासन यासंबंधीची चौकशी करणार का ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, होय.

----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शशिकांत शितोळे, रा.सांगवी गांव (पिंपरी चिंचवड) पुणे यांच्यावर झालेल्या भीषण हल्लाच्या प्रकरणाची चौकशी सीआयडीकडे देणे

**मु. शी.** : शशिकांत शितोळे, रा.सांगवी गांव (पिंपरी चिंचवड) पुणे यांच्यावर झालेल्या भीषण हल्लाच्या प्रकरणाची चौकशी सीआयडीकडे देणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "शशिकांत शितोळे, रा.सांगवी गांव (पिंपरी चिंचवड) पुणे यांच्यावर झ ालेल्या भीषण हल्लाच्या प्रकरणाची चौकशी सीआयडीकडे देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदनाच्या लेखी उत्तराने समाधान झाले.

--------

..6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भिवापूर तालुक्यातील 30 ग्रामपंचायतीची विजेच्या थकित रक्कमेमुळे नळ पाणीपुरवठा योजना बंद करणे

**मु. शी.** : भिवापूर तालुक्यातील 30 ग्रामपंचायतीची विजेच्या थकित रक्कमेमुळे नळ पाणीपुरवठा योजना बंद करणे, याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे ( पाणीपुरवठा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "भिवापूर तालुक्यातील 30 ग्रामपंचायतीची विजेच्या थकित रक्कमेमुळे नळ पाणीपुरवठा योजना बंद करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नागपूर जिल्हयातील भिवापूर तालुक्यातील जवळपास 30 ग्रामपंचायतीची विजेच्या थकित रक्कमेमुळे नळ कनेक्शन बंद आहेत. त्यामुळे त्याठिकाणी लोकांना पिण्यास पाणी मिळत नाही. आज त्याठिकाणच्या लोकांना गढूळ पाणी प्यावे लागत आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, याबाबतीत आपण या 30 ग्रामपंचायतींना किमान येत्या डिसेंबर महिन्यांपर्यंत सवलत देऊन त्या ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा सुरु करणार का ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, भिवापूर तालुक्यातील 76 ग्रामपंचायतींनी पहिले बिल भरले नव्हते, त्यामुळे त्यांचे लायसन्स बंद केले. त्याठिकाणच्या 41 ग्रामपंचायतींनी 10 टक्के रक्कम भरुन योजना सुरु केली, परंतु या 30 ग्रामपंचायतींनी 10 टक्के रक्कम भरलेली नाही. त्यांचेकडे जवळपास 31 लाख रुपयांची थकित बिले आहेत. ही पूर्णपणे इंडिव्हीज्यूअल पाणी पुरवठयाची योजना असून ती ग्रामपंचायतीस हस्तांतरीतही केलेली होती. त्यामुळे याबाबतची जबाबदारी पूर्णपणे ग्रामपंचायतीची आहे. परंतु कधी कधी ग्रामपंचायतींना अशी अडचण येते, त्यामुळे किमान काही टक्केतरी रक्कम त्यांनी भरावयास पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींची आर्थिक अवस्था फार काही चांगली नसते. त्या तीस ग्रामपंचायतींनी 10 टक्के रक्कमेच्याऐजवी 5 टक्के रक्कम भरण्यास शासन सवलत देईल का ? त्या ग्रामपंचायतीस 5 टक्के रक्कम भरण्यास आम्ही सांगू. त्या ग्रामपंचायतींनी 5 टक्के रक्कम भरल्यास आपण त्या गावांचा पाणी पुरवठा पूर्ववत करणार का ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, त्यांनी विजेच्या बिलाची 100 टक्के रक्कम भरली पाहिजे. तसेच कनेक्शनसाठी 10 टक्के रक्कमही भरली पाहिजे.

-------

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर येथे हॉटपरी डॉटकॉम व डेम्स एन डिझायर्स या वेबसाईटव्दारा सुरु असलेला वेश्याव्यवसाय

**मु. शी.** : नागपूर येथे हॉटपरी डॉटकॉम व डेम्स एन डिझायर्स या वेबसाईटव्दारा सुरु असलेला वेश्याव्यवसाय याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी "नागपूर येथे हॉटपरी डॉटकॉम व डेम्स एन डिझायर्स या वेबसाईटव्दारा सुरु असलेला वेश्याव्यवसाय" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------------

..2............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, नागपूरला दिनांक 27/07/2007 रोजी www.hotpari.com व www.Damesn desires या दोन वेबसाईटवर छापा टाकला होता. त्यावेळी लक्षात आले की, संघटीत स्वरुपाचा वेश्याव्यवसाय चालू आहे. या घटनेत पोलिसांनीच सापळा रचला होता. पाच लाखांचा सौदा ठरला आणि त्यानंतर मॉडेल किंवा वेश्या सापडल्या. तीन आरोपी व तीन मुलींविरुध्द कलम 67 इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट 2000 व कलम 4,5 अनैतिक वाहतूक प्रतिबंधक कायदा आणि भा.दं.वि.कलम 109 प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. संघटित स्वरुपाची गुन्हेगारी असल्यामुळे व या प्रकरणी सूत्रधार असल्यामुळे कलम 120 (ब) व संघटित गुन्हेगारीसाठी मोक्का कायदा लावू शकू काय ?

सभापती महोदय, दिनांक 18/4/2007 रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती, श्रीमती रंजना देसाई व श्री.डी.बी.भोसले यांनी प्रेरणा विरुध्द महाराष्ट्र शासन, क्रिमिनल रिटपिटिशन क्रमांक 1694/2003 या केसमध्ये जे निकालपत्र दिले आहे त्याची प्रत सन्माननीय गृहमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांना मी दिली होती, आपल्याकडेही ती प्रत मी देते. यामध्ये चौदा कलमी कार्यक्रम सांगितला आहे. संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व्हिक्टिम ट्रॅफिकिंग रजिस्ट्री नावाचे सॉफ्टवेअर घेतले पाहिजे की ज्यामुळे पोलिसांना ट्रॅकिंग करणे सोपे होईल. दुसरी शिफारस अशी आहे की, डी.आय.जी.यांच्या अध्यक्षतेखाली ॲन्टी ट्रॅफिकिंग सेल निर्माण करणे आवश्यक आहे. या सर्व शिफारशींची अंमलबजावणी करण्यात येईल काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हे प्रकार गंभीर आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कोणती कलमे लावता येतील याबाबत अभ्यास करुन जर ती कलमे लावणे शक्य असेल तर निश्चितपणे लावण्यात येतील. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी न्यायलयाच्या निकालामधील शिफारशींबाबत जी सूचना केली आहे त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये एक व राज्यात इतरत्र 34 सायबर क्राईम सेल उघडण्यात आले आहेत. या सेलमार्फत उघडकीस आलेले गुन्हे नोंद झाले आहेत. त्यामुळे या गुन्हयांचा तपास करण्यास सायबर क्राईम सेल सक्षम आहे.

----------------

..3..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अंधेरी, मुंबई येथील चिनॉय व एलयुएमव्ही महाविद्यालयात निर्माण झालेला प्रवेशाचा प्रश्न

**मु. शी.** : अंधेरी, मुंबई येथील चिनॉय व एलयुएमव्ही महाविद्यालयात निर्माण झालेला प्रवेशाचा प्रश्न याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता यांनी "अंधेरी, मुंबई येथील चिनॉय व एलयुएमव्ही महाविद्यालयात निर्माण झालेला प्रवेशाचा प्रश्न" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------------

..4...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुंबई, अंधेरी (पूर्व) येथील चिनॉय महाविद्यालय व एल.यु.एम.व्ही. महाविद्यालयासंबंधी आम्ही महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 अन्वये सूचना दिली होती. महाविद्यालयांचे प्रवेश सुरु होऊन जवळपास एक महिन्यांचा कालावधी लोटला आहे. या महाविद्यालयाच्या संचालकांनी ही महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय घेतला आहे म्हणून तेथील प्रवेश बंद करण्यात आले होते. परिणामी त्या परिसरातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नाही म्हणून पालकांनी तक्रार केली आहे. उपसंचालकांनी केलेली विनंती मॅनेजमेंटने धुडकावून लावली आहे म्हणून प्रशासक नेमण्यात आला. परंतु, मॅनेजमेंटने त्याविरुध्द न्यायालयात केस दाखल केली आहे. शासनाने आपल्या निवेदनात सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे म्हटले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, हे बरोबर आहे. परंतु, त्या परिसरातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची जबाबदारी कोण घेणार आहे ? आतापर्यन्त प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली नाही. प्रशासक नेमून, रात्रं-दिवस काम करुन, प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे शासनाने जाहीर केले होते. परंतु, न्यायालयाने 'जैसे थे' परिस्थिती ठेवली आहे. प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याबाबत शासनाने कोणता विचार केला आहे ?

यानंतर श्री.गागरे..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, अंधेरी येथील चिनॉय व एम.व्ही.एल.यु. कनिष्ठ महाविद्यालये बंद करण्याची नोटीस या संस्थांनी उप संचालकांना दिली होती. उप संचालकांनी नियमानुसार ही कनिष्ठ महाविद्यालये बंद करता येतील असे कळविले आहे. या संस्थेने जागा विकून तेथे मॉल उभारण्याचे ठरविले आहे, अशी माहिती शासनाला मिळाली आहे. त्यामुळे तेथे 1400 विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न निर्माण होणार आहे. शासनाने या संस्थेवर प्रशासक का नेमू नये ? म्हणून कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. शासनाने प्रशासकाची नियुक्ती केल्यानंतर सदर संस्थेने उच्च न्यायालयात प्रशासक नियुक्तीस आव्हान दिलेले आहे. उच्च न्यायालयाने "जैसे थे" असा आदेश दिलेला आहे. उच्च न्यायालयाकडूनही प्रशासक कायम राहावा, यासाठी योग्य ती बाजू मांडण्यात येईल. दुसरी बाब म्हणजे ॲडव्होकेट जनरल व विधी खात्यातर्फे सल्ला घेऊन याबाबतच्या कायद्यात दुरुस्ती करता येईल का ? हे पाहिले जात आहे. कारण आज एक कॉलेज बंद केले जात आहे, उद्या दुसऱ्या संस्थेच्या जागेला जास्त किंमत मिळाली तर ते सुध्दा कॉलेज बंद करतील. शाळा महाविद्यालयाची परवानगी व बांधकाम केलेल्या जागेबाबत पुन्हा असे प्रकार घडू नयेत म्हणून योग्य तो निर्णय शासन घेणार आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, येथील 1400 विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे, त्यामुळे ताबडतोब ऑर्डीनन्स काढण्यात यावा, अशी मी मागणी करतो.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, शाळा महाविद्यालयातील प्रवेशासंबंधी वारंवार प्रश्न उपस्थित होत आहेत. ही संस्था अचानक कॉलेज बंद करीत आहे, कारण त्यांना तेथे मॉल उभा करावयाचा आहे, अशी माहिती मिळाली आहे. शाळा किंवा महाविद्यालयांना शिक्षणाच्या उद्देशासाठी शासनाने मान्यता दिल्यानंतर त्या जागेचे व्यावसायिकरण करण्याचे पर्याय त्यांच्यासमोर उपस्थित कसे राहू शकतात ? संबंधित शाळा-महाविद्यालयाची जमीन असल्यामुळे त्यांनी याबाबत निर्णय घ्यावा असे शासनाचे धोरण असेल तर ते बरोबर नाही.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल यांनी स्वत: उच्च न्यायालयात उपस्थित राहून या प्रकरणात बाजू मांडावी अशी सूचना शासनाने केलेली आहे. उच्च न्यायालयाची "जैसे थे" ऑर्डर रद्द झाल्यानंतर तेथे प्रशासक नेमावा हा एक भाग आहे. दुसरा भाग असा आहे की, ॲडव्होकेट जनरल व विधी खात्याला सांगून पुढील अधिवेशनात यावर प्रतिबंध घालण्यासाठी कायदा करता येईल का ? हे पाहिले जात आहे. सध्या या कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे प्रवेश दुसऱ्या कॉलेजमध्ये करण्यासाठी निश्चित स्वरुपाच्या सूचना देण्यात येतील. एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, अशी काळजी शासन घेईल. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत मी निवेदन करणार आहे, 11 वी वर्गास जादा तुकडी देण्यासाठी शासनाने आदेश काढलेले आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाने या संस्थेचे संचालक मंडळ आतापर्यंत बरखास्त का केले नाही ?

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, शासनाने प्रशासक नेमला आहे, मंत्री महोदयांनी आदेश दिले होते की, प्रशासकाने या संस्थेचा ताबा व चार्ज घ्यावा तसेच उर्वरित विद्यार्थ्यांचे प्रवेश चार दिवसात पूर्ण करुन घ्यावेत व  किती प्रवेश झालेले आहेत याचा रिपोर्ट द्यावा. परंतु प्रशासक चार दिवस त्या संस्थेमध्ये गेले नाहीत. या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलावले होते परंतु ते उपस्थित राहिले नाहीत. अशा मुजोर लोकांना काबूत आणण्यासाठी संचालक मंडळ बरखास्त करण्यात यावे. सध्या तेथे 800-900 मुले रांगेत उभी राहात आहेत. या मुलांच्या प्रवेशाबाबत तातडीने निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माध्यमिक शाळा संहितेमधील नियमाप्रमाणे अशा प्रकारच्या संस्थेवर प्रशासक नेमण्याची तरतूद केलेली आहे. वास्तविक पाहता विविध संस्थेच्या मालमत्तेबाबतचा कारभार असिस्टंट चॅरिटी कमिशनरकडे आहे. त्यांनी जमीन विक्रीसाठी नियमबाहय परवानगी दिलेली असेल तर त्यांची चौकशी करुन त्यांना निलंबित करण्यात येईल. 1400 विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल. या विद्यार्थ्यांना जवळच्या महाविद्यालयात प्रवेश देण्यात येईल व एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही.

यानंतर श्री.सुंबरे.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य : म्हणजे तुम्ही त्या कॉलेज प्रशासनाला मदत करीत आहात आणि या विद्यार्थ्यांना कॉलेज सोडण्यास सांगत आहात .... )

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, त्या विद्यार्थ्यांनी त्या कॉलेजमध्ये प्रवेशासाठी अर्ज केला आहे आणि आता तुम्ही त्यांना दुसरीकडे पाठविणार म्हणता म्हणजे तुम्ही त्यांना शाळेत पाठविणार का ?

**उपसभापती** : मला या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांना एक सूचना कराविशी वाटते, अर्थात त्यांनी ती मान्य केली तर बरे होईल. सन्माननीय सदस्यांनाही मी सांगू इच्छितो की, आपण तेथे प्रशासकाची मागणी केली आणि त्याप्रमाणे शासनाने ती मान्य करून प्रशासकाची नियुक्ती देखील केली. पण तो प्रशासक तेथे रूजू झालेला नाही. त्यामुळे हे विद्यार्थी कॉलेज बाहेर उभे राहून ताटकळत आहेत. आता माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, त्या विद्यार्थ्यांची सोय दुसऱ्या कॉलेजमध्ये करतो. तेव्हा आता या विद्यार्थ्यांचे निश्चितपणे काय करायचे ते आपण येथे ठरवू या. शासनाने, मंत्र्यांनी आदेश देऊनही प्रशासक जर तेथे गेला नसेल तर माझी सजेशन राहील की,... कारण लोकप्रतिनिधी म्हणून येथे हे सगळे बोलत आहेत, राज्यमंत्री म्हणून आपणही शासनाच्या वतीने येथे उत्तर देत आहात. तेव्हा मंगळवारी किंवा बुधवारी माननीय राज्यमंत्र्यांना शक्य असल्यास, त्यांनी स्वत: तसेच मी स्वत: जाऊन त्या कॉलेजला भेट द्यावी आणि तेथे प्रशासक आले की नाही ते पाहूया., तसेच तेथील एकूण परिस्थिती काय आहे तेही पाहू ...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कोर्टाने जैसे थे अशा ऑर्डर्स दिल्यामुळे प्रशासक तेथे जातच नाहीत.

**उपसभापती** : कोर्टाने नेमक्या काय ऑर्डर्स दिल्या आहेत ? ...

श्री. हसन मुश्रीफ : सभापी महोदय, आम्ही तेथे प्रशासक नेमल्यावर कॉलेज प्रशासन कोर्टामध्ये गेले आणि कोर्टाने स्टेटस्को दिला, म्हणजेच 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्यास सांगितले.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांनी तेथे प्रशासक नेमल्यानंतर ते लोक कोर्टात गेले आणि कोर्टाने 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्यास सांगितले. 'जैसे थे' याचा अर्थ काय आहे ? म्हणजे प्रशासक नेमण्यापूर्वीची परिस्थिती ठेवायची की, प्रशासक नेमल्यानंतरची स्थिती ठेवायची ? कोर्टाच्या आदेशाचे इंटरप्रिटेशन कोणी व कसे करायचे ?

...... 3एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मला याबाबत जास्त काही माहिती नाही. पण कोर्टाने "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत इतकेच मला माहिती आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आपण प्रशासक नेमल्यावर ते लोक कोर्टात गेले आणि कोर्टाने 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा आदेश दिला आहे पण तो आदेश नेमका कोणत्या परिस्थितीला लागू आहे हे समजून घेण्यासाठी कोर्टाच्या आदेशाची प्रत मागवून घ्यायला पाहिजे होती. परंतु शासन याबाबत उदासीन आहे. कोर्टाने नेमका कशाच्या बाबतीत स्टेटस्को दिलेला आहे हेही शासनाला माहिती नाही आणि शासन त्याबाबत माहिती घेऊ इच्छित नाही असे वाटते. तेथील मुलांनी याबाबत सांगितले की, कोर्टाने प्रवेश पक्रियेला स्टे दिलेला आहे. 340 पैकी 107 मुलांना तेथे प्रवेश दिलेला आहे आणि म्हणूनच त्या प्रवेश प्रक्रियेला कोर्टाने स्टे दिलेला आहे असे कॉलेजही मानते. खरे तर प्रशासकाने तेथे येऊन ही प्रक्रिया सुरू करू नये म्हणूनच कॉलेजचे लोक कोर्टात गेले होते आणि त्याबद्दल शासनाला काहीही माहिती नाही.

**उपसभापती** : मला वाटते या संदर्भात मंगळवारी आपण सारे माझ्या दालनात बसू, त्यावेळी संबंधित सर्वांना बोलावून घ्यावे, वकील वगैरेंनाही बोलाविण्यात यावे ...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कॉलेजचे लोक कोर्टामध्ये गेले आणि पहिल्या दिवशी जेव्हा कोर्टात ही केस होती तेव्हा सरकार तर्फे नेमण्यात आलेले आपले वकील कोर्टात हजरच नव्हते त्यामुळे हे सारे घडले आहे आणि कोर्टाने एक्स पार्टी निकाल दिलेला आहे. खरे तर सरकारची ही उदासिनताच आहे, हे सारे जाणीवपूर्वक घडलेले आहे ...

**उपसभापती** : मग कोर्टामध्ये आपला वकील अनुपस्थित का होता ? हेही पहावे लागेल. पण आपण मी मघाशी म्हटल्याप्रमाणे राज्यमंत्र्यांसमवेत बुधवारी त्या कॉलेजमध्ये जाऊ आणि तेथे जी काही परिस्थिती असेल ती तपासून पाहू. तसेच ज्या वकिलांकडे ही ड्युटी सरकारने सोपविली होती ते कोर्टात त्या तारखेच्या वेळी गैरहजर का राहिले त्याबद्दल देखील आपण त्यांचा खुलासा मागवून घ्यावा आणि तो समाधानकारक नसेल तर त्याबद्दल त्यांच्यावरही कारवाई करावी. कारण शासनाने त्यांच्यावर विश्वास ठेवूनच ही जबाबदारी सोपविलेली असते. असे असताना अशा प्रकारे जर हातमिळवणी करून कोर्टात गैरहजर राहत असतील तर ते बरोबर नाही आणि म्हणूनच या बाबत संबंधित आपल्या वकिलावर देखील आपण उचित ती कारवाई करावी. तसेच

...... 3एफ 3 ...



KBS/MAP/SBT/KGS. श्री. गागरे नंतर --- 14:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

बुधवारी सकाळी 11 वाजता माननीय राज्यमंत्र्यांसमवेत मी स्वत: त्या कॉलेजला भेट देईन. त्यासाठी माननीय राज्यमंत्र्यांची तयारी आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझी हरकत नाही. मात्र त्या दिवशी मंत्रिमंडळाची बैठक असेल तर सकाळी येणे जमणार नाही, तरी आपण दुपारी 2.00 वाजताची वेळ ठरवावी.

**उपसभापती** : ते आपल्या सोयीनुसार आपण करू शकतो.

श्री. हसन मुश्रीफ : ठीक आहे. बुधवारी, दुपारी 2.00 वाजता मी आपणा समवेत तेथे येण्यास तयार आहे.

( यानंतर श्री. सरफरे ....3जी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये निवेदन क्रमांक 21 बाबत**

**उपसभापती** : निवेदन क्रमांक 21...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, संबंधित मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे हे निवेदन नंतर चर्चेकरिता घेण्यात यावे.

**उपसभापती** : ठीक आहे.

---

**नियम 93 अन्वये निवेदन क्रमांक 22 बाबत**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---

**नियम 93 अन्वये निवेदन क्रमांक 23 बाबत**

**उपसभापती** : निवेदन क्रमांक 23...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, संबंधित महिला व बाल विकास मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे हे निवेदन नंतर चर्चेकरिता घेण्यात यावे.

**उपसभापती** : ठीक आहे. माननीय विरोधी पक्षनेते यांना औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे, त्यांनी तो उपस्थित करावा.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याच्या मुद्दयासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये आम्ही 19 जुलै 2007 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 29327 विचारला होता. त्यावेळी झालेल्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार माननीय गृह राज्यमंत्र्यांनी अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली. सभापती महोदय, या राज्याचे पोलीस महासंचालक डॉ. पसरीचा यांनी खरेदी केलेल्या संपत्तीसंबंधी प्रश्न विचारण्यात आला होता. त्यासंबंधी पटलावर ठेवण्यात आलेली माहिती मी पूर्णपणे वाचली आहे. या संदर्भात नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने दिलेल्या अहवालावरुन लक्षात येते की, यामध्ये कोणत्याही प्रकारे डॉ. पसरीचा हे जबाबदार नाहीत किंवा त्यामध्ये ते दोषी नाहीत. अशाप्रकारचा हा अहवाल आहे. यामध्ये असा प्रश्न निर्माण होतो की, जर डॉ. पसरीचा हे दोषी नाहीत. तर मग याठिकाणी उपलब्ध झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, सिक्रेट ॲक्टचा भंग करुन ही माहिती कुणी मिळविली? सभापती महोदय, या राज्याच्या पोलीस दलामध्ये असलेल्या गटबाजीबाबत या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली आहे.आणि ती गटबाजी असल्याचे सिध्द झाले आहे. पोलीस महासंचालक डॉ. पसरीचा हे या गटबाजीचे शिकार झाले नाहीत ना ? असे आम्हाला वाटायला लागले आहे. तेव्हा या सिक्रेट ॲक्टचा भंग ज्यांनी केला त्यांची सी.आय.डी.मार्फत चौकशी झाली पाहिजे. कारण या राज्याची बदनामी करण्याचा कट या राज्यामध्ये शिजला व त्या माध्यमातून पोलीस महासंचालकांची बदनामी करण्याचा प्रयत्न झाला आहे. तेव्हा या प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी करुन संबंधितांवर आपण कारवाई करणार काय?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री, माननय उप मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे डॉ. पसरीचा यांच्या मालमत्तेसंबंधीची चौकशी मुख्य सचिवांमार्फत जाहीर करण्यात आली. आता माझ्याकडे उपलब्ध झालेल्या माहितीनुसार मुख्य सचिवांच्या दालनामध्ये त्या संबंधीची सर्व कागदपत्रे देण्यात आली. जर ही कागदपत्रे गुप्त असतील तर त्यांची गुप्तता न पाळता ती सर्व कागदपत्रे बाहेर आली याला जबाबदार कोण आहे? नेहमी चोर सोडून संन्याशाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते...

पकडले जाते. यामध्ये संपूर्ण जबाबदारी ही मुख्य सचिवांची असली पाहिजे. या सदनामध्ये मुख्य सचिवांमार्फत चौकशी जाहीर करण्यात आली. आणि त्यामुळे त्यांच्याकडे असलेली कागदपत्रे बाहेर गेली यामध्ये असलेले षडयंत्र आपण शोधून काढले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये गुन्हेगारीच्या अनेक घटना घडत असतात. पोलीस दलामध्ये सुध्दा मारामाऱ्या होत असतात व लोक त्यामध्ये शिकार होत असतात. डॉ. पसरीचा यांच्या चौकशीच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे गुप्ततेचा भंग होऊन बाहेर आली असल्यामुळे त्याबाबत मुख्य सचिवांची पूर्ण जबाबदारी आहे.

( यानंतर श्री. किल्लेदार )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू...

खाली जरी कोणी कागद फोडले तरी शेवटी वरिष्ठांचीच जबाबदारी आहे. मुख्य सचिव दोन महिन्यापूर्वीच निवृत्त झालेले आहेत. मुख्यसचिवांची चौकशी सीआयडी कसे काय करू शकतील ? त्या दर्जाच्या अधिकाऱ्यांनीच केली पाहिजे. गुप्ततेचा हा गंभीर विषय आहे. आपण आताच प्रतिबंध केला नाही तर मंत्रालयामध्ये कोणीही येऊन माहिती घेऊन जाईल आणि काहीही होईल. उद्या मंत्रिमंडळात झालेल्या कामकाजाचेही कागद बाहेर जातील. मुख्य सचिवांची चौकशी करावाची असेल तर ती कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून करणार आहात ?

श्री.पांडुरंग फुंडकर : यामध्ये गुप्ततेचा भंग झालेला आहे. त्याबाबतची चौकशी कोणत्या अधिकाऱ्यांकडून करावी ? मी सीआयडी चौकशीची मागणी केलेली आहे.

(उपमुख्यमंत्री सभागृहात प्रवेश करतात.)

श्री.दिवाकर रावते : पोलीस महासंचालक श्री.पसरीचा यांच्या संदर्भातील विषय निघालेला आहे. श्री.पसरीच्या प्रकरणाच्या संदर्भातील चौकशी मुख्य सचिवांकडे देण्यात येईल असे सांगितलेले आहे. कागदपत्रांची गुप्तता राखली पाहिजे, परंतु ते कागद बाहेर गेले. या संबंधातील अहवाल पटलावर आलेला आहे. गुप्त कागद बाहेर कसे आले ? गुप्तता पाळण्याची जबाबदारी कोणाची आहे ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सिक्रेट ॲक्टचा भंग झालेला आहे. श्री.पसरीचा यांनी जी मालमत्ता खरेदी केली, याबाबतचे अनेक आरोप झाले. ती माहिती बाहेर कशी आली ? त्यांनी विभागाची परवानगी घेतली की नाही ? त्यांनी किती ठिकाणी फ्लॅटचे बुकींग केले ? ही माहिती कशी बाहेर आली ? अधिकाऱ्यांची सिक्रेट माहिती बाहेर आलेली आहे त्यामुळे सिक्रेट ॲक्टचा भंग झालेला आहे. म्हणून पोलीस महासंचालक, श्री.पसरीचा यांची बदनामी करून राज्याची बदनामी करण्याचा कट काही लोकांनी केलेला आहे. पोलिसांमध्ये देखील आता गटबाजी सुरू झालेली आहे. त्याचा हे श्री.पसरीचा बळी पडलेले नाहीत ना ? असा आमच्यासमोर प्रश्न आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी सीआयडीमार्फत करावी, अशी औचित्याच्या मद्याद्वारे मागणी केलेली आहे, ती मागणी आपण मान्य करावी अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माध्यमांना सिक्रेट माहिती दिल्यामुळे त्यांनी ती दाखविली. त्या अनुषंगाने मागील अधिवेशनामध्ये सविस्तरपणाने चर्चाही झालेली होती. त्यावेळेस मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून याची चौकशी करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. त्याप्रमाणे चौकशी केली. त्या चौकशीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवलेला आहे. तरी देखील सन्माननीय सदस्य आणि विरोधी पक्ष नेते श्री.फुंडकर साहेबांनी जी माहिती बंद लिफाफ्यामध्ये मुख्य सचिवांची परवानगी घेऊनच काही प्रसंग निर्माण झाला तर ती दिली जाते. लिफाफ्यामध्ये दिलेली माहिती बाहेर गेली, ही शंका येथे व्यक्त करण्यात आलेली आहे. नेमकी ही माहिती कोठून गेली ? असे पोलीस दलामध्ये होऊ नये, दल एकसंध असले पाहिजे, यातील मतभेद चव्हाट्यावर येऊन एका युनिफॉर्म सर्व्हीसचे नुकसान होते, शूरपणाने ही गटबाजी संपुष्टात आणण्याचा प्रयत्न मी सुरू केलेला आहे. काही प्रमाणात त्यामध्ये यश आले. पण अधुनमधून काही प्रसंग घडतात, त्या ठिकाणी धक्काही देण्याची आवश्यकता आहे. म्हणून ही गृह विभागाकडे दिलेली कागदपत्रे गुप्त रहाण्याची आवश्यकता होती, ती माहिती कोठून गेली त्याबाबत सीआयडीमार्फत...एका वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी केली जाईल.

---

**<u>नियम 93 च्या निवेदनासंबंधी</u>**

**उपसभापती** : यानंतर 93 ची दोन निवेदने आहेत ती संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय उपस्थित झाल्यानंतर चर्चेला घेण्यात येतील.

--

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. बाल हक्काच्या प्रश्नावर महाराष्ट्र शासनाने, जी यशदा प्रशिक्षण संस्था आहे त्यांनी गेल्या महिन्यामध्ये एक बैठक घेतली होती आणि त्याला विधानसभा आणि विधान परिषदेच्या काही सन्माननीय आमदारांना निमंत्रित केले होते आणि त्यात अशी अपेक्षा होती की, या बाल कामगारांच्या हक्काची अंमलबजावणी व्हावी, बाल हक्क आयोग महाराष्ट्रामध्ये तयार व्हावा आणि बाल हक्काच्या प्रश्नासाठी कृती आराखडा तयार करण्यात यावा. खासकरुन अनेक वेळा धाड टाकून बाल कामगार पकडले जातात परंतु त्यांना सोडल्यानंतर ते परत राज्यामध्ये येत असतात. या बाल कामगारांच्या प्रश्नावर जो जी.आर. आहे तो चुकीच्या स्वरुपात आहे. फक्त मुंबई शहरापुरता तो जी.आर. आहे. त्या जी.आर. ची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता करावयास हवी होती. चाईल्ड गाईड कंव्हेंशन, ज्याबाबत राज्य सरकारने आणि भारत सरकारने बांधिलकी दाखविलेली आहे, हा संपूर्ण विषय कामगार विभाग, महिला व बालविकास विभाग आणि गृह विभाग यांच्याशी संबंधित असल्यामुळे बाल हक्क आयोग निर्माण करुन बालकांच्या प्रश्नावर कृती आराखडा तयार करण्यात यावा या गोष्टीसाठी दोन्ही सदनातील अनेक सन्माननीय आमदार त्या बैठकीला उपस्थित होते. कामगार विभागाचे सचिव उपस्थित होते तसेच महिला व बालविकास व संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील उपस्थित होते. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत तसेच सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे असे अनेक आमदार त्या बैठकीला उपस्थित होते. दुर्दैवाने या अधिवेशनामध्ये शासनाने बाल हक्काच्या प्रश्नावर काही पावले उचलली आहेत काय याबाबत एका शब्दानेही स्पष्ट केलेले नाही. कोणत्याही मुद्याची अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे या औचित्याच्या मुद्याव्दारे मी लक्ष वेधत आहे. बाल हक्क आयोग स्थापन करणे, आणि बालकांच्या हक्काच्या अंमलबजावणीसठी केलेला कृती आराखडा प्रत्यक्षात आणणे याची बांधिलकी सरकारने जाहीर करावी याकडे मी शासनाचे लक्ष वेधत आहे.

---

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपल्या राज्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये आज माध्यमिक शाळांची संख्या 500 ते 600 झालेली आहे. परंतु बऱ्याच जिल्ह्यामध्ये शिक्षण अधिकारी नसतात. शिक्षण अधिकारी जर सेवानिवृत्त झाले तर लवकर शिक्षण

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे.....

अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात नाही. त्यामुळे ज्या काही चुका होतात त्यातील एक गंभीर बाब मी निदर्शनास आणून देत आहे. शिक्षण अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद जालना यांनी दिनांक 5.7.2007 रोजी 11 जुलै, 2007 हा दिवस जागतिक लोकसंख्या वाढ दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले व सर्व विद्यार्थ्यांना घोषवाक्य देणे, विद्यार्थ्यांच्या हातामध्ये फलक तयार करुन सोबत आणण्याबाबत सर्व विद्यार्थ्यांना सूचना देणे, त्या घोषवाक्यापैकी बाराव्या क्रमांकावर असलेले "लोकसंख्येला घाला आळा, कुटुंब नियोजन सर्वांनी टाळा". असे घोषवाक्य राष्ट्रीय धोरणा विरुध्द असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बालमनावर विपरित परिणाम होण्याची शक्यता या घोषवाक्यामुळे निर्माण झालेली आहे. तरी संबंधित शिक्षण अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी सूचना मी या औचित्याच्या मुद्याव्दारे मांडत आहे.

---

**उपसभापती** : यानंतर नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 23 घेण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, निवेदन क्रमांक 23 हे माझ्या नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात आहे तत्पूर्वी माननीय महिला व बालविकास मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील सभागृहात आलेले आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बाल हक्क आयोगाच्या संदर्भात सांगितले. त्या सभेला मी उपस्थित होतो तसेच आपणही उपस्थित होता. त्याबाबतही माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यात जून महिन्याच्या अखेरीस 1106 बालके कुपोषित असल्याचे उघडकीस येणे

**मु. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यात जून महिन्याच्या अखेरीस 1106 बालके कुपोषित असल्याचे उघडकीस येणे याबाबत श्री अरविंद सावंत, डॉ. दीपक सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. परशुराम उपरकर व ॲड अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हर्षवर्धन पाटील ( महिला व बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत, डॉ. दीपक सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. परशुराम उपरकर व ॲड. अनिल परब यांनी "चंद्रपूर जिल्ह्यात जून महिन्याच्या अखेरीस 1106 बालके कुपोषित असल्याचे उघडकीस येणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या नियम 93 च्या सूचनेमध्ये मी पहिला प्रश्न कुपोषणावर नियंत्रण राहावे यासाठी संबंधित उपकेंद्रावरील वैद्यकीय अधिकाऱ्याकडून नियमित तपासणी करण्यात येत असतानाही 1106 कुपोषित बालके मृत्यूशी झूंज देत असणे याबद्दल विचारलेला आहे. दुर्दैवाने मागच्या वेळी जे निवेदन छापले होते तसेच निवेदन आताही छापून आलेले आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

यामध्ये नवीन काही नाही. 1106 मुले कुपोषित आहेत ही वस्तुस्थिती आहे काय ? असल्यास त्यांची श्रेणी काय आहे व त्याबाबतीत शासन कोणती उपाययोजना करीत आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील (महिला व बालविकास मंत्री) : चंद्रपूर जिल्हयातील कुपोषित बालकांची संख्या जवळपास 1203 इतकी आहे. 1 ते 4 श्रेणीनिहाय माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. ती मी पटलावर ठेवीन. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे कुपोषणाच्या संदर्भात सातत्याने उपाययोजना करुन देखील कुपोषित बालकांची संख्या काही ठिकाणी वाढत आहे ही वस्तुस्थिती आहे. या बाबतीत नियंत्रण ठेवणे, विशेषत: नोंदणी करणे, वजन आणि उपचार करणे याबाबतीत निश्चितपणे उपाययोजना केलेल्या आहेत. या उपाययोजना प्रभावीपणे अमलात आणल्या जातील.

सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी बाल हक्क आयोगाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. मी सांगू इच्छितो की, या बाबतीत मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला असून बाल हक्क आयोगाची स्थापना त्वरित करण्यात येईल. या बाल हक्क आयोगाच्या स्थापने बरोबरच प्रायोगिक तत्वावर बाल न्यायालय सुरु करण्याच्या बाबतीत कार्यवाही सुरु करण्यात येईल.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: इयत्ता 11वी प्रवेशाच्या संदर्भात अतिरिक्त तुकडया मंजूर करणे

**मु.शी.**: इयत्ता 11वी प्रवेशाच्या संदर्भात अतिरिक्त तुकडया मंजूर करण्यासंबंधी माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

राज्यात यावर्षी शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल लागल्यावर इयत्ता 11वी प्रवेशाच्या संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेच्या वेळी इयत्ता 11वी प्रवेशापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही असे आश्वासित करण्यात आले आहे. विद्यार्थी प्रवेशाची समस्या सोडविण्याच्या दृष्टिकोनातून इंग्रजी माध्यमाच्या मागणी करण्यात आलेल्या राज्यातील एकूण 169 तुकड्यांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्याबाबतचे आदेश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यातून कायम विना अनुदानावर अतिरिक्त तुकड्या मंजूर करण्याचे आदेश क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहेत.

माननीय उपाध्यक्ष महोदयांनी यासंदर्भात दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने अनुदान तत्वावर तुकड्यांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या सल्ल्याने तपासून मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी मागील अधिवेशनामध्ये शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सुनेच्या पुनर्वसनाबाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानुसार आपण निदेशही दिले होते. अद्याप त्यांचे पुनर्वसन झालेले नाही. तेव्हा याबाबतीत पुनश्च आदेश द्यावेत अशी मी आपणास विनंती करीत आहे.

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात वीज चोरीचे वाढत असलेले प्रकार

**मु. शी.** : राज्यात वीज चोरीचे वाढत असलेले प्रकार यासंबंधी सर्वश्री गोविंदराव आदिक, संजय दत्त, शरद रणपिसे, प्रतापसिंह मोहिते-पाटील व रमेश निकोसे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील वीज चोरीचे दिवसेंदिवस वाढते प्रकार उघडकीस येत असतानाच औरंगाबाद महसूल विभागात वीज चोरीचे प्रमाण अत्यंत जास्त असल्याचे दिनांक 20 जून, 2007 वा त्या सुमारास उघडकीस येणे, या विभागातील परभणी जिल्ह्यात 60 टक्के, बीड जिल्ह्यात 59 टक्के, लातूर जिल्ह्यात 88 टक्के नांदेड जिल्ह्यात 52 टक्के इतकी वीज चोरी उघडकीस येणे, वीज चोरीच्या केसेसवर उपाययोजना करण्यात न आल्याने वीज महामंडळाचे कोटयवधी रुपयांचे नुकसान होणे, तसेच नियमानुसार विजेचा आकार भरुन वीज खरेदी करणा-या ग्राहकाला भार नियमनासारख्या संकटाचा सामना करावा लागणे, वीज चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी वीज मंडळाने स्वत:ची सुरक्षा पथके स्थापन करण्याची निर्माण झालेली गरज, मात्र याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : राज्यात वीज टंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर स्वरुप धारण करीत आहे. याबाबतीत माननीय मंत्री महोदय जरी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असले तरी वीज चोरीचे प्रमाण कमी होण्याचया बाबतीत जेवढे रिझल्टस दिसायला पाहिजे तेवढे ते दिसत नाहीत. त्यामध्ये कमतरता दिसून येते.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्यात मोठया वीज टंचाई असतांना चोरी व गळती होत आहे व त्याचा सामान्य नागरिकांवर विपरीत परिणाम होत आहे. याअनुषंगाने माझा असा प्रश्न आहे की, या खात्याचे मंत्री कार्यक्षम असल्याने जनतेच्या अपेक्षा पण जास्त आहेत. मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, मागच्या वर्षीचा आणि त्याच्या पूर्वीच्या वर्षीची वीज चोरीची जी टक्केवारी आहे त्याची तुलना केली तर त्याचा आलेख कुठेही कमी झालेला नाही. तो कुठेही सिग्निफिकंटली डिक्लाईन झालेला नाही. याचा अर्थ यासंबंधात सरकारने जी पावले उचललेली आहेत ती कुठेतरी कमी पडत आहेत. त्यांची सॉलिडिटी फोर्टिफाय करण्यासाठी माननीय मंत्रिमहोदय कोणती पावले उचलणार आहेत ? याची माहिती द्यावी

श्री.दिलीप वळसे पाटील : राज्यातील वीज टंचाईच्या संदर्भामध्ये सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी लक्षवेधीच्या रुपाने या ठिकाणी मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी या निमित्ताने सन्माननीय सदस्यांना व सभागृहाला सांगू इच्छितो की, जसे विजेच्या निर्मितीच्या आणि पुरवठयाच्या व इन्फ्रास्ट्रक्चरच्या संदर्भामध्ये ज्या पध्दतीने प्रयत्न केले जातात त्या पध्दतीने राज्यातील विजेची चोरी रोखण्याच्या दृष्टीकोनातून अतिशय नियोजित असे प्रयत्न राज्यात केले जात आहेत. आपण या लक्षवेधीच्या उत्तरामध्ये पाहिले तर विवरण पत्र "अ" मध्ये सरसकट वितरण हानी सन 2005-2006 यामध्ये सब्स्टेन्शियली डिडक्अ झालेले दिसत आहे. याचे मूळ कारण हे आहे की, साधारणपणाने दरवर्षी 3 टक्के विजेची हानी कमी करण्याच्या संदर्भामधील धोरण राज्यसरकारने स्वीकारलेले आहे. आणि केंद्रसरकारने सुध्दा देशातील सर्व राज्यांना दरवर्षी किमान तीन टक्के वीज हानी कमी करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, आपण या संदर्भात काही पावले उचलावयाला पाहिजे होती. त्यानुसार सन 2003 चा विजेचा कायदा आल्यानंतर राज्यामध्ये जवळपास 36 दक्षता पथके निर्माण करण्यात आलेली आहेत. या पथकांवर डी.आय.जी.लेव्हलचा अधिकारी डिव्हिजनल व्हिजिलन्सच्या स्वरुपामध्ये काम करतो. परिमंडळ स्वरुपामध्ये देखील 120 पथके निर्माण करण्यात आलेली आहेत, तसेच डेडिकेटेड पोलीस स्टेशन्स स्थापन करण्यात आलेले आहेत. या राज्यातील अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाने याची माहिती तातडीने घेऊन निर्णय देण्याच्या संदर्भामध्ये प्रारुप केलेले आहे. गेल्या काही दिवसांमध्ये आपण जर पाहिले तर

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.......

या राज्यामध्ये बहुतांशी प्रमाणामध्ये धाड घालणे, वीज चोरी डिटेक्ट करणे आणि त्याच्यातून निश्चितपणे पैसे वसूल करणे असा त्याचा अर्थ होत नाही.. या अनुषंगाने केंद्रसरकारने सुध्दा कायद्यामध्ये सुधारणा केलेली आहे. आपण सुध्दा या राज्यामध्ये वीज चोरी प्रतिबंधक कायदा तयार केलेला आहे. आणि अशा वेळेस आपण या नवीन अमेंडमेंड झाल्यानंतर हे सगळे गुन्हे अजामीनपात्र व दखलपात्र म्हणून जाहीर केलेले आहेत. दुस-यांदा अशा प्रकारची चोरी करतांना जर कोणी ग्राहक आढळून आला तर त्याला कमीत कमी तीन महिने व जास्तीत जास्त दोन वर्ष शिक्षा देण्याची तरतूद आहे. तसेच यासंबंधी आणखी विशेष कायदा करता येणार नाही परंतु त्याला खाजगी क्षेत्रातून वीज घेता येणार नाही अशा प्रकारची व्यवस्था केलेली आहे. या राज्यामध्ये विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी ट्रान्समिशन अँड डिस्ट्रीब्यूशन लॉसेस दूर करण्याचा देखील शासन प्रयत्न करीत आहे. हे झाले वीजग्राहकांच्या बाबतीत परंतु अधिकारी व कर्मचा-यांच्या बाबतीत सुध्दा त्यांच्या जबाबदा-या फिक्स करुन त्यांच्या विभागामध्ये वीज चोरीचे प्रमाण कमी करण्याच्या संदर्भामध्ये स्पष्ट सूचना करण्यात आलेल्या आहेत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामधील मॅग्निटयूड मला समजावून घ्यावयाचे आहे ते असे की, निवेदनामध्ये दिल्याप्रमाणे वितरण हानी 29.50 टक्के झालेली आहे. याच्यामधून एक टक्का हानी जर वाचविली तर वीजमंडळाचा अंदाजे किती फायदा होऊ शकेल ? याची माहिती माननीय मंत्रिमहोदय देतील का ?

यानंतर श्री.कानडे......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना पुढे सुरु ...

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे 1 टक्का वीजहानी कमी करु शकलो तर 200 कोटी रुपयांचा फायदा मंडळाला मिळणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वीज चोरीच्या संदर्भात मंत्रिमहोदयांनी निर्बंध आणि नियोजन याबाबत माहिती दिली. कर्मचारी दोषी असतील तर योग्य ती दखल घेतली जाईल आणि कारवाई केली जाईल असे सांगितले. नुकतीच जालना येथे 3 कोटी रुपयांची वीज चोरी पकडली आहे. एवढी मोठी वीजचोरी एका दिवसात झालेली नाही. कारखान्यावर दंडाची कारवाई झाली. ज्या अधिकाऱ्यांनी वीज चोरी पकडली त्यांना योग्य तो मोबदला देण्यास काही हरकत नाही. परंतु ज्यांच्यामुळे वीज चोरी झाली आणि ज्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले त्यांच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, वीज चोरी जास्तीत जास्त प्रमाणात शोधून काढण्यासाठी महावितरण कंपनीने योजना जाहीर केलेली आहे. ज्यांच्याकडून माहिती मिळेल त्या व्यक्तीला 1 हजार रु. रोख आणि वसूल रकमेच्या 5 टक्के रक्कम बक्षित स्वरुपात देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता वीज चोरी निश्चित व्याख्या करण्याच्या दृष्टीकोनातून सबस्टेशनमधील वीजचोरी,ट्रान्सफॉर्मरमधील बिघाड,मिटर रीडींग या गोष्टीचा विचार करावा लागतो. किती वीज वितरीत झाली आणि बिले किती काढली याची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. याबाबतीत ज्या शिक्षा ठेवण्यात आलेल्या आहेत त्यात सेवेतून मुक्त करणे, बदली करणे, गुन्हा दाखल करणे अशा प्रकारची तरतूद कर्मचारी आणि अधिकारी यांच्याबाबतीत करण्यात आलेली आहे. प्रत्येक अधिकाऱ्यावर त्याच्या कार्यक्षेत्रात वीज चोरी आणि वीज गळती थांबविण्याच्या दृष्टीकोनातून जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. जे अधिकारी यामध्ये दोषी असतील किंवा ज्यांचा जाणीवपूर्वक सहभाग असेल त्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, वीज चोरी रोखण्याच्या बाबतीत मंत्रिमहोदयांनी निश्चित धोरण सांगितलेले आहे. वीजनिर्मितीपासून वीजवितरणापर्यंत जे परसेंटेज असते ते ग्राहकाकडून Fuel Adjustment च्या स्वरुपात वसूल केले जाते. वीज हानी कितीही असू शकते. म्हणजे वीज चोरीचे पैसे ग्राहकाकडून वसूल करण्याची पध्दत आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

यामध्ये वीजचोरीचे पैसे ग्राहकाकडून वसूल करण्यात येऊ नयेत यादृष्टीने शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात Anual recovery return एमअेआरसीकडे सादर केले जाते त्यावेळी या सर्व बाबींचा विचार केला जातो. वीज निर्मितीपासून वीज वितरणापर्यंत ट्रान्समीशन लॉसेस आणि डिस्ट्रीब्यूशन लॉसेस यांचा देखील विचार केला जातो. वीज चोरी अथवा वीज गळती आहे याचा कोणताही भुर्दंड ग्राहकावर येत नाही.Due to inadequate support of the system, Under billing, Faulty meters अशी अनेक कारणे यामध्ये आहेत. वीज गळतीचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून उपाय करीत असताना वीजचोरी डिटेक्ट करण्याचे प्रयत्न सुध्दा सुरु केलेले आहेत. तसेच ट्रान्समीशन आणि डिस्ट्रीब्यूशनमध्ये देखील सुधारणा करण्यासाठी प्रयत्न सुरु केलेले आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 15:15

लक्षवेधी सूचना क्र.6.........

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, वीज चोरी हा मंडळातील फार जुना रोग आहे. या मंडळामध्ये गेली अनेक वर्षे वीज चोरी अव्याहतपणे सुरु आहे. चोरीचे अनेक प्रकार आहेत. त्याच्या जोडीला वीज गळतीही आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याचे उत्तर आलेले नाही. फ्युएल ॲडजस्टमेंट चार्ज हा जो अतिशय महत्वाचा घटक आहे, तो सर्वसाधारणपणे ग्राहकांकडून वसूल केला जातो. कमजोरी मंडळाची, चोरीला संरक्षण मंडळाच्या अधिकाऱ्यांचे, चोरीकडे दुर्लक्ष करणारे अधिकारी मंडळाचेच आहेत. हा प्रश्न मी विधानसभेत सातत्याने पाच ते सात वर्षे मांडला आहे. या सभागृहात देखील मागील चार-पाच वर्षापासून मांडत आहे. 39 टक्के चोरीचे प्रमाण असून 1 टक्का चोरी म्हणजे 120 कोटी रुपये इतकी किंमत होते असे मंत्रीमहोदयांनी सांगितले होते. 39 टक्के चोरी होते त्याची वसुली आपण सर्वसाधारण ग्राहकाकडून करीत आहात. त्यांचा काय दोष आहे? कमजोरी शासनाची आहे. ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये ढिलाई तुमच्या अधिकाऱ्यांची आहे. कर्मचारी चोर आहेत असे आपण म्हणत आहात. सर्वच कर्मचारी धुतल्या तांदळासारखे आहेत असेही नाही. परंतु याचा भुर्दंड सर्वसामान्य ग्राहकाला का? आजच्या परिस्थितीत वीज चोरीची टक्केवारी काय आहे? मंत्रीमहोदयांनी वीज चोरीबाबत कारवाई केली त्याबद्दल मी त्यांचे प्रत्यक्ष भेटून अभिनंदनही केले आहे. हा दिवस केव्हातरी महाराष्ट्रात उजाडला पाहिजे होता. तो दिवस उजाडला. चांगली सुरुवात झाली. परंतु याला गती देण्याची आवश्यकता आहे. शासनाकडून जे राजकीय संरक्षण मंडळामार्फत दिले जाते ते थांबविण्याची आवश्यकता आहे. मी अनेक विभाग दाखवून देण्यास तयार आहे. ज्याठिकाणी सर्रास वीज चोरी होत असताना मंडळ आणि शासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. राजकीय स्वार्थासाठी किंवा कोणत्याही कारणासाठी कारखानदार असो, कोणीही असो, त्यांना वीज मोफत मिळता कामा नये. यादृष्टीकोनातून ज्या उपाययोजना केल्या जातात त्या अधिक प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी काय करणार आहात? फ्युएल ॲडजस्टमेंट चार्जमध्ये ग्राहकांना सवलत किती देणार आणि वीज चोरीची टक्केवारी काय आहे?

श्री.दिलीप वळसे पाटील : वीज पुरवठा करीत असताना वीज वितरण कंपनीने कोणकोणत्या हेडखाली काय काय चार्जेस ग्राहकांना लागू करावेत याचा निर्णय एमईआरसीकडून घेतला जातो. एफ.ए.सी.च्या संदर्भात दोन-तीन आदेश एमईआरसीने नव्याने दिले असून त्यामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील..........

बऱ्यापैकी ग्राहकांना रिलिफ देण्याचा प्रयत्न केला आहे. 30 ते 40 टक्के विजेची चोरी होत असल्याचे सांगितले गेले. विजेचा लॉस 100 टक्के ही विजेची चोरी असू शकत नाही. इतके प्रमाण असणे याचे कारण म्हणजे ट्रान्समिशन लाईनमध्ये सुधारणा झाली नाही. विदर्भामधून वीज वाहून आणत असताना 6 टक्क्याच्या आसपास लॉसेस होतात. ट्रान्समिशनची क्षमता नाही, त्यामुळे वितरण करीत असताना त्यामध्ये काही प्रमाणात लॉसेस होतात. हे प्रमाण कमी करावयाचे असेल तर त्यासाठी सिस्टीम इम्प्रूव्हमेंट हा एकमेव कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम निधीअभावी किंवा अन्य काही कारणामुळे राज्य सरकारने हाती घेतला नव्हता. या संदर्भात ट्रान्समिशनमध्ये सुधारणा करण्यासाठी पुढच्या पाच वर्षात 21 हजार कोटी रुपये खर्चून या राज्यामध्ये ट्रान्समिशन नेटवर्क अपग्रेड करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. डिस्ट्रिब्यूशनच्या संदर्भात या राज्यामध्ये सुधारणा करण्यासाठी 14500 कोटी रुपयांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. निर्मितीच्या संदर्भात 30 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. ट्रान्समिशन, जनरेशन आणि डिस्ट्रिब्यूशन या तीनही सेक्टरमध्ये कॅपॅसिटी ॲडिशन आणि सिस्टीम इम्प्रूव्हमेंटचा कार्यक्रम घेण्यात आला आहे. काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानसिकता किंवा ग्राहकांच्या मानसिकतेचा प्रश्न आहे. ग्राहकांची मानसिकता फक्त प्रवचन देऊन किंवा समजुतीच्या स्वरुपात सांगून बदलणार नाही. सगळेच चुकीचे वागतात असे नाही. काही लोक वागतात. त्यासाठी कडक कायदा नव्हता. म्हणून राज्य सरकारने कायदा केला. केंद्र सरकारने देखील कायदा केला. डेडिकेटेड पोलीस स्टेशन्स निर्माण केली. कोर्टांना अधिकार दिले. केसेस लवकर निकाली लागल्या पाहिजेत. त्यासाठी कंपाऊण्डची सुविधा होती. आता नॉनबेलेबल गुन्हयाची व्यवस्था केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नंतर श्री.जुन्नरे...

SGJ/ KGS/ MAP/ प्रथम श्री. भोगले... 15:20

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

श्री. दिलीप वळसे पाटील ....

कायदेशीर पध्दतीने जे करावयास पाहिजे होते तेवढे करण्यात आले आहे. तसेच यासंदर्भात अधिका-यांवर सुध्दा जबाबदारी फिक्स करण्यात आलेली आहे. पूर्वी जनरल चर्चा आम्ही करीत होतो, परंतु आता सबडिव्हीजनचा अधिकारी, ज्युनिअर इंजिनिअर, एक्झीक्यूटीव्ह इंजिनिअरांवर आम्ही जबाबदारी फिक्स करीत आहोत. कारण प्रत्येकाला त्याच्या डीव्हीजनमध्ये वीज मोजून दिली जाणार आहे जेवढी वीज दिली जाईल तेवढयाचे त्या अधिका-याने बिलींग केले पाहिजे. संबंधित अधिका-यानी दिलेल्या विजेच्या संदर्भात तेवढी रिकव्हरी केली नाही तर त्या संदर्भातील जबाबदारी संबंधित अधिका-याची राहणार आहे. या कामासाठी आवश्यक असणारी मॉडर्न टेक्नॉलॉजी, ॲटोमॅटीक मिटर रिडींगपासून प्रत्येक मिटर डीटीसी करण्यापर्यंत तसेच त्याचा संपूर्ण डेटा संगणकाच्या माध्यमातून कलेक्ट करुन त्याचे ॲनालिसीस करणे आणि प्रत्येक विभागाचा फायदा तोटा काढणे किंवा त्यासंदर्भातील जबाबदारी संबंधित अधिका-यांवर किंवा कर्मचा-यावर फिक्स करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, ही बाब या सभागृहाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात गेली पाहिजे. अनेक विभागामध्ये लोडशेडींगचे तास ठरवितांना एमईआरसीने सुध्दा दोन-तीन गोष्टी लक्षात घेतलेल्या आहेत. त्यामध्ये त्या भागात असणारी विजेची चोरी, टी.ॲण्ड डी. लॉसेस, रिकव्हरीची एफिशिअन्सी लक्षात घेतलेली आहे. आपण जर डिसेन्डींग ऑर्डरमध्ये पाहिले तर या राज्यामध्ये जवळपास 21 जिल्हे असे आहेत की, तेथे 7 टक्क्यापासून ते 30 टक्क्यापर्यंत टी.ॲण्ड डी. लॉसेस आहेत. 19 जिल्हे असे आहेत की, त्या ठिकाणी टी.ॲण्ड डी. लॉसेस 28 टक्क्यापासून तर 6.5 टक्क्यापर्यंत टी.एन.डी. लॉसेस आहेत. 28 टक्के टी.एन.डी. लॉसेस ज्या सर्कलमध्ये आहेत ते लॉसेस कमी आहे, रिकव्हरीपण चांगली आहे म्हणून अशा ठिकाणी भारनियमनाचे प्रमाण कमी राहते. परंतु जेथे टी.एन.डी. लॉसेस जास्त आहेत,रिकव्हरी कमी आहे असे सर्कल "डी" कॅटेगरीमध्ये गेल्यामुळे अशा ठिकाणी 12 ते 14 तास किंवा त्यापेक्षा जास्त भारनियमन केले जाते. वीज चोरी करणारे किंवा चुकीच्या पध्दतीने वीज वापरणारे लोक मर्यादित असतील पण त्याकडे इतर लोकांनी दुर्लक्ष केल्यामुळे त्या भागाची कॅटेगरी खाली जाते व त्या भागात भारनियमानाचे तास वाढतात. या बाबतीत सर्व लोकप्रतिनिधी, वृत्तपत्राने लक्ष घालून आपापल्या भागात जनजागृती करण्याची आवश्यकता आहे.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, फयुअेल ॲडजस्टमेंटचे चार्जेस रिडयुस करा त्याबाबतीत आपण सांगितले की, आम्ही एमईआरसीकडे जे प्रपोजल पाठवितो त्यामध्ये एमईआरसी दोन वेगवेगळया गोष्टी करते. ट्रान्समिशन लॉसेस व चोरीचे किती पर्सेंटेज आहे ते विचारात घेतले जाते. त्यामुळे ग्राहकांवर भुर्दंड येत नाही असे म्हटलेले आहे. परंतु उत्तरामध्ये दिलेले आहे की, चोरीचे निश्चित प्रमाण आम्हाला ठरवता येत नाही. जर चोरीचे निश्चित प्रमाण आपल्याला माहिती नसेल तर एमईआरसीमध्ये किती पर्सेंटेज चोरी झाली, ती ग्राहकांवर टाकू नये असे आपण नमूद केलेले आहे त्यामुळे एमईआरसी आमच्याकडून या संदर्भातील पैसे घेत नाही असे आपले म्हणणे आहे. महावितरणाचा विजेच्या संदर्भातील जो रिपोर्ट एमईआरसीला सबमीट केलेला आहे त्यामध्ये आपण दोन क्लासिफिकेशन केलेले आहेत एक ट्रान्समिशन मधील चोरी आणि दुसरी ॲक्च्यूअल चोरी. ...

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, ट्रान्समिशन मधील चोरी असू शकत नाही. ट्रान्समिशनमधील लॉसेस असतात.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, ट्रान्समिशनमधील लॉसेस आणि ॲक्च्यूअल चोरीच्या संदर्भात उत्तरात असे म्हटले आहे की, चोरी किती झाली आहे हे आम्हाला निश्चित सांगता येत नाही. आपण सांगता की, या लॉसेसचे पैसे जनतेकडून घेतले जात नाहीत कारण त्यांनी विचार केलेला आहे की, ॲक्च्यूअल चोरी किती झालेली आहे त्याचे पैसे जनतेकडून चार्ज न करता ट्रान्समिशनचे लॉसेसचे चार्जेस फयूअल ॲडजस्टमेंटच्या चार्जेसमधून वसूल केलेले आहे.

श्री. दिलीप वळसे -पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात आम्ही राज्यातील प्रत्येक सर्कलच्या लेव्हलवर टी.एन.डी. लॉसेसच्या प्रमाणात पर्सेंटेज ठरलेले आहे. परंतु सबडीव्हीजन किंवा सबस्टेशन पर्यंतचे त्या भागाचे प्रमाण काढण्याच्या संदर्भात डीटीसी मिटरींग आणि बाकीचा जो कार्यक्रम मी आपल्याला आता सांगितला आहे. परंतु यासंदर्भात एमईआरसीची अत्यंत डिटेल ऑर्डर आहे ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

....3

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सेंद्रीय खत म्हणून थर्मलची राख शेतक-यांना पुरवणे.

**मु. शी.** : सेंद्रीय खत म्हणून थर्मलची राख शेतक-यांना पुरवणे यासंबंधी श्रीमती फौजीया खान, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, सदाशिवराव पोळ, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती फौजिया खान: ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"थर्मलची राख सेंद्रीय खत म्हणून शेतकऱ्यांच्या माथी मारणाऱ्या रॅकेटचा परभणी येथे दिनांक २६ जून,२००७ रोजी झालेला भंडाफोड, सदर प्रकार पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या टेम्पोमधील तथाकथित सेंद्रीय खताची जिल्हा परिषदेच्या कृषि विस्तार अधिकारी यांनी तपासणी केल्यानंतर उघड होणे, मानवत येथील मुरलीधर जाजू या अधिकृत परवानाधारकाने गेल्यावर्षी देखील अनेकांच्या माथी अशीच राख मारली असण्याची शक्यता, या स्कॅंडलमध्ये अनेकजण सामील असण्याची शक्यता, शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी या प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करुन संबंधितांवर कडक कार्यवाही करण्याची आवश्यकता, परंतु त्या दिशेने तपास होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये पसरलेली संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैं लक्षवेधी सूचना के माध्यम से यह कहना चाहती हूँ कि पुलिस ने अपनी ड्यूटी निभाई है, लेकिन यह प्रश्न सिर्फ एक घटना तक या गृह विभाग से संबंध होने तक ही सीमित नहीं है. इसमें मुख्य भूमिका कृषि विभाग की भी है. इस प्रश्न की व्यापकता को देखते हुए कृषि विभाग के कॉर्डिनेशन के साथ ही इसके लिए उपाय ढूंढे जा सकते हैं. मेरा पहला प्रश्न यह है कि क्या शासन ऐसा करेगा ?

सभापति महोदय, आज एक घटना उजागर हुई है, एक प्रकरण हमारे सामने है, लेकिन राज्य में ऐसे प्रकरण बहुत सारे हो सकते हैं, जहां पर किसानों को लाखों रुपए का नुकसान हुआ होगा. हमारे प्रदेश में किसान आत्महत्या कर रहे हैं. इस बात को ध्यान में रखते हुए जिला स्तर पर शासन को एक विशेष पथक निर्माण करने की आवश्यकता है. इस पथक में कृषि विभाग के अधिकारी, कृषि विद्यापीठ के लोग, भेसल प्रतिबंधक विभाग के लोग और लोक प्रतिनिधियों का समावेश होना चाहिए. अगर जिला स्तर पर विशेष पथक बनाया जाता है तो इस प्रकार की घटनाएं रोकी जा सकती हैं. इसके साथ साथ सभी जिला पथकों के ऊपर प्रदेश स्तर पर महाराष्ट्र शासन की एक कमेटी होनी चाहिए. ऐसा सुझाव मैं शासन के सामने रखती हूँ, क्या शासन मेरा यह सुझाव मान्य करेगा ?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये बनावट खतांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर घोर फसवणूक करण्याचा प्रयत्न झालेला आहे. गेल्या वर्षी परभणी जिल्हयामध्ये बोगस बियाणाचे वाटप झाले होते. मी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात पोलिसांनी कारवाई केलेली आहे. सन्माननीय सदस्या यांनी कृषि विभागाचे अधिकारी, पोलीस विभागाचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांचे जिल्हा लेव्हला पथक नेमणार का असा प्रश्न विचारलेला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अशा तऱ्हेचे एक पथक नेमण्यात येईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, हा मुद्दा फक्त कृषि विभागाशी संबंधित नाही तर कृषि विभाग, लाचलुचपत विभाग आणि इतरही काही विभागांशी हा प्रश्न निगडीत आहे. शेतीला पोषक असे सेंद्रीय खत सोडाच, परंतु थर्मलची राख शेतामध्ये टाकल्यामुळे शेतीची कितपत हानी होते याची माहिती मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, थर्मलची राख शेतीला कितपत हानीकारक आहे याची माहिती शेती तज्ज्ञ देऊ शकतील. त्यासाठी आम्ही सी.ए.नमुना तपासणीसाठी पाठविला आहे, परंतु त्या संदर्भातील माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी एका अतिशय महत्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. शेतकऱ्यांच्या जीवनाशी काहीजण खेळत आहेत. शेतकऱ्यांना बोगस बी-बियाणे पुरविण्यात आले अशाप्रकारच्या बातम्या आपण वर्तमानपत्रात वाचतो. शेतकऱ्यांना बोगस बी-बियाणे पुरविल्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. पीक न आल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहे. शेतकऱ्यांना बोगस बी-बियाणे पुरविण्याचे एक रॅकेट आहे. मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, परभणीमध्ये जिल्हा लेव्हलवर एक पथक नेमण्यात येईल. मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छिते की, अशाप्रकारची परिस्थिती फक्त परभणी जिल्ह्यापुरती मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रात अशी पथके नेमण्यात येणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, परभणी जिल्ह्यापुरता प्रश्न असल्यामुळे त्या जिल्ह्यापुरते मी उत्तर दिलेले आहे. सर्व राज्यामध्ये असे प्रकार चालू आहेत. बोगस बी-बियाणे पुरविल्यामुळे पीक नीट येत नाही. शेतकरी आत्महत्या करण्याचे तेही एक कारण असू शकते. तेव्हा या संबंधी शासन सारासार विचार करुन निर्णय घेईल.

----------------

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वयेच्या सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व इतर सन्माननीय सदस्यांनी "प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या अफजलखानाच्या थडग्याचे उदात्तीकरण करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावयची आहे, ती मी पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिक माहिती पटलावर ठेवण्यात आली.

( प्रेस - येथे सोबतची माहिती छापावी. )

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन मशीन खरेदी करुन त्या कार्यान्वित करण्यासाठी झालेला खर्च

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन मशीन खरेदी करुन त्या कार्यान्वित करण्यासाठी झालेला खर्च यासंबंधी श्री परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात दि.8 जुन,2001 रोजी फिलीप्स इलेक्ट्रानिक लि. मुंबई या कंपनीकडून सुमारे 2 कोटी 34 लाख 47 हजार किंमतीची सिटी स्कॅन मशिन खरेदी करुन सुमारे 17 लाख 38 हजार रुपये ही मशिन कार्यान्वित करण्याकरिता खर्च होणे, यामुळे "क्ष" किरण तज्ञांची जागा रिक्त ठेवून सदरहू मशिनच्या दुरुस्तीच्या करारापोटी सन 2003 ते 2007 सालापर्यंत सुमोर 67 लाख 81 हजार 449 रुपयांचा मे.फिलीप्स इलेक्ट्रानिक्स इ.लि. या कंपनीशी करार करणे, परंतु करारानुसार वेळेवर या मशिनची देखभाल न केल्यामुळे ही मशिन वारंवार बंद अवस्थेत असणे, यामुळे तेथील रुग्णांना खाजगी रुग्णलयातच उपचार करावा लागणे, असे असतांना पुन्हा या कंपनीशी देखभालीचा करार करण्यात येणे, या व्यवहारात काही अर्थपूर्ण व्यवहार होत असल्याचा तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेला संशय, याबाबत शासनाने चौकशी करुन या मशिनचा लाभ जास्तीत रुग्णांना व नियमितपणे देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

डॉ.विमल मुंदडा ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या आहेत. परंतु सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये थोडीशी दुरुस्ती आहे. निवेदनातील नवव्या ओळीमध्ये दिनांक 23.42007 अशी तारीख आहे, त्याऐवजी "दिनांक 20.2.2007 अशी तारीख वाचावी." त्यानंतर निवेदनातील खालून 5 व 6 व्या ओळीमध्ये सिंधुदुर्ग येथील सिटी स्कॅन मशीन चालू आहे, असे

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा.....

म्हटले आहे, त्याऐवजी "सिंधुदुर्ग येथील सिटी स्कॅन मशीन चालू आहे परंतु युपीएससी यंत्रणा दिनांक 20.2.2007 ते दिनांक 17.7.2007 पर्यंत सिटी स्कॅन मशीन कार्यरत नव्हती" असे वाचाचे. बाकी निवेदन वितरीत केल्याप्रमाणे.

**तालिका सभापती** : सुधारल्याप्रमाणे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 15:30

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, आरोग्य विभागाने संपूर्ण राज्यासाठी 2001 मध्ये 20 सिटी स्कॅन मशीन खरेदी केल्या. परंतु सदरच्या मशीन रुग्णालयात बसविल्यानंतर त्याठिकाणी "क्ष" किरण चिकित्सक उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्या मशीनवर जे काम करतात, त्यांना प्रशिक्षणही दिलेले नाही. रुग्णालयात आज "क्ष" किरण चिकित्सकाशिवाय रुग्णांची तपासणी केली जात आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील रुग्णालयासाठी तज्ज्ञांची मागणी करुनही तज्ज्ञ उपलब्ध करुन दिलेले नाहीत. परंतु याठिकाणी उत्तरात असे म्हटले आहे की, तज्ज्ञ आठवाडयातून एकदा येतात. परंतु प्रत्यक्षात ते येत नाहीत. तसेच, ते आठवडयातून दोनदा आले पाहिजे. तसेच, सिंधुदुर्ग जिल्हयातील रुग्णांना सिटी स्कॅनच्या माध्यमातून उपचार घेण्याच्या दृष्टीने जवळपास 2 हजार रुपये प्रति रुग्ण खर्च येतो, त्यामुळे आपण हा खर्च कमी करणार का ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न "क्ष"किरण चिकित्सकासंबंधी विचारला. त्याबाबत मी सांगू इच्छिते की, 6 महिन्यांचे प्रशिक्षण संबंधितांना देण्यात येते. तसेच याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आठवडयातून दोनदा टेक्निशियन येण्यासंबंधी प्रश्न विचारला. त्याबाबतीत मी सांगू इच्छिते की, टेक्निशियनची कमतरता असल्यामुळे आठवडयातून तो एकदा रेग्यूलर येईल. सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन त्या कालावधीत बंद असल्यामुळे रुग्णांना बाहेर सेवा घ्यावी लागली असेल. परंतु आपण बी.पी.एल.धारकानां अशी सेवा मोफत देतो. आपण ही यंत्रणा परदेशातून आणलेली आहे. त्यामुळे या यंत्रणेच्या माध्यमातून आपण रुग्णांची तपासणी करु. तसेच सिटी स्कॅन मशीन बंद असल्याच्या काळात जर बी.पी.एल.रुग्णांची गैरसोय झाली असेल व त्यांनी बाहेर उपचार घेतले असतील तर त्या संदर्भात आपण त्यांच्या रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याचे काम करु.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MAP/ KGS/ प्रथम श्री.पुरी..... 15:35

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या वर्षी झालेला एकंदरीत खर्च बघितला तर 67,81,449 रुपये एवढा आहे. सन 2003 पासून सिटीस्कॅनची मशिन बंद आहे. हा खर्च वार्षिक मेंटेनन्ससाठी दर कराराप्रमाणे खर्च झाला आहे. फक्त क्ष-किरण तज्ञ की क्ष-किरण तंत्रज्ञ याचा खुलासा मंत्रिमहोदयांनी कृपया करावा.

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, सिटीस्कॅन मशिनला आता सहा वर्षे झाली आहेत. एखादे मशिन सहा वर्षानंतर वेअर ॲण्ड टेअर होण्यास सुरुवात होते. त्यामुळे या रुग्णालयासाठी नवीन सिटीस्कॅन मशिन घेण्याबाबत शासनाचा मनोदय आहे काय ?

सभापती महोदय, राज्यामध्ये आता मेडिकल क्षेत्रात देखील ऑनलाईन पद्धत सुरु झाली आहे. समजा मुंबईमध्ये एखादा रुग्ण असेल आणि त्यासंबंधीचे कुशल डॉक्टर कोल्हापूर येथे उपलब्ध असतील तर कोल्हापूरहून ते कुशल डॉक्टर मुंबईला ऑनलाईन रिपोर्ट पाठवू शकतात, अशा प्रकारची यंत्रणा विकसित झाली आहे. अशी व्यवस्था मुंबईच्या हिरानंदानी व हिंदुजा रुग्णालयामध्ये उपलब्ध आहे. या यंत्रणेसाठी एक कोटी रुपयांचा खर्च येतो पण त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही. सिंधुदुर्गमध्ये तंत्रज्ञ उपलब्ध होत नाहीत, असे शासनाचे म्हणणे आहे. त्या ठिकाणी अशा पद्धतीची ऑनलाईन सोय शासन करणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सभासदांनी तंत्रज्ञ की तज्ञ, असा पहिला प्रश्न विचारलेला आहे. तंत्रज्ञ आणि तज्ञ असे दोन्ही मिळत नाहीत.

सभापती महोदय, सर्व राज्यातील रुग्णालयांना नवीन सिटीस्कॅन मशिन उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण आहे. अनेक रुग्णालयांना हे मशिन पुरविण्यात आले आहे तर काही रुग्णालयांना अद्याप पुरवावयाचे आहे. राज्यातील सर्व रुग्णालयांना सिटीस्कॅन मशिन उपलब्ध करुन दिल्यानंतर नादुरुस्त मशिन्स रिप्लेस करण्याबाबतचा विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, ऑनलाईनसंबंधी मेडिकल रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये प्रक्रिया सुरु आहे. यासंबंधीच्या सॉफ्टवेअरचे काम प्रगतीपथावर आहे. राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालय आणि आरोग्य भवन हे एकमेकांशी लिंक करण्याची प्रक्रिया सुरु आहे. एक ते दीड वर्षात ही प्रक्रिया पूर्ण होईल.

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग येथील सिटीस्कॅन मशिन दुरुस्त करण्यासाठी फिलिप्स कंपनीला कंत्राट देण्यात आलेले आहे. परंतु, गेल्या चार-पाच महिन्यांपासून या मशिनचे पार्टस् मिळत नाहीत. हे पार्टस् लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या मशिनचे यु.पी.एस.मिळालेले नाही, ते इम्पोर्ट करावे लागले, ही वस्तुस्थिती आहे. बाकी सर्व पार्टस् उपलब्ध होतात. ज्यावेळी ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली त्यावेळी विभागात झालेल्या चर्चेदरम्यान महाराष्ट्रातील ज्या कंपन्या आहेत त्यांच्याबरोबर दुरुस्तीचे काँट्रॅक्ट करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

---------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सेंट जॉर्ज रुग्णालय आवारात उभारण्यात आलेल्या आरोग्य भवन इमारतीच्या निकृष्ट बांधकामाबाबत

**मु. शी.** : सेंट जॉर्ज रुग्णालय आवारात उभारण्यात आलेल्या आरोग्य भवन इमारतीच्या निकृष्ट बांधकामाबाबत डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गो-हे, श्री.अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, सर्वश्री सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य शासनाने सेंट जॉर्ज हॉस्पिटल, सी.एस.टी, मुंबईच्या परिसरात बांधलेल्या आरोग्य भवनाच्या अत्यंत निकृष्ट बांधकामामुळे सदर इमारतीच्या सिलिंग व भिंतीचे प्लॅस्टर कोसळून पडणे, पावसाळयात मोठया प्रमाणात गळती झाल्याने लॅबमधील साहित्य खराब होणे, सदर इमारतीचा ताबा घेताना बांधकाम विभागाने इमारतींची पाहणी न करता बांधकाम कंत्राटदाराला सुमारे १४ कोटी रुपये देण्यात येणे, तसेच इमारतींच्या कामात काही कमी जास्त फरक झाल्यास त्यासाठी शासनाकडे अर्नेस्टमॅनी जमा असलेले लाखो रुपयेही सदर इमारतीचे बांधकाम कंत्राटदाराला परत करण्यात येते, अशा प्रकारे अत्यंत निकृष्ट बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराला व ते पास करणाऱ्या अधिकाऱ्यांवर खटले भरण्याची आवश्यकता असतांना त्याकडे शासनाने हेतूत: दुर्लक्ष केल्याने जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे (आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एका मोठया भ्रष्टाचाराचा प्रकार मी या निमित्ताने सभागृहासमोर मांडत आहे. महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत 'आरोग्य भवन' ही इमारत सेंट जॉर्ज रुग्णालयाच्या आवारामध्ये उभारण्याचे काम दोन वर्षापूर्वी सुरु झाले. 16 कोटी रुपये खर्च करुन या आरोग्य भवनमध्ये संचालकांचे कार्यालय, इतर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कार्यालये उघडण्यात आली आहेत.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

02-08-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3R-1

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर .......... 15:40

डॉ.दीपक सावंत ..........

या कार्यालयाचे 14 कोटी रुपयांचे कान्ट्रॅक्ट मे.घेरजी ईस्टर्न कंपनी, मुंबई व ठेकेदार मे.जी.एच.खत्री ॲण्ड कंपनी यांना देण्यात आले होते. दोन वर्षानंतर या इमारतीला गळती लागली. माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी या इमारतीला भेट दिली होती. आरोग्य मंत्र्यांनी स्वत: बिल्डींगची पाहणी केलेली आहे. लक्षवेधी सूचनेला दिलेल्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "सदर इमारतीमधील 1 ते 8 मजल्यावर माहे जून, जुलै, 2006 मध्ये मुंबईत झालेल्या पर्जन्यवृष्टीमुळे दक्षिण व उत्तर बाजूच्या भिंतींना मोठया प्रमाणावर ओलसरपणा आढळून आला..." म्हणजे मुंबईत काहीही झ ाले तर 26 जुलैचे कारण सांगून मोकळे व्हायचे, हा यामागचा उद्देश आहे काय ? या इमारतीचे उद्घाटन सन 2005 मध्ये झाले. एका वर्षामध्ये अशा प्रकारे लिकेज होणे बरोबर आहे काय ? म्हणजे मूळ बांधकामामध्येच दोष आहे. शासनाने ज्या ठेकेदाराला काम दिले होते, त्या ठेकेदाराने उत्तम दर्जाचे काम केले नाही, हे यावरुन सिद्ध होते. आरोग्य विभागाने आता ही जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सापविलेली आहे. बांधकाम विभागाने ही जबाबदारी स्वीकारलेली नाही. बांधकाम विभागाने असे सांगितले की, यामध्ये आमचा काही दोष नाही. सभापती महोदय, आता जर आपण त्या इमारतीला भेट दिली तर आपल्या असे निदर्शनास येईल की, अनेक ठिकाणी पोपडे निघालेले आहेत, कोणत्याही क्षणी प्लास्टर पडण्याची शक्ता आहे. माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी आरोग्य भवनातील सभागृहात कॉन्सफरन्स घेतली होती. मंत्री महोदय जेथे बसलेल्या होत्या त्यांच्या मागील भिंतीचे प्लास्टर निघालेले होते. त्यावेळी ही बाब पत्रकारांनी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली होती. लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, ठेकेदाराच्या अनामत रक्कमेतून आम्ही इमारतीची दुरुस्ती करणार आहोत. हे 14 कोटी रुपयांचे बांधकाम आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या ठेकेदाराने हे काम केलेले आहे, त्या ठेकेदारावर शासन फौजदारी कारवाई करणार काय ? लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, त्या ठेकेदाराला आम्ही ब्लॅक लिस्टमध्ये टाकणार आहोत. मग आता पर्यंत त्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये का टाकले नाही ? तुम्ही कोणत्या प्रक्रियांची वाट बघत आहात. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शासन या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकणार आहे काय आणि हे आरोग्य भवन दुरुस्ती करुन केव्हा पर्ववत करणार आहात ?

..2...

02-08-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3R-2

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर .......... 15:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, ज्यावेळी ही इमारत हस्तांतरित करण्यात आली त्यावेळी इमारतीमध्ये काही प्रॉब्लेम्स आढळून आले होते. ही इमारत लवकरात लवकर दुरुस्त करण्याबाबत आरोग्य विभागाने ठेकेदाराला सूचना दिलेल्या आहेत. इमारतीचे ठेकेदार मे.जी.एच.खत्री यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करुन सुध्दा त्यांनी रिस्पॉन्स दिला नाही. त्यामुळे आरोग्य विभागाने या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याचा निर्णय घेतला. हा एम.एच.एस.टी.पी.चा वर्ल्ड बँक एडेड प्रोजेक्ट होता, त्याअंतर्गत वेगवेगळे 115 बांधकाम करण्यात आले होते. त्यामधील ही एक इमारत होती. यानंतर आरोग्य विभाग काही बांधकाम करणार नाही. ते ठेकेदार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रजिस्टर्ड आहेत. त्यामुळे आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र पाठवून असे कळविलेले आहे की, आपण या ठेकेदाराला ब्लॅक लिस्ट करा. ठेकेदाराचे सिक्युरिटी डिपॉझीट 63 लाख रुपये आहे आणि बँक गॅरंटी 62 लाख रुपये आहे. डिपॉझ ीट सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे, बँक गॅरंटी आम्ही रिव्होक करणार आहोत. या रक्कमेतून आम्ही इमारतीची दुरुस्ती करणार आहोत आणि त्याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाला विनंती करणार आहोत की, या ठेकेदाराला कोणत्याही परिस्थितीत ब्लॅक लिस्ट करा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ साहेब सभागृहामध्ये उपस्थित आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग ही जबाबदारी घेण्यास तयार आहे काय ? आरोग्य विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पोर्चमध्ये चेंडू टाकलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला हे मान्य आहे काय ? माझी अशी माहिती आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाला हे मान्य नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगावे की, ही जबाबदारी आम्हाला मान्य आहे. हा महत्वाचा प्रश्न आहे. 14 कोटी रुपयांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सभापती महोदय, मी आपल्यामाध्यमातून सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ साहेबांना विनंती करतो की, त्यांनी या प्रकरणावर प्रकाश टाकावा. सार्वजनिक बांधकाम विभागाला ही जबाबदारी मंजूर आहे काय ?

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे मी सविस्तर उत्तर देऊ शकतो. शासनाच्या विविध विभागातर्फे वेळोवेळी बांधकाम करण्याची मागणी केली जाते. कोणतेही बांधकाम करताना शासनाची सामुहिक जबाबदारी असते. बांधकाम पूर्ण झाल्यावर त्याची देखभाल, दुरुस्ती व मेंटेनन्स बी.अँड सी. करते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या बांधकामामध्ये जे दोष निर्माण झालेले आहेत, त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ? कंत्राटदाराने ठेवलेला अर्नेस्टमनी सध्या कोणत्या विभागाकडे जमा आहे ?

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी केलेला खुलासा बरोबर आहे. राज्यातील सर्व सार्वजनिक हॉस्पीटलचे मेंटेनन्स बी.अँड सी. विभागाकडे असते. डब्ल्यू.एच.ओ. व जागतिक बँकेच्या सहकार्याने आरोग्य भवनाची अप्रतिम वास्तू उभारण्याचा प्रयत्न केलेला आहे. इमारतीचे बांधकाम झ ााल्यानंतर एक दीड वर्षात हा गंभीर प्रकार घडलेला आहे. ऑर्नेस्ट मनी व बँक गॅरंटी राखून ठेवली जाईल हे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. तरीही याबाबत योग्य ती उपाययोजना शासनाने करावी.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हे खरे आहे की, जागतिक बँकेच्या सहाय्यातून ही वास्तू तयार झालेली आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम खाते या इमारतीची जबाबदारी घेणार आहे का ?

**तालिका सभापती** : या प्रश्नाची दखल घेऊन त्याचे गांभीर्य मंत्री महोदयांच्या लक्षात आणून दिले आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, जागतिक बँकेच्या प्रकल्पातून हया वास्तू उभ्या राहिलेल्या आहेत. तत्कालीन रुल्स ऑफ बिझनेसप्रमाणे सार्वजनिक बांधकाम खात्याने काम करुन दिले आहे. शासनातील ज्या विविध विभांगाना बांधकाम करुन हवे आहे, त्याची रक्कम संबंधित

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ .....

खाते सार्वजनिक बांधकाम खात्यास उपलब्ध करुन देते. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यपध्दतीमध्ये सेक्रेटरी, चीफ इंजिनियर, सुपरीटेंडेंट इंजिनियर, एक्झीक्युटीव्ह इंजिनियर, डयेप्युटी इंजिनियर अशी उतरंड आहे. हे अधिकारी व कर्मचारी बांधकामाचे नकाशे तयार करुन संपूर्ण इमारत बांधून देतात व ती इमारत सुस्थितीत कशी राहिल हे पाहतात. रजिस्टर्ड कॉन्ट्रॅक्टरकडून काम करुन घ्यावे लागते. कॉन्ट्रक्टरवर लक्ष ठेवावे लागते. अशा प्रकारे अनेक कामे करावी लागतात. सदरहू प्रकल्पाच्या बाबतीत त्यांनी काही इंजिनियर बांधकाम खात्याकडून मागविले होते व त्याप्रमाणे खात्याने इंजिनियर पाठविले होते. तसेच या प्रकल्पासाठी त्यांनी बाहेरुन काही कन्सलटंट नेमले आहेत. या कन्सलटंटच्या देखरेखीखाली इमारत उभी राहिली आहे. कालांतराने कन्सलटंटला पैसे मिळाल्यानंतर त्यांनी हात वर केले आहेत व ते निघून गेले आहेत. बांधकाम करणारे कॉन्ट्रक्टरही निघून गेले आहेत. या प्रकल्पाच्या बाबतीत हया सर्व अडचणी निर्माण झालेल्या आहेत. आता पुढचे काम कोणी करायचे ? हा महत्वाचा मुद्दा आहे. याबाबत माझी व माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांची याबाबत बैठक झालेली आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भुजबळ ....

आणि त्यात ठरले की, हे जे काही झालेले आहे ते घडून गेलेले आहे. आता आमच्याकडे त्यांनी याबाबतची सर्व कागदपत्रे आणून दिली आहेत, अर्नेस्ट मनी देखील आणून दिला आहे. अजून त्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले`नाही, ड्रेनेजचे वगेरे काम व्हायचे आहे, महापालिकेकडून पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळावयाचे आहे. आता अर्नेस्ट मधून मधून इमारतीचे उर्वरित काम तसेच दुरूस्ती होईल का, मुळात याचे मेन स्ट्रक्चर आहे ते कितपत योग्य झालेले आहे वगैरेही सगळे वादाचे मुद्दे आहेत. आता आम्ही यात लक्ष घातले आहे. या संदर्भात संबंधित मंत्री महोदयांबरोबर माझी बैठकदेखील झ ाालेली आहे व लवकरच माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर याबाबत बैठक आम्ही घेऊ. सभापती महोदय, या बाबतीत चौकशी देखील केली गेली पाहिजे. हे जे कोणी कंत्राटदार असतील त्यांना काळ्या यादीत टाकण्याची कारवाई देखील करण्यात येईल. शेवटी आम्ही कितीही अडचणी सांगितल्या तरी सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणून आम्हालाच हे काम करावे लागणार आहे. मला कल्पना आहे की, ही जी डॉक्टर्स असलेली मंडळी आहेत ती या बांधकाम कंत्राटदाराच्या पाठीमागे किती लागणार ? त्यांनी त्यांचे स्वत:चे काम करायचे की हे बांधकामाचे काम करायचे ? शेवटी दुसऱ्याचे काम आपल्याकडे कोणीच घेऊ नये हे खरे. तर ही पद्धत आहे, तिला कोठे तरी छेद देण्याचा प्रयत्न केल्यानंतर हे प्रश्न उभे राहतात. म्हणून मी सांगू इच्छितो की, याबाबतीत पूर्ण चौकशी केली जाईल, ज्यांनी चूक केली असेल त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल आणि या इमारतीची देखील पूर्ण तपासणी करून तिची दुरूस्ती करण्यात येईल.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : याचा अर्थ कंत्राटदार, कन्सल्टंट, सुपरविजन करणारे आले लोक या सर्वांचाच आपण यामध्ये समावेश केलेला आहे. हे चांगले झाले. आता या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपली आहे.

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 6 बाबत ....</u>**

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 6 ही सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी दिलेली आहे. त्यांनी माझ्याकडे पत्र दिले आहे की, त्यांची माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक असल्याने ही लक्षवेधी सूचना सर्वात शेवटच्या क्रमांकावर घ्यावी. तेव्हा यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक 7 चर्चेला घेण्यात येईल.

***

.... 3टी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कल्याण-शीळफाटा (जि.ठाणे) रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे झालेले काम.

मु.शी. : कल्याण-शीळफाटा (जि.ठाणे) रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे झालेले काम यासंबंधी सर्वश्री लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, सदाशिवराव पोळ, वसंतराव चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, भास्कर जाधव, डॉ.वसंत पवार, श्रीमती फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संजय दत्त, नितीन गडकरी, संजय केळकर, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, गोविंदराव आदिक, धनाजी साठे, रमेश निकोसे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

---

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो. ..

"ठाणे जिल्ह्यातील कल्याण-शिळ रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे झालेले काम, सदर रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असल्याची जुलै,2007 मध्ये उघडकीस आलेली धक्कादायक माहिती, त्यामुळे सदरचा रस्ता वाहतुकीच्यादृष्टीने धोकादायक झालेला असणे, परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी रस्त्यावर निषेधात्मक वृक्षरोपन करुन दि.12 जुलै,2007 रोजी केलेले आंदोलन, निकृष्ट दर्जाचे झालेल्या कामाची उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची शासनाकडे मागणी करुनही सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप याबाबत आंदोलनाचा दिलेला इशारा, चार महिन्यापूर्वी केलेल्या रस्त्याची दुरावस्था झालेली असल्याने सदर संशयास्पद प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करुन दोषींविरुध्द कडक कारवाई करण्याची अत्यावश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया"

श्री..अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री) महोदय, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.......3टी 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचना क्र.7 वरील सा.बा.मंत्र्यांच्या निवेदनानंतर ....)

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, त्यांना या निवेदनामध्ये, उत्तरामध्ये काही दुरूस्ती करावयाची आहे का ?

श्री. अनिल देशमुख : नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासंबंधात ही लक्षवेधी सूचना आहे. गेले कित्येक दिवस कल्याण-शीळफाटा रस्त्याच्या कामाचा हा प्रश्न रखडलेला आहे आणि या रस्त्याला यापूर्वी माननीय मंत्री महोदयांनी स्वत: माननीय उपसभापती आणि अन्य लोकप्रतिनिधींच्या समवेत भेट दिलेली आहे. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, चार महिन्यात हा सगळा रस्ता ठाकठीक होईल, रस्त्यावरील खड्डे बुजविले जातील. पण प्रत्यक्षात काही तसे घडलेले नाही आणि आज त्या ठिकाणी इतके अपघात होत आहेत की, शेवटी लोकप्रतिनिधींना, लोकांना त्या विरोधात मोर्चा काढावा लागला आहे, आंदोलन करावे लागले आहे. त्या रस्त्यात पडलेल्या खड्ड्यांमध्ये लोकांनी झाडे लावून आपला निषेध व्यक्त केलेला आहे. या रस्त्याचे काम ज्या कंत्राटदाराकडे आहे त्याने अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम तेथे केलेले आहे, त्या कामाची चौकशी झाली पाहिजे आणि संबंधित ठेकेदारावर त्याबद्दल आपण काय कारवाई करणार ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, कल्याण-शीळफाटा रस्त्याचा हा प्रश्न आहे आणि या रस्त्याचे काम मागील वर्षी 25 ऑगस्टला चालू केले होते आणि ते पूर्ण होण्यास 18 महिन्यांचा कालावधी दिलेला आहे म्हणजे 24 फेब्रुवारी 2008 पर्यंत हा रस्ता पूर्ण करावयाचा आहे. हा संपूर्ण रस्ता 4 लेनचा असून 22 कि.मी.लांबीचा आपल्याला करावयाचा आहे. सध्या या रस्त्याचे काम जोरात चालू आहे. तेथे दोन लेन होत्या तेथे आता चार लेन आपण करीत आहोत आणि हे सर्व काम 24 फेब्रुवारी 2008 पर्यंत याचे काम आम्ही पूर्ण करू आणि त्याची क्वालिटी देखील चांगली ठेवू.

( यानंतर श्री. सरफरे ....3यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, त्या रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमध्ये लोकप्रतिनिधींनी झाडे लावली . खड्डे पडल्यामुळे त्या रस्त्यावर सारखे अपघात होत असतात. काही दिवसापूर्वी स्कूटरवरुन नवरा बायको जात असतांना रस्त्यावरील खड्डयांमुळे त्या गरोदर महिलेला अपघात झाला. मंत्रिमहोदयांसोबत आम्ही अनेक वेळा त्या रस्त्याला भेट दिली आहे. त्यासंबंधात अनेक वेळा बैठका झालेल्या आहेत...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, 24 फेब्रुवारी 2008 पर्यंत या रस्त्याचे काम पूर्ण होईल. हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर लोकांना त्रास होणार नाही. सध्या हा रस्ता दोन लेनचा असून तो चार लेनचा करण्यात येत आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम सध्या चालू असून पावसाळा असल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडले आहेत. तेव्हा आम्ही जास्तीत जास्त खड्डे बुजवू. हा एकूण रस्ता 22 किलोमीटर लांबीचा असून तो अतिशय चांगला करुन देण्यात येईल याची मी आपणास गॅरंटी देतो.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या रस्त्याचा प्रश्न प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित करण्यात येतो. आज या ठिकाणी देण्यात आलेले निवेदन दिशाभूल करणारे आहे. निवेदनावरुन असे दिसते की, त्या ठिक्ाणी सर्व आलबेल आहे, रस्त्यावर खड्डे नाहीत, रस्त्यावरील सर्व वहातूक सुरळीत चालू आहे, वहातूक खंडीत होत नाही अशाप्रकारचे उत्तर दिले आहे. हे निवेदन करणारे अधिकारी कोण आहेत? त्यांना आपण पाठीशी घालणार आहात काय? या रस्त्याचे कालपरवा काढण्यात आलेले फोटो मी आपणास सादर करतो. त्या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे असून त्यामध्ये आपल्याला झाडें लावता येतील. तेव्हा याबाबत शासनाने सुधारीत निवेदन केले पाहिजे...

**उपसभापती** : त्या फोटोंकडे बघून मी काय करु, त्या खड्डयांमधून मी देखील गेलो आहे...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी कोणत्याही प्रकारची दिशाभूल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. शिळफाटा ते भिवंडी या रस्त्यावरुन जायला पूर्वी तीन तास लागत होते. या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले असून आता हा रस्ता दोन लेन ऐवजी चार लेनचा करण्यात येत आहे. त्यामुळे दोन लेन अधिक वाढविण्यात येत आहेत. पावसाळयामध्ये त्या रस्त्यावर खड्डे पडले असतील. शिळफाटा ते काटई नाका या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरु आहे. रस्त्याचे काम सुरु असतांना थोडासा त्रास सहन करावा लागेल. सभापती महोदय, पेडर रोडचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख...

सुध्दा काम सुरु होईल, त्याठिकाणी सुध्दा लोकांनी शासनाला सहकार्य केले पाहिजे. ज्यावेळी आपण काम हाती घेतो त्यावेळी ते काम पूर्ण होईपर्यंत लोकांना थोडासा त्रास होत असतो. हा रस्ता 100 टक्के अतिशय चांगल्या दर्जाचा होईल...

श्रीमती मंदा म्हात्रे : रस्त्याचे काम व्हायचे तेव्हा होईल, पहिल्यांदा आपण खड्डे बुजविण्याचे काम करा...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, हा रस्ता दोन लेन ऐवजी चार लेनचा करण्यात येत आहे. शिळफाटा ते दुर्गाडी टोल नाका पर्यंतच्या रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्यास सांगितले आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, "रस्त्याच्या या लांबीमध्ये रुंदीकरण केलेल्या भागात पावसाळयात काही खड्डे पडले आहेत". पहिल्या पावसाळयामध्ये रस्त्याची अशी अवस्था होत असेल तर निश्चितपणे हे निकृष्ट दर्जाचे काम झाले आहे असा याचा अर्थ होतो.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या रस्त्यावर पाच लेअर टाकण्यात येणार आहेत. या रस्त्याला 200 मिलीमीटरचा क्रस्ट द्यावा लागेल. आता फक्त 50 मिलीमीटरचे काम झाले आहे. एकूण पाच लेअरचे सिलकोट करुन हा रस्ता होणार आहे. या रस्त्यावर पहिला लेअर पडला असून अजून चार लेअर बाकी आहेत. हा संपूर्ण रस्ता केल्यानंतर तो चांगल्या दर्जाचा आणि सुस्थितीतील होईल याची मी गॅरंटी देतो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या सभागृहामध्ये चर्चा झाली त्यावेळी मंत्रिमहोदयांनी हे काम मे. प्लस कन्सेप्ट कन्सॉर्शियम या कंपनीला दिल्याचे सांगितले. ही कंपनी परदेशातील असून ती ब्लॅक लिस्टेड आहे. ही कंपनी व्यवस्थित काम करणार नाही, या गोष्टीकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार(

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरू....

त्याचा अनुभव आम्ही घेत आहोत. त्या ठिकाणी जे काम झालेले आहे ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे झलेले आहे. हे आम्ही सांगण्याची आवश्यकता नाही, त्या भागामध्ये रहाणारे, रस्त्यावरून येणारी-जाणारी माणसे आहेत ते सांगू शकतील. या संदर्भात सर्वसामान्य नागरिकांच्या भावना तीव्र आहेत. फेब्रुवारी 2008 मध्ये काम पूर्ण व्हायचे आहे. अजून एक लेअरसुध्दा पूर्ण झालेला नाही. एका बाजूला चार लेअर टाकावयाचे आहेत. निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की,, "शेवटचा डांबरी थर टाकण्याचे काम वगळता मजबुतीकरणाचे काम बहुतांशी पूर्ण करण्यात आले आहे." हे उत्तर दिशाभूल करणारे आहे. मजबुतीकरणाचे काम झाले असते तर त्या ठिकाणी खड्डे पडले नसते. म्हणजेच काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे, याबाबत शासने गांभीर्याने लक्ष दखल घेण्याची आवश्यकता आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय हा कंत्राटदार ब्लॅकलिस्टमधील आहे असे सांगण्यात येते, ही सत्य गोष्ट नाही. ही मलेशियन कंपनी आहे...

**उपसभापती** : ही गोष्ट सत्य आहे.

श्री.अनिल देशमुख : ही गोष्ट सत्य नाही. मलेशियन कंपनी आहे. या कंपनीचे संपूर्ण रेकॉर्ड तपासलेले आहे. ती कंपनी अतिशय चांगले काम करत आहे. आपण ज्या रस्त्याचा उल्लेख केला तो कटई नाका - टाटा पावर स्टेशन ते दुर्गाडी या रस्त्यावरील पाच लेअरपैकी चार लेअरचे काम झ ालेले आहे. ज्या रस्त्यावर खड्डे आहेत, त्या ठिकाणी एक लेअरचे काम झालेले आहे, चार लेअरचे काम बाकी आहे. सपूर्ण रस्त्याचे काम झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची तक्रार रहाणार नाही. आपल्या लोकप्रतिनिंधींना तसेच सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनीही त्या कामाची पहाणी केली. इतरही सन्मानीय सदस्य त्या ठिकाणी उपस्थित होते. सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, या रस्त्यामुळे जे साडे तीन तास लागत होते, त्या ऐवजी पाऊण तासच वेळ लागतो. आता तो रस्ता चांगल्या पध्दतीने, सुस्थितीत करू. 22 कि.मी..च्या रस्त्याचे काम अतिशय चांगल्या पध्दतीने करण्यात येईल. 24 फेब्रुवारी 2008 पर्यन्त हे काम पूर्ण होईल.

**उपसभापती** : मंत्री महोदय, या ठिकाणचे लोक प्रतिनिधी सांगतात की, रस्ता निकृष्ट दर्जाचा झालेला आहे, रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत, असे असताना या खात्याचे अधिकारी आणि आपणही कॉन्ट्रॅक्टरची भलावण का करता ? हे कळत नाही. हे काम नीट करा असे न सांगता त्याचे काम चांगले आहे, चांगले काम होणार आहे, असे सांगितले जाते ते बरोबर नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये या संबंधात बैठक होऊन चर्चा झालेली आहे.

**उपसभापती** : मी त्याचा हवाला दिला तर....

श्री.अनिल देशमुख : आपल्याच दालनामध्ये बैठक घेऊन तशा पध्दतीच्या त्यांना सूचना दिलेल्या होत्या.

**उपसभापती** : माझ्या दालनामध्ये जेव्हा बैठक झाली तेव्हा आपणही होता, इतर काही सन्मानीय सदस्य होते. त्यावेळेस माझ्या काही भावना होत्या, त्याही मी मांडलेल्या आहेत. ज्या जिल्ह्यामध्ये आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून काम करतो, त्यावेळेस किमानपक्षी आम्हाला उघड्या माथ्याने वावरता आले पाहिजे. त्यांनी केलेले पाप आमच्या डोक्यावर घेऊन आम्ही फिरायचे काय ? नको त्यांचे उद्‌गार ऐकायचे काय ? ज्या कॉन्ट्रॅक्टरनी घाण काम केलेले आहे. त्याला बजावण्याऐवजी आपण आमचीच समजूत काढत आहेत की, हे होईल, ते होईल, चांगले काम होईल. ज्यांनी एवढे घाण काम केलेले आहे, त्यांच्यावर कारवाई करणार आहात की नाही ? मंत्री महोदय सांगतात की, ते ब्लॅक लिस्टमधील नाहीत. परंतु ते कॉन्ट्रॅक्टर ब्लॅक लिस्टमधील आहेत, ही गोष्ट खरी आहे. हे आपण कशाला लपवत आहात ?

श्री.अरविंद सावंत : हा प्रश्न गंभीर आहे.

श्री.अनिल देशमुख : हा प्रश्न नागपूरच्या अधिवेशनामध्ये उपस्थित झालेला होता. तेव्हाच आम्ही त्याची संपूर्ण चौकशी केली. महाराष्ट्रामध्येच नाही तर नॅशनल हायवे ऑथरटी, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांच्याकडेही हा मलेशियन कॉन्ट्रॅक्टर ब्लॅक लिस्ट मधील आहे काय ? याची चौकशी केली, संपूर्ण माहिती घेतली. मी खात्रीने सांगतो की, तो कॉन्ट्रॅक्टर ब्लॅक लिस्टमधील नाही.

**उपसभापती** : ठीक आहे तो ब्लॅक लिस्टमधील नसेल, तो चांगले काम करणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : मी या खात्याचा मंत्री म्हणून सांगतो की, हे काम जेव्हा पूर्ण होईल तेव्हा ते काम अतिशय चांगल्या दर्जाचे` असेल...

**उपसभापती** : असे झाले तर आपल्या अध्यक्षतेखाली आम्ही त्यांचा जाहीर सत्कार करू.

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : अतिशय चांगल्या दर्जाचे काम असेल. जोपर्यन्त चांगल्या दर्जाचे काम होणार नाही, तोपर्यन्त टोल लावण्यास त्याला परवानगी देणार नाही.

श्री.रामनाथ मोते : ज्या कॉन्ट्रॅक्टरला हे काम दिलेले आहे, त्याच्याबाबतीत अशी गंभीर बाब आहे की, संबंधित कॉन्ट्रॅक्टर स्वत: काम करत नाही. त्यांनी अनेक सब कॉन्ट्रॅक्टर नेमलेले आहेत, त्यांच्याकडून हे काम केले जात आहे, म्हणून ते निकृष्ट दर्जाचे आहे.

**उपसभापती** : त्याची चौकशी होईल काय ?

श्री.अनिल देशमुख : याची मी माहिती घेतो.

**उपसभापती** : माहितीमध्ये सिध्द झाले तर...

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : त्यांनी सबकॉन्ट्रॅक्टरला काम दिलेले आहे काय याची चौकशी करु.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय लोकप्रतिनिधी जी माहिती सांगत आहेत ती खरी समजून माननीय मंत्रिमहोदयांनी कारवाई केली पाहिजे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, त्यांनी सबकॉन्ट्रॅक्टरला काम दिले आहे काय याबाबत त्यांना बोलवून चौकशी करु.

श्री. मधुकर सरपोतदार : त्यांनी सबकॉन्ट्रॅक्टरला काम दिले आहे असे समजून आपण ॲक्शन घ्यावी.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न मांडला त्याची आम्ही नक्की चौकशी करु आणि चौकशीत तसे काही आढळून आले तर कारवाई करु.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आपण या प्रश्नाबाबत वेळोवेळी पुढाकार घेतलेला आहे आणि माननीय मंत्रिमहोदयांना याची कल्पना आहे की, तो रस्ता म्हणजे त्या भागाची लाईफ लाईन आहे. त्या रस्त्यावरुन रोज हजारो प्रवासी प्रवास करीत असतात. वेगवेगळ्या पक्षातील सर्व लोकप्रतिनिधी या विषयावर एक झालेले आहेत. कारण तेथील जनतेमध्ये फार मोठा प्रक्षोभ आहे. लोकप्रतिनिधींना जनता प्रश्न विचारते की, याबाबत आपण काय करीत आहात ? मला या ठिकाणी निश्चितपणे नमूद केले पाहिजे की, माननीय मंत्रिमहोदय स्वत: दोन वेळा त्या परिसरामध्ये आले. एकदा त्यांनी कामाची सुरुवात करुन दिली. दुसऱ्या वेळी ते मॉनिटरींग करण्यासाठी आले. याबाबतीत माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी जी माहिती या उत्तरामध्ये दिलेली आहे त्याबाबत त्यांना स्वत:ला कल्पना आहे की, ती माहिती खरी नाही. माननीय मंत्रिमहोदय म्हणतात की, 2008 मध्ये हा रस्ता पूर्ण होणार आहे. आम्हा सर्व लोकप्रतिनिधीसमोर आजचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. आज त्या ठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. त्या ठिकाणी रस्त्यामध्ये खड्डे आहेत की, खड्डयामध्ये रस्ता आहे असा प्रश्न नागरिकांना पडलेला आहे. याबाबतीत माझी विनंती आहे की, हे अधिवेशन संपल्यानंतर सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन, सर्व जनतेचे समाधान करुन, त्या ठिकाणच्या कामाचे स्वरुप पाहता ते काम किती दिवसात होणार आहे याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी कालमर्यादा सांगावी. दहा पंधरा दिवसात काम होईल काय

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त .....

याबाबत सांगावे. तोपर्यंत आम्ही त्यांना प्रश्न विचारणार नाही. मात्र त्यानंतर जर हीच अवस्था राहिली तर कोणत्याही दिवशी, मग दिवस असो की रात्र असो, आम्ही आपल्याला फोन करु आणि विनंती करु. माननीय मंत्रिमहोदयांना घेऊन त्या ठिकाणी सरप्राईज चेकींगसाठी यावे. त्यासाठी माननीय मंत्रिमहोदयांची तयारी आहे काय ? दुसरा प्रश्न असा की, त्या ठिकाणी आल्यावर जर तीच अवस्था दिसली तर माननीय मंत्रिमहोदय तेथील कंत्राटदारावर किंवा संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहेत ?

श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला जोडूनच मी एक प्रश्न विचारतो. साधारणत: सत्ताधारी पक्षातील सदस्य त्वेषाने बोलत नाहीत. सन्माननीय सदस्य प्रामाणिकपणे बोलत आहेत. सन्माननीय सदस्यांनी असा आरोप केला की, माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर असत्य आहे. याचा अर्थ आपण या सभागृहाची दिशाभूल करीत आहात काय ?

श्री. संजय दत्त : माझे इंटरप्रिटेशन तसे नाही.

श्री. मधुकर चव्हाण : आपण तसेच बोललात.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी सदनाची कोणतीही दिशाभूल करीत नाही. छापील उत्तरामध्ये जे दिलेले आहे ते सत्य आहे. यामध्ये सदनाची कोणतीही दिशाभूल करण्याचा प्रयत्न नाही. मी सांगितले की, सध्या रस्त्याचे काम चालू आहे. काम चालू असताना दोन रस्त्याच्या बाबतीत सांगितले की, काही ठिकाणी खड्डे आहेत ते नक्की बुजवू. या पूर्वी तीन वेळा त्या रस्त्याला मी स्वत: भेट दिलेली आहे. सभापती महोदय, आपण स्वत:ही होता. सन्माननीय सदस्यही उपस्थित होते.

**उपसभापती** : मी एकदाच हजर होतो. मी परत आलेलो नाही.

श्री. अनिल देशमुख : लोकप्रतिनिधींना कळवून, कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांना बोलवून मी स्वत: त्या रस्त्याची पाहणी करण्यासाठी येईन.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 16:10

**उपसभापती** : या प्रश्नावर काल-परवा माझ्या दालनामध्ये मिटींग झाली. त्या मिटींगमध्ये सर्व लोकप्रतिनिधींनी आमच्याकडे भावना प्रकट केल्या. त्यानंतर हे उत्तर आलेले आहे. खरी परिस्थिती माननीय मंत्री महोदयांना, मला आणि लोकप्रतिनिधींना माहीत आहे. त्यामुळे याबाबतीत मला कोणाला कोठेही अडचणीत आणावयाचे नाही. परंतु हे काम किती निकृष्ट दर्जाचे झाले आहे ते माननीय मंत्री महोदयांना, मला आणि सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. असे असताना रेकॉर्डवर चुकीचे यावे अशी माझी इच्छा नाही. ज्या गोष्टी माझ्या दालनामध्ये आपण चर्चिल्या आहेत, ज्या गोष्टी अनुभवल्या आहेत त्याबाबतीत आम्ही सत्याला सामोरे जाणारे आहोत. सत्यापासून दूर जाणारे नाही. एक गोष्ट नक्की आहे की, या रस्त्याचे आजवर झालेले काम हे अयंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. आज लोकप्रतिनिधींनी या ठिकाणी त्यांची मते सांगितलेली असून त्यांच्या मताशी मी देखील सहमत आहे. हे सर्व झाल्यानंतर एखादा माणूस चुकतो आणि ती चूक सुधारण्याची संधी आपण त्या माणसाला देतो. याबाबतीत चुकीचे समर्थन करण्याची वृत्ती वाढीला लागल्याचे दिसून येते. अधिकारी लिहून देतात आणि त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदय येथे वाचतात. त्या रस्त्याच्या कामाला माननीय मंत्री महोदयांनी 3 वेळा भेट दिली. एका भेटीच्या वेळी मी देखील त्यांच्या बरोबर होतो. त्या भेटीनंतर या ठिकाणी परत येण्याबाबत मी कानाला खडा लावला. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, कॉन्ट्रॅक्टर चांगला आहे. कॉण्ट्रक्टर चांगला असेलही. हे काम चांगले झाले तर कॉण्ट्रॅक्टरचा, माननीय मंत्री महोदयांचा आणि त्यांच्या सर्व अधिका-यांचा आम्ही स्वखर्चाने जाहीर सत्कार करु. माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण चांगली सेवा उपलब्ध करुन देणार याबद्दल शंका असण्याचे कारण नाही. इतके चांगले कार्य पार पाडल्यानंतर आपण अभिनंदनास पात्र आहात. त्यामुळे कॉण्ट्रॅक्टर, आपण आणि आपले अधिकारी या सर्वांचा नागरी सत्कार करु. त्या कार्यक्रमाला कल्याण-डोंबिवली तसेच ठाणे महानगरपालिकेच्या महापौरांना उपस्थित राहाण्याची विनंती करीन. हा सर्व सत्कार, आम्ही त्या भागातील सर्व लोकप्रतिनिधी, आमच्या खिशातून करु. एक गोष्ट नक्की की तो मलेशियन कॉण्ट्रॅक्टर आहे, त्या बाबतीत कोणतीही हरकत नाही. परंतु या कॉण्ट्रॅक्टरने मलेशियासारखा रस्ता करावा. याठिकाणी तो मलईसारखा रस्ता करतोय. त्याने मलेशियासारखा रस्ता कराव आणि तो करण्यासाठी आमचे सर्व सहकार्य मिळेल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : माननीय सभापती महोदय, आपण सांगता ही वस्तुस्थिती भयानक आहे. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर बरोबर नाही....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, माझे बोलणे अजून संपलेले नाही. मी बोलण्यासाठी उभा आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे अशी माझी त्यांना विनंती आहे. या विषयावर मला बोलणे क्रमप्राप्त झाले म्हणून मी बोलत आहे. मी लोकप्रतिनिधींसह एखाद्या प्रश्नासंबंधी माननीय मंत्री महोदयांबरोबर, अधिका-यांबरोबर चर्चा केल्यानंतर आमच्या सारख्यांवर हेत्वारोप झाले तर आम्ही गप्प बसणारे नाहीत. आम्ही समर्थपणे तोंड देणारी मंडळी आहोत. आज परिस्थिती अशी आहे की, तुमच्या अधिका-यांना आम्ही शेजारचा रस्ता बघा असे सांगतो. हा कॉण्ट्रॅक्टर ब्लॅक लिस्टेड होता की नाही हा संशोधनाचा मुद्दा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना त्या कॉण्ट्रॅक्टरने ते काम सबलेट केल्याचे सांगितले. जेव्हा एखाद्या कामाच्या दर्जाबाबत अशी परिस्थिती उद्‌भवते त्यावेळी लोकांच्या जोरदार रेट्यामुळे आम्हाला त्यामध्ये लक्ष घालावे लागते. या कॉण्ट्रॅक्टरने काम सबलेट केले नाही हे माननीय मंत्री महोदय छातीठोकपणे सांगू शकतात काय ? परंतु मी छातीठोकपणे सांगू इच्छितो की, त्या कॉण्ट्रॅक्टरने ते काम सबलेट केलेले आहे. तो स्वत: ते काम करीत नाही. जी फक्त पाट्या टाकण्याचेच काम करतात अशी मंडळी तेथे काम करीत आहेत. या कामाला सरकारचे 250 ते 300कोटी रुपये लागणार आहेत. माननीय मंत्री महोदयांना माझी हात जोडून विनंती आहे की, आजवर झाले ते झाले. याचे गांभीर्य आपण कृपा करुन लक्षात घ्यावे आणि यामध्ये तातडीने लक्ष घालावे. आज मी या पदावर आहे, उद्या मी या पदावर कदाचित नसेनही. पण जनतेची अवहेलना होता कामा नये. ज्या जनतेने आम्हाला येथवर पाठवले त्यांच्यावर अन्याय होणार असेल, त्यांना नागरी सुविधांना तोंड द्यावे लागणार असेल तर होणा-या परिणामांची कल्पना लक्षात घेऊन मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो की, त्यांनी वेळीच या प्रकरणी लक्ष घालून त्या कॉण्ट्रॅक्टरला आवर घालावा, त्यांच्या अधिकांना तपासावे, कामाचा दर्जा तपासावा.

....नंतर कु. खर्चे...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती**........

अधिका-यांनी सांगितले म्हणजे ते खरे आहे असे मानू नका किंवा आम्ही सांगतो म्हणून ते खरे आहे असे माना असेही मी म्हणत नाही तर आपण यासंदर्भामध्ये सत्याला सामोरे जावयाला शिका. यासंदर्भात काळजीपूर्वक विचार करुन या रस्त्याचे काम कुठल्या दर्जाचे झालेले आहे हे तपासून पहावे. कॉन्ट्रॅक्टर किंवा अधिकारी या रस्त्याच्या कामाच्या संदर्भात सांगतात की, लेयरवर लेयर चढविले आहेत आणि तूम्ही ते ऐकता आणि ऐकून त्याची माहिती आम्हाला सांगता व आम्ही ती ऐकतो. कृपया जनतेच्या हिताकरिता मी आपल्याला विनम्रपणे सांगतो कदाचित तुम्हाला त्यामुळे वाईट वाटेल पण तसे वाईट वाटण्याचे काही कारण नाही. आपणही तसेच खुल्या मनाने सर्व गोष्टी स्वीकाराव्यात सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी जसे यासंदर्भात सांगितले की, या रस्त्यावरील एका खड्डयामुळे एका गरोदर बाईचा मृत्यू झाल्याची घटना घडली. मंत्रिमहोदय, अशा घटना दररोज घडत आहेत. आपल्याला कल्पना नसेल की, या रस्त्याच्या बाबतीत पोलीस कमिशनर यांचाही एक अहवाल आहे, आपण तो अहवाल मागवावा आणि त्याचा अभ्यास करावा. या ठिकाणी रस्त्यांची जी परिस्थिती आहे ती कशी आहे ? यासंदर्भात गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. सदर रस्त्यांचे काम करणारा कॉन्ट्रॅक्टर कोण आहे याच्याशी जनतेला व आम्हा लोकप्रतिनिधींनाही काही कर्तव्य नाही. सदर कॉन्ट्रॅक्टर कोणीही असो अ,ब,क,ड कोणीही असो त्याच्याशी आम्हाला कर्तव्य नाही. यानिमित्ताने मी परत एकदा सांगतो की, परंतु या रस्त्याचे काम हे दर्जेदार अशाच पध्दतीचे झाले पाहिजे. सदर रस्त्याच्या कामाकरिता आपण जो खर्च करीत आहोत तो सत्कारणी लागला अशी भावना तुमची आमची नाही तर मुख्य म्हणजे जनतेची तशी भावना झाली पाहिजे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, या खात्याचा मंत्री या नात्याने मी खात्री देऊ इच्छितो की, या रस्त्याचे काम दर्जेदार अशाच प्रकारचे होईल.

-----

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सांगली जिल्हयामध्ये पवनचक्की उभारणीकरिता जमीन खरेदी विक्री व्यवहारामध्ये शेतक-यांची झालेली फसवणूक.

**मु.शी.**: सांगली जिल्हयामध्ये पवनचक्की उभारणीकरिता जमीन खरेदी विक्री व्यवहारामध्ये शेतक-यांची झालेली फसवणूक यासंबंधी सर्वश्री.सर्वश्री.शरद पाटील,जयंत पाटील,प्रकाश शेंडगे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत तयांनी निवेदन करावे,अशी विनंती करतो.

" सांगली जिल्हयातील कवठेमहांकळ व तासगाव तालुक्यातील शेतक-यांना विचारात न घेता अनेक शेतांमधून वीजवाहिनी तारांसाठी ( पवनचक्की उभारणीकरीता ) सुझलॉन विंड पॉवर एनर्जी या कंपनीने शेतक-यांच्या जमिनी खरेदी`ल्या आहेत. या जमीन खरेदी - विक्री व्यवहारामध्ये कंपनीने शेतक-यांची फसवणूक केलेली असणे,जमिनीला योग्य भाव न देणे,नुकसानभरपाई न देणे,उक्त मागणीकरिता गेल्या दोन महिन्यांपासून पवनचक्की ग्रस्त शेतक-यांनी मोर्चे,धरणे,गावसोड आंदोलन,पेरणी - मशागत आंदोलन केलेली असणे,त्यासंदर्भात वारंवार माननीय तहसिलदार,जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले परंतु त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष,त्यामुळे सर्व पवनचक्कीग्रस्त शेतक-यांनी पवनचक्क्यांची वीज निर्मिती रोखण्याचा शासनास दिलेला इशारा,याबाबत शासनाने तातडीने पवनचक्कीग्रस्त शेतक-यांना न्याय देण्याची आवश्यकता व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विनय कोरे ( अपारंपारिक ऊर्जा मंत्री ) : अध्यक्ष महाराज,लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केलया असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलाव ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-----

3Y - 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, पवनऊर्जा हा विषय आपल्या राज्यामध्ये अतिशय महत्वाचा बनलेला आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळया जिल्हयांमध्ये ज्या ज्या ठिकाणी अनुकूल अशी भौगोलिक परिस्थती आहे त्या त्या ठिकाणी पवन ऊर्जा प्रकल्प उभे राहत आहेत. त्यानुसार सातारा,सांगली,उत्तर महाराष्ट्रामध्ये नंदुरबार जिल्हयामध्ये सांगली जिल्हयातील तासगाव आणि कवठे-महांकाळ या तालुक्यांमध्ये हे पवनऊर्जा प्रकल्प उभे राहिलेले आहेत. पवनऊर्जा हे अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत महत्वाचे असल्यामुळे केंद्रशासनाने तया प्रकल्पांसाठी अनुदान देण्याचे धोरण जाहीर केलेले आहे. राज्यशासनाने देखील पवनऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना जाहीर केलेल्या आहेत. या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी अनेक उद्योजक पुढे आले आहेत. पवनऊर्जा निर्मिती करणारे प्रकल्प पूढे आले. आणि हे प्रकल्प उभे राहिले त्यामधून ऊर्जा निर्माण व्हायला लागली या कंपनीने हा प्रकल्प निर्माण केल्यावर पैसा मिळू लागला परंतु ज्या जमिनींवर हे प्रकल्प उभे राहिले त्या जमिनीचा मात्र या सगळया योजनांमध्ये विचार झालेला नाही. वास्तविक राज्यातील भौगोलिक परिस्थिती पाहता ती जर या प्रकल्पाला अनुकूल असेल तरच पवनऊर्जा निर्माण होऊ शकते, ही वस्तुस्थिती असतांना ज्या जमिनीवर हे प्रकल्प उभे करावयाचे असतात त्या जमिनीच्या किमतीचा देखील या पवनऊर्जा प्रकल्पाच्या खर्चामध्ये समावेश करायला हवा कारण अशा कंपन्यांनी त्या भागातील जमिनी मातीमोल किंमतीत विकत घेतल्या आणि वर्षानुवर्षे त्यामधून ऊर्जानिर्मिती होणार आणि त्या कंपन्यांना त्यातून फायदा होणार, पैसे मिळणार. पण ज्यांच्या जमिनी या प्रकल्पामध्ये गुंतल्या त्या मालकांना मात्र त्यामधून काहीच लाभ मिळणार नाही. त्यामुळे आज सांगली जिल्हयातील तासगांव व कवठे-महांकाळ या तालुक्यामध्ये शेतक-यांनी फार मोठया प्रमाणामध्ये पवनऊर्जा प्रकल्पाच्या विरोधामध्ये आंदोलन सुरु केले. यासंदर्भात ज्यांच्या जमिनी मातीमोल किमतीमध्ये खरेदी केल्या व त्यांचे जे नुकसान झाले त्यांना त्यांच्या जमिनींची योग्य ती किंमत मिळाली पाहिजे, अशी त्यांची मागणी आहे. यासंदर्भात काही जमिनींचे व्यवहार फसवणुकीच्या पध्दतीने देखील झालेले आहेत, त्यांचा तपास करुन निकाल लावणे गरजेचे आहे. यासदर्भात जिल्हाधिका-यांची व माननीय मुख्यमंत्र्यांची देखील बैठक झालेली आहे. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये यासंदर्भात धोरणात्मक अशा प्रकारचा कोणताच निर्णय घेण्यात आलेला नाही. या जमीनमालकांना लवकरात लवकर न्याय मिळेल का ?

यानंतर श्री. कानडे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ 16:20

लक्षवेधी सूचना पुढे सुरु...

प्रा. शरद पाटील ...

सभापती महोदय, ही सर्व परिस्थिती लक्षात घेता मी अशी मागणी करतो की, यापूर्वी उभ्या राहिलेल्या प्रकल्पांसाठी घेतलेल्या जमिनी आणि यापुढे होणाऱ्या प्रकल्पांसाठी घेतल्या जाणाऱ्या जमिनी ज्या मालकांच्या असतील त्यांना कायम स्वरुपी उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून या प्रकल्पामध्ये सहभागी करुन घेतले जावे. त्याचप्रमाणे अशा स्वरूपाचा धोरणात्मक निर्णय घेऊन त्याअनुषंगाने कायदा देखील करण्यात यावा आणि शेतकऱ्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे. म्हणून तशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या भावनांशी निगडीत असा कायदा राज्यात तयार व्हावा आणि प्रकल्पांना लीज बेसिसवर जमिनी द्याव्यात व शेतकऱ्याला सातत्याने उत्पादन मिळत रहावे याबाबत धोरणात्मक विचार करुन काय उपाय करता येतील याबाबत शासन गांभीर्याने विचार करीत आहे आणि लवकरच तशा प्रकारचे धोरण राज्यामध्ये अस्तित्वात आणण्याचा शासन प्रयत्न करणार आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील कवठेमहांकाळ,तासगांव तसेच सांगोला तालुक्यातील काही भाग व पाटण तालुक्यातील बरीच जमीन अशा प्रकल्पांसाठी कवडीमोलाने हडप करण्याचे षडयंत्र सुरु आहे. प्रा. शरद पाटील यांनी सांगितले की याबाबत आंदोलने होत असल्यामुळे काही तरी ठोस निर्णय घ्यावा जेणेकरुन शेतकऱ्यांना न्याय मिळेल व शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही. त्यांच्या जमिनीला योग्य भाव मिळेल. लीजवर भाडेपट्टयाने जमीन देण्याबाबत शासन विचार करणार आहे परंतु यामध्ये बराच वेळ जाणार आहे. अशा जमिनी खरेदी करण्यामध्ये प्रचंड गैरव्यवहार झालेला आहे. जमीन एकाची, पैसा दुसऱ्याला अशा प्रकारे गैरव्यवहार झालेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी देखील गैरव्यवहार मान्य केलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केलेले गैरव्यवहार शासन रद्द करणार आहे काय ? त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरी मिळाली पाहिजे अशी मी मागणी पूर्वी केली होती परंतु त्यावर आजतागायत निर्णय झालेला नाही. शेतकऱ्यांची घरे उद्ध्वस्त झाली, मुले देशोधडीला लागली. उत्पन्न होणारी वीज दुष्काळग्रस्त भागाला द्या अशीही आम्ही मागणी केली. परंतु शासन भाडेपट्टा देणार नाही, गैरव्यवहार झालेले व्यवहार रद्द करणार नाही. म्हणजे प्रकल्पग्रस्त भागातील

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे

शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर शासन पॅकेज देणार आहे काय ? ज्या बडया धेंडांनी जमिनी घेतलेल्या आहेत मग ते ॲक्टर असोत वा उद्योगपती असोत या पवनचक्क्यांच्या मालकांना प्रत्येक एक पवनचक्कीमागे मुलांना नोकरी देण्यासाठी शासन भाग पाडणार आहे काय ? त्याचप्रमाणे दुष्काळी भागातील लोकांना यातून निर्माण होणारी वीज देऊन लोडशेडींग कमी केले जाणार आहे काय ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, याठिकाणी तीन प्रकारचे प्रश्न माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी उपस्थित केले आहेत. दुष्काळी भागाला वीज द्यावी अशी मागणी केलेली आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रातील वीज उत्पादन आणि वीज वितरण यासंबंधी ऊर्जा नियामक आयोग निर्णय घेत असतो. त्यामुळे ज्याठिकाणी वीज निर्माण होते त्यांना वीज द्यावी अशा प्रकारचा निर्णय घेण्याचा अधिकार शासनाकडे नाही. दुसरा मुद्दा उपस्थित केला की जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारात शेतकऱ्यांची प्रचंड प्रमाणावर फसवणूक झालेली आहे. याअनुषंगाने माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर एक बैठक झाली. विभागीय आयुक्तांबरोबर एक बैठक झाली. जिल्हाधिकाऱ्यांच्या पातळीवर एक फास्ट ट्रॅक ट्रॅब्युनल नियुक्त करावयाचे आणि लोकांनी त्यांच्याकडे तक्रारी द्यावयाच्या.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्री. उल्हास पवार )**

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.8.......... श्री.विनय कोरे....

या सगळ्या तक्रारींचे त्यांनी व्हेरिफिकेशन घ्यायचे आणि त्यांनी योग्य तो निर्णय द्यायचा अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यांना योग्य वाटेल तो निर्णय घेण्यासाठी त्यांच्याकडे काही रक्कम या कंपन्यांनी जमा करावी अशाही सूचना या कंपन्यांना दिलेल्या आहेत आणि त्याची इन्क्वॉयरी करण्याचे काम सुरु आहे. जवळजवळ 650 ते 700 इन्क्वॉयरी त्याठिकाणी पूर्ण झालेल्या आहेत. उद्याच्या 6 तारखेला पुन्हा या टास्क फोर्सची बैठक होत आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याही विषयाचे काम वेगाने सुरु आहे. दुसरा प्रश्न म्हणजे स्थानिक लोकांना रोजगार देण्याच्या अनुषंगाने आपण काही प्रयत्न करणार का? या संदर्भात शासनाने माहिती उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न केला. जितके रोजगार लागलेले आहेत त्यापैकी जवळजवळ 91 टक्के लोक स्थानिक विभागातून घेतले गेले आहेत. अशा प्रकारे त्या दोन-तीन तालुक्यातील जवळजवळ 1 हजार मुलांना या प्रकल्पामधून आजपर्यंत रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, ज्या पवनचक्क्या उभ्या राहिल्या त्या सामाजिक वनीकरण विभागाच्या जमिनीवर किंवा रेग्युलर जमिनीवर उभ्या राहिल्या असतील तर त्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाची परवानगी घेतली आहे का?

श्री.विनय कोरे : प्रत्येक ठिकाणी पवन ऊर्जा प्रकल्प उभा करीत असताना वेगवेगळे धोरण आहे. वन जमिनी सुध्दा पवन ऊर्जा निर्मिती क्षेत्रासाठी उपयुक्त असतील तर द्याव्यात अशा प्रकारचा कायदा आहे. त्यासाठी नियमावली आहे. 9 लाख रुपये त्यांना भरावे लागतात. नवीन पर्यायी जमीन घेऊन द्यावी लागते. त्यामुळे सामाजिक वनीकरणाच्या जमिनीवर एखादा पवन ऊर्जा प्रकल्प उभारला गेला असेल तर या नियमावलीला अनुसरुनच हे काम पूर्णत्वास गेले असेल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, महार वतनी, इमाने वतनी जमिनींवर असा प्रकल्प राबविण्यात आला आहे हे खरे आहे काय? अशा जमिनींची खरेदी विक्री करण्यास शासनाने परवानगी दिली आहे काय?

श्री.विनय कोरे : खरेदी विक्री व्यवहार हा दोन घटकामधील विषय असतो. तो कायदेशीररित्या पूर्ण झाल्यावरच हा विभाग त्यांना पवन ऊर्जेसाठी परवानगी देतो. 10 हेक्टरच्या वर एका खात्याच्या नावावर जमीन आवश्यक असेल तर त्यासाठी औद्योगिक आयुक्तांकडून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जमिनीसाठी परवानगी घ्यावी लागते. आतापर्यंत जे पवन ऊर्जा निर्मितीचे काम झाले, या सगळ्या क्षेत्रातील या सगळ्या जमिनीसाठी रितसर परवानगी घेऊनच त्याठिकाणी काम झाले आहे.

श्री.विक्रम काळे : सध्या राज्यामध्ये किती पवनचक्क्या कार्यरत आहेत आणि किती पवनचक्क्याचे काम सुरु आहे?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, साधारणपणे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य म्हणून पवन ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात महाराष्ट्र समोर आलेला आहे. 1485 मे.वॅट इतकी स्थापित क्षमता महाराष्ट्राची आज निर्माण झालेली आहे आणि 31 मार्च, 2008 पर्यंत 500 मे.वॅट यामध्ये भर पडेल अशी या विभागाची अपेक्षा आहे.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यातील शेतकऱ्यांनी दूधाचे दर वाढवून मिळण्याची केलेली मागणी.

मु.शी. : राज्यातील शेतकऱ्यांनी दूधाचे दर वाढवून मिळण्याची केलेली मागणी यासंबंधी सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, वसंत पवार, जितेंद्र आव्हाड, सदाशिवराव पोळ, श्रीमती फौजिया खान,सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, सुधाकर गणगणे, जैनुद्दीन जव्हेरी, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री भास्कर जाधव, लक्ष्मण जगताप, वसंत चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, राजेंद्र जैन, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, गुरुनाथ कुळकर्णी, विक्रम काळे, अरुण गुजराथी, सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील शेतकऱ्यांनी विशेषत: कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दूध उत्पादनाचा खर्च वाढलेला असल्याने दूध दर वाढून मिळणेसाठी केलेली मागणी, व त्यासाठी सुरु केलेले दूध आंदोलन, दूध दर वाढविण्यासाठी शासनाने कोणताही ठोस निर्णय न घेणे, त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, दूध बंदीमुळे मुंबई शहरातील नागरिकांनी दूध बंदीमुळे होऊ घातलेल्या अडचणीच्या परिस्थितीमुळे पसरलेले भितीचे वातावरण, यावर शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास गुजरातमधील दूध संस्था मुंबईची बाजारपेठ काबीज करण्याची शक्यता म्हणून शासनाने दूध उत्पादक शेतकरी व ग्राहकांना वेठीस न धरता दूध धोरण जाहीर करण्याची निर्माण झालेली निकड, यावर शासनाने करावयाची कारवाई व करावयाची उपाययोजना."

श्री.हसन मुश्रीफ (दुग्धविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, दुधाच्या दरवाढीच्या संदर्भात मध्यंतरी कोल्हापूर जिल्हयात आंदोलन झाले होते. कोल्हापूर जिल्हा हा नेहमीच क्रांतीकारक ठरलेला आहे. ऊसाला अधिक दर मिळाला पाहिजे, प्रती टन 1300 रुपये भाव मिळावा यासाठी आंदोलन सुरु झाले. 1300 रुपये भाव देण्यास सुरुवात झाली आणि पहिला हप्ता म्हणून 750 रुपये दिल्यानंतर आंदोलन बंद झाले. याचा परिणाम असा झाला की, राज्यामध्ये आज ऊसाचा प्रश्न उग्र बनला आहे. जवळजवळ 3 आठवडे ऊस गाळपाचा कार्यक्रम सुरु राहणार होता तो होऊ शकला नाही. राज्यामध्ये आज 25 लाख टन ऊस गाळपाअभावी पडून आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ MAP/ प्रथम श्री. भोगले... 16:30

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

सभापती महोदय, गाई, म्हशी असतात त्यांना चारा, खाद्य खाऊ घालावे लागत असते. परंतु सध्या चारा आणि खाद्याचे दर भरमसाठ वाढत असल्यामुळे सध्या दुधाला जे दर मिळतात ते दर दूध उत्पादक शेतक-याला परवडत नाही. दुधाचे दर वाढले पाहिजेत ही दूध उत्पादक शेतक-यांची आणि सर्व लोकप्रतिनिधींची मागणी आहे. महागाईचा विचार करता दुधाचे दर वाढविण्याच्या संदर्भात शासन आयोग स्थापन करुन आयोगाच्या माध्यमातून दुधाचे दर वाढवणार आहे काय? दुस-या गोष्टींची महागाई होत असतांना दुधाचे दर वाढवण्याच्या संदर्भात रेग्युलेटरी कमिटी किंवा आयोग नेमून दुधाचे दर वाढवण्यात येणार आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, शेतक-यांच्या दुधाला जो दर दिला जातो तो दर शेतक-याला परवडत नाही ही वस्तुस्थिती आहे. दुधाचा व्यवसाय विशेषत शेतमजूर, दलित आणि भगिनी करीत असतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत गाई-म्हशींसाठी काम करावयाचे, त्यांना चारा, पाणी खाद्य द्यावयाचे, त्यांच्यासाठी राबायचे आणि दूघ काढल्यानंतर जर मेहनतीचेही पैसे मिळणार नसतील तर ते योग्य नाही. आपल्या राज्यात निर्माण होणा-या दुधाचा थेंबन्‌थेंब खरेदी करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारलेली आहे. यासंदर्भात आपल्या राज्यात जी व्यवस्था आहे तशी व्यवस्था इतरत्र कोठेही पहावयास मिळत नाही. दर वेळेस पशू खाद्यात आणि चा-याच्या दरामध्ये वाढ होत असते परंतु त्या प्रमाणात दुधाच्या दरात वाढ होत नाही, महागाई वाढली की, बाहेर आंदोलने होतात, त्यानंतर दुधाच्या संदर्भात सभागृहात चर्चा होते व दुधाच्या दरात वाढ करण्यासाठी मग समिती नेमली जाते व त्या समितीचा अहवाल आल्यानंतर दुधाच्या दरात वाढ केली जाते. परंतु यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, जसे वीज दरवाढ एमईआरसी करते किंवा डीझेल पेट्रोलची वाढ केली जाते तशाच प्रकारे दुधाच्या दराची वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यासाठी सचिव श्री. अशोक बसाक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आलेली असून या विषयाच्या संदर्भात विधानसभेत देखील सखोल चर्चा झालेली असून यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, 31 ऑगस्टपर्यंत दुधाच्या दरात वाढ करण्याची सकारात्मक भूमिकेचा शासन विचार करेल. श्री.अशोक बसाक यांच्या अध्यक्षतेखाली समितीचा अहवाल आल्यानंतर 31 ऑगस्ट पर्यंत दुधाच्या दरवाढीच्या संदर्भात निश्चित घोषणा केली जाईल.

....2

02-08-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4B-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, दुधाच्या अतिशय महत्वाच्या प्रश्नावर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून चर्चा उपस्थित केलेली आहे. दुधाच्या दरात वाढ व्हावी यासाठी बाहेर आंदोलने झालेली असून हजारो लिटर दूध रस्त्यावर फेकले गेले आहे. सभापती महोदय, आपल्या राज्यात गुजरातचे दूध येते आणि त्या दुधाची किंमत आपल्यापेक्षा कमी असून त्याची क्वालिटी चांगली आहे. नॅशनल डेअरीचे दूध आपल्याकडे येते आणि त्या दुधाची किंमत आपल्या दुधापेक्षा कमी असून त्या दुधाची क्वालीटी आपल्या दुधापेक्षा किती तरी चांगली आहे. आपण आपल्या दुधाचे दर वाढवल्यानंतर आपल्या दुधाचा खप कसा वाढेल यासंदर्भात आपण काही विचार केलेला आहे काय? आज मुंबईमध्ये मोठया प्रमाणात बाहेरच्या राज्यातून दूध येत आहे त्यामुळे हे अतिक्रमण आपण कशा प्रकारे थोपवणार आहात? तसेच आपल्याकडे मोठया प्रमाणात दुधात जी भेसळ होत आहे ती आपण कशी थांबवणार आहात ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, मुंबई हे दुधाचे मोठे मार्केट आहे. मुंबईमध्ये गुजरातमधून अमूल डेअरीचे 2, 2.5 लाख लिटर दूध दररोज येते, मदर डेअरीचे दूध सुध्दा मुंबईमध्ये येत असते. तसेच आंध्र प्रदेश आणि शेजारच्या इतर राज्यातून सुध्दा मोठया प्रमाणात दूध येत असते. बाहेरच्या राज्याचे दूध आपल्या राज्यातील दुधापेक्षा स्वत आहे. बाहेरच्या राज्यातील स्वस्त दूध आपल्या राज्यात आल्यानंतर आपल्या दुधाचे मार्केट जाईल यासाठी बाहेरच्या राज्यातून जे दूध येईल त्याच्यावर प्रत्येक लिटरला 1 रुपया एंट्री फी लावावी असा निर्णय झाला होता.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ..............

परंतु केंद्र सरकारने नकार दिला, त्यामुळे त्यांची अंमलबजावणी होऊ शकली नाही. चांगल्या क्वालिटीचे दूध पुरविण्यासाठी दूध उत्पादकांना व दूध संस्थांना आवाहन निश्चितपणे करण्यात येईल. पोलीस, फूड ॲन्ड ड्रगचे अधिकारी सातत्याने छापे घालत आहेत. तामिळनाडूतील टोळ्या अविरत कार्यरत आहेत. या टोळ्यांना पायबंद घालण्यासाठी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मनावर घेतलेले आहे.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: एस.आर.ए.अंतर्गत वांद्रे येथे बांधण्यात आलेल्या सदनिकांची उंची आठ फूट असल्याबाबत...

**मु.शी.**: एस.आर.ए.अंतर्गत वांद्रे येथे बांधण्यात आलेल्या सदनिकांची उंची आठ फूट असणे यासंबंधी श्री मधुकर सरपोतदार, डॉ.दीपक सावंत व श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडून दिलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकउे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत (एस.आर.ए) वांद्रे पूर्वेकडील महानगरपालिकेच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या परिश्रम को.ऑ.हौ.सोसायटीतील सदनिकांची ऊंची केवळ ८ फूट असणे, ओकांर को.ऑ.हॉ. सोसायटीतील मूळ भाडेकरुंना डावलण्यात येऊन बोगस व्यक्तिचा भाडेकरु म्हणून समावेश केला जाणे, इमारतीला अद्याप ऑक्युपेशनल सर्टिफिकेट न मिळताच रहिवासी रहायला जाणे, परिणामी पिण्याचे पाणी उपलब्ध नसणे, उद्वाहनाची दुरावस्था असणे, शासकीय जमिनीवरील शास्त्रीनगर को.ऑ.हौ. सोसायटी व खार पूर्व येथील शासकीय जमिनीवरील शांतीलाल कंपाऊंड को.ऑ.हौ. सोसायटी, केंद्र शासनाच्या जमिनीवरील मराठा कॉलनी व हनुमान टेकडी या गृहनिर्माण संस्था प्रयत्नशील असणे, या गृहनिर्माण संस्थांच्या जागा मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे विकासकांनी या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना पैशाचे व निवासी जागेच्या वाढीव क्षेत्राचे आमिष दाखवून आपल्या बाजुचे करुन या ठिकाणच्या झोपडपट्टीधारकांना धाकदपटशा दाखवून बळजबरीने करारनाम्यावर स्वाक्षऱ्या करुन घेणे, प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेच्या यादीत अनेक बोगस सभासदांचा समावेश केलेला असणे, परिश्रम को.ऑ.हौ.सोसायटीच्या सभासदांकरीता बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबीरात १० X १० चे गाळे देण्यात येऊन तेथे पाण्याची व अन्य मुलभूत सुविधा देण्यात न येणे, मुंबई शहरातील ऐन मोक्याची जागा असल्याने विकासकांनी प्रस्तावित गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना हाताशी धरुन होत असलेला भ्रष्टाचार, एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी कोणत्याही योजनेच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट न देता कार्यालयात बसून कागदी घोडे नाचविणे, यामुळे या ठिकाणच्या स्थानिक रहिवाशांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संताप, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित विकासकांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

..3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या निवेदनावरील पहिल्या परिच्छेदात नमूद करण्यात आले आहे की, " मे. ईस्ट ॲन्ड वेस्ट बिल्डर्स यांनी वास्तुविशारद मे.जी.डी.सांभारे ॲन्ड कंपनी यांच्यामार्फत सादर केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावास बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक 3.3.2004 रोजी प्रमाणित केलेल्या परिशिष्ट-2 च्या आधारे मंजुरी देण्यात आलेली असून 100 तात्पुरत्या संक्रमण शिबिराच्या बांधकामास दिनांक 10.10.2004 रोजी मंजुरी देण्यात आलेली आहे. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये संक्रमण शिबिरांचे क्षेत्रफळ किती असावे याबाबत तरतूद नाही. प्रत्यक्ष जागेवर बांधकामासाठी कमी जागा उपलब्ध असल्याने जास्तीत जास्त लोकांचे तात्पुरत्या संक्रमण शिबिरात पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने तात्पुरत्या संक्रमण शिबिराचे क्षेत्रफळ साधारणत: 100 ते 150 चौ.फूट इतके बांधण्यास परवानगी दिलेली असते." मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी गृहनिर्माण जाहीर केले होते त्यावेळी एक पुस्तिका छापली होती. त्या पुस्तिकेमध्ये हे क्षेत्र 185 चौ.फूट असावे असा उल्लेख आहे. आपण या विभागाचे मंत्री असल्यामुळे आपल्याकडे ती पुस्तिका असेलच. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले धोरण डावलून आपणास असे उत्तर देता येईल काय ? पुढे निवेदनात असे नमूद करण्यात आले की, "...पुनर्वसन सदनिकांची उंची मंजूर आराखड्यानुसार 8 फूट 6 इंच (2.6 मीटर ) इतकी आहे. जी विकास नियंत्रण नियमावली 33 (10) मधील परिच्छेद 4 चे नियम 23 चे अधीन राहून देण्यात आलेली आहे." ज्या सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत त्याची उंची 8 फूट 6 इंच इतकी आहे. त्यामुळे त्या इमारतीमध्ये रहिवाशी राहण्यास तयार नाहीत. मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, त्या सदनिकांमध्ये पुनर्वसन मंडळाच्या चार अधिकाऱ्यांना राहण्यासाठी काही दिवस पाठवावे. अजून त्या इमारतीला ओ.सी. मिळालेली नाही. ज्या अधिकाऱ्यांनी हे उत्तर तयार केलेले आहे त्यांना त्याठिकाणी राहण्यास पाठवावे. मग ते चीफ ॲडमिनिस्ट्रेशन ऑफीसर असो वा अन्य अधिकारी असो, त्यांना त्या सदनिकांमध्ये राहण्यास पाठविण्यात येईल काय ?

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

8 फुटाच्या खोल्या बांधल्या असून खोलीमध्ये वर पंखाही लावता येत नाही. असे असताना याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे. हे उत्तर आपल्या प्रशासनातील अधिकाऱ्यांनी दिलेले आहे. गरीब माणसांची फसवणूक करणारे हे एसआरए मंडळ असून एसआरए मंडळाने गरिबांची थट्टा करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे मी मघाशी जे दोन प्रश्न विचारले त्याचे प्रथम माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, संक्रमण शिबीरासाठी क्षेत्रफळ जाहीर झ ाालेले आहे. झोपडपट्टीतील जास्तीत जास्त लोकांना एकाच ठिकाणी रहावयाचे असते. त्यामुळे त्याठिकाणी मोठया क्षेत्रफळाच्या सदनिका बांधल्या तर त्याठिकाणी कमी लोकांना रहावयास मिळेल. लोकांचा एकाच इमारतीत राहण्याचा आग्रह असतो. म्हणून 100 फुटाची, 150 फुटाची सदनिका बांधावी असे काही ठरलेले नसते. तेथील सर्व लोकांना त्याच ठिकाणी ॲकोमोडेट करण्याच्या दृष्टीने सदनिका बांधलेल्या असतात. उपलब्ध जागेनुसार 185 फुटाच्या, 150 फुटाच्या किंवा 100 फुटाच्या सदनिका होऊ शकतात. अशाप्रकारेच त्याठिकाणी लोकांना ॲकोमोडेट करण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यामुळे याबाबतीत तसा काही हार्ड ॲण्ड फास्ट रुल नाही. 10 लोकांचे ॲकोमोडेशन असेल तर 185 फुटाच्या सदनिका करता येतील किंवा 15 लोकांचे असेल तर 150 फुटाचे करता येईल. अशाप्रकारे ॲडजस्ट करुन सदनिका बांधल्या जातात. तसेच, पुनर्वसन विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे खोल्यांची उंची 8.6 इंचाची आहे. त्यापेक्षा उंची कमी आहे, असे काहीही नाही. यासंदर्भातील उंचीच्या प्रमाणानुसार खोल्या बांधलेल्या आहेत. त्यामुळे खोल्यांची उंची कमी जास्त करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, हे सन्माननीय सदस्यांनी प्रथम समजून घ्यावे. याबाबतीतील नियमांनुसारच कार्यवाही झालेली आहे व त्याबाबत आमच्या अधिकाऱ्यांनी इन्स्पेक्शनही केलेले आहे. परंतु याबाबतीत सन्माननीय सदस्यांशा शंका असेल तर आम्ही पुन्हा चौकशी करु. परंतु विभागाच्या अधिकाऱ्यांनी आराखडयानुसार हे काम केलेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : आपले अधिकारी ए.सी. कॅबीन सोडून कधी बाहेर जातात काय ?

..2....

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, यासंदर्भातील माहिती मी घेतलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे चौकशी करण्यास मी तयार आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझी माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरास हरकत आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, पुस्तिका माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रकाशित केली. परंतु अशाप्रकारे कोणतीही पुस्तिका प्रकाशित झाली नाही व ज्यामध्ये क्षेत्रफळ व उंचीचा समावेश असेल अशाप्रकारची पुस्तिका प्रकाशित झाली नाही, असे माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी सांगून रेकॉर्डवर आणावे.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, याबाबतीत माहिती घ्यावी लागेल.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय चुकीचे बोलत आहेत. मूळ लक्षवेधी सूचनेचा गाभा काय आहे ? त्यांच्या विभागाचे अधिकारी याठिकाणी चुकीची माहिती देत आहेत.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली माहिती मी पटलावर ठेवतो.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी संक्रमण शिबिराच्या जागा 185 चौ.फुटाच्या असतील, असे पत्रक माननीय मुख्यमंत्री महोदयांनी काढल्याची माहिती सभागृहात दिली. या पत्रकाबाबत सन्माननीय मंत्रिमहोदयांना काहीही माहिती नाही त्यामुळे त्यांनी ही माहिती पटलावर ठेवतो, असे सांगितले आहे. ही माहिती पटलावर ठेवत असतांना जर त्यामध्ये सत्य आढळून आले तर संक्रमण शिबिरातील जागा 185 चौ.फुटाच्या बांधणार काय ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "न.भू.क्र.629 (भाग), मौजे वांद्रे या भूभागावरील परिश्रम सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या वतीने मे.ईस्ट ॲण्ड वेस्ट बिल्डर्स यांनी वास्तुविशारद मे.जी.डी.सांभारे ॲण्ड कंपनी यांच्यामार्फत सादर केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावास महानगरपालिकेने 3/3/2004 रोजी प्रमाणित केलेल्या परिशिष्ट-2 च्या आधारे मंजूरी देण्यात आलेली असून 100 तात्पुरत्या संक्रमण शिबिराच्या बांधकामास दिनांक 10/10/2004 रोजी मंजूरी देण्यात आलेली आहे." म्हणजेच ज्या झोपडपट्टीसाठी एस.आर.एस.स्किम आणली त्यामध्ये नेमक्या किती झोपडया होत्या, याची निश्‍चित माहिती प्रशासनाला होती. माझा प्रश्न असा आहे की, निश्‍चितपणे परिश्रम सहकारी गृहनिर्माण संस्थेतील झ ोपडपट्टीमध्ये किती झोपडया होत्या व झोपडपट्टीधारक किती ?

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, याबाबत माहिती घेऊन ती पटलावर ठेवतो.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय प्रत्येक प्रश्नाची माहिती पटलावर ठेवणार असतील तर ते येथे उत्तर देण्यासाठी कशाला आले आहेत ? कोणत्या अधिका-याने त्यांना हे उत्तर तयार करुन दिले आहे, त्यांच्याकडे ही माहिती नव्हती काय ?

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : माननीय राज्यमंत्री महोदयांच्या मी हे लक्षात आणून देतो की, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अतिशय महत्वाचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला आहे. चुकीची माहिती अधिका-यांनी सादर केली असेल तर त्याची आपण गंभीर दखल घ्यावी. तसेच, सन्माननीय सदस्यांना हवी असलेली माहिती आपण नंतर पटलावर ठेवावी.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती सुधार हे खाते माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे आहे व त्या खात्याचे राज्यमंत्री ॲड.प्रितमकुमार शेगावकर हे नवीन आहेत. चुकीची माहिती देण्याचा त्यांचा हेतू नाही. कृपया त्यांना सांभाळून घ्यावे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, या खात्याचा कार्यभार माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे व राज्यमंत्री नवीन आहेत म्हणून सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारणे गैर आहे, असे सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांचे म्हणणे आहे. जर लक्षवेधी सूचना स्वीकृत झाली असेल तर त्यामध्ये सांभाळून घेण्याचा प्रश्न येतो कुठे ? आणि सांभाळूनच घ्यायचे असेल तर मग आम्हाला ही लक्षवेधी सूचना मागे घ्यावी लागेल.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांभाळून घ्यावे, असे म्हटले आहे. गैर आहे, असे ते म्हणाले नाहीत. त्यांनी आपल्याला विनंती केली आहे.

श्री.सतीष चतुर्वेदी : सभापती महोदय, एकतर लक्षवेधी सूचना संबंधित मंत्र्यांना उशिरा मिळालेली आहे. त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार ते उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे जर अधिका-यांनी चुकीची माहिती दिली असेल तर तपासून शासन त्यासंबंधी कार्यवाही करेल. तसेच, सन्माननीय सदस्यांना जी अधिकची माहिती हवी आहे, ती पटलावर ठेवण्यास माननीय राज्यमंत्र्यांची तयारी आहे.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्नकरतात.)

**तालिका सभापती** : माननीय मंत्री श्री.सतीश चतुर्वेदी यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्यांना जी माहिती पाहिजे, ती संपूर्ण माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर यांना ही लक्षवेधी सूचना काल रात्री मिळालेली आहे. सभागृहाच्या प्रथेप्रमाणे सन्माननीय सदस्यांना जी माहिती पाहिजे, ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय श्री.सतीश चतुर्वेदी यांच्या म्हणण्याशी आम्ही सहमत आहोत. हे खाते किचकट आहे. गृहनिर्माण खाते भ्रष्टाचाराचे आगार आहे. माझी गृहनिर्माण राज्यमंत्री ॲड.प्रीतमकुमार शेगावकर यांना अशी विनंती आहे की, त्यांनी सांस्कृतिक कार्य, महिला व बाल कल्याण असे सोपे विभाग मागून घ्यावेत.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य शांत राहिले तर लक्षवेधी सूचनेला उत्तर मिळू शकेल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.सतीश चतुर्वेदी असे म्हणाले की, गृहनिर्माण राज्यमंत्री नवीन आहेत. माननीय राज्यमंत्री महोदयांनी माझा प्रश्न शांतपणे ऐकून घ्यावा. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार व अन्य सन्माननीय सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना विचारलेली आहे. लक्षवेधी सूचनेला दिलेल्या लेखी उत्तरातील पहिल्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "....100 तात्पुरत्या संक्रमण शिबीराच्या बांधकामास दिनांक 10/10/2004 रोजी मंजुरी देण्यात आलेली आहे." सर्व झोपडीधारक वर्षानुवर्षे एकत्र राहत असल्यामुळे ते एकाच ठिकाणी राहण्याचा आग्रह धरतात, हे आम्हाला मान्य आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, डी.सी. रुलमध्ये बदल करण्यात आलेला नाही, आपल्याला अधिका-यांनी चुकीची माहिती दिलेली आहे. आता 185 चौ.फुटाऐवजी 225 चौ.फुटाच्या सदनिका बांधण्याबाबतचा निर्णय झालेला आहे. आपण तसा कायदा केलेला आहे. शासनाने शंभर संक्रमण शिबीराच्या बांधकामास परवानगी दिली

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ........

तर मग फक्त 40 झोपडीधारकांचेच स्थलांतर का केले ? माझा प्रश्न असा आहे की, शासन डी.सी. रुल मध्ये बदल करणार आहे काय ? आपण दिनांक 3 मार्च, 2004 रोजी परवानगी दिलेली आहे. म्हणजे आता 40 महिने झालेले आहेत. अद्याप इमारतीच्या बांधकामास सुरुवात झालेली नाही. त्या झोपडीधारकांनी 10 x 10 च्या संक्रमण शिबीरातील कोंडवाडयात किती वर्षे रहायचे ? माझा असा प्रश्न आहे की, नवीन नियमाप्रमाणे संक्रमण शिबीराचे बांधकाम करण्यात येईल काय आणि आवश्यकता असेल तर शासन डी.सी. रुल मध्ये बदल करणार काय ? तसेच, 100 झोपडया आहेत की त्यापेक्षा जास्त आहेत ? झोपडपट्टीधारकांच्या यादीमध्ये बाहेरच्या लोकांना देखील घुसविण्यात आले आहे, याची शासन सी.आय.डी. चौकशी करणार काय ?

यानंतर श्री.गागरे ........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री महोदयांनी सभागृहाला असे सांगावे की, डी.सी. रुल्समध्ये बदल करावयाचा असेल तर ते खाते वेगळे आहे, त्यामुळे सन्माननीय सदस्यांची मागणी विचारात घेऊन संबंधित खात्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल. माननीय सदस्यांनी दुसरी मागणी केली आहे की, सुमारे 100 लोकांची नावे बेकायदेशीररित्या यादीत घातलेली आहेत, त्याबाबत सी.आय.डी. चौकशीची मागणी केलेली आहे. सी.आय.डी. चौकशी करण्यास काही हरकत नाही असे सांगावे. अशी माहिती मंत्री महोदयांनी दिली तर हा विषय संपेल.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, आपण केलेल्या सूचना मान्य असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे मी आश्वासन देतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. मंत्री महोदय नवीन आहेत याची आम्हाला कल्पना आहे, त्यामुळे आम्ही त्यांना जास्त त्रास देऊ इच्छित नाही. परंतु माननीय मंत्री महोदयाच्या मागे काम करणारे एस.आर.ए. मंडळ आहे, त्या लोकांना त्या पदावर क्षणभरही ठेवण्याच्या पात्रतेचेही ते नाहीत. त्यांना गरीबांविषयी जराही कणव नाही. लोकांना लुटण्याचा व त्रास देण्याचा एकमेव व्यवसाय एस.आर.ए. मध्ये चालत आहे. एस.आर.ए. बाबत माझ्याकडे अनेक उदाहरणे आहेत म्हणून मी मागील डिसेंबरमध्ये लक्षवेधी सूचना दिली होती, ती आपल्या कार्यालयाने लावली नाही. तसेच मार्च महिन्यातही लक्षवेधी दिली होती, तरीही ती आपल्या कार्यालयाने लावली नाही. पुन्हा एकदा दि.24.7.2007 रोजी लक्षवेधी दिली तरी ती लावली नाही. काल मी माननीय सभापती महोदयांना भेटलो तेव्हा आज ही लक्षवेधी चर्चेला आलेली आहे. विधानमंडळाचे अधिकारी कसे वागतात त्याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. या योजनेमधील सर्व माणसे गरीब आहेत. वर्षानुवर्षे या झोपडपट्ट्याबाबत काय चालले आहे, याची आपणा सर्वांना माहिती आहे. याबाबत मी वेळोवेळी उल्लेख केला आहे. त्यामुळे मी विनंती करतो की, व्यवस्थित उत्तर मिळण्यासाठी ही लक्षवेधी राखून ठेवण्यात यावी. गरिबांना ट्रान्झिट कँपमध्ये कधी जागा मिळणार आहे ? महाराष्ट्र

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार .....

शासनाने याबाबतच्या निकषाबाबतची पुस्तिकाही छापलेली आहे. ही पुस्तिका बऱ्याच सदस्यांनी वाचलेली नाही व मंत्री महोदयांनीही याची काही माहिती नाही, असे ते म्हणत आहेत. याची छापील प्रत माझ्याकडे आहे. मंत्री महोदयांनी या प्रश्नाचा अभ्यास करुन लक्षवेधीचे उत्तर देणे आवश्यक आहे. त्यामुळे ही लक्षवेधी राखून ठेवण्यात यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, या लक्षवेधीवर कार्यवाही होईपर्यत एस.आर.ए.मंडळावरील लोकांना तेथून हलविण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शासन तशा प्रकारची कारवाई करणार आहे का ? हा माझा प्रश्न आहे. एस.आर.ए.मंडळावर ही माणसे जोपर्यत आहेत, तोपर्यत गरीबांना न्याय मिळणार नाही. "It's studied opinion" मी केवळ आज नाही तर मागील चार वर्ष याचा अभ्यास करीत आहेत. त्यामुळे हा प्रश्न मांडला आहे. मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, श्री.चक्रवर्ती नावाचे अधिकारी व त्यांच्या हाताखालील स्टाफने एस.आर.ए. मध्ये गोंधळ घातला आहे. प्रकरण हायकोर्टामध्ये गेल्यानंतर मध्यंतरी या लोकांनी काही फाईल जाळून टाकल्या आहेत. हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. यामध्ये आमच्या भागातील सोसायटयांची काही प्रकरणे आहेत. माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी याबाबतची दिलेली माहिती सत्य आहे. यामध्ये गरिबांना त्रास होत असल्याने अतिशय पोटतिकडीने हा विषय मी मांडत आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ....

मी त्या लोकांना गेली 40 वर्षे ओळखतो आहे आणि अशा लोकांचे तेथे हाल चालविले आहेत. सभापती महोदय, एसआरए मधील जे अधिकारी आहे ते स्वत: कधीही आपल्या केबिनमधून बाहेर पडत नाही. केवळ खालून आलेले अहवाल पाहतात आणि निर्णय घेतात. तेव्हा या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना सांगेन की, वाटल्यास मी आपल्याला माझ्याबरोबर तेथे घेऊन जाण्यास तयार आहे. आपण माझ्याबरोबर यावे, मी आपल्याला या सोसायट्या दाखवितो आणि मग तुमचे अधिकारी बरोबर आहेत की आम्ही बरोबर आहोत ते आपणच ठरवावे. तेव्हा या विषयाचे गांभीर्य आपण लक्षात घ्यावे आणि कृपा करून त्या गरीब लोकांना जो त्रास होत आहे तो कमी करावा.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे जी सूचना केली तिचा विचार करून, मी आपल्यासह आमच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत एक बैठक घेतो आणि या लोकांचे प्रश्न निकाली काढतो. मला वाटते की, हा प्रश्न निश्चितपणे निकाली निघू शकेल.

**उपसभापती** : आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी एसआरए मधील प्रशासनाबद्दल सांगितले, एका अधिकाऱ्याचे नाव घेऊन त्यांनी उल्लेख केलेला आहे. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. परंतु त्यांच्या हाताखाली जी काही मंडळी काम करतात ती यामध्ये जास्त कारणीभूत आहेत असे मला वाटते. कारण त्यांच्याकडूनच त्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे काम जाते. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेल्या श्री.चक्रवर्ती या अधिकाऱ्याकडून काहीही दिरंगाई होत नाही असे माझे मत आहे. परंतु त्यांच्या हाताखालील जी मंडळी आहेत, मी त्यातील कोणाचेही नाव घेणार नाही, पण मी आपल्याला सांगेन की, मी स्वत: एका प्रकरणामध्ये अनुभव घेतलेला आहे. मी त्या प्रकरणी श्री.चक्रवर्तींना बोलाविले होते आणि त्यांना त्याबाबत विचारणा केली असता त्यांना त्याची काहीही कल्पनाच नव्हती. तेव्हा याही प्रकरणी आपण त्यांना बोलावून घेऊन या प्रश्नाची कल्पना देऊ. माझी खात्री आहे की, त्यांना याबाबत अधिक काही माहिती नसावी. हे एसआरए प्रकरणच असे आहे की, ते साऱ्यांनाच बरोबर घेऊन जाणारे आहे. त्यामुळे यात गरीबांची अडचण होते आहे हे आपले म्हणणे बरोबर आहे, मात्र त्याला कोण कारणीभूत आहे त्याचा सगळा अभ्यास झाला पाहिजे. त्यामुळे आपण याबाबत लवकरात लवकर बैठक लावू ...

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आपण आपल्याच दालनात ही बैठक बोलाविल्यास आणि त्यावेळी आम्हाला देखील बोलविल्यास बरे होईल. ...

...... 4एच 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : ठीक आहे. विधान परिषदेच्या या प्रश्नाशी संबंधित सर्व आमदारांना मी त्या बैठकीस बोलावून घेईन. त्या बैठकीस आपण श्री.चक्रवर्ती साहेबांना देखील बोलावू, त्यांच्याबरोबर संयुक्त बैठकच आपण घेऊ या आणि जे काही आहे ते त्यांच्यासमोर मांडू आणि मग त्यांच्या कार्यालयात नेमके काय चालले आहे ते त्यांनाही कळेल.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे एक महिन्यामध्ये ही बैठक घेतली जाईल.

****

**ल□वेधी सूच□ांसंबंधीची ि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□**

**सहसचिव** : अध्य□ महाराज, मी आपल्या अ□ुमती□ आजच्या दिवसाच्या □म□जाच्या पत्रि□ेतील बाब □ 6-ब च्या अंत□ि दा□वि□यांत आलेल्या ल□वेधी सूच□ांसंबंधीची ि□वेद□ □मां□ 1 ते 213 सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : ि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आली आहेत.

**निवेदने**

( प्रेस : येथे सोबत जोडलेली □मां□ 1 ते 213 ही ि□वेद□ □प्रया छापावी)

........ 4एच 3 ....

असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.** : राज्य सरकारतर्फे गेली 4 वर्षे 'अहिल्यादेवी पुरस्कार' जाहीर न होणे.

**मु.शी.** : राज्य सरकारतर्फे गेली 4 वर्षे 'अहिल्यादेवी पुरस्कार' जाहीर न होणे याबाबत श्री.प्रकाश शेंडगे,वि.प.स., यांनी दिलेली 'विशेष उल्लेखा'ची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी 'विशेष उल्लेख'ची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विषयाबाबत विशेष उल्लेख करतो ....

" सभापती महोदय, समाजातील विशेषत: महिला वर्गातील उल्लेखनीय सामाजिक कामगिरी करणाऱ्या महिलांना राज्य सरकार तर्फे 'अहिल्यादेवी पुरस्कार' दिला जातो. परंतु गेल्या चार वर्षापासून या पुरस्कारासाठी केवळ नामांकने मागविली जातात परंतु प्रत्यक्षात एकाही वर्षामध्ये पुरस्कार दिला गेलेला नाही. हा पुरस्कार देणे राज्य सरकारने बंद केले आहे पण प्रत्यक्षात हा पुरस्कार देणे बंद न करता केवळ अर्ज मागवून कागदोपत्री पुरस्कार देणे चालू आहे आणि यातून संबंधित महिला वर्गाची घोर फसवणूक राज्य सरकारतर्फे चालू आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 4आय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

सदरहू विषय अत्यंत महत्वाचा आणि सार्वजनिक स्वरुपाचा असल्यामुळे आपणामार्फत शासनाला विनंती करतो. गेल्या चार वर्षामधील पेंडींग असलेले पुरस्कार ताबडतोब देण्यात यावेत. आणि येथून पुढें असे प्रकार न घडता महिला वर्गासाठी असलेले पुरस्कार चालू ठेवावेत अशी आपणामार्फत शासनाला विनंती करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : रायगड जिल्हयातील स्थानिक मच्छिमारांचा रोजगार बंद झाल्यामुळे त्यांच्यावर आलेली उपासमारीची वेळ

मु.शी. : रायगड जिल्हयातील स्थानिक मच्छिमारांचा रोजगार बंद झाल्यामुळे त्यांच्यावर आलेली उपासमारीची वेळ याबाबत कर्नल सुधीर सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत, यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"रायगड जिल्हयातील उरण व पनवेल तालुक्यातील खाडया, खाजण जमिनी, मिठागरे, मुखे व किनारे या फिशिंग झोनवरील कोळीवाडा, उरण कोळीवाडा, गव्हाण कोळीवाडा व बेलपाडा कोळीवाडा या ठिकाणी सुमारे 1748 पारंपारिक मच्छिमार कुटुंबे रहात असून ते या फिशिंग झोन शेतीवर मासे पकडणे, मासे निवडणे, मासे विक्री करणे व मासे सुकविणे इत्यादी रोजगार करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. परंतु आता सिडको, जेएनपीटी व ओएनजीसी या तीन कंपन्यांनी या गरीब मच्छिमार कुटुंबाची फिशिंग झोन 365 पिकी शेतजमीन शासनाकडून विकत घेऊन या पिकी शेतीमध्ये सतत भराव घालून जमीन तयार करणे, तसेच खाडयांची मुखे बंद करण्यात येऊन खुदाई करुन माशांची अंडी व कोष टाकण्याच्या जमिनी उद्ध्वस्त केल्या जात आहेत. यामुळे या पारंपारिक स्थानिक मच्छिमारांचा रोजगार बंद होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. हा मच्छिमार समाजाचा जिव्हाळयाचा प्रश्न असून विषय अतिशय गंभीर असल्याने मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील उरण व पनवेल तालुक्यामध्ये सिडको, जेएनपीटी, ओएनजीसी या तीन कंपन्यांनी गरीब मच्छिमार कुटुंबांची फिशिंग झोन 365 पीकीमध्ये असलेली जमीन संपादित केली. जे फिशिंग झोन खाडीमध्ये होते, खाजण जमिनीमध्ये होते ते पूर्णपणे बंद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...

व्हावयाची पाळी आली आहे. त्यामुळे तेथील स्थानिक मच्छिमार कुटुंबे पूर्णपणे रस्त्यावर येणारआहेत. तेथील लोकांचा मच्छिमारीचा हक्क मान्य करुन ते जर विस्थापित होत असतील तर त्यांना योग्य मोबदला देण्यात यावा अशी या विशेष उल्लेखाव्दारे मी आपणास विनंती करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी. : मुंबई सार्वजनिक न्यास कायद्यानुसार धर्मादाय आयुक्त कार्यालयावर टाकलेली जबाबदारी

मु.शी. : मुंबई सार्वजनिक न्यास कायद्यानुसार धर्मादाय आयुक्त कार्यालयावर टाकलेली जबाबदारी याबाबत मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने मुंबई सार्वजनिक न्यास कायद्यानुसार नोंदलेल्या न्यासांचा कारभार व त्यांच्या निधींचा विनियोग ठरलेल्या उद्दिष्टांसाठीच होतो अथवा नाही हे पहाण्याची व चुकार न्यासांना वठणीवर आणण्याची जबाबदारी कायद्याने धर्मादाय आयुक्त कार्यालयावर टाकलेली आहे. परंतु एकंदरीतच धर्मादाय आयुक्तालयाचा व्यवहारच वादग्रस्त आहे. आयुक्तालयामार्फत सुनावणी सुरु असलेल्या नोंदणीकृत न्यासांमध्ये सुध्दा गैरव्यवहार चालू असून त्याची तक्रार धर्मादाय आयुक्तांकडे केली असता त्वरीत कोणतीही कारवाई न होता, आयुक्तांकडून सुनावणीच्या वेळेस फक्त तारखा दिल्या जातात. याचे एक उदाहरण म्हणजे इंस्टिटयुशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स या सार्वजनिक न्यासाकडे नोंदणीकृत असणाऱ्या संस्थेच्या 1998 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील फेरफाराची नोंद वादग्रस्त ठरल्यावर त्याची चौकशी करण्याकरिता धर्मादाय आयुक्तांकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. अशातच संस्थेच्या नावावर असलेले मुंबईतील बॅलॉर्ड पिअर येथील कार्यालयही संस्थेचा बेकायदेशीर ताबा असलेल्या लोकांनी धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय विकून टाकल्याचे संस्थेच्या सभासदांच्या लक्षात आले. त्याबाबत धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार करुनही आयुक्तांकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नाही. संपूर्ण धर्मादाय आयुक्तालयाचा कारभारच वादग्रस्त पध्दतीने चालू असून धर्मादाय आयुक्तालयाच्या कामाच्या पध्दतीचीच विधी व न्याय विभागामार्फत फेररचना होणे गरजेचे आहे".

सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करु इच्छितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी. : तासिका वाढवून मिळण्याबाबत महाराष्ट्र राज्य हिंदी शिक्षक महामंडळाने केलेला ठराव

मु.शी. : तासिका वाढवून मिळण्याबाबत महाराष्ट्र राज्य हिंदी शिक्षक महामंडळाने केलेला ठराव याबाबत रामनाथ मोते, वि.प.स. यां□ दिलेली विशेष उल्ले□ची सूच□.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, "महाराष्ट्र राज्य माध्यमिक हिंदी शिक्षक महामंडळाने राज्यात माध्यमिक शाळांमध्ये हिंदी (संपूर्ण) विषयासाठी वाढीव तासिका मान्य करण्याबाबत केलेला ठराव" या विषयावर विशेष उल्लेखास संमती मिळावी ही विनंती.

राज्यातील माध्यमिक शाळांमधून जे त्रिभाषा सूत्र शासनाने स्वीकारले आहे त्यामध्ये व्दितीय भाषा म्हणून हिंदी विषयाचे अध्यापन केले जाते.हा विषय अनिवार्य आहे, शालांत परीक्षेपर्यंत या विषयाची 100 गुणांची परीक्षा घेतली जाते. विषयानुसार एका आठवडयाला किती तासिकांचा वेळ असावा याबाबत शासनाने निश्चित धोरण केले आहे. सध्या हिंदी विषयासाठी आठवडयातून 27 तासांच्या कामकाजापैकी फक्त दोन घडयाळी तास दिले जातात. पुनर्रचित अभ्यासक्रमामध्ये भरपूर अभ्यासक्रम वाढलेला आहे. त्यामध्ये गद्य-पद्य, त्यानंतर पूरक पाठ, व्याकरण,निबंध, वृत्तांत लेखन, कहानी लेखन, पत्र लेखन इत्यादी विषयांचा समावेश केला असून 100 गुणांच्या या कौशल्याच्या भाषा विषयासाठी दोन तास अपूर्ण पडत आहेत. त्या संदर्भात माध्यमिक हिंदी शिक्षक महामंडळाने शासन स्तरावर वारंवार विनंती केली की, किमान 30 मिनिटांची एक तासिका या विषयासाठी वाढवून द्यावी. याबाबत शासनाने अद्यापि कोणताही निर्णय घेतलेला नाही. म्हणून शासनाला विनंती करतो की, हिंदी शिक्षक महामंडळाने केलेल्या मागणीनुसार हिंदी विषयासाठी एक तासिका वाढवून देण्यात यावी अशी विनंती करतो.

---

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अपंग भरतीबाबत उच्च न्यायालयाने दिलेला स्थगिती आदेश उठविण्याबाबत करावयाची कार्यवाही

मु.शी. : अपंग भरतीबाबत उच्च न्यायालयाने दिलेला स्थगिती आदेश उठविण्याबाबत करावयाची कार्यवाही याबाबत श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यां□ दिलेली विशेष उल्ले□ाची सूच□.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, "अपंग भरतीचा अनुशेष भरुन काढला जात असल्यामुळे माननीय उच्च न्यायालयाने विविध शासकीय विभागातील रिक्त पदे भरण्यास स्थगिती दिली आहे.ज्या शासकीय विभागात अपंग भरतीचा अनुशेष शिल्लक नाही त्या विभागात ही सर्वसाधारण भरती करता येत नाही. सन्माननीय पशुवैद्यकीय राज्यमंत्री यांनीही अनुशेष शिल्लक नसणाऱ्या विभागातील स्थगिती उठविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिलेले आहे. शासनाने विधीमंडळात दिलेल्या आश्वासनानुसार कार्यवाही व्हावी म्हणून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करु इच्छितो." सभापती महोदय, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालये, अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये अपंगांची भरती करण्यासंदर्भात मुंबईच्या उच्च न्यायालयाने शासनाला निर्देश दिले आहेत. त्यानुसार शासनाच्या ज्या ज्या विभागांमध्ये अपंगांची भरती होऊन त्यांचा अनुशेष पूर्ण केला आहे. त्या विभागामध्येसुध्दा शासनाच्या वतीने अन्य कर्मचाऱ्यांची भरती करण्यास निर्बंध घातलेले आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी भरती बंद असल्यामुळे कर्मचाऱ्यांची नियुक्ती होऊ शकत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, ज्या ज्या ठिकाणी अपंगांचा अनुशेष भरलेला आहे, त्या त्या ठिकाणी अन्य कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांना शासनाने प्रतिबंध न करता मान्यता द्यावी. या पूर्वी शासनाने घोषणा केलेली आहे त्याची पूर्तता व्हावी अशी विनंती आहे.

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : 60 वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवासभाड्यात सवलत देण्याची आवश्यकता.

**मु. शी.** : : 60 वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवासभाड्यात सवलत देण्याची आवश्यकता, याबाबत श्री.संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर, यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"केंद्र सरकार देशातील 60 वर्षे वा त्या वरील जेष्ठ नागरिकांना रेल्वेच्या प्रवास भाड्यात तसेच इतर सवलती देते, त्या धोरणानुसार राज्यातील जेष्ठ नागरिकांना ज्यांचे वय 60 वर्षे व त्यापेक्षा जास्त आहे, अशा सर्व ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या व सर्व ठिकाणी अगदी म.न.पा परिसरात सुध्दा अशा प्रकारची सवलत द्यावयास पाहिजे, परंतु तसे न घडता ज्यांचे वय 65 वा त्यापेक्षा जास्त आहे, अशा ज्येष्ठ नागरिकांनाच राज्यपरिवहन महामंडळाच्या फक्त साध्या बसमधून प्रवास भाड्यात सवलत दिली जाते, हा राज्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांवर अन्याय असल्याची भावना निर्माण होऊन, त्या विरोधात ज्येष्ठ नागरिक संघटना सनदशीर मार्गाने शासनाकडे अन्यायाविरूध्द दाद मागत आहे, कृपया ज्येष्ठ नागरिकांच्या भावना व समाजातील त्यांचे स्थान लक्षात घेता, ज्यांचे वय 60 वा त्यापेक्षा जास्त आहे, अशा सर्व ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसमधून तसेच म.न.पा. क्षेत्रातून धावणाऱ्या राज्यपरिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास भाड्यात सवलत देण्यात यावी." सदर विषय अत्यंत महत्वावा व सार्वजनिक हिताचा असून तो मी आज सभागृहात "विशेष उल्लेखा"द्वारे मांडत आहे.

----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : गोंदिया जिल्ह्यातील उपसा सिंचन योजना निधी अभावी बंद पडणे.

**मु. शी.** : गोंदिया जिल्ह्यातील उपसा सिंचन योजना निधी अभावी बंद पडणे, याबाबत श्री.केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर, यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुका अंतर्गत गडमाता उपसा सिंचन, बिजेपार आणि कालीसराड उपसा सिंचन, पांढरवाणी या योजनेचे मागील तीन वर्षापासून रखडलेले काम, निधी अभावी बंद पडलेले सदर काम त्वरित चालू करणे, गडमाता उपसा सिंचन बिजेपार येथील जॉईन्ट मॅनेजमेंटला दहा वर्षे लोटूनही भूसंपादनाची कार्यवाही प्रलंबित असणे, दिनांक 12-09-2005 ला मा. विशेष भूसंपादन अधिकारी, इटिया डोह प्रकल्प, गोंदिया यांचेकडे 2.55 लक्ष रुपयांचा भरणा करूनही शेतकऱ्यांना संपादित जमिनीचे 70 टक्के ॲडव्हान्स पेमेंट अजूनपर्यन्त प्राप्त न होणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता ", सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

---

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील अनेक जिल्ह्यात रेशनिंगवर लाल गहू देण्यात येणे

**मु. शी.** : राज्यातील अनेक जिल्ह्यात रेशनिंगवर लाल गहू देण्यात येणे याबाबत वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री.अरविंद सावंत, यां□ ए□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील अनेक जिल्ह्यात रेशनिंगवर लाल गहू देण्यात येत असल्याबाबतचा मुद्दा विधानपरिषद सभागृहात उपस्थित केल्यावर या लाल गव्हावर बंदी आणण्याचे सभापतींनी निर्देश दिले. परंतु पावसाळ्यात आदिवासी भागात रेशनिंग वाटण्याकरिता आधीच साठा करून ठेवण्यात येतो. त्यावेळी या लाल गव्हाचाही साठा आदिवासी भागात पावसाळ्यापूर्वीच केलेला आहे. त्यामुळे शासनाने बंदीचे निर्देश देऊनही आजही आदिवासी भागात या लाल गव्हाचे वितरण करण्यात येत आहे. या गव्हाची सक्ती केल्याने आदिवासींना 10 किलो तांदूळ कमी प्रमाणात देण्यात येत आहे. एकीकडे न्याय केला परंतु त्याची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने न झाल्याने अजूनही या आदिवासी भागात लाल गव्हाचे वाटप चालू आहे. याबाबत शासनाने ठोस पावले उचलून वा आदिवासी भागात पावसाळ्यापूर्वी केलेला साठा रद्द करून चांगल्या गव्हाचे वितरण करण्याची आवश्यकता असल्याने, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

---



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती तर्फे मुलांच्या मनात वैज्ञानिक जाणिवा निर्माण करण्याच्या नावाखाली हिंदू धर्म विरोधी माहिती पसरविण्याचे होत असलेले कार्य.

**मु. शी.** : महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती तर्फे मुलांच्या मनात वैज्ञानिक जाणिवा निर्माण करण्याच्या नावाखाली हिंदू धर्म विरोधी माहिती पसरविण्याचे होत असलेले कार्य याबाबत श्री.अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.अरविंद सावंत यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत : (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील 10 वी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणिवा निर्माण करण्यासाठी डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या "महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती" तर्फे (अंनिस) सर्व शासकीय व खाजगी शाळेत वैज्ञानिक जाणिवा प्रकल्पांतर्गत लहान मुलांच्या मनात वैज्ञानिक जाणिवा निर्माण करण्याच्या नावाखाली हिंदुधर्म, धर्मग्रंथ, देवता, संत, राष्ट्रपुरुष, धार्मिक उत्सव, सण, व्रते, प्रथा, परंपरा, मंदिरे व तीर्थक्षेत्रे या विषयी असलेल्या श्रध्दांवर घाला घालण्याचे व सुसंस्कार नष्ट करण्याचे धर्मद्रोही व राष्ट्रद्रोही कृत्य या संस्थेमार्फत केले जात आहे. याकरिता या संस्थेद्वारे "वैज्ञानिक जाणिवा" हे पुस्तक शिक्षक व विद्यार्थ्यांना 10 रुपयांना विकले जाते व त्या अंतर्गत ज्या प्रश्नपत्रिका दिल्या जातात, त्यात विचारण्यात येणारे प्रश्न हे अंधश्रध्दा निर्मूलनाच्या दृष्टीने नसून "श्रध्दा निर्मूलन" करण्याकरिता विचारलेले आहेत. यातील काही प्रश्न हे अंधश्रध्दा निर्मूलनाच्या दृष्टीने काही उपयोगाचे नाहीत. उदा.मेधा पाटकर यांचा मोठया धरणांना विरोध का आहे ? व महाराष्ट्रामध्ये "एन्रॉन कंपनीला विरोध का झाला ? अशा प्रकारचे आहेत. या प्रश्नांचा व अंधश्रध्दा निमूर्लन याचा संबंध काय आहे ? यामुळे राज्यातील कोवळया बालमनावर धर्माच्या विरोधातील मते व कुसंस्कारच घडविले जात असून ज्ञानदानसारख्या पवित्र क्षेत्रातून अशा प्रकारची हिंदू धर्मविरोधी माहिती हेतूपुरस्सर पसरविण्याचे कार्य करीत असलेल्या या संस्थेवर समाजघातक व धर्मद्रोही कृत्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरू.....

केल्याबाबत कडक कारवाई करण्याची आवश्यकतता आहे. तसेच, या कार्यक्रमांना जे संबधित अधिकारी परवानगी देत आहेत, त्यांनी या प्रकल्पांची संपूर्ण चौकशी करुन त्यांना परवानगी नाकारणे आवश्यक असतांना या प्रकल्पाला हातभार लावल्याबाबत त्यांच्यावरही कारवाई करणे आवश्यक आहे. राज्यातील भावी पिढी स्वैराचारी व नास्तिक होऊ नये याकरिता शासनाने कडक धोरण राबविणे गरजेचे असल्याने या प्रकरणी शासनाने तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, राज्यातील 10 वी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणिवा निर्माण करण्याच्या नावाखाली डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीतर्फे कार्यक्रम राबविला जातो. त्यामध्ये हिंदू धर्माचा अवमान करण्याचे काम जोरदार सुरू आहे. या संस्थेकडून वैज्ञानिक जाणिवा नावाचे पुस्तक ते 10 रुपयाला विकतात. त्यामधून अतिशय वाईट प्रश्न विचारतात. उदाहरणादाखल मी ते वाचून दाखवितो :- वटपोर्णिमा व्रतामागील अंधश्रद्धा कोणती ? 'शनि'संबंधी अंधश्रद्धा कोणती ? शनिशिंगणापूर प्रमाणे घरांना व घरातील खोल्यांना, कपाटाला, संडासाला दारे नसल्यास काय अडचण होईल ? 'पिंडास कावळा शिवणे' यामागे अंधश्रद्धा कोणत्या ?

यानतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

मेधा पाटकर यांचा मोठ्या धरणांना विरोध का आहे ? महाराष्ट्रामध्ये एन्रॉन कंपनीला विरोध का झ ाला ? म्हणजे वैज्ञानिक जाणिवा बाजूलाच राहिल्या. हे असले नसते उद्योग ते करीत आहे. यामुळे बीड, अंबेजोगाईमध्ये अत्यंत जोरदार आंदोलन झाले.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी अशा पध्दतीने एखाद्या व्यक्तीचा उल्लेख करणे बरोबर नाही.

श्री. दिवाकर रावते : नरेंद्र दाभोळकरांना हिंदूच्या भावना दुखविण्याचा काय अधिकार आहे ? आपण त्यांचे दलाल आहात काय ?

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. अरविंद सावंत : माझा विशेष उल्लेख मांडून पूर्ण होऊ द्यावा. विशेष उल्लेखावर हरकतीचा मुद्दा असू शकत नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी असंसदीय शब्द वापरलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य बसतात. आपल्या भावना मान्य आहेत. आपण भावना व्यक्त कराव्यात परंतु .....

श्री. दिवाकर रावते : मी असंसदीय शब्द वापरलेला नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना त्यांचा विशेष उल्लेख पूर्ण करु द्यावा.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, वैज्ञानिक जाणिवा या अंतर्गत दिनांक 16 व 17 जुलै,2007 रोजी अनेक उपक्रम घेतले गेले आणि या उपक्रमामध्ये वैज्ञानिक जाणिवा या गोंडस नावाखाली अंधश्रध्दा निर्मुलन समितीतर्फे श्रध्देचे निर्मुलन कसे होईल याचा प्रयत्न केला गेला. सभापती महोदय, या विरुध्द त्या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अनेक वेळा पोलिसांकडे तक्रार केली. त्यांच्या विरुध्द गुन्हा सुध्दा दाखल झाला. हे शासन निधर्मी आहे असे आपण म्हणतो.

श्री. अरविंद सावंत ....

निधर्मी शासनाने केवळ हिंदूंच्या श्रध्दास्थानावर टीका करणाऱ्या अंधश्रध्दा निर्मुलन समितीला शासकीय व्यासपीठावर विषय मांडण्यासाठी संधी देणे हे भारतीय राज्य घटनेच्या कलम 25, 26, व 29 च्या विरोधात तसेच धार्मिक भावना दुखावण्याबाबतचे भारतीय दंडविधान संहितस कलम 295 (अ) नुसार अजामीनपात्र दंडनीय अपराध आहे, हे लक्षात घेऊन शासनाने या अंधश्रध्दा निर्मुलन समितीला अशा प्रकारचा कार्यक्रम घेण्यास बंदी घालावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उपसभापती** : विशेष उल्लेखावर हरकतीचा मुद्दा असतो काय ?

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्ड होऊ नये म्हणून सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सांवत यांनी श्री. नरेंद्र दाभोळकर यांच्या पुस्तिकेचा उल्लेख केला. विवेक जागर या नावाने ते अभियान चालवित आहेत. भारतीय घटनेने वैज्ञानिक दृष्टीकोनाचा....

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : राज्यात खाजगी प्राथमिक शाळांमध्ये शिपाई व लिपिक नेमण्याची आवश्यकता

**मु. शी.** : राज्यात खाजगी प्राथमिक शाळांमध्ये शिपाई व लिपिक नेमण्याची आवश्यकता याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" राज्यात प्रत्येक मान्यताप्राप्त माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये शासनाने शिक्षक कर्मचारी तसेच त्या शाळांना आवश्यक निकषाप्रमाणे देय असलेल्या लिपिक व सेवकवर्ग दिलेला असणे, परंतु माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये जास्त पटीने संख्या असलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना आजपर्यंत लिपिक व सेवकवर्ग नसल्यामुळे ही सर्व कामे तेथील शिक्षक, मुख्याध्यापकांना करावी लागतात. उलट प्राथमिक शाळेत लहान-लहान मुले असतात त्यांची काळजी, देखभाल घेणे गरजेचे असताना राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांमध्ये शिपाई व लिपिक यांची पदे न दिल्याने पालकवर्गात पसरलेला तीव्र असंतोष पसरलेला आहे. भविष्यामध्ये प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये तेथील विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात 1 लिपिक आणि सेवकवर्ग देणे गरजेचे आहे. म्हणून भविष्यामध्ये या प्राथमिक शाळांमध्ये 1 सेवक आणि किमान 1 लिपिक द्यावा अशा प्रकारची सूचना मी आपल्यामार्फत या विशेष उल्लेखव्दारे मांडत आहे.

----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : डोंबिवली व कल्याण स्टेशन परिसरात फेरीवाल्यांचे वाढत असलेले प्रमाण

**मु. शी.** : : डोंबिवली व कल्याण स्टेशन परिसरात फेरीवाल्यांचे वाढत असलेले प्रमाण याबाबत श्री. संजय दत्त वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री. संजय दत्त यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

डोंबिवली व कल्याण स्टेशन परिसरात फेरीवाल्यांचे प्रमाण प्रचंड वाढत आहे. फेरीवाल्यांच्या वाढत्या प्रमाणामुळे सर्वसामान्य जनतेला रस्त्याने चालणे अत्यंत कठीण झाले आहे. तसेच कल्याण व डोंबिवली शहर परिसरात वाहतूक व्यवस्थेचा पूरता बोजवारा उडाला आहे. फेरीवाल्यांनी पदपथावर तसेच रस्त्यांवर केलेले अतिक्रमण हटविण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपलिकेच्या आमसभेमध्ये ठराव होऊन तसेच सर्वोच्च न्यायालयाचे रल्वे स्टेशन परिसरातील 150 मीटर जागेमध्ये ना फेरीवाला क्षेत्राचे आदेश असताना सदर आदेशाचा अवमान राजरोसपणे केला जात आहे. फेरीवाल्यांचे आणि महानगरपालिका अधिकारी व पोलीस यांचे साटेलोटे असल्याने त्यांच्यावर कारवाई होत नाही असा समज जनतेत पसरला आहे. परिणामी जनता त्रस्त झाली आहे. जनतेला तातडीने दिलासा देण्यासाठी फेरीवाल्याचे तातडीने हॉकर्स झोनमध्ये स्थलांतर करण्याची गरज आहे. या सार्जनिकदृष्ट्या अत्यंत महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

सभापती महोदय, या संदर्भात मी आपणास विनंती करतो की, हे अधिवेशन संपल्यानंतर या प्रकरणी सर्व संबंधितांची बैठक आपण आपल्या दालनात बोलवावी आणि हा प्रश्न मार्गी लावण्यात पुढाकार घ्यावा.

**उपसभापती** : मान्य.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, धन्यवाद.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## माहितीच्या मुद्याबाबत

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. या ठिकाणी सामाजिक न्याय विभागाचे मंत्री उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी अंधश्रध्देच्या संबंधात विशेष उल्लेख मांडला. अंधश्रध्देच्या संदर्भातील विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे गेलेले आहे. माननीय सामाजिक न्याय मंत्री हे त्या समितीचे चेअरमन आहेत. माझी त्यांना अशी विनंती आहे की, त्यांनी संयुक्त समितीच्या बैठका घ्याव्यात. या बैठका घेताना समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांना निमंत्रणे मिळालेली आहेत की नाहीत याची त्यांनी कृपा करुन खात्री करावी. अन्य वैधानिक समित्यांच्या तीन-तीन बैठका असताना आपण बैठक बोलावली. दुसरी बैठक 30 जुलै रोजी घेण्यात आली. त्या बैठकीचे निमंत्रण आम्हाला कोणालाही मिळालेले नाही एवढेच मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांचे म्हणणे बरोबर आहे. संयुक्त चिकित्सा समिती स्थापन झाल्यानंतर त्या समितीच्या दोन बैठका झाल्या. पहिली बैठक 27 जूनला झाली. त्या बैठकीमध्ये विधेयकाच्या संदर्भात जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी आपण 1 महिन्याचा अवधी दिलेला होता. त्यानंतर विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. रामदास कदम यांचे मला 30 जुलैला पत्र आले की, लोकांना विधेयकाच्या प्रती वेळेवर मिळाल्या नसल्यामुळे या विधेयकाच्या संदर्भात जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी दिलेला 1 महिन्याचा कालावधी पुढे आणखी एक महिन्याने वाढवून द्यावा. त्यामुळे जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी आणखी 1 महिन्याची मुदत वाढवून देण्यासाठी 30 जुलैला तातडीने बैठक बोलावण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये आपण जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी 1 महिन्याची मुदत वाढवून दिलेली आहे. यापुढे समितीच्या बैठका सर्वांच्या सवडीनुसार घेण्यात येतील.

श्री. उल्हास पवार : मला देखील 30 जुलैच्या बैठकीची कल्पना नव्हती. माझी विनंती आहे की, आपण ज्या सूचना आणि हरकती मागविलेल्या आहेत त्याबाबतीत सर्व लोकांना माहिती होईल यादृष्टीने कार्यवाही करावी.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : या विधेयकाच्या संदर्भात हरकती व सूचना मागविण्यासाठी एक महिना मुदतवाढ दिलेली आहे असे लोकांना वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन कळवावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : अंधश्रध्देच्या संदर्भातील विधेयक चिकित्सा समिती समोर आहे. या विधेयकाच्या संदर्भात जनतेकडून ठराविक मुदतीमध्येय हरकती व सूचना मागविल्या पाहिजेत.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MAP/ KGS प्रथम श्री.शिगम एम. ............ 17:25

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी......

जर या ठिकाणी आपल्याला या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता मुदतवाढ द्यावयाची होती तर विधानसभेचे विरोधी पक्षनेता श्री.रामदास कदम यांनी यासंदर्भात एक पत्र लिहिल्यानंतर त्याअनुषंगाने केवळ तुम्ही दोन तीन लोकांनी बसून यासंदर्भात निर्णय घेणे, ही पध्दत बरोबर नाही. आपल्या सचिवालयाने ही बैठक बोलवायला पाहिजे होती. सदर संयुक्त समितीच्या पुढच्या कुठल्याही बैठकीमध्ये आपण ही खबरदारी घ्यावी की, प्रत्येक बैठकीला सर्व सदस्य हजर राहण्यासाठी वेळेवर निमंत्रणे पाठविली जातील आणि ती त्यांना मिळाली याचा पुरावा कार्यालयाकडून आपल्याकडे ठेवला गेला पाहिजे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सदर विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविल्यानंतर कोणाच्याही श्रध्दा आणि अंधश्रध्दा दुखविण्याचा प्रश्न राहणार नाही.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4M - 2

**पृ.शी.**: जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक.
**मु.शी.**: सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 89 -महाराष्ट्र जादुटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव.

श्री.चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : अध्यक्ष महाराज,सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 89 - अंधविश्वास आणि अज्ञानावर पोसल्या जाणा-या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे मानसिक,शारीरिक व आर्थिक शोषण करुन त्यांचे नुकसान करण्याच्या,व त्याद्वारे समाजाची घडी विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने वैदू व भोंदूबाबा यांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणा-या तथाकथित अतींद्रिय किंवा अतिमानुष शक्ती किंवा चमत्कार करुन भूतपिशाच्य यांच्या नावाने जनमानसात रुजवलेल्या अंध विश्वासापोटी निर्माण होणा-या अनिष्ट व दुष्ट प्रथांचा व अघोरी रुढींचा मुकाबला करुन त्याचे समूळ उच्चाटन करण्याच्य दृष्टीने यासंबंधात समाजामध्ये जागृती व जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच निकोप व सुरक्षित यासंबंधात समाजामध्ये जागृती व जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच निकोप सुरक्षित वातारण निर्माण करण्याकरिता,आणि तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक यावर विचार करण्याकरिता दिनांक 17 एप्रिल,2007 रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानपरिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------



JPK/ MAP/ KGS        प्रथम श्री.शिगम एम. ............        17:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## दहावीच्या अभ्यासक्रमातील मराठी विषयाच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुका याबाबत चौकशी करुन उपाययोजना सुचविण्यासाठी तदर्थ समिती नियुक्त करणे.

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम 163 अन्वये खालील प्रस्ताव मांडतो.

दिनांक 19 जुलै, 2007 रोजी विधानसभा सभागृहात उत्तरीत झालेल्या श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.स.स. यांच्या "दहावीच्या अभ्यासक्रमातील मराठी विषयाच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुका" या विषयावरील लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची तदर्थ समिती नियुक्ती करण्यात यावी.

या समितीमध्ये 15 सन्माननीय सदस्यांपैकी 11 सन्माननीय सदस्य विधानसभेचे व 4 सन्माननीय सदस्य विधानपरिषदेचे खालीलप्रमाणे असतील.

1. प्रा.वसंत पुरके, माननीय शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री
2. श्री.पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद
3. श्री.हसन मुश्रीफ, माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री
4. श्री.संजय देवतळे, वि.स.स.
5. श्रीमती शोभा बच्छाव, वि.स.स.
6. श्री.चंद्रकांत उर्फ बाळासाहेब शिवरकर, वि.स.स.
7. प्रा.तुकाराम बिरकड, वि.स.स.
8. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.
9. श्री.सत्यजित पाटील, वि.स.स.
10. श्री.सुनील केदार, वि.स.स.
11. श्रीमती शोभा फडणवीस, वि.स.स.
12. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
13. श्री.उल्हास पवार, वि.प.स.
14. ॲड.गुरुनाथ कुलकर्णी. वि.प.स.
15. श्री.धोंडीराम राठोड, वि.प.स.

4M - 4



श्री.हसन मुश्रीफ.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

1) इयत्ता 10 वीच्या इतर विषयांच्या पुस्तकात चुका कशा राहिल्या याबाबत जबाबदारी निश्चित करणे.

2) इयत्ता 10 वीच्या "कुमारभारती" पुस्तकाच्या पुनर्छपाई करण्यामध्ये शासनाच्या झालेल्या नुकसानीची भरपाई.

3) पाठ्यपुस्तके निर्दोष होण्याचे व वेळेवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तक निर्मिती प्रक्रिया व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आणि महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ( बालभारती ) यामधील परस्पर समन्वय कार्यपध्दती याबाबत शिफारस करणे.

असे प्रकार भविष्यात पुन्हा होऊ नयेत म्हणून सर्व विषयांची अभ्यासमंडळे गठीत करणे व त्यांची जबाबदारी आणि कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत शिफारस करणे.

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 17:30

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, याविषयाच्या बाबतीत या सदनामध्ये अशी चर्चा झाली होती की, विधानपरिषदेच्या सदस्यांची समिती नेमायची आणि एका आठवडयाच्या आत निर्णय घ्यावयाचा. त्याचवेळी आमच्याकडून नांवे घेण्यात आली. प्रत्येक पक्षाची 2/2 नांवे दिलेली होती. त्याप्रमाणे समिती घोषित करण्याचे ठरले.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, समितीमध्ये नांवे कमी असतील तर विरोधी पक्षाने नांवे सुचवावीत ती समितीमध्ये ॲड करतो. दोन्ही सभागृहाच्या सदस्यसंख्येच्या प्रमाणात समितीमध्ये नांवे असणे आवश्यक आहे. नांवे ॲड केल्यावर त्याला सभागृहाची मान्यता घेतली पाहिजे आणि पुन्हा त्यानंतर विधानसभेची त्याला मान्यता घ्यावी लागेल.

**उपसभापती** : विधानपरिषदेच्या 4 माननीय सदस्यांची नांवे समितीमध्ये आलेली आहेत. सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. विरोधी पक्षनेत्यांनी नांवे वाढवून द्यावयाची असतील तर नांवे ताबडतोब पाठवावीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि मधुकर चव्हाण यांची नांवे दिली होती. ज्यांनी विषय मांडला त्यांचीच नांवे समितीमध्ये नाहीत.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि श्री. मधुकर चव्हाण यांची नांवे समितीमध्ये ॲड करतो. दोन्ही सदनाची 15 सदस्यांची समिती करीत असताना सभागृहाच्या सदस्यसंख्येच्या प्रमाणात समिती सदस्यांची नांवे असली पाहिजेत. कमिटी मोठी केली तर निर्णय होत नाही. कोणत्या सदस्यांची नांवे द्यावयाची हा विरोधीपक्षाचा अधिकार आहे. विषय उपस्थित करणाऱ्या सदस्यांची नांवे द्यावयाची की अन्य कोणाची नांवे समितीमध्ये द्यावयाची हा त्यांचा अधिकार आहे.

**उपसभापती** : मी हा प्रस्ताव राखून ठेवतो. नांवे ॲड झाल्यावर प्रस्ताव वाचतो.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हा प्रस्तावच अपूर्ण आहे. याठिकाणी प्रस्ताव मांडताना म्हटले आहे की, दिनांक 19 जुलै 2007 रोजी विधानसभा सभागृहात उत्तरीत झालेल्या श्री. अमरसिंह पंडित व इतर वि.स.स. यांच्या "दहावीच्या अभ्यासक्रमातील मराठी विषयाच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुका" या विषयावरील लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी मा.शालेय शिक्षण राज्यमं)ी यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची तदर्थ समिती नियुक्त करण्यात यावी"

....2

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ....

या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे आणि त्यावेळी निर्णय झाला की अशी एक समिती नेमायची आणि ती नेमत असताना खालच्या सदनाचे काही माननीय सदस्य आणि वरच्या सदनाचे काही माननीय सदस्य अशी संयुक्त समिती करावयाची.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विधानसभेमध्ये यावर चर्चा झाली होती तेथे निर्णय झाला आणि येथे घोषणा केली.

**उपसभापती** : मी हा प्रस्ताव राखून ठेवतो. सुधारित प्रस्ताव 15 मिनिटात सादर केला जाईल.

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणीकरिता तदर्थ समिती नियुक्त करणे.**

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानपरिषद नियम 189 अन्वये खालील प्रस्ताव मांडतो :-

दिनांक 25 जुलै,2007 रोजी धर्मादाय रुग्णालयांच्या संदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेबाबत झालेल्या चर्चेच्या वेळी आश्वासित केल्यानुसार रुग्णालयाच्या तपासणीकरिता विधानपरिषदेच्या सदस्यांची तदर्थ समिती गठीत करण्यात यावी आणि या समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

1. श्री. हसन मुश्रीफ , विधी व न्याय राज्यमंत्री तथा समिती प्रमुख
2. श्री. गोविंदराव आदिक, वि.प.स.
3. श्रीमती सुधा जोशी, वि.प.स.
4. श्री. संजय दत्त, वि.प.स.
5. श्री. जितेंद्र आव्हाड, वि.प.स.
6. श्रीमती फौजिया खान, वि.प.स.
7. श्री. मधुकर चव्हाण, वि.प.स.
8. डॉ. दीपक सावंत, वि.प.स.
9. श्री. जयंत पाटील, वि.प.स.

तसेच सदर समितीच्या कार्यकक्षा मुंबई महानगरपालिका क्षेत्र असून समिती खालील विषयावर अभ्यास करुन सभागृहास अहवाल सादर करेल

1. दिनांक 11 जुलै 2006 रोजी मुंबईमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटातील जखमींना धर्मादाय हॉस्पिटलमध्ये देण्यात आलेल्या उपचाराबाबत व त्यांना आकारण्यात आलेल्या फी बाबत.
2. मुंबईतील लिलावती, हिंदुजा, जसलोक व इतर अशा धर्मादाय रुग्णालयांनी मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या कलम 41 अ मधील अटीनुसार गरीब व आर्थिक दृष्टीने दुर्बल घटकातील रुग्णांवर मोफत अथवा सवलतीच्या दराने उपचार करण्यास दिलेल्या नकाराबद्दल.

..4..



श्री. हसन मुश्रीफ ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदर समितीने आपला या संदर्भातील अहवाल पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सभागृहास सादर करावा.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती**: श्री. हसन मुश्रीफ, राज्यमंत्री विधी व न्याय यांना मी या तदर्थ समितीचा समिती प्रमुख म्हणून नियुक्त करतो.

--------

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>तदर्थ समितीचे पुनर्गठन</u>**

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, ज्यावेळी दोन्ही सभागृहाची संयुक्त समिती निर्माण केली जाते त्यावेळी रेशो ठरलेला आहे. विरोधी पक्षाच्या वतीने जर इतकी नावे दिली जाणार असतील तर किती सदस्यांची समिती नियुक्त करावयाची?

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी यांनी उल्लेख केला आहे. दिनांक 19 जुलै, 2007 रोजी विधानसभा सभागृहात उत्तरीत झालेल्या प्रश्नाच्या संदर्भात ही समिती नियुक्त केली जात आहे असे मंत्रीमहोदय देखील म्हणाले आहेत.

श्री.आर.आर.पाटील : विधानपरिषद सभागृहाची समिती करावी अशी अपेक्षा आहे का?

श्री.पांडुरंग फुंडकर : पहिल्यांदा या सभागृहात या विषयावर लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती हे मला आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे.

श्री.आर.आर.पाटील : चर्चा कोणत्या सभागृहात झाली यावर वाद घालू नये. खालचे सभागृह 5.45 वाजता स्थगित होणार आहे. या सभागृहात मंजूर होणारा प्रस्ताव खालच्या सभागृहात मंजूर व्हावा लागेल. अन्यथा समिती अस्तित्वात येणार नाही.

श्री.मधुकर चव्हाण : आम्ही जी नावे दिली आहेत ती समितीमध्ये अंतर्भूत करावीत.

श्री.आर.आर.पाटील : दोन्ही सभागृहाची 15 सदस्यांची संयुक्त समिती करावयाचे ठरले आहे. विरोधी पक्षाच्या बाजूने किती नावे समाविष्ट करावयाची आहेत?

श्री.मधुकर चव्हाण : मंत्रीमहोदयांनी शिवसेना व भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रत्येकी दोन नावे लिहून मागितली होती त्यानुसार आम्ही नावे कळविली होती. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे या विषयावर या सभागृहात पहिल्यांदा चर्चा झाली होती.

**उपसभापती** : ठीक आहे. मंत्रीमहोदयांनी सुधारित प्रस्ताव मांडावा.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दहावीच्या अभ्यासक्रमातील मराठी विषयाच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुका याबाबत चौकशी करुन उपाययोजना सुचविण्यासाठी तदर्थ समिती नियुक्त करणे.**

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम 163 अन्वये पुढीलप्रमाणे सुधारित प्रस्ताव मांडतो.

दिनांक 19 जुलै, 2007 रोजी विधानसभा सभागृहात उत्तरीत झालेल्या श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.स.स. यांच्या "दहावीच्या अभ्यासक्रमातील मराठी विषयाच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुका" या विषयावरील लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची तदर्थ समिती नियुक्ती करण्यात यावी.

सुधारणा केल्याप्रमाणे या समितीमध्ये 20 सन्माननीय सदस्यांपैकी खालीलप्रमाणे 11 सन्माननीय सदस्य विधानसभेचे व 9 सन्माननीय सदस्य विधानपरिषदेचे असतील.

16. प्रा.वसंत पुरके, माननीय शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री
17. श्री.पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद
18. श्री.हसन मुश्रीफ, माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री
19. श्री.संजय देवतळे, वि.स.स.
20. श्रीमती शोभा बच्छाव, वि.स.स.
21. श्री.चंद्रकांत उर्फ बाळासाहेब शिवरकर, वि.स.स.
22. प्रा.तुकाराम बिरकड, वि.स.स.
23. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.
24. श्री.सत्यजित पाटील, वि.स.स.
25. श्री.सुनील केदार, वि.स.स.
26. श्रीमती शोभा फडणवीस, वि.स.स.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

27. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

28. श्री.उल्हास पवार, वि.प.स.

29. ॲड.गुरुनाथ कुलकर्णी. वि.प.स.

30. श्री.धोंडीराम राठोड, वि.प.स.

31. श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स.

32. श्री.कपिल पाटील, वि.प.स.

33. श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, वि.प.स.

34. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

35. डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

या समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

1) इयत्ता 10 वीच्या इतर विषयांच्या पुस्तकात चुका कशा राहिल्या याबाबत जबाबदारी निश्चित करणे.

2) इयत्ता 10 वीच्या "कुमारभारती" पुस्तकाच्या पुनर्छपाई करण्यामध्ये शासनाच्या झालेल्या नुकसानीची भरपाई.

3) पाठ्यपुस्तके निर्दोष होण्याचे व वेळेवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तक निर्मिती प्रक्रिया व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आणि महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ( बालभारती ) यामधील परस्पर समन्वय कार्यपध्दती याबाबत शिफारस करणे.

4) असे प्रकार भविष्यात पुन्हा होऊ नयेत म्हणून सर्व विषयांची अभ्यासमंडळे गठीत करणे व त्यांची जबाबदारी आणि कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत शिफारस करणे.

सदर समितीने या संदर्भातील अहवाल पुढील अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात सादर करावा.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

02-08-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4O.4

SGB/ MAP/ KGS/ 17:35

**पृ.शी.**: महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक.

**मु.शी.**: सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक-28 महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधी नगरविकास राज्यमंत्री यांचा प्रस्ताव.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2004 वि.प.वि.क्रमांक-28 महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक यावर विचार करण्यासाठी दिनांक 20 जुलै, 2006 रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानपरिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक 21 बाबत**</u>

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, नियम 93 अन्वये असलेले निवेदन क्रमांक 21 मागे ठेवण्यात आले होते ते घेण्यात यावे अशी विनंती आहे.

**उपसभापती** : आपले जे एकविसावे निवेदन आहे ते अजूनही झालेले नसल्यामुळे पुढील अधिवेशनात घेण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, निवेदन क्रमांक 21 हे पुढील अधिवेशनात घेण्यापेक्षा या निवेदनाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी मला वेळ दिला तर मी त्यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा करुन मार्ग निघू शकेन.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांबरोबर चर्चा करुन त्यांचा प्रश्न सोडविण्यात येईल.

<u>**नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक 19 बाबत**</u>

**उपसभापती** : निवेदन क्रमांक 19, हे सुध्दा पुढील अधिवेशनात घेण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 93 अन्वये 19 वी सूचना, झोपडपट्टी संबंधिची आहे. या ठिकाणी आता माननीय मंत्रीमहोदय उपस्थित नसल्यामुळे ही सूचना पुढील अधिवेशनात घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

<u>**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील निवेदनाबाबत**</u>

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता आज तागायत त्याचे निवेदन झालेले नाही.

**उपसभापती** : सभागृहात आता संबंधित मंत्री उपस्थित नसल्यामुळे पुढील अधिवेशनात सभागृहापुढे सदर निवेदन ठेवण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर दुस-या मंत्र्यांनी निवेदन करावे. निवेदन करणे ही मंत्र्यांची सामुदायिक जबाबदारी आहे. सामुदायीक जबाबदारी असल्यामुळे कोणाही मंत्र्यांना निवेदन वाचावयास सांगावे. संबंधित मंत्री उपस्थित नाहीत म्हणून निवेदन करावयाचे नाही असे चालणार नाही. सामुदायिक जबाबदारी असल्यामुळे कोणत्याही मंत्र्यांनी संबंधित निवेदन वाचावे किंवा वितरित करावे. निवेदन न करणे असे कसे चालेल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेब आपण जरा विनंती करावयास शिका. असे काय, तसे काय असे म्हणणे बरोबर नाही. सभागृहाचा कृपया आपण डेकोरम पाळावा.

श्री. कपिल पाटील : सभागृहाचा डेकोरम सरकार पाळत नाही ना. डेकोरम कोणी पाळावयाचा आहे ?

**उपसभापती** : सभापतींना उद्देशून असे बोलणे ठीक नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपल्याला उद्देशून बोलत नसून शासनाला उद्देशून बोलतो आहे. सदर निवेदन करण्याच्या सदंर्भात आपणच शासनाला आदेश दिलेले आहेत.

**उपसभापती** : ठीक आहे. उपस्थित माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन वाचून दाखवावे.

----

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अंधेरी येथील जानकी देवी पब्लिक स्कुलमध्ये तरणतलावात बुडून विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू

मु. शी. : अंधेरी येथील जानकी देवी पब्लिक स्कुलमध्ये तरणतलावात बुडून विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू याबाबतच्या नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नगरविकास राज्यमंत्री यांचे निवेदन

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : जानकी देवी ट्रस्ट संचालित, जानकी देवी पब्लिक स्कुल, अंधेरी या शाळेमध्ये इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचा वर्ग आयसीएसई संलग्नीत असून इयत्ता आठवी ते इयत्ता दहावीचे पर्यंतचे वर्ग राज्यमंडळांशी संलग्नीत आहेत. या शाळेच्या इयत्ता दुसरीच्या अभ्यासक्रमात पोहण्याचा विषय समाविष्ट आहे. दिनांक 24.7.2007 रोजी सायंकाळी 4.00 वाजता इयत्ता दुसरीतील गट, शाळेच्या तरणतलावात पोहण्यासाठी गेले होते. त्यामध्ये इयत्ता दुसरीतील विद्यार्थी कु. हरेकृष्ण सिंग यांचाही समावेश होता. कु. हरेकृष्ण यास फ्लोट बांधून प्रशिक्षकांनी त्याला तरणतलावात पोहण्यासाठी उतरवले होते. त्या ठिकाणी दोन प्रशिक्षक उपस्थित होते. कु. हरेकृष्ण सिंग याने तरणतलावात गेल्यानंतर त्यास बांधण्यात आलेले फ्लोट काढून टाकल्यामुळे तो तरणतलावात पोहतांना पाण्यात बुडाला. ही बाब एका प्रशिक्षकाच्या लक्षात आल्यानंतर त्यास दुस-या प्रशिक्षकाच्या मदतीने पाण्याबाहेर काढले व त्यास औषधोपचारासाठी प्रथम खाजगी रुग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार कु. हरेकृष्ण सिंग यास उपचारासाठी कुपर रुग्णालयात दाखल करण्यासाठी नेले असता डॉक्टरांनी दाखल करण्यापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले.

या प्रकरणी प्रथम वर्सोवा पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यू प्रकरण क्रमांक 33/2007 फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 174 अन्वये दाखल करुन तपास करण्यात आला. तपसामध्ये तरणतलाव येथे उपस्थित असलेले दोन प्रशिक्षक, कु. हरेकृष्ण सिंग याच्या मृत्यूस जबाबदार असल्याचे निष्पन्न झाल्याने सरकारतर्फे वर्सोवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे....

178/2007 भारतीय दंडविधान संहिता, 304 (अ) अन्वये दोन प्रशिक्षकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयामध्ये दोन प्रशिक्षकांनी दिनांक 25.7.2007 रोजी 21.15 वाजता अटक करण्यात आली असून त्यांची दिनांक 26.7.2007 रोजी माननीय न्यायालयाने जामिनावर मुक्तता केलेली आहे व गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे. राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळामध्ये आग लागून कोणतीही दुर्घटना घडू नये यादृष्टीने या शाळांमध्ये अग्निशमनयंत्र बसविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार सन 2005-2006 या वर्षी 8 कोटी एवढा निधी जिल्हापरिषदांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना इमारतीच्या दुरुस्तीकरिता दरवर्षी प्रतीशाळा रु. 5000 प्रमाणे सर्व शिक्षा अभियान अंतर्गत अनुदान देण्यात येते.

-----

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनाबाबत**

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी आपल्याल विनंती करतो की, माझ्या निवेदनाच्या संदर्भात आपण आपल्या दालनात मिटींग बोलावली तरी मला चालेल.

**उपसभापती** : माझ्या दालनात आपल्या विषयासंदर्भात मिटींग बोलावण्यात येईल हे मी मघाशीच सांगितलेले आहे.

--------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागरी जमीन ( कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 निरसित करणे

**मु.शी.**: नागरी जमीन ( कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 निरसित करणे या विषयावर माननीय मुख्यमंत्री यांचा वैधानिक प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु........

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे, आपण युएलसीच्या प्रस्तावावरील चर्चा पुढील अधिवेशनात घ्यावी. कारण माझ्यासहित अनेक सन्माननीय सदस्यांना या चर्चेत भाग घ्यावयाचा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझीही आपणास विनंती आहे की, आपण या प्रस्तावावरील चर्चा पुढील अधिवेशनात घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते ऑनलेग राहतील.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना माझी विनंती आहे की, त्यांनी त्यांचे भाषण सुरु करावे नंतर आपण याबाबत निर्णय घेऊ.

श्री.दिवाकर रावते ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी उभा आहे. युएलसी कायदा रद्द केल्यामुळे मुंबई शहराच्या जडणजडणीमध्ये मूलभूत फरक होणार आहे. मुंबई बेटावर चिंताजनक परिस्थिती निर्माण होणार आहे. तेव्हा या संदर्भात सखोल चर्चा करण्याची आवश्यकता आहे. ही चर्चा मुंबईतील कानाकोप-यातील मोकळ्या जमिनीच्या संदर्भात करावी लागेल. या संदर्भात सरकारने कोणकोणते निर्णय घेतले ते आम्हाला समजून घ्यावे लागतील. गेल्या 30 वर्षात या कायद्याची अंमलबजावणी करण्यास शासन अपयशी का ठरले हे समजून घ्यावे लागणार आहे. हा कायदा रद्द केल्यानंतर एकूण किती जमीन उपलब्ध होणार आहे ? या मोकळ्या जमिनींवर नवीन घरे बांधली जातील ती कोणासाठी असतील ? असे अनेक प्रश्न या प्रस्तावात गुंतलेले आहेत. या प्रस्तावाची व्याप्ती खूप मोठी आहे....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी ही चर्चा येथेच थांबवित आहे. या प्रस्तावावरील चर्चा पुढील अधिवेशनात घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे ऑन लेग आहेत.

मी आता अर्धातास चर्चेच्या सूचना घेत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी.**: नागपूर येथील महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळातील कामगारांना नियमितपणे पगार न मिळणे

**मु.शी.**: नागपूर येथील महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळातील कामगारांना नियमितपणे पगार न मिळणे यासंबंधी श्री.सय्यद जामा यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.सय्यद जामा ( विधानसभेने निवडून दिलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" नागपूर येथील महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळातील सुमारे 260 कर्मचाऱ्यांना नियमित काम मिळत नसल्याने त्यांना पगार मिळत नसणे, त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची पाळी येणे, त्यामुळे शासनाबाबत जनतेत पसरलेला असंतोष."

सभापति महोदय, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडल के बुनकरों से संबंधित यह प्रश्न है. बुनकरों को डि-लिंक करने की योजना महाराष्ट्र शासन ने दुबारा शुरु की है. सभापति जी की मध्यस्थता से माननीय मुख्यमंत्री ने उनके पेमेंट के बारे में 15 मई को निर्णय किया है. लेकिन अभी तक उनके काम का पेमेंट नहीं हुआ है. ऐसे 4,200 बुनकर हैं, इनको पेमेंट न मिलने की वजह से इन लोगों की हालत बहुत खराब है. इसलिए मेरा माननीय मंत्री महोदय से अनुरोध है कि बुनकरों का डि-लिंकिंग का पैसा जल्दी से जल्दी मिलना चाहिए.

सभापति महोदय, मेरा दूसरा मुद्दा यह है कि जो बुनकर निवृत्त हो जाएंगे, उनको महाराष्ट्र शासन या केन्द्र शासन की तरफ से जो लाभ मिलने वाले हैं, वह लाभ देने के बारे में सरकार की क्या तैयारी है ? 260 कर्मचारियों को वी.आर.एस. मंजूर हुआ है, उनका पेमेंट भी अभी तक नहीं हुआ है. उनको जल्दी से जल्दी पेमेंट मिलना चाहिए, यह मांग मैं इस अर्धातास चर्चा के माध्यम से करना चाहता हूँ. आशा है कि माननीय मंत्री महोदय इस ओर ध्यान देंगे.

. . . भाषण पूर्ण,नंतर पुरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतिश चतुर्वेदी (वस्त्रोद्योग मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जामा यांनी महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळातील 4 हजार विनकरांना संलग्न करण्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांना मी सांगू इच्छितो की, याबाबतीत शासनाने निर्यय घेतलेला आहे. त्या 4 हजार विनकरांना आपण प्रत्येकी 25 हजार रुपयांची राशी देणार आहोत. मागे आपण 4 हजार विनकरांना प्रत्येकी 15 हजार रुपये राशी देऊन संलग्न केले होते. यासंबंधी पूर्वी बैठकही झाली होती. त्यामध्ये 20 हजार रुपयांची राशी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु सन्माननीय सदस्य श्री.सज्जद जामा व विनकरांच्या काही पुढाऱ्यांना ती राशी पसंद नसल्यामुळे राशी देण्यास विलंब लागलेला आहे. याबाबतीत पुन्हा आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेतली व त्यामध्ये प्रत्येकी 25 हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला. यामधील कर्मचाऱ्यांची संख्या 198 असून त्यांच्यापैकी 30 लोकांना आपण अगोदरच व्हीआरएसची रक्कम दिलेली आहे. अजून 150 व्हीआरएस घेतलेले लोक असून त्यांनाही रक्कम देण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. तसेच, ज्या विनकरांनी फेस्टीव्हल ॲडव्हॉंस घेतलेला आहे, तोही माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून तो फेस्टीव्हल ॲडव्हॉंस त्या 25 हजार रुपयाच्या राशीमध्ये कॅल्यूलेट न करता आपण पैसे देणार आहोत. तसेच उर्वरित 150 कामगारांनाही व्हीआरएसची रक्कम देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. यासंदर्भातील पुढील कार्यवाही वित्त विभागाची परवानगी घेऊन लवकरात लवकर त्यांना पैसे देण्याचे काम शासनातर्फे करण्यात येईल. तसेच हातमाग मंडळाच्या ठेक्याच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला व कामगारांना त्यांचा भत्ता मिळण्याच्या दृष्टीने योजना सुरु ठेवावी, अशी विनंती सन्माननीय सदस्यांनी केली. त्यांची विनंती शासनाला मान्य आहे. तसेच त्यांनी हातमाग मंडळामार्फत शेतीमध्ये उत्पादन घेत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, हे काम हातमाग मंडळामार्फत सुरु होणार आहे. तसेच याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी कर्मचाऱ्यांना 4 महिने पगार न मिळाल्याचा मुद्दा उपस्थित केला. याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण सदर कर्मचाऱ्यांना एक महिन्यांचा पगार दिलेला असून तीन महिन्यांचा पगार देणे बाकी आहे, तोही देण्याच्या दृष्टीने शासनाचा प्रयत्न आहे. काही विभागांकडून पैसा

...2

श्री.सतिश चतुर्वेदी ....

येणे बाकी आहे.त्यामुळे याबाबतीत खात्यामार्फत पाठपुरावा करुन तो तीन महिन्यांचा पगारही त्वरित देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. अशाप्रकारे हातमाग महामंडळामार्फत काम सुरु होणार आहे. पूर्वी महामंडळामध्ये 600-700 कर्मचारी होते व ही जनता कापड योजना केंद्र शासनाची होती, ती सन 1998 मध्ये बंद झाली. त्या 600 कर्मचाऱ्यांपैकी फक्त 200 कर्मचारी राहिलेले असून तेही कमी होतील. 50 कर्मचाऱ्यांवर आपला पुढचा कार्यक्रम सुरु होणार आहे. त्यांचेही पगार नियमित होण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करु व पुन्हा असे प्रश्न येणार नाहीत यादृष्टीने आमच्या खात्यातर्फे काळजी घेऊ. याबाबतीत आम्ही विचार विनिमय करणार आहोत. तसेच ही 25 हजार रुपयांची राशी लवकरात लवकर देण्याच्या दृष्टीने त्यांच्या चेक वाटपाचा कार्यक्रम शासनातर्फे लवकरात लवकर घेतला जाईल.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चतुर्वेदी...........

सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत विणकर समाजाच्या लोकांना धनादेश वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येईल आणि ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

**सभापती** : अर्धातास चर्चा संपली आहे.

---------------------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.रामनाथ मोते यांनी दिलेल्या म.वि.स.नियम 93 च्या वैश्यंपायन स्मृतीबाबतचे निवेदन पटलावर ठेवले आहे ते रेकॉर्डवर येणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, नागरी कमाल जमीन धारणा कायद्यासंबंधीच्या विधेयकावर विधानसभेमध्ये चर्चा सुरु आहे. आपल्या सभागृहात देखील यावर चर्चा सुरु करावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते हे ऑनलेग होते. त्यांनी चर्चा सुरु करण्यास हरकत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय उपसभापती महोदय सभापतीस्थानी असतांना त्यांनी निर्णय दिलेला आहे. मी माझे भाषण केले आहे.

श्री.वसंत डावखरे, उपसभापती : सभापती महोदय, आपण म्हणता त्याप्रमाणे मी सभापतीस्थानी असतांना नागरी कमाल जमीन धारणासंबंधीचा प्रस्ताव पुकारला होता. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते हे ऑन लेग होते. मघाशी त्यांनी भाषण सुरु केले आहे. त्यानंतर मी अर्धा-तास चर्चेच्या सूचना पुकारल्या.

**सभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण व इतर सन्माननीय सदस्यांची नांवे एका समितीसाठी सूचविण्यात आली आहेत. विधानसभेकडून तसा प्रस्ताव आल्यानंतर आपल्याला ती मंजूर करावयाची आहेत. विधानसभेकडून तो प्रस्ताव अद्याप यावयाचा आहे. विधानसभेकडून प्रस्ताव येईपर्यन्त मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5.57 ते 6.12 पर्यन्त स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोरले.................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सत्रकाळातील कामकाजाचा आढावा.**

**सभापती** : आज पावसाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आता सभागृहाचे आजच्या दिवसाचे कामकाज संपलेले आहे. मी संत्रकाळातील कामकाजाचा आढावा सभागृहासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 12

एकूण काम - 83 तास

कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यमुळे वाया गेलेला वेळ - 40 मिनिटे.

कोरम नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 05 मिनिटे

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 01 तास 15 मिनिटे.

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 81 तास.

**रोजचे सरासरी कामकाज 6 तास 45 मि.**

**तारांकित प्रश्न**

आलेल्या सूचना - 4194

कार्यवाहीसाठी घेतलेल्या सूचना - 3237

स्वीकृत प्रश्न - 990

तोंडी उत्तरे - 76 प्रश्न.

**अल्पसूचना प्रश्न --**

प्राप्त झाले - 22

स्वीकृत - 04

**नियम 93 सूचना --**

प्राप्त झाल्या - 154 सूचना

निवेदने झाली - 70 सूचना

चर्चा झाली - 66 सूचना.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ........ 18:15

**सभापती** .........

**लक्षवेधी सूचना --**

प्राप्त झाल्या - 1045

मान्य - 267

चर्चा झाली - 48

**विशेष उल्लेख 53 सूचना मांडण्यात आल्या.**

**नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा --**

प्राप्त झाल्या - 2

मान्य झाली -1

**शासकीय विधेयके संमत** - 10

**अशासकीय ठराव चर्चा - 2**

**अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चा** - 1

**अर्धा तास चर्चा** -

प्राप्त झाल्या - 71

मान्य झाल्या - 63

चर्चा झाली - 8

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.**

**सभापती : मी खालील घोषणा करतो, राज्यपालांना अशी शिफारस करण्या**चे ठरले आहे की, " महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक , 03 डिसेंबर, 2007 रोजी विधान भवन, नागपूर येथे घेण्यात यावे."

---------

**पृ.शी./मु.शी.**: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे. आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांकडून आलेला पुढील संदेश वाचून दाखवितो :

" मी, एस. एम. कृष्णा, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याव्दारे गुरुवार, दिनांक 02 ऑगस्ट, 2007 रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( सायंकाळी 6 वाजून 21 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही